

# प्रवाही जीवन

दत्त आपटे यांच्या आयुष्यक्रमाचा मागोवा घेणारे चरित्रात्मक एकटाकी लेखन करता आले असते; पण त्यासाठी कागदोपत्री नोंदी खूप आवश्यक असतात. चरित्रनायकाने स्वत: -संबंधाने जे जितके नोंदविलेले आहे ते त्रोटक आहे. त्यांच्या चरित्राची मांडणी करण्यासाठी, संबंधितांनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणींचा पुरेपूर आधार असल्यामुळे त्या संकलित आठवणींतूनच हे व्यक्तिमत्व साकारणे अधिक सयुक्तिक आहे.

तथापि त्यांच्या व त्यांच्या मित्रगटाच्या तारुण्यातील देशकार्याची पुरेशी कल्पना देणारी मुनी क्षीरसागर यांची हकिकत त्यांच्या शब्दांत तशीच दिली आहे. दत्त आपटे यांच्या कार्याचा दुसरा अति महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची शिक्षणसंस्था. त्यांनी स्वत: त्यासंबंधी प्रारंभापासूनची वाटचाल लिहून ठेवली असल्याने ती या चरित्रभागास जोडून समाविष्ट केली आहे.

या दोन्ही व्यतिरिक्त त्यांच्या जीवनकार्यातील साऱ्या अंगांचा थोडक्यात परामर्श घेण्यात आला आहे. शिवाय व्यक्तिगत बाबी त्यांच्या मुलांनी लेखरूपात दिल्या आहेत. या सर्व उपलब्ध लेखनसाहित्याची सलग जोडणी करण्याने दत्त आपटे यांचे प्रवाही जीवन साकार होत आहे.

*या माहितीचे संकलन शरद आपटे यांनी केले. वडिलांच्या रोजनिशी, पत्रव्यवहार व इतर तपशील यांचा शोध घेऊन त्यांनी प्रयत्नपूर्वक ते सर्व उपलब्ध केले. कुलवृत्तांत व काही सांगोवांगी माहिती यांचा उपयोग पूर्वपीठिकेसाठी केला आहे.*


| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | पूर्वपीठिका व डफळापूर | १८ |
| २ | स्थलांतर व बालपण | २१ |
| ३ | शिक्षण व तरुणपण | २२ |
| ४ | विवाह | २३ |
| ५ | विविध पैलू | २४ |
| ६ | मुनींची स्वातंत्र्य चळवळीची हकिकत | ३९ |
| ७ | 'यंगमेन्स सोसायटी'ची वाटचाल | ५७ |



# प्रवाही जीवन

## पूर्वपीठिका

आपटे घराणे कौशिक गोत्री, चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणाचे आहे. चित्पावन ब्राह्मणांच्या मूलस्थानाबाबतीत अितिहासकार आणि मानव वंशशास्त्रज्ञ यांच्यातही अेकमत नव्हते. मात्र अलीकडच्या संशोधनांतून, आणि विशेषतः ब्राह्मण समाजातील जागृतीमुळे त्या बाबतीत आलेल्या सखोल तर्कबुध्दीतून त्याविषयी बरेचसे नेमकेपण आले आहे. त्यानुसार परशुरामाने आपल्या परिश्रमांतून, तपश्चर्येतून व ब्राह्म-क्षात्र तेजाच्या आविष्कारातून अपरान्त भूमी वसविली. साधारणतः केरळपासून ते गुजरातच्या दक्षिणेपर्यंतची किनारपट्टी आजच्या काळातही 'कोकण' म्हणून ओळखली जाते. ती भूमी बाह्य आक्रमणांपासून तशी सुरक्षित, निसर्ग रमणीय, आणि प्रागैतिहासिक काळातही राजकीय घडामोडींपासून दूर होती. अेवम् च संशोधन, वेदाभ्यास, तपाचरण यांसाठी अनुकूल होती. शिवाय त्या भूमीची गरजेपुरती साफसफाअी करून तिथे कृषीवलांचे निर्मितीप्रयोग सुरू झाले.

या प्रकारचाच तेथील लोकांचा आयुष्यक्रम प्रदीर्घ काळ राहिल्यामुळे 'बाहेरच्या जगात' त्यांच्या कार्याची वा संस्कृतीची दखल फारशी घेतली गेली नव्हती; आणि बाह्य जगातील आपल्याविषयीच्या अज्ञानाची दखल या कोकणस्थानीही घेतली नव्हती. 'कोकणस्थ' हा शब्द १७१५ सालाच्या आधी वापरांत दिसत नाही. मराठी दौलतीचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट याच्या कारकिर्दीपासून तो शब्द प्रचलित झाल्याचे दिसते. तोपर्यंत ते लोक व्यवसाय म्हणजे केवळ कृषीचा करीत. काही चित्पावन गुप्तहेर, हरकारे अशी कामे करीत. कालक्रमाने पोटासाठी स्थलांतर करू लागल्यानंतर कोकणस्थ चित्पावनांची पांगापांग सुरू झाली.

मानववंशाच्या ख्यातनाम अभ्यासक अिरावती कर्वे यांच्या म्हणण्याप्रमाणे चित्पावनांच्यात गौरवर्ण आणि डोळ्यांची रंगच्छटा पिंगट-घारी, तपकिरी अशी असते. त्यांच्यात कुमारिकेला पार्वतीचे रूप मानून सन्मानाचे स्थान असते. शिवाय त्यांच्यात आर्य आणि द्रवीड रक्तातील गुणसूत्रांचा वाटा आहे. प्रथमपासूनच्या सामाजिक निरीक्षणांनुसार चित्पावन ब्राह्मण हे विविध कारणांसाठी संचार करणारे, स्थलांतरित वर्गात मोडतात. त्यामुळे ते काटकसरी, बोलण्या-वागण्यात स्पष्ट व्यवहारी, आणि कष्टाळू असतात. पैशाचा अतिरेकी व अन्यायी मोह ते ठेवीत नाहीत; डोळस धर्मपरायणता आणि पापभीरुता ही चित्पावनांची वैशिष्ट्ये आहेत. धर्माचा अतिरेक न करता, आधुनिक विज्ञाननिष्ठ जीवनाशी ते जुळवून घेतात. त्या समाजातील व्यक्तींनी स्वातंत्र्यलढा, राजकारण, धर्मकारण, साहित्य, संगीत-नाटक-कला अशा अनेक क्षेत्रांत ठसा अुमटविला आहे. त्यांची तुलना अनेकदा, बाहेरून काटेरी परंतु आतून रसाळ असलेल्या फणसाबरोबर; किंवा बाहेरून कठीण पण आतून गोड पाणी व मअू-लुसलुशीत

खोबरे असलेल्या श्रीफळाशी केली जाते.

वेदशाखेप्रमाणे चित्पावनांचे ऋग्वेदी आणि यजुर्वेदी असे भाग आहेत. आपटे हे यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेतील आहेत. तैतिर्यांत हिरण्यकेशी, आपस्तंभ, आणि बौधायन ही तीन सूत्रे आहेत; त्यांपैकी आपटे हे हिरण्यकेशी शाखाध्यायी आपस्तंभ आहेत. त्यांचे गोत्र कौशिक. अध्ययनासाठी ज्या ऋषींची परंपरा आचरिली जाते, ते त्या घराण्याचे गोत्र मानण्यास हरकत नाही. संगीताच्या क्षेत्रांत जसे ग्वाल्हेर, जयपूर, किराना ही घराणी त्यांच्या अध्ययनपध्दतीवरून असतात, तशीच ही अध्ययन परंपरा म्हणावी. कौशिक हे विश्वामित्राचे नाव आहे. कुशकाचा नातू म्हणून तो कौशिक. तो कान्यकुब्ज देशीचा राजा होता. जन्माने क्षत्रिय पण तपःसामर्थ्याने तो ब्रह्मर्षीपदाला पोचला. मोरपिसातील रंगांची उधळण, मोराच्या अंड्यातील द्रवातून येते असे म्हणतात. त्याचप्रमाणे ज्ञातीचा हा तपशील पाहिल्यानंतर आपटे कुलोत्पन्न दत्तोपंतांच्या अुपजत गुणवैशिष्ट्यांची संगती सहजपणे लागू शकेल.

अशा कुलातील आपटे घराण्याचा ज्ञात मूळपुरुष विश्वनाथभट याचे स्थान आजगाव; हे वेंगुर्ले-सावंतवाडी रस्त्याला आहे. सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हा भाग गिरी-सागराच्या सान्निध्यात आहे. या ठिकाणची माणसे कालौघात स्थलांतरित झाली. त्यांची अेक शाखा कोकणातील त्र्यंबक - देवाचे गोठणे या ठिकाणी गेली. त्यांपैकी ११व्या पिढीतील मोरेश्वर (मोरभट). त्यानंतरच्या बाळंभट यांना दोन मुलगे, केशव आणि नारायण. त्यांतले नारायण हे दत्त आपटे यांचे वडील. कोकणातून यांतील कोणती पिढी नेमकी कधी व कोणत्या कारणांनी देशावर आली याचा अुलगडा झालेला नाही, पण अुदरनिर्वाह आणि कर्तबगारीला काही वाव मिळण्यासाठीच स्थलान्तर होत असते हे तर अुघड आहे.

मराठी राज्याचे सातारे - आणि आदिलशाहीचे विजापूर ही शहरे जोडणाऱ्या तत्कालीन मार्गावर, जत हे अितिहास काळातील डफळे सरदारांच्या जहागिरीचे गाव होते. त्या जहागिरीच्या वाटण्या होअून डफळापूर हे डफळे कुटुंबातील जहागिरीचे वेगळे गाव झाले. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस डफळापूरच्या जहागिरीवर जे पुरुष होते, ते अकाली वारले. त्यांच्या मागे त्यांच्या विधवा राणीसाहेब त्यांची जहागीर सांभाळून होत्या. त्या जहागिरीचे कारभारी म्हणून नारायण बाळकृष्ण आपटे हे रुजू झाले. डफळापूर हे जतपासून स्वतंत्र झाले होते तरी त्या अुभय कुटुंबांत स्थावर मालमत्तेचे काही वादविवाद होते, ते हाताळण्याचे काम डफळापूरचे 'आपटे कारभारी' पाहात असत. शिवाय अिंग्रज राज्यकर्त्यांच्या धोरणानुसार, त्या बाअीसाहेबांनी वारस म्हणून दत्तकपुत्र घेण्यातही अडचणी अुभ्या केल्या जात होत्या.

या राजकारणांसाठी आणि जत-डफळापूरच्या विवादप्रश्नासाठी नारायणराव आपटे कारभारी आपले कौशल्य वापरीत होते. स्वाभाविकच त्यांचा मुक्काम डफळापुरात पडला. तिथे त्यांच्या अधिकाराला शोभेल असा वाडा राहण्यासाठी दिलेला होता. त्यांनी त्या काळातील रूढीप्रमाणे काही शेतमळा विकत घेतला. तिथे विश्वासार्ह वाटेकरी होते. शेतीचे ठरलेले अुत्पन्न ते कारभाऱ्यांना देत असत. लिंगू माळी आणि चव्हाण आडनावाचे कोणी वाटेकरी त्यांची जमीन करत असत, असे अैकिवात आले. प्रदीर्घ कालखंडानंतर १९८० साली त्या आपटे कुटुंबातील नारायणरावांचे वारसदार आणि भावंडे डफळापूरला भेट देण्यासाठी गेले असता, त्या गावातील जुन्या जाणत्या पिढीतील लोकांनी 'आपटे कारभाऱ्यां'ची कर्तबगारी आपापल्या वाडवडिलांकडून समजलेली असल्याचे बोलून दाखविले होते. डफळापूरचा आपट्यांचा वाडाही त्या वारसांना पाहता आला, त्या प्रसंगी अुपस्थित असणाऱ्या वारसदारांत गोपाळ, विनायक, दत्त हे नारायणरावांचे मुलगे आणि सोनू ही कन्या यांचा समावेश होता. तो वाडा आज सुस्थितीत नाही.

डिसेंबर २०१७ मध्ये या वाड्याची माहिती घेण्यासाठी डफळापूरला भेट दिली. ग्रामपंचायतीत हा वाडा त्यांच्या नोंदीला नाही असे कारकुनाकडून समजले. ब्राह्मणवस्तीत दत्त मंदिराजवळ रघुनाथ शंकर कुलकर्णी राहतात, ते पूर्वीच्या काळी ग्रामसेवक होते; दत्त मंदिरासमोर आपटे वाडा म्हणून पूर्वी ओळखला जात असे, तो माळी नावाच्या कुणी घेतला असून, ग्रामपंचायत १९५५ साली स्थापन झाली

तेव्हापासून आपटे या नावावर कोणतीही मिळकत नाही असे ते म्हणाले. जत रस्त्याला बस स्टँडजवळच ओढ्यावर एक पूल आहे तो आपटे कारभारी असताना बांधला गेला, तशी कोनशिला त्या पुलाच्या भिंतीवर होती; ती कुलकर्णी व जवळच्याच हॉटेलचे मालक पुरोहित म्हणून आहेत त्यांनीही पाहिल्याचे सांगितले. पूल जुन्या बांधकामाचा भक्कम असला तरी पश्चिमेचा कठडा काढून नवीन केला आहे. तिथे ही कोनशिला असल्याचे सांगतात.

आपटे कारभाऱ्यांचे विसाव्या शतकारंभीचे ते घर अर्थातच अुत्तम नांदते होते. बाअीसाहेबांच्या जहागिरीच्या कामात नारायणराव आपटे व्यग्र होते. त्यानिमित्ताने त्यांना परगावी - पुण्यामुंबअीस, राजकारण घेअून जावे लागत असे. त्यांचे वडील निवर्तले होते, केशवपन केलेली विधवा आअी घरी होती. ती मोठ्या खंबीर मनाची व व्यवहारचतुर होती. फटकळ आणि तडफेची असूनही अत्यंत मायाळू होती. तिला सारेजण 'बाअी'च म्हणत. नारायणराव यांची पत्नी पेंडसे घराण्यातील, तिचे नाव गंगाबाअी. हे दांपत्य मनमिळाअू, पण लोकहितासाठी दक्ष म्हणूनच त्या भागात ओळखले जाअी. या दांपत्याचा प्रपंच बहरात होता. या वेळपावेतो त्यांना ९अपत्ये झाली होती, त्यात पाचजण मुलगे आणि चार लेकी होत्या.

या पाच भावंडांत वासुदेव, हरी, गोपाळ, विनायक आणि दत्त ही मुले. जना, मनू, बनू, अंबू या कन्या होत्या. गोपाळ १९०० सालचा, विनायक १९०६, आणि दत्तूचा जन्म ३ फेब्रुवारी १९१०चा. नारायणरावांस बहीण नव्हती, अेक बंधू होते, असे 'कुलवृत्तांत' सांगतो. पण त्यांच्याशीही विशेषसे संबंध पुढच्या काळात राहिले नसावेत. नारायणरावांस त्यांच्या पत्नीच्या माहेरकडून -म्हणजे लेकी वारशाने, तासगावजवळ डोर्ली गावी काही शेतजमीन आली होती. आपटे मंडळीस सांगलीत वडिलार्जित छोटे दुमजली घर होते, पण तिथून डफळापूर हे नोकरीचे ठिकाण फारच दूर होते. त्यामुळे सांगलीच्या घरात फारसा वावर नव्हता. डोर्लीच्या जमिनीचे काही अुत्पन्न येत असे, त्यातील शेतमाल विक्रीसाठी सांगलीच्या पेठेला येण्याची रीत होती. दत्तूच्या आधीचे भाअू गोपाळ हे डोर्लीहून बैलगाडीने शेतमाल घेअून सांगलीला त्यांच्या अुगवत्या तरुणपणात येत असल्याचे ते सांगत. अेक प्रसंग त्यांच्या सांगण्यात येअी. तो असा की, रात्रीच्या वेळी प्रवासात भरलेल्या गाडीवर ते झोपलेले होते. गाडीवान पुढच्या दांडीवर बसून गाडी हाकीत होता. मागच्या बाजूने खस्‌खस्स आवाज येत असल्याचे अैकून ते दोघे सावध झाले, तर गाडीत भरलेल्या मालाची पोती फाडून काही चोर मागच्यामागे ओरबाडून घेत होते. त्यांना हटकल्यावर या लोकांचा आवाका पाहून ते पळून गेले. असल्या प्रसंगांना तोंड देण्याची बेडरता या आपटे भावंडांत होती, हे त्यातून लक्षात येअू शकते.

नारायणराव आपटे कारभाऱ्यांची कार्य-कर्तबगारी भरात होती. डफळापूर जहागिरीच्या वारसाच्या वतीने ते कारभार चालवीत असले तरी त्यातील राजकारण आणि वाद सुरू होतेच. या बाबतींत सल्ला घेण्यासाठी त्यांनी लोकमान्य टिळक यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्याची, भेट घेतली होती, असे आधीच्या आपटे पिढ्यांकडून सांगण्यात येत असे. तो १९१४चा काळ. यावेळी टिळक मंडाले कारागृहातून परत आले होते. टिळकानी त्यांना त्या काळातील अेक आदरणीय व्यक्तिमत्व असलेले अण्णासाहेब पटवर्धन यांना भेटून त्यांचे मार्गदर्शन घेण्याबद्दल सुचविले. कारभाऱ्यांचा मोठा मुलगा वासुदेव पुण्याच्या शेतकी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाची परीक्षा देअून आलेला होता. दोन तीन कन्यांची लग्ने झालेली होती. पण बाकीची मुले अजून लहान होती, शाळकरी होती.

अशा वातावरणात अण्णासाहेब पटवर्धन यांची भेट घेण्यासाठी म्हणून नारायणराव हे पुण्याला गेले होते. दुर्दैवाने तिथे साथीच्या प्लेग रोगाने त्यांना गाठले; आणि पाहता पाहता त्यातच ते निवर्तले. ही बातमी डफळापुरात येअून धडकली तेव्हा काय आकांत अुडाला असेल याची कल्पनाच केलेली पुरे! थोरल्या वासुदेवाच्या कृषी पदवीचा (बी अेजी) निकाल त्याच वेळी जाहीर झालेला होता. ते अुत्तीर्ण झाले पण त्या निमित्ताने वाटले जाणारे पेढे ताटातच राहिले. आपटे कुटुंबावर आकाश कोसळले.

डफळापूर जहागिरीलाही हा फार मोठा धक्का होता. त्या धक्क्यातून थोडे सावरल्यावर घरातली कर्ती महिला म्हणून नारायणरावांच्या आअीने सांगलीला राहायला

जाण्याचा निर्णय घेतला. या आपटे घराला नव्या सुधारणांचे वारे लागलेले असल्यामुळे नारायणरावांच्या पत्नीने -म्हणजे गंगाबाअीने केशवपन केले नाही, तथापि तिच्या अुदरी दहावे अपत्य वाढत होते. सुनेच्या पदरातील अुगवत्या वयाची तीनचार मुले आणि तिच्या अुदरातील गर्भ यांसह बाईने डफळापूरचा निरोप घेतला. सांगलीत पाअूल ठेवण्यापुरते वडिलार्जित घर होते, अेवढेच सांगलीत येण्याचे कारण; आणि मुलांना हातपाय हलविण्यास डफळापूरपेक्षा अनुकूलता होती, हेही दुसरे कारण होते.

▪ ▪ ▪

सांगलीच्या गावभागात दोन नंबरच्या शाळेमागे आपट्यांची जागा होती. त्यात आणखीही अेक भावकी राहात होती. त्यातल्या पुढच्या  रस्त्यालगतच्या भागात या कुटुंबाने आपला पेटारा-बिस्तारा टाकला आणि हे कुटुंब सांगलीकर झाले. यावेळी विनायक आठ आणि दत्तू चार वर्षांचा होता. विपन्नावस्था असली तरी मुलांनी चार बुके शिकण्याला तर पर्याय नव्हता. गोपाळ सांगलीच्या सरकारी हायस्कूलात जाऊ लागला, आणि धाकटे दोघेजण घरासमोरच्या मराठी २नं. शाळेत शिकू लागले. दोन-तीन वर्षांतच त्या दोघांनी, नव्याने सुरू झालेल्या सांगली सिटी हायस्कूलात प्रवेश घेतला.

शाळकरी वयात विनायक आणि दत्तूचे अभ्यासाइतकेच -किंबहुना काकणभर अधिक लक्ष खेळावर होते. मल्लखांब, कुस्ती, वैयक्तिक कसरती, पोहणे अशा मैदानी खेळांत त्यांनी शाळेच्या स्पर्धांमधून चमक दाखविली. सिटी हायस्कूलच्या इतिहासग्रंथात या दोन्ही खेळाडूंची १९२०-२५ या कालावधीत नोंद झाली आहे. त्याचबरोबर आईचे आणि आजीचे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक न्याय प्रस्थापित करणारे ठरले. दत्तूचे खास मित्र असलेले अनंता आणि राम क्षीरसागर ही भावंडे सांगलीच्या नदीकाठी आश्रमात राहात असत. माधुकरी मागून त्यांचा निर्वाह चालत असे. दत्तूची आई अनंताला म्हणायची, 'तू एरवी आमच्या घरी अधून मधून जेवतोस, तसा तुझ्या माधुकरीत एखादा दिवस दत्तूलाही जेवायला घाल. कारण माधुकरीचे अन्न पवित्र असते. गावातली सुखदु:खे त्या घासातून कळत असतात.' एके दिवशी माधुकरी मागून अनंता खुशीत घरी आला. माधुकरीत कोणीतरी त्याच्या झोळीत लिंबाचे लोणचे भरपूर घातलेले होते. ती खुशी पाहून अक्काने (दत्तूच्या आई) विचारल्यावर अनंताने माधुकरीची झोळी उघडून दाखविली, पाहातो तर आतल्या ताटलीतील अन्नात अळ्या वळवळत होत्या. अनंताला रडू फुटले. ज्या माऊलीने हे लोणचे वाढले होते तिच्याकडे अक्का स्वत: अनंताच्या दंडाला धरून घेऊन गेली. विटके लोणचे त्या बाईच्या अंगावर टाकून अक्काने तिला दम दिला, 'पोरं माधुकरी मागतात म्हणजे ती रस्त्यावर पडलेली नव्हेत, अभ्यासाकरता धडपडत आहेत. वाढायचं तर चांगलं अन्न वाढा नाहीतर माझ्याशी गाठ आहे हे लक्षात ठेवा.' स्वाभाविकच याची चर्चा गल्लीभर झाली आणि माधुकऱ्यांना चांगले अन्न मिळू लागले.

शालीय स्पर्धांतून विनायक खेळात चमकत असे, दत्तूला वक्तृत्वाचीही देणगी होती. वक्तृत्व स्पर्धेत वरचेवर शाळेला त्यांनी बक्षिसे मिळवून दिली. परंतु शाळेची फी मात्र वेळेवर भरणे कठीण होत होते. एके वर्षी स्पर्धेतील भाषणात त्यांनी इंग्रजी सरकारवर सडकून टीका केली. सरकारच्या विरोधात असला प्रकार करून नसते संकट ओढवून घेण्याचा शाळेचा स्वभाव नव्हता; कारण संस्था चालली पाहिजे! शाळेने तसा दंडक घातला होता, पण तो धुडकावून दत्तूने हे तडफदार भाषण ठोकले. दत्तूच्या या भाषणावर प्रतिक्रिया उमटून त्याला ती शाळा सोडावी लागली. पुढच्या शिक्षणासाठी त्यांनी सांगली हायस्कूलमध्ये नाव दाखल केले. तिथे त्यांनी, व अनंता क्षीरसागर या त्यांच्या मित्रानेही जेमतेम मॅट्रीकची परीक्षा १९३०च्या सुमारास पार पाडून शाळा सोडली. पुढच्या शिक्षणासाठी फी भरणे शक्य नव्हते. नंतरच्या काळात त्यांनी शिक्षणसंस्था स्थापन केली त्या शाळेत, फी भरण्यासाठी पैसे नाहीत या कारणाने कोणालाही शाळा सोडावी लागू नये याची त्यांनी सतत काळजी घेतली.

एकदा मित्रमंडळी कृष्णेच्या पुरात नावेतून नृसिंहवाडीला जायला निघाली. वाटेत रात्र झाली. आपण कोठे आहोत हे कळेना. किनाऱ्यावरील एका झोपडीत

दिवा पाहून नाव तिकडे नेली. पाऊस कोसळत होता, पाणी चढत होते आणि लाटापण भरपूर होत्या. नाव एका झाडाला बांधली. नाव बांधायला दोरी नव्हती. धोतराचा उपयोग करून ती बांधली. वल्ही आणि नाला सोबत घेऊन राड, चिखल, काटेकुटे पार करीत सर्वजण त्या झोपडीत गेले. इतक्या रात्री ही बामणाची मुले पाहून झोपडीतल्यांना आश्चर्य वाटले.रात्र तिथेच काढून सकाळी सगळे नरसोबावाडीला मार्गस्थ झाले. पुरात नाव घेऊन गेलेली मुले रात्री घरी आली नाहीत, त्यावेळी पालकांची अवस्था काय झाली असेल याची कल्पना आज अंगावर शहारा आणणारी आहे; पण त्या काळातल्या अशा तरुणांची रग पालकांचाही धीर सुटू देस नसे.

१९३५ साली दत्तोपंतानी शिक्षणसंस्था स्थापन केली, तेव्हा त्यांचे वय २५ वर्षांचे होते. स्वत:च्या शाळेत शिक्षकी पेशा स्वीकारल्यानंतर 'यंगमेन्स' आणि 'मॉडेल' या दोन संस्थांचे एकत्रीकरण करावे लागले, शिवाय दत्त आपटे हे पदवीधर नसल्यामुळे ठराविक कालावधीतच त्यांनी पदवी घेतली पाहिजे असा निर्णय विद्यापीठ मान्यता समितीने दिला; आणि तरच त्या शाळेस मॅट्रीकच्या वर्गासाठी मान्यता मिळणार होती. अर्थातच त्यामुळे दत्तोपंतांचे इंटरच्या वर्गाशी रखडलेले शिक्षणाचे गाडे पुढे सरकले आणि मॅट्रीकनंतर १४ वर्षांनी त्यांनी बी.ए. ची पदवी मिळविली. स्वत:च्या शाळेला मान्यता मिळण्यासाठी पदवीची अट नसती तर ती पदवी मिळविण्याच्या भानगडीत पडलोही नसतो, असे त्यांनीच नमूद केले आहे. विलिंग्डन कॉलेजच्या एरवीच्या तासांना न जाता परीक्षा देता येण्यासारख्या होत्या. विलिंग्डन कॉलेजचे आवार सांगली-मिरजेच्या साधारण मध्यावर असले तरी ते, संस्थानच्या हद्दीत गणले जात नव्हते. एव्हाना दत्तोपंतांच्या चळवळींमुळे त्यांना इंग्रज सरकारकडून अटक होण्याचा बराच संभव होता. म्हणून ते कॉलेजकडे जाणे टाळत होते. पण परीक्षेपुरते तरी कॉलेजवर जाणे भाग होते. अशा परिस्थितीत विलिंग्डन कॉलेजचे प्राचार्य गोकाक यांच्या मदतीने स्वतंत्र गुप्त खोलीत बसण्याची व्यवस्था करून परीक्षा देता आली. १९४४ साली ते पदवीधर झाले. इतिहास आणि अर्थशास्त्र असे त्यांचे विषय होते. खेळातील आवडीमुळे त्यांनी डीपीएड् (क्रीडा शिक्षणातील पदविका) हा कोर्सही केला, तसेच राष्ट्रभाषा हिंदीच्या काही परीक्षा दिल्या. त्यांच्या सर्व्हिसबुकातील नोंदीनुसार या सर्व शैक्षणिक अर्हतेची माहिती मिळते.

स्वत: स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेच्या प्रारंभकाळाच्या वाटचालीबरोबरच त्यांच्या सार्वजनिक जीवनाचीही सुरुवात झाली होती. ऐन तारुण्याच्या उमेदीत असताना चळवळीच्या संबंधी काही वस्तू घरात हळूच येऊ लागल्या होत्या. एकेवेळी त्यांची आई अक्का घर शेणाने सारवत होती. उंदीर घुशींनी केलेली बिळे मुजवत असताना तिला एका बिळात काहीतरी वस्तू दिसली. तिने ती वर काढल्यावर सोन्याचे काही जिन्नस असल्याचे दिसले. ती बिचारी भिऊन गेली. मग चळवळीसाठीच्या कुठून तरी पैदा केलेल्या या खजिन्याबद्दल दत्तूला सर्व प्रकार घरी सांगावा लागला.

यानंतरच्या पुष्कळशा घडामोडी त्यांचे मित्र अनंता क्षीरसागर यांनी त्यांच्या निवृत्त काळात नोंदवून ठेवल्या आहेत. त्या पुढच्या काही पृष्ठांमध्ये प्रकाशित केलेल्या आहेत. तसेच ऐन उमेदीच्या काळात दत्तोपंतांनी शिक्षणसंस्थेची जी उभारणी केली, तिचाही इतिहास त्यांच्याच शब्दांत लिहिला गेला आहे तोही यानंतरच्या पृष्ठांमध्ये आहे.

▪ ▪ ▪

तरुणपणाच्या धामधुमीत इच्छित कार्याच्या मागे धावत असताना अविवाहित राहाण्याचा संकल्प त्यांनी केला होता परंतु नंतर तो बारगळला. १९३९ साली त्यांचे लग्न जमून आले तेव्हा ते २९ वर्षांचे होते.

म्हणजे त्या काळात त्यांचे विवाहवय उलटून गेले होते. किशोरवय संपल्यापासून त्यांचे मन सामाजिक व राष्ट्रीय कार्यासाठी ओढ खात होते. शिवाय त्यांच्या लहानपणी वडील गेल्यानंतर, साऱ्या भावंडांसह ते कुटुंब सांगलीत पाऊल टाकून स्थिरावले असले तरी आर्थिक दृष्ट्या ओढघस्त संपलेली नव्हती. त्यामुळे अविवाहित राहण्याचा निर्णय त्यांनी पूर्वीच घेतला होता आणि बरीच वर्षे तो ठामपणे पाळलाही होता.

तथापि त्यानी विवाह करावा यासाठी घरची मंडळी आग्रह करीत होती; त्याचबरोबर त्यांच्या सर्वव्यापी व्यासंगामुळे संपर्कात आलेला नवस्नेही-परिवार त्यांना, लग्न करून 'आधी प्रपंच करावा नेटका' हे पटविण्याच्या प्रयत्नांत होता. ना.प. थत्ते, बाबूराव नाईक, तालमीतले खेळगडी आणि पुण्या-मुंबईतील प्रतिष्ठित परिचित त्यांना आपुलकीने समजावत होते.

बडोदा येथे रा.ना. दांडेकर हे विद्वान प्राध्यापक होते. त्यांची मेव्हणी कृष्णा उर्फ कुशी हिच्यासाठी दांडेकरांनी दत्तोपंतास विचारणा केली. कृष्णा ही जबलपूरच्या मटंगे कुटुंबातील मुलगी. दत्तोपंतांचे मेव्हणे शरद मटंगे यांनी दिलेल्या माहितीवरून कोकणातल्या गुहागर जवळच्या वेळणेश्वर या सागरतीराचे हे मूळचे जोशी कुटुंब. त्यांच्यापैकी कोणी एक वंशज नाशिक क्षेत्री स्थलांतरित झाला. तिथे रामाच्या देवळात हे मृदंग वाजवीत. त्यावरून त्याना मृदंगे जोशी म्हणत, त्याचे पुढे मटंगे झाले.

जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजात दत्तात्रय गोपाळ मटंगे हे पदार्थविज्ञान (फिजिक्स) विषय शिकवीत. त्यांना 'फिजिकल सोसायटी ऑफ इंग्लंड'ची फेलोशिप होती. ते नावाजलेले प्राध्यापक होते व त्यांनी 'अपेक्षावाद' या नावाचे मराठी पुस्तक अल्बर्ट आईन्स्टाईनच्या सापेक्षता सिद्धांताविषयी प्रकाशित केले होते, प्राध्यापक मटंगे यांना दहा मुले; त्यातला सर्वांत थोरला नृसिंह उर्फ नाना मॅट्रिक होऊन पुढे शिकण्यास बनारसला गेला होता. साऱ्या भावंडात तिसरी आणि मुलीत दुसरी कुशीताई.

जबलपुरात कॉलेजच्या आवारात मटंगे या प्राध्यापकासाठी प्रशस्त बंगला होता. घरात गडीमाणसे-घोडागाडी-गायी गोठा असा सरंजाम होता. या भावंडांचे वडील आण्णा व आई जीजी हे वत्सल कुटुंब होते. घरात पुरोगामी सुधारणावादी वातावरण होते, आधुनिक शास्त्र-विज्ञान हे चर्चेचे विषय होते. वाचन-लेखन-कला-संगीत यांना स्थान होते. आण्णा चांगले गात. जीजीला देशी औषधांचे ज्ञान होते.

१९३६च्या उन्हाळ्यात आण्णा मटंगे हे जीजीसह त्यांच्या नऊ मुलांना घेऊन पुणे पाहायला आले होते. तेथील मुक्कामात असताना आण्णांची प्रकृती बिघडली. खोकला फार वाढल्यामुळे अस्वस्थता होती. त्यांना डॉक्टरांचे औषध चालू होतेच, पण त्याचा उपयोग न होता त्यांचे पुण्यात प्राणोत्क्रमण झाले. नऊ मुलांसह जीजी जबलपुरास परत आल्या. कॉलेज आवारातील बंगला सोडून त्या गावात राहायला आल्या व खंबीरपणे संसाराची सूत्रे त्यांनी हाती घेतली. त्यांची दुसरी कन्या कुशीताई त्यांच्या मदतीला हाताशी होती. ती मॅट्रिक झाली होती, ती चांगले गात असे, शिवण-भरतकाम यांत ती निपुण होती. धाकटी विजया(दामले -प्रशांत दामलेची आई) हीसुद्धा त्या कलांत पारंगत होती.

इकडे दत्तोपंतांच्या घरी लग्नासंबंधी बोलणी करावीत, बैठका कराव्यात, याद्या-रुखवत जमवावे, देणी-मानपान सजवावे, देवधर्म-दैवतपूजा पाखाळावी असे काहीही नव्हते. त्यांचे आई-वडील निवर्तले होते. थोरले भाऊ त्यांच्या त्यांच्या प्रापंचिक विवंचनेत पांगलेले होते. त्यांच्या स्नेहीसोबत्यांच्या उपस्थितीत लग्नसमारंभ साधेपणी पार पडला.

एका मोठ्या संपन्न घरातून व आधुनिक वातावरणातून कुशीताई मटंगे सांगलीसारख्या छोट्या, परंपरावादी गावात उषा आपटे म्हणून दत्तोपंतांच्या घरी आल्या. नव्या वातावरणाशी त्यानी जुळवून घेतले. दत्त आपटे यांचा सशस्त्र चळवळीतला सहभाग, पोलीसचौकशीचा हंगामा, धावपळ, सार्वजनिक कार्यामुळे घरात आल्यागेल्यांची सतत वर्दळ... अशा धबडग्यात त्या बुडून गेल्या. त्यांना माहेरी फारसे जाता आले नाही पण मुंबईला दत्तोपंतांचे साडू गाडगीळ यांच्याकडे दत्तोपंतांचे सतत जाणे-येणे राहिल्याने तेवढ्या बहिणीच्या संपर्कात त्या राहिल्या.

उषा आपटे इकडे दत्तोपंतांच्या घरच्या गोतावळ्यात 'उषामामी' झाल्या. दत्तोपंतांची विधवा बहीण अंबूताई ताम्हनकर, ही दत्तोपंतांच्या आधाराने जवळपास राहात असे. तिच्या मुली व अन्य भाचरे त्यांना 'मामी' म्हणत. ते ऐकून -पूर्वीच्या प्रथेनुसार साऱ्या गोतावळ्याच्या त्या उषामामी झाल्या. त्यांची मुलेही त्या उभयतांस 'दत्तूकाका' आणि 'मामी' म्हणू लागली.

त्यानंतरही स्वातंत्र्यचळवळीत सक्रीय झाल्यामुळे दत्तोपंत प्रपंचात गुंगले नाहीत. लग्नानंतर आठ वर्षांनी त्यांना

पहिले अपत्य झाले. नंतरच्या दोन अपत्यांना बालमृत्यू आले. त्याची थोडीशी धास्ती घेऊन त्यांची पत्नी उषाबाई बाळंतपणासाठी किर्लोस्करवाडीला दत्तोपंतांचे बंधू गोपाळकाका यांच्याकडे गेली होती. रोहिणीचा जन्म तिथला. कामाच्या व्यापात कुटुंबासाठी द्यायला त्यांना फारसा वेळ मिळत नसेल, परंतु सगळ्या कौटुंबिक गोतावळ्याचे केंद्रस्थान त्यांनी मिळविले होते. सगळे भाऊ-बहिणी आणि विशेष करून त्या सर्वांची मुले यांच्याशी दत्तूकाकांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते राहिले.

१९६१ साली त्यांनी पन्नाशी उलटली होती तेव्हा त्यांना अर्धांगाचा सौम्य झटका आला होता. अस्सल सातारी तंबाखूचा 'बार' ते भरत असत. त्यांच्या या आजारात सुरुवातीला तंबाखू लागली असेल असे त्यांना व इतरांना वाटले. परंतु नंतर त्यांची डावी बाजू किंचित लुळी पडत असल्याचे लक्षात आले. वेळेवर काही उपचार झाले. परंतु त्यानंतर काही व्यायाम आणि मसाज आवश्यक होते. मारुती कांबळे हा त्यांचा सोबती सावलीसारखा दिमतीला असे; त्याने शास्त्रोक्त मसाज आणि सर्व शुश्रुषा केली आणि दत्तोपंत हळूहळू पूर्ववत् झाले. यावेळी त्यांनी नुकतीच पन्नाशी पार केली होती. पदरी पाच लहान मुले होती. अशा वेळी हा आजार सर्वांनाच धक्का देऊन गेला, पण कांबेळेचे परिश्रम आणि दत्तूकाकांची इच्छाशक्ती यांमुळे तो धक्का पार झाला. पुढे काही दिवसांवर प्रजासत्ताकदिन आलेला होता. 'त्या दिवशी मी चालतच शाळेला जाईन,' असा निश्चय जाहीर करून त्यांनी घरात प्रयत्न सुरू केले. छपराला दोर बांधून चालण्याचा सराव केला आणि खरोखरीच ते २६ जानेवारीला ध्वजवंदनासाठी स्वत:च्या पायाने चालत शाळेत गेले.

▪ ▪ ▪

कोणत्याही अभ्यासू आणि समाजशरण असलेल्या तरुणाला साम्यवादाचे तत्त्वज्ञान आकर्षित करते. दत्तोपंतही समाजवादी आणि साम्यवादी विचारांचा समन्वय करून काही समाजकारण करू पाहात होते. ते मार्क्सच्या तत्वज्ञानाचे अभ्यासक होते. शाळेत शिकवतानाही जागतिक संदर्भ देऊन ही चर्चा विद्यार्थ्यांशी करत असत. त्यातूनच कामगार चळवळीकडे ते ओढले गेले. त्या काळातील पदवीधरांना हायकोर्ट प्लीडर अशी एक परीक्षा देऊन वकिली करता येत असे. त्यांचे एक सहकारी अशी परीक्षा देऊन कामगार न्यायालयात वकीली करू लागले होते. कामगारांचे प्रश्न मांडण्यासाठी आपणही तसे करावे हे दत्तोपंतांना वाटू लागले. त्यांच्या अंगी आवश्यक ते सर्व वकिली गुण होते तथापि त्याच संदर्भात ते आपली उणीव सांगतात की, खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणे हे त्यांच्या स्वभावाला पटण्यासारखे नव्हते..

२२ मे १९६५ला सांगलीच्या साखर कामगार सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली. सांगलीच्या साखर कारखान्याचे नेतृत्व, दत्तोपंतांचे निकटचे स्नेही वसंतदादा पाटील यांच्याकडे होते. या कामामुळे दोघांचे पक्ष एकमेकाच्या विरोधात असले तरी त्यांच्या व्यक्तिगत जिव्हाळ्यात काडीमात्र फरक पडला नाही. हा त्या काळाचा आणि त्याकाळच्या शिकवणुकीचा परिणाम म्हटला पाहिजे. त्या दोघांचे संबंध नेहमीच सौहार्दाचे राहिले. नंतरच्याही काळात दत्त आपटे यांच्या बहुतांश उपक्रमात दादांचे संपूर्ण सहकार्य राहिले. आणि राजकारणी घडामोडीत दादांचे राजकीय खच्चीकरण करण्याचे प्रयत्न झाले त्यावेळी दत्तोपंत दादांच्या पाठीशी भक्कम उभे होते.

कामगारांचे हित जपणारी युनियन व्यवस्थापनाला अडचणीची वाटणार. १९६५ नंतरच्या चार-पाच वर्षांतील दत्तोपंतांच्या रोजनिशीत जवळ जवळ प्रत्येक दिवशी, साखर कामगारांच्या युनियनबद्दल मजकूर नोंदलेला आहे. युनियन अंतर्गत वादातून दत्त आपटे यांची युनियन मोडून समांतर संघटना स्थापन करण्यात आली. दत्तोपंतांच्या काही कामगार सहकाऱ्यांना मारहाणही झाली. कारखान्याच्या कार्यकारी संचालकावर फौजदारी गुन्हा दाखल करावा लागला. या सर्व घडामोडीत कायदे आणि नियम यांची कोणत्याही परिस्थितीत पायमल्ली होऊ नये याची सर्वतोपरी काळजी दत्तोपंतांनी वाहिलेली आहे.

१६ एप्रिल १९६५ ला सांगलीच्या भिडे ॲण्ड सन्स या कारखान्यात कामगारांची युनियन चालू करण्याबाबत त्यांच्याकडे कामगारांनी मागणी केली, आणि दुसऱ्याच दिवशी त्यांनी कारखान्यास भेट दिली. त्या कारखान्यातील

कामगारांचे प्रश्न मिटले; त्याचबरोबर त्या कारखान्याचे मालक रघुनाथराव भिडे मामा यांच्याशी दत्तोपंतांचा कायमचाच दोस्ताना जमला. नंतर शिवसदन या सहकारी संस्थेचे सूत्रधार दत्तोपंत असले तरी अध्यक्षपद भिडे मामांच्याकडे राहिले. याशिवाय भूविकास बँक आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथील कामगार संघटनांचे नेतृत्व दत्तोपंतांच्याकडे होते. कामगारांचे हित साधण्याबरोबरच व्यवस्थापनाशी समन्वय करण्याच्या त्यांच्या पद्धतीचा गौरव कारखानदारांच्या राज्यस्तरीय संघटनेने आवर्जून केलेला आहे.

या क्षेत्रातील अभ्यासातून त्यांनी कामगार विषयक खास पुस्तिका प्रकाशित केली त्याच आधारे त्या काळातील अग्रगण्य दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'ने २१ फेब्रुवारी १९६९ च्या अंकात अग्रलेख लिहिला. ना.यशवंतराव चव्हाण यांनीही त्या पुस्तिकेचे कौतुक करणारे पत्र लिहिले आहे. 'श्रमिकांची वाटचाल' या नावाचे कामगार चळवळीला वाहिलेले मासिक होते, त्यात दत्त आपटे नियमित लेखन करीत होते. दत्तोपंतांनी वकिलीची परीक्षा दिली नाही पण विशेषत: कामगार कायद्यांविषयी अनेक पुस्तके त्यांच्या संग्रही होती. त्या विषयीची कित्येक नियतकालिके त्यांच्याकडे येत असत. 'सहकारी शेती आणि कामगार विषयक काढलेली आपली पत्रके चांगली आहेत, या विषयांचा प्रसार करण्यास त्यांचा भरपूर उपयोग होई, असा अभिप्राय मुरारजीभाई देसाई यांनी २१ फेब्रुवारी १९५९ च्या पत्रात व्यक्त केला आहे.

▪ ▪ ▪

सहकार क्षेत्रातील मूलभूत तत्त्वे आणि त्यांच्या आधारे सामान्यांकडे येणारी आर्थिक शक्ती, यांवर दत्तोपंतांचा अभ्यास होता. स्वतंत्र भारताने समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारलेली असल्यामुळे सर्वांगीण विकासाचा मुख्य मार्ग म्हणजे आर्थिक गुंतवणूक सरकारने करणे. परंतु त्याला खूप मर्यादा पडतात. त्याला पर्याय म्हणून सहकार हाच मार्ग पुढे आला. एका दशकापूर्वीच म्हणजे १९४४ साली दत्तोपंतांनी त्यांच्या शाळेत 'विद्यार्थी सहकारी भांडार' सुरू केले होते. शाळेतल्या शिक्षकांनी ठराविक रक्कम घालून एक निधी उभा केला, त्यामधून विद्यार्थ्यांच्या गरजेचे दैनंदिन साहित्य अल्प नफा घेऊन पुरविणे असा उद्देश होता. विशेष म्हणजे त्या विद्यार्थी भांडाराचे नामकरण दत्तोपंतांच्या माघारी 'कै.दत्त आपटे शालेय विविध वस्तू भांडार' असे झाले व ते सहकारी भांडार आजही सुरू आहे.

दत्तोपंतांनी १९६०च्या दशकात सांगली भागात औद्योगिक सहकारी चळवळ सुरू केली. एका सिमेंट वस्तू बनविणाऱ्या खाजगी कारखान्यात टाळेबंदी झाल्यामुळे बेकार झालेले कामगार दत्तोपंतांच्याकडे आले. 'इतका अनुभव आहे तर हा उद्योग सहकारी तत्वावर तुम्हीच का स्थापन करत नाही?' असे या कामगारांना आवाहन करून त्यांनी सहकारी सिमेंट वस्तू कारखाना सुरू केला. त्यासाठी सर्वतोपरी खटपट त्यांनी केली. कोणा एका गृहस्थानी बुडीत अवस्थेला आणून ठेवलेले श्रमिक सहकारी मुद्रणालयही त्यांच्याकडे आले. या छापखान्याचे प्रकरण सहकार न्यायालयाकडे असताना, न्यायालयाने दत्त आपटे यांची प्रशासक म्हणून नेमणूक केली होती. तथापि सहकारातील मूळ तत्वे बाजूला राहून जे दोष उपजतच येत असतात तेच त्रासदायक ठरले आणि यशवंत सिमेंट वस्तू कारखाना आणि हे मुद्रणालय दोन्ही संपून गेले.

तथापि शिवसदन ही ग्रामीण जीवनाला पूरक अशी वेगळी ग्रामीण सहकारी घरबांधणी संस्था आणि शिक्षण संस्थेच्या संबंधितांसाठी सहकारी हौसिंग सोसायटी हे दोन सहकारी प्रकल्प उत्तम प्रकारे कार्यान्वित झाले. सांगली परिसरात एकंदरीतच सहकारी शेती आणि उद्योगधंदे बहराला आले, त्याला त्या भागातले नेतृत्व आणि दत्तोपंतांसारखे अभ्यासू व नेटके कार्यकर्ते निर्विवादपणे कारणीभूत आहेत.

▪ ▪ ▪

विद्यार्थीदशेच्याही आधीपासून समाजाविषयी तळमळ त्यांच्यावर बिंबलेली होती. ऐन तारुण्यात त्यांच्यावर भगतसिंगादी हुतात्म्यांच्या विचारसरणीचा प्रभाव होता. नंतरच्या काळात ते मानवेंद्रनाथ रॉय यांचे अनुयायी बनले. स्वातंत्र्यलढ्यात सशस्त्र क्रांतीकडे त्यांचा ओढा होता. ते उद्दिष्ट १९४७ ला गाठल्यानंतर ते खरे रॉयवादी बनले. प्रारंभापासूनच ते राष्ट्रीय काँग्रेसचे सक्रीय कार्यकर्ते होते.

लोकशाही राज्यपद्धतीवर त्यांचा आत्यंतिक विश्वास होता. नेहरूंच्या आधुनिकतेचे आणि आर्थिक धोरणाचे ते कट्टर समर्थक होते. नेहरूंवर त्यांची श्रद्धायुक्त भक्ती होती. त्या संबंधात एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. त्यांचा मुलगा हर्षवर्धन याच्या मुंजीच्या समारंभाची तयारी सुरू होती. आधल्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास त्यांच्या बहिणीचा नातू -अजित साठे हा आठ-दहा वर्षांचा मुलगा दत्तूकाकांना सनसनाटी बातमी देण्याच्या भरात ओरडत त्यांच्याकडे गेला. 'दत्तूकाकाऽऽ, नेहरू मेलेऽ'. हे ऐकून दत्तूकाका बाहेर आले आणि त्यांनी त्या कोवळ्या पोराच्या कानफटीत लगावली. अजितला त्याचे कारण कळलेच नाही; पण नंतर जेव्हा ती बातमी खरी ठरली तेव्हा त्याच पोराला पोटाशी धरून दत्तूकाका रडू लागले.

राजकारणापासून अलिप्त राहून समाजसेवा करण्यासाठी स्थापन झालेली काँग्रेसप्रणित संघटना म्हणजे सेवादल. दत्तोपंतांचा सेवादलात सक्रिय सहभाग असे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांगलीतील काही पदाधिकाऱ्यांनी, दत्तोपंत काही काळ संघातही येत असल्याचे सांगितले. तो काळ संघ आणि सेवादल यांच्यात चालणाऱ्या दैनंदिन वादावादीचा होता. तरुण विद्यार्थ्यांच्यातही तो संघर्ष झिरपत असे. 'त्यांच्यातील तणाव कमी करण्याचे सामर्थ्य सांगलीत फक्त एकाच व्यक्तीकडे होते, ती व्यक्ती म्हणजे दत्त आपटे' असे, आज नव्वदी उलटलेले स्वयंसेवक नरहरी किरकिरे यांनी सांगितले. त्यांच्या माहितीनुसार एका प्रसंगी दोन्ही गटातील पोरांची एक बैठक दत्त आपटे यांनी सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये बोलाविली. 'तुम्हा दोघांचाही उद्देश एकच आहे पण मार्ग वेगळे आहेत. तुमच्या भांडणाचा फायदा आपल्या विरोधकांना म्हणजे सरकारला होतो; म्हणून स्वीकारलेल्या आपापल्या मार्गाने जाऊन आपसातील संघर्ष टाळा' असा तंबीवजा आदेश त्यांनी सर्वांना दिला.

वसंतदादा पाटील हे वयाने दत्तोपंतांपेक्षा लहान असले तरी दादांची मैत्री आणि नेतृत्व दत्तोपंतांना जिव्हाळ्याचे होते. त्या काळातील अनेक तरुण मुलांना दत्त आपटे हे गुरुस्थानी होते. दादांच्याही मनात दत्तोपंतांबद्दल मनस्वी आदर होता हे अनेक प्रसंगांतून दिसून येत असे. 'शिक्षणसंस्थेच्या तीन तपांची वाटचाल' हे निवेदनपर पुस्तक दत्तोपंतांनी वसंतदादांना अर्पण केले आहे. या दोघांच्याही स्वभावात सांगलीचे पाणी मुरलेले होते त्यामुळे पुरोगामी स्पष्ट विचार आणि खंबीर बेडरपणा हे त्यांच्या जीवनाचे अधिष्ठान ठरले.

१९६९ नंतरच्या राजकारणातील नेतृत्वाचा दांभिकपणा आणि बोटचेपी तडजोड उभयतांना कदापि मान्य होत नसे. वसंतदादांनी त्या सुमारास राजकीय संन्यास घेतला, त्याविषयी 'अशा दांभिक नेत्यांचा यात हात असावा या संशयाला बळ मिळते' याची नावनिशीवार नोंद दत्तोपंतांच्या रोजनिशीत आहे. इतकेच नव्हे तर 'अशा सोदेगिरीच्या नेतृत्वाला कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्याची जुनी खोड आहे. त्याचाच वसंतदादा हा नवा बळी असून कधीतरी एक दिवस त्याच्यावरही अशीच पाळी येऊ शकेल' असे दत्तोपंतांनी नावानिशी म्हणून ठेवले आहे, त्याचा शब्दश: प्रत्यय भावी काळाने दिला, हे अनोखे वैशिष्ट्य आहे. पुणे मुंबईच्या मतलबी राजकारणावर या दोघांचीही मर्जी खप्पा होती. त्याविषयीचा लेख लिहून दत्तोपंतांनी ६ एप्रिल १९६९ ला दादांच्याच हाती दिल्याची नोंद त्यांनी केली आहे. कोणत्याही निवडणुकीच्या वेळी काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी ते रस्तोरस्ती जात नसत, परंतु सभा बैठकी आणि धोरणात्मक चर्चा यांमध्ये भाग घेत.

समाजवादी वर्तुळातील संबंधामुळे एस.एम.जोशी यांच्याशीही त्यांचे मैत्र होते. विठ्ठल जोगळेकर यांनी म्हटल्याप्रमाणे दत्त आपटे यांच्यासोबत ते एकदा एस.एम.जोशींच्या घरी गेले होते. एस.एम. यांच्या पत्नी ताराबाई यांनी दत्तोपंतांकडे तक्रार केली की, 'तुम्हीच यांना समजवा, त्यांची तब्येत बरी नसते तरीही व्याप आणि दौरे सतत चालू असतात. हे ऐकत नाहीत. शिवाय दम्याचा त्रासही होतो'. हे सर्व ऐकून दत्तोपंतांनी त्यांना म्हटले, 'वहिनी काळजी करू नका, हे दमेकरी लोक भारी चिवट असतात, त्यांना काही होणार नाही.' हे अस्सल सांगलीचे टवाळखोर उत्तर ऐकून त्या वहिनी काय बोलणार!

वि.स.पागे बाळासाहेब भारदे, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, स.का.पाटील, के.के.शहा, शांतिलाल

शहा, हितेंद्र देसाई, काका गाडगीळ अशा सर्व विचारांच्या नेत्यांशी त्यांचा खास स्नेह होता. जयप्रकाश नारायण, एम.एन.रॉय यांच्याशी त्यांचा घनिष्ठ परिचय होता. जिल्ह्यातील सगळ्याच विचारांच्या कार्यकर्त्यांशी त्यांचा व्यक्तिगत संबंध होता. १९७१ साली दत्तोपंतांच्या एकसष्ठी निमित्ताने नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळच्या सत्कार समितीची नावे पाहिली तर दत्तोपंतांचा सर्वगामी परिवार लक्षात येतो. नागनाथ नायकवडी आणि नाना पाटील असे जहाल लोकही दत्तोपंतांचा सल्ला घेण्यासाठी वारंवार भेटत असत.

नव्या मनूतील काँग्रेसी राजकारणावर मात्र दत्तोपंत अतिशय नाराज होते. १९६७ साली काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन सांगलीला होणार होते, नंतर ते रद्द झाले. तथापि त्यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेच्या प्रस्तावनेत त्यांनी काँग्रेसकडून सांगलीकरांच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या प्रस्तावना -लेखाचा समारोप करताना त्यांनी लिहिले आहे की, 'टिळक गांधी नेहरू अशा नेत्यांचे उत्तराधिकारी म्हणून तुम्ही राज्य करीत आहात. महात्माजींनी तुम्हाला उत्तराधिकार दिला आहे, तो या देशातील हजारो वर्षांच्या सांस्कृतिक जीवनाचा उत्तराधिकार आहे. आसक्ती आणि अभिलाषा यांच्याऐवजी सेवा आणि सदाचार यांनाच या संस्कृतीने प्राधान्य दिले आहे याचे स्मरण ठेवले पाहिजे.'

## साहित्याचा परामर्श

-मंगला बापट

साहित्यक्षेत्रातील दत्तोपंतांचे कार्य या प्रकल्पाच्या दुसऱ्या खंडात समग्रपणे संकलित करण्यात आले आहे. ते पाहिल्यावर त्यांचा व्यासंग लक्षात येईल. साधारण १९३४ ते १९७२ अशी तीन तपे त्यांचा वाचन लेखनाचा व्यासंग सातत्याने सुरू होता.

दत्तूकाकांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी सजलेले होते. त्या पैलूंशी निगडीत आयुष्याच्या साऱ्या धडपडीत, वाचन आणि लेखन जपणारा एक अभ्यासक म्हणून त्यांचे कार्य आश्चर्य करण्याजोगे आहे. त्यांच्या हातून २४ पुस्तके झाली, असे त्यांच्या हातून प्रकाशकीय पत्रव्यवहारावरून दिसते. त्यांपैकी १७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या डॅन ब्रीन याचे, आत्मनिवेदनात्मक पुस्तक त्यांनी अनुवादित केले; पण ते त्यांचे पुस्तक तत्कालीन इंग्रज सरकारने जप्त केले होते, याचा अर्थ ते पुस्तक सरकार विरोधाची प्रेरणा देणारे होते हे उघडच आहे! आज इतक्या वर्षांनंतर भारतातील ब्रिटिश परराष्ट्र-कचेरीशी संपर्क करण्यापासून, बराच शोध घेतल्यावर त्याची एक प्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात मिळाली. दत्तूकाकांनी त्यांची काही पुस्तके आणि लेखस्वरूपी साहित्य, त्यांच्या पत्नी उषा आपटे, अथवा अन्य कुणाच्या नावाने प्रकाशित केले. संस्था किंवा त्यांच्या व्यापांतील उपक्रम, यांस कुठे अडचणीचे ठरू नये असा त्यात हेतू असणार. असे समजते की, इतर कुणाच्या नावावर केलेल्या लेखनासाठी काही मानधन मिळाले तर ते त्या नावाने संस्थेकडे घेता येई. शिवाय संस्थेचे हितचिंतक वा मोठे देणगीदार यांना कृतज्ञतेपोटी काही श्रेय देण्याचीही त्यामागे भूमिका होती. या बाबतीत एक संवाद वसंत कुंभोजकर यांनी सांगितला, तो बोलका आहे.

'वाचा आणि विचार करा' या शीर्षकाची एक लेखमाला दैनिक 'केसरी'मधून प्रसिद्ध होत असे. आपल्या अवती-भवती काय चालले आहे, त्याचा आपल्या जीवनावर, देशाच्या राजकारणावर काय परिणाम होणार, याची चर्चा त्या लेखांतून होत असे. लेखकाचे विषय, लिखाणाची ढब यावरून असे वाटे की, हे लिखाण डी.एन.सरांचे आहे. एक दिवस मी सरांना विचारलेच. सरांनी प्रथम माझे म्हणणे नाकारले. मी आग्रह धरला तसे सरांनी कबूल केले शिक्षणसंस्था चालवायची म्हणजे काही गोष्टी कराव्या लागतात. आपली संस्था नवीन, त्यात आर्थिक दृष्ट्या दुबळी! अशा वेळी माणसे जोडायला काहीतरी करावे लागते.'' 'म्हणजे सर तुम्ही तुमची लेखणी विकलीच म्हणायचे.' ''तसे समज. मी एक लेखक म्हणून जनतेसमोर असावा अशी काही माझी महत्वाकांक्षा नाही.''

शालेय जीवनातील विद्यार्थ्यांत वाचनाची गोडी वाढावी म्हणून, त्यांच्या लेखनाचे बरेच विषय धाडसी, पराक्रमी, युक्तिबाज अशा नायकांभोवती वेढलेले असत. त्यांच्या

साहित्यकृतींचा परामर्श घेण्यासाठी काही पुस्तकांवर दृष्टिक्षेप पुरेसा ठरेल.

१७व्या शतकातील फ्रेंच राजा लुई आणि त्याची राणी या दोघांमध्ये वितुष्ट कसे येईल, हे पाहण्याची संधी त्यांचा प्रधानमंत्री कार्डीनल हा शोधत असतो. त्यासाठी कार्डीनल रिचल्यू कोणत्या युक्त्या शोधत होता, त्यांमध्ये डार्टा आणि त्याचे तीन सहकारी पार्था, आरामी आणि ॲाथा यांचा सहभाग कसा होता, हा 'थ्री मस्केटीयर्स' या कादंबरीचा कथाभाग आहे. मुळात ही कादंबरी फ्रेंच लेखक अलेक्झांडर ड्यूमा या जगविख्यात लेखकाची आहे. डार्टा नावाचा एक तरुण वडिलांनी दिलेले पिवळ्या रंगाचे तट्टू आणि आईने दिलेली मलमाची डबी या सामग्रीसह आपले नशीब अजमावण्यासाठी राजदरबारात येतो. तीन सहकाऱ्यांशी मैत्री करून राणीचा रत्नहार तिला परत मिळवून देतो आणि राजदरबारी शिलेदार म्हणून नियुक्त होतो. ही कथा 'वीस वर्षानंतर'ही चालू राहते. 'वीस वर्षानंतर' हेच त्या दुसऱ्या कादंबरीचे नाव. आधीच्या कथेत ऐन पंचविशीत असणारे ते तरुण आता ४५ वर्षांचे झाले आहेत. इंग्रज राज्यक्रांतीत लोकपक्ष आणि राजपक्ष यांचा समेट व्हावा म्हणून ही चौकडी चातुर्याने कृती करत असते. त्यांच्यावर येणारी संकटेही तितकीच मोठी असतात. पण बुद्धी आणि धाडस यांचा वापर करून ती संकटे हे शिलेदार पार करू शकतात. त्यानंतरचा कथाभाग हा चौदाव्या लुईची उचलबांगडी करण्याचा, त्यांचा अयशस्वी कट आहे. चौदाव्या लुईच्या जुळ्या भावाला - फिलीपला, 'लोखंडी मुखवटा' चढवला जातो. हा मुखवटा काढताना फिलीपच्या जिवाला धोका असतो. पण तो पत्करून मुखवटा काढण्याचा प्रयत्न केला जातो. या सगळ्या कारस्थानात डार्टा आणि त्याचे सहकारी मृत्यू पावतात. डार्टा आणि त्याचे तीन शिलेदार राज्यनिष्ठा सांभाळताना लोकक्षोभाला बळी पडतात. त्यांची ही जीवनकहाणी अलेक्झांडर ड्यूमानी आठ भागात लिहिली आहे. ती संक्षिप्त स्वरूपात अनुवादित करून दत्तूकाकानी मराठी वाचकांसमोर ठेवली आहे.

आजच्या काळातही आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या समृद्ध असणारी लोकशाही अमेरिकेतील संयुक्त संस्थानांत दृढमूल आहे. तिचा आदर्श सर्व जगापुढे आहे. ही लोकशाही बळकट व जगन्मान्य होण्यास अमेरिकेला(यूएस) एकाहून एक सरस असे अध्यक्ष लाभले, हे विसरून चालणार नाही. मॉर आणि मिस्क पिटरसॅम या लेखकांनी, जॉर्ज वॉशिंग्टन(पहिला राष्ट्राध्यक्ष) ते व्हिट डी आयसेनहॉवर (चौतिसावा राष्ट्राध्यक्ष) यांच्या कार्यांचा आपल्या पुस्तकात मागोवा घेतला आहे. त्याचा अनुवाद दत्तूकाकानी 'अमेरिकेच्या अध्यक्षांच्या गोष्टी' याच नावाने केला आहे. लहानपणी मिळालेला स्वच्छंदीपणा, व केलेले कष्ट यांतून दत्तूकाकांचे राष्ट्रप्रेम जागृत झाले होते. त्या गोष्टी ठळकपणे शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोचाव्यात असा या अनुवादांचा उद्देश असावा. अमेरिकेचा राष्ट्रपिता जॉर्ज वॉशिंग्टन, राज्यघटनेचा जनक जेम्स मॅडिसन, अब्राहम लिंकन यांच्या कार्यांची थोडक्यात पण रंजकतेने करून दिलेली ओळख, म्हणजे लहानपणापासून देशभक्ती रुजविण्याचे संस्कार आहेत. अमेरिकेचा इतिहास किंवा या अध्यक्षांच्या चरित्राचा सखोल अभ्यास करणाऱ्यांना हे पुस्तक निश्चितच उपयोगी आहे. विशाल आकाशाचे दर्शन घ्यायचे असेल तेव्हा घरातील एक झरोका जे काही करतो, तसेच या पुस्तकाचे स्वरूप आहे.

महात्मा टॉलस्टॉयच्या 'वॉर ॲन्ड पीस' या जगत्‌विख्यात कादंबरीचा संक्षेपात केलेला अनुवाद वाचनीय आहे. मुळात अशा मोठ्या साहित्यकृतीचा संक्षेप करणे व त्याचा सहजसुंदर अनुवाद करणे या दोन्ही कठीण गोष्टी दत्तूकाकानी समर्थपणे पेलल्या आहेत. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा फ्रेंच सेनानी नेपोलियन आणि त्याला प्रतिकार करणारा रशिया, यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या या कादंबरीत इतिहास आणि तत्वज्ञान यांचा मनोरम मिलाफ आहे. बेचिराख होणारी रशियन भूमी, होरपळून जाणारे मॉस्को शहर, आणि त्यांतून विजयाच्या उर्मीने नेपोलियनचा पाठलाग करणारे रशियन यांचा जय किंवा पराजय नेमका कोणता, हे वाचकांनीच समजून घ्यावे. एकमेकाला शत्रू समजणाऱ्या राष्ट्रप्रमुखांच्या इच्छेनुसार युद्धे होतच असतात. पण त्यांत भरडले जाणारे सामान्य नागरिक आणि मृत्यूला कवटाळणारे सैनिक यांचे जीवन -म्हणजे त्यांच्या

जीवनातील आशाआकांक्षांना तिलांजलीच असते. युद्धानंतरच्या शांततेत ईश्वरनिष्ठा आणि जीवनावरचे प्रेम शेवटी जोपासावे लागते. कादंबरीतील पेरी आणि नताशा यांचे सहजीवन पुन्हा सुरू होते. आपल्याकडे १९४७ साली झालेल्या भारताच्या फाळणीनंतर दंगलींच्या पार्श्वभूमीवर आधारित पु.भा.भावे यांच्या कथाही असाच संदेश देणाऱ्या आहेत. 'वॉर ॲन्ड पीस' या शीर्षकाचे 'पराभूत जय' असे यथायोग्य नामकरण दत्तूकाकांसारख्या कुशल अनुवादकाचेच असू शकते.

१७७५मध्ये इंग्लंड आणि फ्रान्स या दोन्ही देशांतील बहुसंख्य जनता जुलमी राज्यसत्तेने भयभीत झालेली होती. शिवाय धर्ममार्तंडांच्या अमानुष शिक्षा फ्रान्सची जनता भोगत होती; तर दरोडेखोरी, चोऱ्या, खून यांसारख्या प्रकारांनी इंग्लंडची जनता हैराण होती. त्या दोन देशांतील जुलमी राजवट आणि छळवणूक सहन करणारी जनता व तिची चमत्कारिक स्थिती 'कथा ही नगरींची दोन' या नावाने अनुवादित झाली. १८१२ साली चार्लस् डिकन्स यांनी लिहिलेल्या 'दि टेल ऑफ टू सिटीज' या जगविख्यात कादंबरीचा तो अनुवाद आहे. एकाच कुटुंबाची ही कथा, वेगवेगळ्या दोन देशांतील शहरांमध्ये घडते. राजकीय परिस्थितीचे परिणाम सामान्य लोकांना कसे भोगावे लागतात याचे चित्रण या कादंबरीत आहे.

'तारस बुल्बा' ही रशियन लेखक निकोलाय गोगाई याची १८३५मध्ये प्रसिद्ध झालेली ऐतिहासिक कादंबरी. याचा मराठी अनुवाद त्याच नावाने दत्तूकाकानी केला आहे. तारस बुल्बाचा कथाभाग रशियातील 'झापुर्झीयन कोसॅक' या लढवय्या जमातीतल्या योद्ध्यांच्या जीवनावर आधारित आहे. दत्तूकाकानी केलेले तारस बुल्बाचे वर्णन वाचून आपल्या शेलारमामाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. व्होडकाच्या नशेत, जुगारात बुडलेले कोसॅक योद्धे रणांगणावर कसे तुटून पडतात, याचे वर्णन दत्तूकाकानी फार रोमहर्षक केले आहे. एकंदर हे पुस्तक शौर्य, रणकंदन अशा प्रसंगांनी भरले आहे.

इजिप्त देशाची महत्त्वाकांक्षी स्त्री म्हणजे क्लिओपॅट्रा. जगातील अनेक साहित्यिकांनी तिला आपल्या साहित्यांत साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. क्लिओपात्राची ही लोकप्रिय कहाणी दत्तूकाकानी पाल्हाळ न लावता हृद्य केली आहे.

३००-४०० वर्षांपूर्वी आधुनिक राष्ट्रे भांडवलशाहीच्या विस्तारातून जन्माला आली. त्या आधुनिक राष्ट्रांचे रूपांतर साम्राज्यवादी राष्ट्रांमध्ये झाले. भौगोलिक दृष्ट्या काही बदल झाला. मानवाने निसर्गावर मात करण्याच्या प्रयत्नामुळे मानवी मूल्यांमध्ये मात्र खूप फरक पडला. निसर्गसंपत्तीची लूट झाली, पण राहणीमान सुधारले. वैचारिक आणि काल्पनिक सुखाच्या कल्पना बदलल्या. 'समुद्रवलयांकित पृथ्वी' एकच असली तरी भांडवलशाहीचे पोषण करणाऱ्या समाजरचनेमुळे या निसर्गसंपत्तीचीही धूळदाण होऊन मानवी जीवन अगतिक होते. या सर्वाची मीमांसा, 'निसर्गसंपत्ती आणि मानव' या पुस्तकात केली आहे. वाचनात आलेली माहिती उचलून या पुस्तकासाठी घेतल्याची प्रामाणिक कबुली आपल्या प्रास्ताविकात दत्तूकाकानी दिली आहे. विषयानुसार झालेले संकलन व त्यामुळे वाचनात येणारी सुसंगती प्रभावी ठरली आहे. विषुववृत्तीय प्रदेशातील रबर, कोको, कॉफी, साखर यांच्या उत्पादनांत उतरलेले अमेरिकन आणि युरोपिअन भांडवलदार, त्यांचा नफा, जागतिक व्यापाराच्या वृद्धीसाठी निग्रो वा इतर रानटी जमातींची वेठबिगारी-गुलामी-उपासमार, त्यांतील संघर्षाची सत्यता वाचकांना पटणारी आहे. गहू, कापूस यांच्या उत्पादनात तडजोडीची भूमिका घ्यावी लागली. वनस्पतीजन्य संपत्तीची लूटमार चालू असताना प्राणीसृष्टीही त्यातून वगळली गेली नाही. लोखंड, दगडी कोळसा, पेट्रोलियम या खनिज संपत्तीवर अमेरिका आणि युरोप या राष्ट्रांची मक्तेदारी होती. कारखानदारी, खते, वाहतूक इत्यादी महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत पश्चिमात्य राष्ट्रांनी वर्चस्व स्थापन केले. त्यांच्या राजकीय विस्तारावर मर्यादा आल्या, पण आर्थिक दृष्ट्या ती राष्ट्रे वर्चस्व गाजवू लागली. भारतात मात्र ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत अर्थशास्त्राचे प्रस्थापन व्हावे म्हणून स्वदेशीचा उद्‌घोष करणारे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी देशभक्तांनी भारतीय समाज जागरूक ठेवला. विनोबा भावे यांनी 'जय जगत्' ही घोषणा देऊन सर्व मानवजातीला एकाच पातळीवर आणले. त्यामुळे

साम्राज्यवाद, भांडवलशाही यांचे हिडीस स्वरूप आपल्याकडे प्रभावी झाले नाही. मानवता, भूतदया यांच्या दिशेने भारतीयांची वाटचाल झाली. विचारांची ही दिशा स्पष्ट होण्यासाठी 'निसर्गसंपत्ती आणि मानव' हे पुस्तक पर्यावरणप्रेमी वाचकांना आणि अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना निश्चित उपयोगी आहे.

'ऑलिव्हर ट्विस्ट' ही एका अनाथ मुलाची जिद्द आणि साहस सांगणारी सुखद कहाणी. ती वाचताना आपल्याला ना.धों.ताम्हनकरांचा 'गोट्या' आठवावा.

या अनुवादित साहित्याबरोबर 'प्राणीगावच्या मौजा', 'सिदबा धायगुडे', 'शिर्क्यांच्या गढीतील पिशाच' हे बालसाहित्य आणि काही व्यक्तिचित्रे त्यानी लिहिली. तो वाचकांसाठी मोलाचा ठेवा आहे. त्यांच्या दुसऱ्या एका कथेत, शेतसारा वसूल करायला आलेल्या इंग्रजी काळातील अधिकाऱ्याची सिदबाने केलेल्या फजितीची कथा आहे. शिवारात फिरताना तुळशीच्या रोपाला सिदबा नमस्कार करतो. देशी इंग्रजीचा अवतार असणारा अधिकारी चिडतो, ''तुम्ही कशालाही देव मानता. तुमच्या या देवाचे मी काय करतो पहा'', म्हणून ते रोप उपटून चोळामोळा करून टाकतो. सिदबा गप्प बसतो. नंतर तो खाजकुयलीच्या झुडपाला नमस्कार करतो. हा इंग्रज अधिकारी त्या झुडपाशी झोंबतो आणि मग आग आग होऊन पळत सुटतो.

'शिर्क्यांच्या गढी'तील कथेत प्रेमाला मुकलेला आत्मा पिशाच होऊन राहात असतो. गढीत येणाऱ्या प्रत्येकाला हे पिशाच सळो की पळो करून सोडत असते. एकदा एक कुटुंब तिथे राहायला येते; त्यात एक मुलगा, एक मुलगी आणि त्यांची आजी असते. मुलं चांगली डांबरट असतात. ती दोघे मिळून त्या भुतालाच सळो की पळो करून सोडतात. भूत या मुलांना घाबरून आजीच्या आश्रयाला जाते. आजी भुताला प्रेमाने जवळ घेते. इथे त्या आत्म्यास आजीचे प्रेम मिळते, आणि तो आत्मा मुक्त होतो. भूत गढी सोडून जाते. या कथेतील भूत आणि मुलांच्यातील खोड्या रंजक आहेत.

अनुवादित वाङ्मयातील पात्रे आपल्याशी संवाद साधतात. ती बोलतात, तेव्हा त्यातील रंजक नाद आपल्या मनात रुंजी घालू लागतो. त्यामुळे आपल्याकडील वाचकांशी ती पात्रे एकरूप होतात. प्रसंग वर्णनामुळे ती परिस्थिती डोळ्यासमोर उभी राहते. शालेय जीवनात अशा साहित्याचे वाचन झाले तर राजनिष्ठा, शौर्य, धाडस, जुलूम, छळवणूक या शब्दांचे अर्थ जाणून घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक होतील. शालेय वयातील नैसर्गिक आकर्षणाचे भांडवल करून ते पडद्यावर दाखविण्याची उबळ सध्या सिनेनिर्मात्यांना आहे. त्यापेक्षा विद्यार्थ्यांवर होणाऱ्या कायमस्वरूपी संस्कारांवर आता लक्ष देणे सुशिक्षित समाजाचे कर्तव्य ठरेल. अशा चित्रकथांवर आधारलेल्या चित्रपटांची विद्यार्थी वाट पाहात असतील.

*(लेखन : गोपाळकाकांची मुलगी, दत्तूकाकांची पुतणी, माहेरची मंदा आपटे, संस्थेतून निवृत्त शिक्षक, वाङ्मयाभ्यासक)*

▪ ▪ ▪

याशिवाय युद्धोत्तर जगाच्या आधुनिक इतिहासाचा परिचय करून देणारी पुस्तकमालिका प्रकाशित करण्याची आपटे यांची तयारी झाली होती, पण दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम आपल्या येथील समाजजीवनावर होत चालला, त्या काळातच त्या मालिकेतील 'पॅलेस्टाईन' हे पहिले पुस्तक त्यांनी काढले पण त्या मालिकेतील पुढचे भाग प्रकाशित होऊ शकले नाहीत. तसेच आणखीही काही पुस्तकांचे व अनुवादांचे उल्लेख, त्यांच्याशी प्रकाशकांच्या झालेल्या पत्रव्यवहारात आहेत. पण ती पुस्तके प्रकाशित झाली नसावीत. दत्तूकाकांचे जितके साहित्य या प्रकल्पात(खंड २) आले आहे, तेच सुमारे सातशे पानांचे आहे. नाट्य, क्रीडा अशा कलांचाही शास्त्रशुद्ध अभ्यास त्यांच्या बोलण्यातून आणि व्याख्यानांतून जाणवत असे. त्यांच्या अनेकांगी व्यवधानातून लेखनाचा हा व्यासंग आश्चर्य करण्यासारखा आहे.

साहित्यक्षेत्रामध्ये एवढे मोठे काम असूनही दत्त आपटे हे बाहेरच्या जगाला साहित्यिक म्हणून फारसे परिचित नाहीत. त्यांच्या प्रकाशित साहित्याव्यतिरिक्त कितीतरी मजकुराचा उल्लेख पत्रांतून आणि रोजनिशीतून आहे. भा.रा.भागवत यांनी दत्त आपटे यांच्याकडून ऑस्कर वाईल्ड यांच्या भयकथांचे आणि ड्यूमाच्या 'ब्लॅक ट्यूलीप' या

कादंबरीचे भाषांतर करून मागितले आहे. स्वातंत्र्य चळवळीला चिथावणी देणारे म्हणून जप्त केलेले साहित्य, एवढ्या उल्लेखाने सावरकर डोळ्यासमोर येतात. दत्त आपटे यांनी 'माय फाईट फॉर आयरिश फ्रीडम' या डॅन ब्रीन या क्रांतिकारकाचे आत्मनिवेदन 'आयर्लंडच्या स्वातंत्र्याची कथा' या नावाने अनुवादित केले. मुनी क्षीरसागर यांच्या लिखित आठवणीनुसार हे पुस्तक सरकारने जप्त केले होते. पुस्तक नेताजी सुभाषचंद्रांना समर्पित केले आहे, त्यावर अर्थातच प्रकाशक व अनुवादकाचे नाव गुप्त ठेवलेले दिसते. याखेरीज बऱ्याच लघुकथा आणि इतिहास व भूगोल यांविषयीचे साहित्य आणि स्तंभलेखन त्यांच्या लेखणीतून उतरले आहे. 'पॅलेस्टाइन' हे छोटेखानी पुस्तक प्रसिद्ध झाले; त्या पुस्तकातच आगामी आकर्षण म्हणून हिंदुस्थान, जपान, आणि चीन अशा तीन पुस्तकांचे जाहिरातवजा निवेदन आहे. १९३७ सालच्या काँग्रेस अधिवेशनात वितरित करण्यासाठी कुमारअप्पा यांच्या पुस्तकाचा अनुवाद 'ग्रामोद्धाराचे तत्त्वज्ञान' या नावाने त्यांनी केला. परंतु त्या पुस्तिकेची एकही प्रत या प्रकल्पासाठी हाती लागली नाही.

१९५५ सालच्या पत्रात ढवळे प्रकाशनकडून लिहिले गेले आहे की, 'आपण कोठे आणि कसे राहातो' हे पुस्तक शिक्षणखात्याकडे पाठविण्यात आले होते; त्यासंबंधीच्या काही मुद्द्यांवर आपले समर्थन उलट टपाली कळवा.' हे पुस्तक बहुधा क्रमिक अभ्यासाकरिता लिहिले असावे. ढवळे प्रकाशनच्याच एका पत्रात म्हटले आहे की, 'भूगोल हा तुमच्या आवडीचा विषय. त्यामुळे अत्यंत चटकदार भाषेत लिहिलेली भूगोलाची पुस्तके हाती पडतील अशी मोठी उमेद अजूनही आहे. एरवी भूगोल हा विषय मला धार्जिणा नाही, म्हणून तुमच्यासारख्या कृष्णाकाठच्या खंबीर गड्याकडे तो सोपविला; तरी त्या गड्याने कच खाऊ नये.'

क्रमिक पुस्तक म्हणून सरकारी यंत्रणेला मानवेल असे लिहिण्याचा दत्तोपंतांचा पिंड नव्हता. कितीतरी मंत्री त्यांच्या जवळचे मित्र होते पण त्यांच्याकरवी आपले एखादे पुस्तक कुठेतरी लावले जावे असे त्यांच्या मनात येणेही शक्य नव्हते.

१९५८चे प्रकाशकाचे एक पत्र म्हणते, 'तारकापुत्रचा मजकूर आजच जाधवांकडे रवाना केला आहे; आपण त्यानिमित्ताने ओळख करून घेण्यास जाधवांकडे समक्ष जावे.' १९५९ च्या पत्रात 'दासबोध सार' मिळाले, ते वाचून त्याबद्दल सविस्तर सूचना काही दिवसांनी पाठवितो, असा प्रकाशकाचा मजकूर आहे. धार्मिक ग्रंथांचे वाचन दत्तोपंतांनी कधी केले होते ते समजायला कोणताही मार्ग नाही; पण हा उल्लेख पुरेसा स्पष्ट आहे. १९६५च्या प्रारंभी रोजनिशीतील नोंदीप्रमाणे 'ढवळे यांच्याकडे जाऊन पडलेले लिखाण' म्हणून त्यांनी पाच पुस्तकांचा उल्लेख केला आहे आणि 'लवकरच ती पुस्तके छापतो आहे' असेही पत्रोत्तर आहे. त्यात 'द हिस्ट्री ऑफ डॉन क्वीझाट' ही स्पॅनिश लेखकाची कादंबरी आहे, तसेच स्पॅनिश योद्ध्याच्या जीवनावर 'एलसीड' ही कादंबरी आहे. रोजनिशीतील १९६९च्या नोंदीनुसार 'चेंगीझ खान लिहायला घेतले. शाळेतील शिक्षिका सौ.गोखले लेखनिकाचे काम करीत आहेत,' असे दिसते.

या सर्व नोंदी पाहिल्यानंतर त्यांचे अप्रकाशित, संकल्पित किंवा अर्धेमुर्धे राहिलेले साहित्यिक काम अवाढव्य होते, इतकेच म्हणता येईल. खूप लिखाण करूनही, ते प्रकाशित होण्यासाठी त्यांनी फारसा जोर धरला नाही किंवा इतर कामाच्या धबडग्यात त्याकडे लक्ष देता आले नसावे. त्यांच्या शाळेत 'विवेक' या नावाचे मासिक विद्यार्थ्यांसाठी त्यांनी सुरू केले होते. साहित्याचे बीज आणि साहित्याची गोडी मुलांच्यात रुजण्यासाठी त्याचा उपयोग होत असे. प्रारंभी हस्तलिखित असलेले हे मासिक पुढे छापील स्वरूपात निघू लागले. दत्त आपटे यांनी 'संस्कार' या नावाचे एक मासिकही सुरू केले, परंतु निधीअभावी काही अंकांनंतर ते बंद झाले. या उपक्रमातून त्यांचे काही विद्यार्थी पुढच्या काळात लेखक, संपादक, ग्रंथपाल अथवा प्रकाशक म्हणून नावारूपाला आले.

▪ ▪ ▪

जाहीर सभेत सहजगत्या बोलण्याची कला त्यांना अवगत होती. 'सेवादलाच्या शिबिरात दत्त आपटे यांचे बौद्धिक असेल तेव्हा आम्ही आवर्जून पहिल्या रांगेतील जागा पकडत असू' अशी आठवण ग.प्र.प्रधान यांनी दिली होती. सेवादलातील हे बौद्धिक ऐकण्यासाठी संघाचे काही

स्वयंसेवकही येत असत. वर्गात आठवी-नववीच्या मुलांना अभ्यासाचा धडा शिकवताना ते साभिनय रंगून जात असत. शिवाय जगाचा इतिहास, चालू राजकारण व इंग्रजी-मराठी साहित्याचा अभ्यास असल्यामुळे त्यांचे वक्तृत्व बहारदार होई. त्यांनी कधी नाटक सिनेमात काम केले नाही पण अभिनयाची कला असलेल्या अनेक पोरांना त्या क्षेत्रात मोठे होण्यासाठी त्यांनी खूप मदत केली. एका जर्मन दिग्दर्शकाचा सत्कार भावे नाट्यमंदिरात झाला, त्यावेळी त्यांनी शेक्सपियर आणि मराठी रंगभूमी या विषयावर केलेले भाषण ऐकून तो दिग्दर्शक उद्‌गारला, असे अभ्यासू लोक तुमच्या रंगभूमीकडे आहेत...!

तथापि हा अभिनयगुण आणि साहित्याची रसिकता त्यांच्या घरगुती वातावरणातसुद्धा पदोपदी जाणवत असे. क्लिओपॅट्रा या सिनेमात सिझरचा वध झाल्यानंतर मार्क ॲँटनीने सिनेटपुढे केलेले भाषण ते अभिनयासह घराच्या सोप्यावर म्हणत, हे कुटुंबातल्या सर्वांना माहीत आहे. क्लिओपॅट्रा आणि ज्युलिअस सिझर यांच्यातील संवादही ते साभिनय म्हणत. क्लिओपॅट्राला अशुभ स्वप्न पडले आणि तिला सारी दुश्चिन्हे दिसली म्हणून, आज सिनेटच्या सभेला तुम्ही जाऊ नका असे ती सिझरला सांगते; तेव्हा सिझर उत्तरतो, 'हा रोमचा सम्राट, बायकोला पडलेल्या स्वप्नाला घाबरून राजदरबारात आला नाही, हे समजले तर जनता काय म्हणेल...' हे वाक्य ते झोकात म्हणून दाखवत. घरातल्या मोठ्या आरशापुढे उभे राहून नेसत्या धोतराच्या निऱ्या करतानाही ते काही संवाद व उतारे डौलात तोंडपाठ म्हणत असत.

▪ ▪ ▪

हाती घेतलेले कार्य आणि त्यामागचा मूलभूत विचार हेच दत्त आपटे यांचे श्रद्धास्थान होते. त्यांची मातुश्री अक्का हे त्यांचे दैवतच होते. वडिलांची कर्तबगारी त्यांना पूर्णत: ठाऊक होती पण त्यांच्याविषयी आठवण फारशी नव्हती. वडिलांचा सहवास आणि प्रेम त्यांच्या आयुष्यात नव्हते. आईचे सहवास आणि प्रेम त्यांना वयाच्या पंचविशीपर्यंत मिळाले, त्याचबरोबर सामाजिक न्याय आणि नीती यांचे संस्कारही मिळाले. आपल्या वडिलांचा संदर्भ देऊन, तरुण भाच्याला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'पैसा अडका आपल्या मुलाबाळांसाठी कोणीही ठेवतील, पण दोन पिढ्यांना अर्धशतकभर पुरेल एवढी प्रतिष्ठा निर्माण करणे ही मानवी जीवनाची खरी कृतार्थता आहे. हा वारसा तुम्ही टिकवून धरणे ही भावी काळातील जबाबदारी आहे'. या श्रद्धेमुळेच आपल्या आईवडिलांचे वार्षिक पुण्यस्मरण, ते आणि विनायकराव हे दोघेजण आवर्जून करीत असत.

या श्रद्धेबरोबरच त्यांच्याकडे देवधर्माचीही निष्ठा होती. साम्यवादी आणि समाजवादी विचारांचा अभ्यास असूनही ते निष्ठेने देवधर्म सांभाळत असत. अर्थातच ते सर्व घराच्या उंबऱ्याच्या आत असे. देव्हाऱ्यातील देवीवर त्यांची अपार श्रद्धा होती. स्वयंपाक घरातील एका मोठ्याशा घुमटाकार कोनाड्यात शिसवी देव्हारा होता. समईच्या मंद प्रकाशात मोजकेच देव विसावलेले असत. मागच्या रांगेत गंगेचा गडू, छोटेसे तबक त्यात शाळीग्राम आणि तशाच काही मुद्रा होत्या. पहाटे चार वाजता उठून ते स्वयंपाकघरात येत. प्रार्थनेचा पवित्रा घेतानाही उभे राहाण्याची पद्धत अशी की, एखादा पैलवान आव्हान देण्याच्या मनस्थितीत असावा! देवीपुढे हात जोडून नतमस्तक होणे असा काही प्रकार त्यांच्या प्रार्थनेतही नव्हता. डावा पाय पुढे, रुंद छाती फुगलेली, उन्नत माथा, डोळे मिटलेले अशी त्यांची प्रार्थना होई. 'काशाय वस्त्रम्' ही दत्ताची प्रार्थना होई. नजर वर उचलत उचलत प्रार्थना पूर्ण! दत्तोपंत देवापुढेही नतमस्तक झाले नाहीत, ते परिस्थितीपुढे कसले झुकतात!! संध्याकाळी घरी आल्यानंतर देवीची प्रार्थना त्याच पावित्र्यात होत असे. देव्हाऱ्यातील देवीची मूर्ती आईला सापडलेली होती. असे देव घरी आणू नयेत असा संकेत असूनही देवीच्याच इच्छेनुसार ती घरी राहिली, आणि तेव्हापासून कुटुंबाची बिकट परिस्थितीही पालटत गेली असा घरच्या सर्वांचा विश्वास होता. परंतु पूजेचे अवडंबर, व्रते, वैकल्ये, नवस अथवा अन्य सोपस्कार आणि कर्मकांडे किंचितमात्र होत नसत. नवरात्र गणपती हे पारंपरिक सण उत्साहात साजरे होत, त्यांमध्ये धार्मिक भावनेपेक्षा पोरांच्या हौसेमौजेवर जास्त भर होता.

दत्तोपंतांचे आणखी एक श्रद्धास्थान म्हणजे बलभीम मारुतीराया. सांगलीच्या कृष्णाकाठी तपोवनातील मारुती

हे साऱ्या गावातील तरुणाईचे दैवत होते. दत्तोपंतांना तालीम आणि खेळ यातही खूप आवड होती. इतर कुठल्याही देवळात जाऊन त्यांनी जाहीरपणे देवदर्शन केले नाही, पण तपोवनातला मारुती हा एक अपवाद होता. निवृत्तीनंतर रोज संध्याकाळी त्यांचे समवयस्क मित्र या हनुमानाजवळ जमत आणि आपापली निवृत्तीची वये विसरून पोराटकीच्या गप्पागोष्टींत रमत. मुद्दाम तीर्थयात्रा करणे किंवा नियमित कुलदैवताकडे जाणे अशी या घराची प्रथा नाही. कामानिमित्ताने कुठे वेळ प्रसंग राहिल्यास त्या ठिकाणच्या देवस्थानी दत्तोपंत जाऊन डोळे मिटून येत.

बलभीम व्यायामशाळा आणि रास्ते मास्तर त्यांच्या परमआदराचे स्थान होते. 'आपण आज जे काही आहोत त्यात या दोन्हीचा मोठाच वाटा आहे,' असे ते अभिमानाने सांगत. या दोघा भावंडांची -किंबहुना त्या पिढीतल्या सर्वांचीच रास्ते मास्तरांच्यावर भक्ती होती. रास्ते यांच्या उतारवयात त्यांची तब्येत बरी नव्हती, त्यावेळी दत्तोपंत आणि विनायकराव यांनी रास्ते मास्तरांना विश्रांतीसाठी आपल्या घरी आणून ठेवले होते. दोघे भाऊ त्यांची मनोभावे सेवा करीत. ज्या शिक्षकांनी आमच्यासारख्या तरुणांना घडविले आणि राष्ट्रीय कार्यासाठी प्रेरित केले, अशा शिक्षकांच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही अशी त्यांची भावना होती. परंतु त्यांच्याप्रति असलेला आदर प्रगट करण्यासाठी म्हणून या बंधूंनी त्यांच्या शिक्षणसंस्थेच्या रौप्यमहोत्सवात गुरुवर्य पां.वि.रास्ते, पां.वि.कुलकर्णी आणि तीरमारे गुरुजी या तीन शिक्षकांचा जाहीर सत्कार करून एस.एम.जोशी यांच्या हस्ते बहुमान केला व आपल्या विद्यार्थीगणासमोर या गुरुवर्यांना चरणस्पर्श करून वंदन केले.

▪ ▪ ▪

## दत्तूकाकांचे गणगोत

-अनुराधा मिराशी

आम्ही पाच भावंडे, सर्वात मोठी बहीण पुष्पा, तिच्या पाठचा भाऊ हर्षवर्धन, नंतर मी म्हणजे रोहिणी, मग शरद व सर्वांत धाकटा श्रीकांत.

वडिलांची आमच्यावर खूप माया होती. आत्तासारखे मुलांवर प्रेम दाखविण्याचे किंवा सतत त्यांचे लाड करण्याचे प्रकार त्यावेळी नसायचे. परंतु आईवडिलांच्या प्रत्येक कृतीतून, ते आपल्या बाबतीत किती दक्ष आहेत हे जाणवायचे. त्यांच्या जिवावर बिनधास्त राहाता येत होते. दोन वेळा पोटभर जेवण आणि दोन दोन कपडे अशा बेतशीरपणाची आम्हाला लहानपणापासूनच सवय होती. त्यात कधी कमीपणा वाटला नाही; कारण आमच्या अवती-भोवतीचा समाजही तसाच होता. माझ्या मैत्रिणी, नात्यागोत्याचा परिवारही तसा बेताच्या परिस्थितीचा होता; भाजी-भाकरी खाऊन सुखी होता.

आमचे वडील दत्त आपटे, त्यांना आम्हीही दत्तूकाका म्हणत असू. आजूबाजूच्या लोकांना, नातेवाईकांना सगळ्यांनाच त्यांचा आधार वाटत असे. अडचण घेऊन घरी येणारा कोणीही मोकळा परत जात नसे. घरी आलेली कोणतीही व्यक्ती -कामगार असो वा अन्य कोणी, जेवणखाण करून जायचे. चहाची वेळ असेल तर येणाऱ्याला चहा दिला गेलाच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे.

त्यांच्या आयुष्यात आलेल्या मनुष्यमात्रांतील, अतीव आदराची पहिली व्यक्ती म्हणजे अक्का (दत्तूकाकांची आई). उगवत्या वयात त्या दोघांनाही तालमीचा खूप नाद होता. दोघेही तालमीत कुस्ती खेळत असत. संध्याकाळी घरी आल्यावर घराच्या जोत्यावर बसलेल्या आक्काच्या मांडीवर डोके ठेवून तिचा दत्तू आडवा होत असे. अक्का म्हणायची, ''अरे दत्तू, दूध तर सोडच, पण मी तुम्हाला ताकाचे पाणीसुद्धा देऊ शकत नाही. कशाला उगीच कुस्ती व्यायाम करतोस?''

त्याकाळी सांगलीत वीज, नळाचे पाणी असल्या सोयी नव्हत्या. उजाडण्यापूर्वी कृष्णा नदीवर जाऊन अक्का अंघोळ करून येत असे. एक दिवस तिला नदीच्या पाण्यात पायाला काहीतरी टोचले म्हणून तिने पाऊल उचलून चाचपून पाहिले, तर ती देवीची मूर्ती होती. त्या मूर्तीच्या हातातली तलवार अक्काच्या पायाला टोचली होती. अक्का ती मूर्ती घेऊन घरी आली. बाईला - म्हणजे दत्तूकाकांच्या आजीला

वाटले, कोणीतरी न लाभलेली म्हणून ही मूर्ती नदीत सोडली असेल. तिने अक्काला -तिच्या सुनेला सांगितले, ती मूर्ती परत नदीत सोडून दे. पुरणवरणाचा स्वयंपाक करून देवीला त्या दिवशी नैवेद्य दाखवला; आणि दुसरे दिवशी ती मूर्ती परत नदीत सोडायची असे ठरले. पण त्या रात्री बाईच्याच स्वप्नात येऊन देवीने दृष्टांत दिला, 'मी तुझ्या घराचे भले करण्यासाठी आले, तू मला परत पाठवू नकोस.' मग त्या देवीला मानाने देवघरात ठेवण्यात आले. आजही ती देवी आमच्या माहेरी देवघरात आहे. दत्तूकाकांची अशी श्रद्धा होती की, या देवीची प्रेरणा आणि कृपा आपल्या घरास लाभली आहे. त्यामुळे आधीपेक्षा आर्थिक परिस्थिती सुधारली, समाजात प्रतिष्ठा मिळाली. त्यांचे कार्यही तसेच मोठे होते, पण जोडीला देवीचे आशीर्वादही होते.

मुनीकाका क्षीरसागर आणि त्यांचे तिघे भाऊ लहानपणी सांगलीत आले. ते कृष्णाकाठी असलेल्या आश्रमात राहात होते. ही भावंडे माधुकरी मागून आणून जेवत असत.

स्वातंत्र्यानंतर मुनीकाकांचे लग्न झाले. मुनीकाकांच्या पत्नी 'दीक्षाकाकू'. उंच, काळ्यासावळ्या आणि शिडशिडीत बांध्याच्या होत्या. त्या नऊवारी साडी नेसत. साधी सुती साडी असे. पण नेसत खूप छान. त्यांच्या घरच्या सगळ्यांत मोठ्या असल्यामुळे तक्रारी करण्याचा हक्क होता, असे त्यांचे वागणे असे. माझी आई (आम्ही तिला 'मामी' म्हणत असू), स्वयंपाकघरात ओट्यापाशी स्वयंपाक करीत असे. तिच्याशेजारी उभ्या राहून दीक्षाकाकू काहीतरी सांगत असत. त्या काय सांगतात हे आम्हाला कळत नसे. मध्येच त्या जेवणाच्या खोलीकडे तोंड करून दत्तूकाकांनाही काहीतरी सांगत, ते मात्र मुनीकाकांच्या भोळसटपणाविषयी तक्रार करणारे असे. मुनीकाका होतेही तसेच! अतिशय शांत, सतत हसरा चेहरा, त्यावर समाधानी भाव. बारीक डोळे करून हसत. देशप्रेमाचे स्वप्न पाहाणारी ही कर्तृत्ववान माणसे! आजच्या काळात सतत दुसऱ्याला फसवू पाहाणारी माणसे सभोवती असताना, दुसऱ्यासाठी आयुष्याची बाजी लावणारी ही माणसे आठवतात. जिद्द आणि कर्तृत्व असेल तर वागण्यात बाणेदारपणा येतोच.

वडिलांचे आणखी एक खास मित्र म्हणजे कराडचे आमचे गोपाळकाका कुलकर्णी. प्रचंड देहाचा आणि निर्मळ मनाचा माणूस. खूप हलाखीची परिस्थिती. आमच्या कुटुंबाबद्दल त्यांना खूप आपलेपणा व प्रेम होते. त्यांच्या पत्नी म्हणजे वेणूकाकू. त्याही उंच, देखण्या पण खूप अशक्त होत्या. त्यांना दम्याचा विकार होता. आमची आई त्यांना विश्रांतीला बोलवत असे. त्यांचे पथ्यपाणी, खाणेपिणे सर्व प्रेमाने व आपलेपणाने करत असे. त्यांना बरे वाटायला लागले की मग त्या परत जात. काकू गेल्यावर पुढे गोपाळकाका एकटेच येत. ते कराडहून सायकलवरून येत. सायकलीला मागे मृदंग लावलेला असे. आले की देवघराचा ताबा घेत, तासन्‌तास पूजा चाले. एरवी संध्येला चुकारपणा करणाऱ्या माझ्या भावंडांकडून सकाळ संध्याकाळ संध्या करून घेत. आमच्या घरात प्रत्येक लग्नकार्यात कोठी खोली गोपाळकाकांकडे सोपवलेली असे. गोपाळकाका घरी आले की, दत्तूकाका आमच्या आईला सांगत, 'आज गोपाळचा वाढदिवस आहे, काहीतरी गोड करा. मग आमची आईपण शिरा, खीर असे काहीतरी गोड बनवत असे. दत्तूकाकांचा उद्देश इतकाच की, परिस्थिती नसलेल्या या त्यांच्या मित्राला गोडधोड खायला मिळावे!!

आमचे वडील, आत्या, काका आणि घरातील मोठी मंडळी रोज रात्री एकत्र जमत. रात्री गोपाळकाका मृदंग वाजवून खड्या आवाजात अभंग म्हणत. आठ-दहा दिवस राहून गोपाळकाका परत निघाले की दत्तूकाका त्यांना आपल्या कपाटातील स्वत:चे धोतर, शर्ट, वगैरे कपडे देत असत. या दोघांचे मित्रप्रेम अफाट होते. सगळे त्यांना कृष्ण-सुदामा म्हणत.

मीरा भागवत आणि विमल रणदिवे या दोघी वडिलांच्या मैत्रिणी, आमच्या आत्त्या. मीरा भागवत आम्हाला सख्या आत्यासारख्याच होत्या. आमची आईपण त्यांचे माहेरपण यथासांग करीत असे. त्या माझ्या वडिलांना दादा म्हणत. वडीलधारी मंडळी घरी आली की त्यांना वाकून नमस्कार करण्याची माझ्या आईची शिकवण होती. भावांना हे बंधन नसे -कदाचित त्या काळचा मुलगा-मुलगी हा भेद असावा. मी नमस्कार केला की मीराआत्त्याला खूप कौतुक असे. विमल आत्त्यांना दमा होता. कृष्णाकाठच्या मोकळ्या हवेत

राहिल्याने त्रास कमी होईल म्हणून त्या काही दिवस आमच्याकडे राहिल्या होत्या. सकाळी आवडीने आईच्या हातची भाकरी व सोबत दही चटणी अशी न्याहरी करायच्या, छान बऱ्या होऊन पुन्हा मुंबईला गेल्या. एकदा दत्तूकाकांच्या बरोबर मुंबईला या विमलआत्यांकडे मी गेले होते.

आमच्या घराशी जवळीक असलेले आणखी एक कुटुंब भिलवडीकर. दत्तूकाकांचे एक घनिष्ठ मित्र शाहीरकाका; म्हणजे शाहीर शंकरराव निकम. खूप प्रेमळ चेहरा असलेले अबोल व्यक्तिमत्व. स्वातंत्र्यसैनिक आणि भारत सेवक समाजाचे कार्यकर्ते असलेले शाहीरकाका सांगलीत असतील त्यावेळी आरवाडे हायस्कूमध्ये भारत सेवक समाजाच्या कार्यालयात राहात आणि दोन्ही वेळेला आमच्या घरी जेवायला असत.

इंगळे म्हणून एक गृहस्थ गॅस एजन्सीत कामाला होते. ते देखील दत्तूकाकांचे मित्र. त्यांची बायको मुलांना घेऊन आमच्या घरी आली की आम्ही पाहाताच राहायचो; कारण त्यांची राहणीच तशी! उंची कपडे, बूट, मोजे. कसल्याशा आजाराने इंगळे वारले. एजन्सीकडून पैसा वगैरे मिळाला, पण छानछोकीत राहायची सवय असल्यामुळे बायकोने व मुलांनी सगळा पैसा चैनीत उडवला. त्या बाई मुलांना घेऊन आमच्याकडे येत. त्या रडायला लागल्यावर आमची आई त्यांना समजुतीच्या चार गोष्टी सांगे, जेवायला देत असे. पुढे सगळी वाताहत होऊन ते कुटुंब संपून गेले.

नरादादा आणि अक्का. ही दोन भावंडे तर आमच्या घरचीच झाली. त्यांचे वडील त्यांच्या लहानपणीच वारले होते. हे कुटुंब आमच्या शेजारी राहायला होते. नरादादाने सांगितलेल्या काही आठवणी माझ्या मनात ताज्या आहेत. नरादादाची सातवी फायनलची परीक्षा तासगावला होती. त्याला पेपर लिहिण्यासाठी पेन दत्तूकाकांनी घेऊन दिले. त्याचा तासगावला जाण्यायेण्याचा खर्च दत्तूकाकाच करत होते. तो सांगायचा, दत्तूकाका म्हणजे मूर्तीमंत माणुसकी! या कुटुंबाला दत्तूकाका व आमची अंबूआत्त्या नेहमीच मदत करत असत. अक्का म्हणजे नरादादाची बहीण, नेहमीच आमच्या घरात असे. मॅट्रीक झाल्यावर दत्तूकाकानी नरादादाला मुंबईला मंत्रालयात नोकरी लावून दिली. पुढे काही दिवसांनी तो त्याच्या आईला व अक्काला मुंबईला घेऊन गेला. ते दोघे अधूनमधून येत असत, हक्काने आमच्याच घरी राहात. सांगलीला त्यांचे अन्य कोणीच नव्हते. मुंबईला आमच्या काशीमावशीचे घर होते, तेही त्यांना तितकेच हक्काचे होते. अण्णा -म्हणजे माझ्या मावशीचे यजमान आणि ही मावशी, यांची जोडीदेखील तशीच; अनेकांना आधार देणारी. नरादादा मुंबईला गेला आणि तिथेच स्थायिक झाला. त्याचे लग्न खूप उशिरा झाले. आमच्या त्या वहिनी खूप चांगल्या होत्या. त्या दादाबरोबर सांगलीला येत. मामीला व दत्तूकाकांना सासू सासरे मानत.

विजय पंडित, नामदेव कराडकर, मारुती कांबळे, नलवडे सर अशी कितीतरी माणसे आमच्या कुटुंबाशी एकरूप झाली होती. आमच्या घराला हक्काने आपले घर मानत होती. विजय पंडित आमच्याच बरोबरीतला शाळेतील विद्यार्थी. तो आमच्या घरी वाराने जेवायला येत असे; पुढेही नेहमीच येत राहिला. तो आमच्याप्रमाणेच दत्तूकाका आणि मामी म्हणत असे. विजय पंडित नेहमी रुबाबात असे. त्याला बँकेत नोकरी मिळाली, मग रुबाब आणखीनच वाढला. घरी आला की मला चिडवायचा. माझ्यासारखाच रडण्याचा आवाज काढायचा. आमची मामी कधीच चिडायची नाही. 'मामी बघ की गं' अशी माझी भुणभुण चालू झाली की मग मामी म्हणायची, 'ए विजय, गप की रे बाबा''. विजय चहा पिऊन निघून जायचा, आणि सुट्टीदिवशी उगवायचा. दत्तूकाका घरी असले तर मात्र अतिशय शांत आणि नम्र वागायचा.

नामदेव कराडकर दत्तूकाकांचा विद्यार्थी होता. तो आमच्या घरी रोजच यायचा, आमच्यापैकीच तो एक आहे असे वाटत असे. त्याची बायको शांता, ती आम्हाला हक्काची वहिनी! तिच्या घरी गेल्यावर तेल, चटणी भाकरी असा खाऊ आमच्यासाठी तयार असे. मी आणि माझी आतेबहीण रेखा दिवसाच्या कोणत्याही वेळी तिच्याकडे जाऊन चटणी भाकरी खात असू. मी दोन-तीन वर्षांपूर्वी तिच्या घरी गेले, ते जवळ जवळ पस्तीस वर्षांनी! त्याही वेळेला शांतावहिनीने मला भाजी भाकरी खायलाच लावली. हे प्रेम अनमोल असते. गेल्या वर्षी नामदेव गेला. आठवणी

कायम राहणार!

आम्ही भावंडे लहान असताना दत्तूकाकांना अर्धांगाचा सौम्य झटका आला होता. पण आमच्या मारुती कांबळे यांनी त्यांची इतकी सेवा केली त्याला तोड नाही! दत्तूकाका असेपर्यंत त्यांची साथ त्याने कधीच सोडली नाही. दत्तूकाकाबरोबर फिरायला जाण्यासाठी कांबळे काका पहाटे चार वाजता हजर असे. फिरून आल्यावर दत्तूकाकांच्या बरोबर चहा-न्याहरी करून त्याच्या घरी जात असे. पण दिवसभर दत्तूकाकांबरोबर सावलीसारखा राही. आम्हा मुलांत मात्र त्याची पोराटकी चालायची.

माझी आई, तिला आम्ही 'मामी' म्हणत असू. आमच्या घरी सतत कोणी ना कोणीतरी जेवायला असे. माजघरात पंगत वाढायचे काम माझ्याकडे. आई भाकरी करायची, आणि मी सर्वांना वाढत असे. वाढताना वेण्या पुढे आलेल्या तिला अजिबात चालत नसत. किंवा वाढताना केसांना हात लावलेला तिला आवडत नसे. वेण्या पदराच्या आत ठेवून पदर घट्ट खोचलेला हवा. तिने लावलेल्या या सवयींमुळे पुढच्या आयुष्यात कधी नावे ठेवून घ्यावी लागली नाहीत. दत्तूकाका मांडी ठोकून जेवत. सगळ्यांची मस्करी करीत.

आमची काकू म्हणजे शारदा मामी. आम्ही भावंडे आणि चुलत भावंडे आपापल्या आईला मामी म्हणत असू आणि वडिलांना काका! शांताताई -म्हणजे आमची आतेबहीण, हिने आम्हाला तिचेच नाते सांगितले. आमची आत्या अंबूताई वडिलांची धाकटी बहीण, हिचे यजमान प्लेगमध्ये गेले. त्यावेळी ती आपल्या दोन मुलींना घेऊन कायमची माहेरी आली. त्यावेळी ती गरोदर होती. पुढे तिला तिसरी मुलगी झाली ती विमल. त्या सगळ्या आमच्या घरी आल्या, त्यावेळी आमच्या घरात मोठ्या काकांचे चार मुलगे होते. रघुनाथदादा, नानाकाका, मधुअण्णा आणि बाळकृष्ण. हे सगळे माझ्या वडिलांना अर्थातच काका म्हणत. आमच्या मोठ्या काकांची फिरतीची नोकरी असल्यामुळे त्यांची ही सगळी मुले सांगलीतच असत. त्यांच्यामुळे ते विनूकाका दत्तूकाका झाले. आतेबहिणी या मामांच्या बायकांना 'मामी' म्हणू लागल्या. त्यांचे ऐकून आम्ही अपत्येही आईला व काकूला 'मामी' म्हणू लागलो आणि वडिलांना 'काका'. तासगावला आमची आणखी एक आत्या होती, तिला आमच्या या आतेबहिणी 'मावशी' म्हणत, त्यामुळे त्या आत्याला आम्ही सोनुमावशी म्हणत असू. आमची ही नाती लोकांना कळत नसत, गोंधळ उडे. गावातही ते दत्तूकाका-विनूकाका झाले.

आमची अंबूआत्या आणि शांताताई, सिंधूताई, विमल यांच्यावर दत्तूकाका-विनूकाकांचा जीव होता. ते दोघे आपल्या बहिणीला व तिच्या मुलींना खूप जपत. एकदा या मुली लहान असताना नदीवर खेळायला गेल्या होत्या. तिथे मारुती मंदिराचे काम सुरू होते. सिमेंट-वाळूतून या मुलींनी महादेवाच्या पिंडी बनवल्या आणि आपापल्या हातावर घेतल्या. या नादात घरी यायला उशीर झाला. आमच्या आत्त्याने त्यांना बाहेर उभे राहाण्याची शिक्षा केली. त्या तिघी डाव्या हातावरच्या पिंडीला उजव्या हाताने नमस्कार करून 'दत्तूकाका लवकर घरी येऊदेत' अशी प्रार्थना करत होत्या. ते पाहून आत्या म्हणाली, 'येऊ दे दत्तू; त्याचे पण मी ऐकणार नाही'. थोड्या वेळाने दत्तूकाका आले. या मुलींचे चेहरे पाहून त्यांना शिक्षा दिली आहे हे ओळखले. दोनही हातांच्या कवेत तिन्ही भाच्यांना एकत्र उचलून घेऊन, ते घरात आले. 'आता या भावाला काय बोलणार' म्हणून आमची आत्या गप्पच बसली.

शांताताई तिच्या लहानपणीच्या आठवणी सांगायची. त्यांचे हे दोनही मामा या मुलींना खांद्यावर घेऊन पुराच्या पाण्यात पोहत असत. दत्तूकाका व विनूकाकांनी त्या मुलींना वडिलांची कमतरता भासू दिली नाही. या आतेबहिणी, किंवा आमची चुलत भावंडे सगळी आम्हाला सख्खीच वाटत. कधी परकेपणा नाही. मोठ्या घरच्या चुलत भावंडांच्या बायका, म्हणजे मोठ्या काकांच्या सुना सुशिलावहिनी, सुधावहिनी, सुमतीवहिनी व प्रभावहिनी. दुसऱ्या काकांची सून विजयावहिनी. या सगळ्याजणी खूप समंजस होत्या. आपापले संसार सांभाळून होत्या. या सगळ्या गोतावळ्यात विलक्षण आपलेपणा होता. विनूकाकांना खूप कमी वयात मधुमेह झाला होता. ते इन्शुलीनचे इंजेक्शन घेत असत. त्यावेळी सिरींज व सुया खूप मोठ्या असायच्या. माझा एक चुलत भाऊ जर्मनीत होता. दत्तूकाकांनी जर्मनीतून त्याच्यामार्फत सुया मागवायला सुरुवात केली. त्या सुया, सिरींज रोज उकळावे

लागत असे. विनूकाका स्टुलावर बसून मांडीत इन्शुलीनचे इंजेक्शन स्वत: घेत असत. पण त्यापूर्वी सिरींजने (पिचकारी) आम्हा मुलांवर पाणी उडवत. ते टोचून घेणेही हसत खेळत होई. दत्तूकाका विनूकाका सर्व बाजार - वर्षभराचे धान्य वगैरे एकत्र आणत. उपवासादिवशी मोठी बुट्टी भरून केळी आणली जायची. काहीही आणले तरी ते एकत्र आणायचे, अशी पद्धत होती.

दत्तूकाका-विनूकाकांनी एकत्र दिवाळीचा बेत आखला. आपटे कुटुंबीय, माहेरवाशीणी, जावई, नातवंडे असे सर्वजण आमच्या घरी एकत्र जमले. आमच्या सर्व वहिन्या, काकू व आई मिळून फराळाचे जिन्नस बनवत होत्या. रोज दुपारी एकत्र जमायचे आणि गप्पा टप्पा करत काम करायचे. कधी कुरापती नसत, हेवे दावे नाहीत. माझ्या आजोबांचे व आजीचे श्राद्ध दत्तूकाका विनूकाका असेच खूप श्रद्धेने करत. त्यावेळी देखील या सुना तयारी करण्यासाठी आमच्या घरी जमत होत्या. चेष्टा मस्करी करत कामे उरकत. या सर्व सुनांना दत्तूकाका आधार हा वाटे. या सर्वांची मुले, तसेच शांताताईची सांगलीत शिकायला असलेली मुले अजित, अरुण...आपटे कुटुंबात अशी मुलांची मोठी फौज होती. त्यामुळे आम्हाला कोणालाही बाहेरच्या मित्र मैत्रिणींची गरज भासली नाही.

काही वर्षांनी सर्वांनी गावाबाहेर घरे बांधली. सगळीच कुटुंबे दुरावली. मुले मोठी झाली, आपापल्या मार्गाला लागली. पुढच्या पिढीत मनेही दुरावत गेली. भेटीही लांबत गेल्या.

१९६९ साली ताईचे म्हणजे पुष्पाचे लग्न झाले. ताईला दोन मुले झाली, शर्मिला आणि उमेश. दत्तूकाका व मामी खूप खूश होते, पण तिच्या संसारात असलेल्या कलहाची दु:खी किनार होती. या मुलांना त्याचा त्रास होऊ नये म्हणून आम्ही भावंडे आणि आमचे आई-वडील काळजी घेत होतो. १९७७ साली माझे लग्न झाले; ताईची दोनही मुले दिवसभर आजी आजोबांच्याकडे येत. पुढे १९७८ साली माझा भाऊ हर्षवर्धनचे लग्न झाले. १९७९ साली मला, व हर्षाला मुली झाल्या. नंदा व पूनमचा जन्म झाला. आजी आजोबांच्या आनंदात भर पडली. पण हा आनंद इथेच जणू संपणार होता! दत्तूकाका म्हणजे एक भला मोठा वटवृक्षच होता. त्यांच्या सावलीत घरचे, बाहेरचे विसावत होते. 'आरवाडे हायस्कूल' हे त्यांच्या कर्तृत्वाचे जागृत उदाहरण होते. पुढच्या पिढीने तिकडे पाठ फिरविली. १९८१ साली दत्तूकाकांना अपघात झाला. त्यांच्या पायाला दुखापत झाली. इतका जिद्दी माणूस या दुखापतीमुळे खचून गेला. त्याचे आणखी एक हळवे कारण म्हणजे त्यांच्या लाडक्या भावाचा विनूकाकांचा वर्षापूर्वी झालेला मृत्यू!

एकदा मी माहेरी सांगलीला आलेली असताना दत्तूकाकांना खूप भरून आले. काय झाले, असे मी विचारल्यावर ते म्हणाले, 'मला काल रात्री स्वप्न पडले. मी आणि विनायक नदीवर फिरायला गेलो होतो. परंतु आलो तर घराची दारे बंद होती. खूप अंधार होता. खूप हाका मारल्या तरी कोणीही दारे उघडली नाहीत.' आधल्या रात्री त्यांनी झोपेत खरंच हाका मारल्या होत्या, बिंदुदादा वगैरे उठून आले होते. त्यांच्या ध्यानी मनी विनूकाकाच होते. दोघेही शेजारी शेजारी असणाऱ्या खोल्यांमध्ये झोपत, आणि एकमेकांविषयी सजग असत. एकाला काही झाले तर दुसरा जागा होई.

विनूकाका गेल्यापासून दत्तूकाका पूर्ण खचून गेले होते. या दोन भावांनी संपूर्ण आयुष्य सारी सुख:दु:खे एकत्र अनुभवली. आम्ही सर्वजण सभोवती असूनदेखील ते विनूकाकांच्या शिवाय एकटे पडले. सांगलीत त्यांना 'राम-लक्ष्मण' म्हणून ओळखत. आमची आत्त्या म्हणजे अंबूताई हिच्या आजारपणात या दोघांची होणारी घालमेल आणि त्यांच्या तीव्र दु:खाचे कढ आम्ही पाहिले. विनूकाका गेल्यानंतर दत्तूकाकांनी डायरीत लिहिले, 'अंबूताई गेली, त्यावेळी विनायकच्या आधाराने सावरलो. विनायक गेला, आता कुणाच्या आधाराने सावरायचं!'.

अंबुआत्या गेली, तिच्या मधल्या मुलीचा मुलगा 'शिवानंद' आमच्याकडे आला. आमची आतेबहीण सिंधूताई पूर्वीच वारली होती. तिची मुलगी बेबी दोन महिन्यांची असतानाच शांताताईने तिच्याकडे मोडनींबला नेली होती. या शिवानंदला आम्ही 'नंदू' म्हणत असू. तो आमचे सहावे भावंड होऊन राहिला.

दत्तूकाकांनी खूप लिखाण केले, पण स्वत:चा मोठेपणा कधीच लिहिला नाही. खरा समाजसेवक असाच असतो

ना? आताच्या काळात साऱ्या नात्यागोत्यांचाही हिशोब करणाऱ्यांना या सगळ्याचे महत्व कळणे कठीण आहे. परिस्थितीला महत्व न देता माणसे जपणारे आईवडील आम्हाला मिळाले. माझ्याही आयुष्यात दैवाने कधी बिकट परिस्थिती आली तरी, घरी येणाऱ्यांचे आदरातिथ्य आम्ही करू शकलो. आता आमच्याही आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात अशी इच्छा करायची की पुढच्या जन्मी हेच आईवडील आम्हाला लाभोत!!

*(लेखन : दत्त आपटे यांची कन्या, पूर्वाश्रमीची रोहिणी आपटे)*

■ ■ ■

## डी एन ए

-शरद आपटे

डीएनए म्हणजे कोणत्याही सजीवाच्या पेशीतील गुणसूत्रांची रचना. त्या जिवाची जैविक माहिती डीएनए हा घटक देत असतो. रंग, रूप, स्वभाव, गुणदोष हे सर्व डीएनएमुळे समजते. थोडक्यात एखाद्या व्यक्तीचा डीएनए म्हणजे त्या व्यक्तिमत्त्वाचे आरशातील स्वच्छ प्रतिबिंब होय. योगायोग असा की, दत्त नारायण आपटे या नावाचे लघुरूप डीएनए या आद्याक्षरांचेच आहे. समता बंधुता आणि सामाजिक न्याय ही वैशिष्ट्ये त्यांच्या डीएनएमध्ये दिसतील.

प्रस्तुतच्या ग्रंथ प्रकल्पामुळे आम्हा कुटुंबियांच्याही कल्पनेपलीकडचे दत्तूकाका आम्हाला समजले. माझ्या उगवत्या वयातच दत्तूकाका गेले. त्यांच्या पन्नाशीआधी माझा जन्म आहे म्हणजे त्यांच्या कर्तबगारीचा काळ मला पाहाता आला नाही, आणि माझ्या भावंडानाही तो आकलन झाला होता असे वाटत नाही. तरीही आमच्या लहानपणी जे दत्तूकाका आम्ही अनुभवले त्यावरून त्यांच्या स्वभावाची कल्पना आम्हाला येऊ शकली होती. दत्तूकाका जी कथा आमच्या लहानपणी सांगत त्यावरून कसल्या ध्येयाने पेटलेली ही माणसे होती, याचा अंदाज येऊन आम्हाला आश्चर्य वाटत असे.

अकोल्याच्या राष्ट्रीय पाठशाळेचे प्रचारक असलेले गोडबोले नावाचे कोणी गृहस्थ तीन चार हजार रुपये घेऊन ते दत्तूकाकांना देण्यासाठी सांगलीस आले होते. किसनलाल ओंकारदास या अकोल्याच्या व्यापाऱ्याने चळवळीतल्या कामासाठी ही रक्कम पाठविली होती. ती दत्तूकाकांच्या हाती गोडबोले यांनी सुपूर्त केली. परंतु गोडबोले शोकाकुल दिसत होते. त्याचे कारण विचारताच दु:खाचा बांध फुटून ते धाय मोकलून रडू लागले. त्यांचा एकूलता एक मुलगा औषधोपचाराअभावी नुकताच मृत्यू पावला होता. जवळ पैसे नव्हते म्हणून त्याच्यावर ते उपचार करू शकले नव्हते. वास्तविक त्यांच्या हाती चळवळीसाठीची मोठी रक्कम होती परंतु व्यक्तिगत कारणासाठी देशाचा हा पैसा कसा वापरणार; म्हणून त्यांनी आपल्या मुलाची स्वातंत्र्यवेदीवर आहुती दिली होती. ही कथा दत्तूकाकांच्या तोंडून ऐकताना त्यांचाही चेहरा कासावीस होत असे. दत्तूकाका त्याच पठडीतले होते.

दत्तूकाका नेहमी साहसाला प्रोत्साहन देत असत. आम्ही मुले लांब लांब सायकल ट्रीप काढत असू. त्यांनी कधीही आडकाठी केली नाही, की काळजी व्यक्त केली नाही. श्रावण सोमवारी नदीला पूर असेल तर पोहत हरीपूरला जाण्याची सांगलीची परंपराच होती. अक्षरश: शेकडो तरुण गटागटाने पोहत जात असत. साधारण दुपारी निघून संध्याकाळपर्यंत परत येत. नोकरीस लागल्यावर संध्याकाळी सहाच्या पुढे मित्रांसह मी पोहायला जात असे. नदीवर जाताना वाटेत दत्तूकाका भेटत. पोरांची तयारी पाहून ते विचारीत, ''काय रे, आत्ता कुठे चाललात?'' दबक्या आवाजात उत्तर द्यायचे 'पोहत हरीपूरला'. ''काय लेको, ही काय पोहत हरीपूरला जायची वेळ झाली काय?'' एवढेच दत्तूकाका म्हणत, आणि ''जा लेको, लवकर या परत'' अशी पुस्ती जोडत. माणसाला एखाद्या गोष्टीची भीती असेल तर तो दुसऱ्यांनासुद्धा घाबरवितो. दत्तूकाका तर अशा बाबतीत प्रोत्साहन देत.

माझ्या विशी-पंचविशीतच नोकरीतून आणि त्यांच्या अनेक कामातून दत्तूकाका हळूहळू निवृत्तच झाले होते. शाळेचेच काही काम पाहाण्यासाठी ते नित्यनियमाने

सकाळी शाळेत जाऊन येत असत. माझ्या पाहाण्यातील त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. सांगलीच्या गावभागातील वडिलार्जित घर त्या दोघा बंधूंनी नवे बांधून घेतले होते. शिक्षकांच्या हौसिंग सोसायटीमधील एक प्लॉट आणि त्यावर साध्या छपराचे छोटेसे घर एवढीच स्थावर त्यांच्याकडे होती. आम्ही मुलेबाळे फार मोठ्या पदावर किंवा वशिल्याच्या कुठल्या जागेवर त्यांनी चिकटवलेली नव्हती पण भाजी भाकरी खाण्याइतपत ही सर्वजण उभी होती. तेवढे नियोजन त्यांच्या पत्नी उषामामी यांनीच केले होते. दत्तूकाकांना आर्थिक नियोजन आणि भविष्याचे आडाखे जमले नाहीत असे म्हणावे लागेल. माझ्या जाणत्या वयात आमच्या घरी धुणे-भांडी करणारी कामवालीही नव्हती, त्यामुळे ती कामे सर्वांनी आपापली करायची असत. दत्तूकाका त्यांच्या वयाच्या साठी-पासष्ठीत स्वत:चे कपडे धूत असत. त्यांच्या माघारी रुग्णालयाचे पैसे भागविताना जिकीर यावी इतपत बँक शिल्लक होती. माझे लग्न व्हायचे होते आणि धाकटा श्रीकांत नुकताच पदवीधर झाला होता त्यांचा मोठ्या मुलीचा संसार तसा चिंतेचा विषय होता. दत्तूकाकांनी आयुष्यभर शिक्षकी पेशा केला पण आम्हा मुलांची शिक्षणे अगदीच बेताची झाली. दत्तूकाकांनी आम्हाला अमूक शिकले पाहिजे असे कधी सांगितले नाही आणि आमचे प्रगतीपुस्तकही कधी पाहिले नाही. आम्हाला त्यातल्या त्यात जे करता आले त्याचे पूर्णत: स्वातंत्र्य होते.

▪ ▪ ▪


एवंगुणविशिष्ट दत्त आपटे हे आमच्या सर्वांच्याच आत्यंतिक जिव्हाळ्याचे असले तरी, तो एक मोठ्या अभ्यासाचाच विषय आहे असे वाटू लागले आहे. त्याच एका भारावलेल्या अवस्थेत पुढच्या पानांतून त्यांच्याविषयी संकलित केलेली स्मरणफुलांची ओंजळ आपल्याकडे देत आहे. ती संकलित करीत असताना आलेल्या दोन प्रतिक्रिया मुद्दाम सांगतो. मी सांगली बँकेत नोकरी करीत होतो. पेठेतील एका मोठ्या पेढीवरचे दिवाणजी जवळजवळ रोज बँकेत येत असत. एके दिवशी, आजच्या शाळा आणि शिक्षक असा आमच्या गप्पांचा विषय चालू होता. त्या गप्पांत हे दिवाणजी सहभागी झाले आणि एकदम म्हणाले 'आम्हाला जे शिक्षक मिळाले तसे तुम्हाला आणि यापुढे कोणालाच मिळणे शक्य नाही.' हे शिक्षक कोण, अशी मी साहजिकच चौकशी केली. त्यांनी डी एन आपटे सरांचेच नाव घेतले. त्यांचा मी मुलगाच आहे, हे सांगितल्यावर त्यांचा चेहरा आनंदाने फुलला. ते काऊंटरच्या आत आले आणि माझ्याजवळ येऊन माझे पाय धरत म्हणाले, 'आज आम्ही सरांच्यामुळे जगात उभे आहोत'. मी विलक्षण थक्क झालो.

दुसऱ्या एका प्रसंगी बलभीम व्यायाम शाळेच्या प्रांगणात दहा पंधरा वयाची बरीच मुले खेळत होती. त्यांच्यात मिसळून मी शिकवत होतो. रस्त्याने जाणारे एक वयस्कर गृहस्थ आत आले आणि माझी पाठ थोपटून मला म्हणाले, 'याच मैदानावर दत्तोपंत आमच्यात मिसळून खेळत असत; तू वडिलांची परंपरा राखलीस!'

सुज्ञांस अधिक काय सांगावे?

*(लेखक : दत्त आपटे यांचा मुलगा, निवृत्त बँक कर्मचारी, सुप्रसिद्ध पक्षी निरीक्षक)*

●●●




भारताचे सर्वप्रकारे शोषण करणाऱ्या ब्रिटिशांच्या मगरमिठीतून सुटका करून घेण्याचे व्यापक प्रयत्न१८५७ सालापासून सुरू झाले. तेथपासून १८८५ पर्यंतच्या कालखंडात झालेल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय खटपटींचा भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचा पहिला कालखंड. त्यानंतर १८८५ पासून ते लोकमान्यांच्या निर्याणापर्यंत -म्हणजे १९२०च्या मध्यापर्यंत, सर्वांगीण घडामोडींचा आढावा घेणारा भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचा दुसरा कालखंड आहे.

या दोन्ही कालखंडांचा विश्वसनीय इतिहास जाणण्याची इच्छा करणाऱ्या तरुण पिढीला भरपूर साहित्य उपलब्ध होऊ शकते; पण १९२० पासून १९४७ पर्यंत झालेल्या, व पुढच्या कालखंडात सुरू असलेल्या झटापटींचा व घटनांचा अन्वयार्थ लावणारा इतिहास अद्यापि उपलब्ध नाही. तो कधीकाळी लिहिला जाईलच! भारतीय स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचा तो तिसरा कालखंड! या तिसऱ्या खंडासाठी संशोधकांना टिपणवजा काही संकलने स्वत: करावी लागतील व अन्य टिपणे धुंडाळावी लागतील. त्या दृष्टीने या हकिकतींचा उपयोग व्हावा अशी आशा!

विनम्र लेखक
**'मुनि'**
(अ.ह.क्षीरसागर)



*'उदंड करावे राजकारण! परी अवघे गुप्तपंथी ॥' राष्ट्रगुरू समर्थांच्या या प्रेरणेने आम्हा मंडळींचा राजकीय जीवनप्रवास सुरू झाला. तो 'सत्याग्रही विचारधारेत' विलीन करता करता साठी उलटून गेली! या हकिकतीत विस्मरणाने स्थल-काल-व्यक्ती आदींचे जे विपर्यस्त उल्लेख झाले असतील किंवा जी अवास्तवता आली असेल अथवा पूज्यपूजाव्यय झाला असेल, त्या सर्वांबद्दल क्षमस्व! क्षमस्व!!*
***'मुनि'***



## हकिकत व मनोगत

दुथडी वेरळा व एकथडी नान्नीच्या परिसरात भिक्षुकी करण्याची सनद(!) यादव कुलभूषण सिंघणराजाकडून मिळवणारे, हिंगणगाव जि.सातारा येथे जीवत्समाधी घेणारे तपस्वी नारायणभट्ट क्षीरसागर हे आमचे कुलपुरुष. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडे पसरलेल्या कपूरेश्वराच्या व गिरिजाशंकराच्या कुशीत वसलेले शामगाव हे माझे गाव. इथली तांदूळ पिकवणारी शेती; पण आता तिच्यात बटाटे विपुल पिकतात. गिडगापाची रेटं व उडदाचे घुटे खाऊनही तालमीचा शौक करणारी राकट माणसं इथं आढळतात. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला मल्ल दाजी माळी इथलाच. माझा जन्म आजोळी भोसरे येथे झाला. मुंज-व्रतबंध संस्कार शेजारीच असलेल्या राजाचे कुर्ले या गावी, हुशार ब्राह्मण कास्तकार व सावकार अराणके यांच्या वाड्यात झाला.

माझे आजोबा पां.रा.कुलकर्णी उर्फ तात्या हे अराणक्यांचे कुलमुखत्यार होते. औंधचे संस्थानिक श्रीमंत बाळासाहेब पंत यांच्याशी त्यांचा दाट घरोबा होता. माझे आजोबा त्या काळातही चांगले इंग्रजी येत असलेले असे गृहस्थ होते. ते 'केसरी'चे ग्राहक व वाचक होते.

माझे वडील हरिपंत कुलकर्णी हे स्वदेशीच्या पहिल्या चळवळीत हातमोजे, पायमोजे व कानटोप्या विणून त्यांची विक्री करण्यासाठी सातारा-सोलापूरपासून बाळापूर-अकोल्यापर्यंत पायी येत असत. ते जात्याच अबोल होते; तरीपण मधून मधून प्रवासातल्या गंमती-जमती सांगत असत. ते सहावी इयत्ता पास होते, त्यांचे हस्ताक्षर व गणित फारच उत्तम होते. गावठी शाळा चालविणे, किराणा दुकान घालणे, पोस्टल रनरची नोकरी करणे वगैरे अनेक व्याप त्यांनी केले होते. राष्ट्रीय चळवळीबाबत चालणाऱ्या चर्चेच्या वेळी त्यांनी काढलेले पुढील उद्‌गार मला अजून आठवतात. ''अरे अनंता, स्वराज्य हे सुसरीने गिळलेले माणिक आहे. ते परत मिळवायला हिमतीने खटपट केली पाहिजे. लोकांत एकी झाली पाहिजे. 'पावणेआठ' नाही म्हणणारी उडताऱ्यासारखी गावेच्या गावे उठली पाहिजेत. मुळशी-बार्डोली यांसारखे तालुकेच्या तालुके इंग्रजांविरुद्ध उभे केले पाहिजेत. लाल-बाल-पाल गेलेत, गांधी-सावरकर जातील! पिढ्यान् पिढ्या चालणारा हा झगडा आहे. या बाबतीत समाधानाचे मरण येईल इतके काम आपण केले म्हणजे झाले!''

माझे एक चुलते शं.पां.कुलकर्णी हे औंधच्या श्री यमाई हायस्कूलमधील पूज्य साने गुरुजींचे सहाध्यायी. यांनी शिक्षण अर्धवट सोडून जीआयपी रेल्वेत नोकरी धरली होती. ४२च्या चळवळीचा डोंब उसळला तेव्हा त्यांनी नोकरी सोडली व साताऱ्याला ते स्थायिक झाले. दुसरे चुलते बा.पां. कुलकर्णी हे हाडाचे शिक्षक होते. त्यांनी बडोद्याला 'कलाभुवन'मध्ये, माकडछाप टूथपावडरवाल्या नोगी कंपनीच्या चालकांसोबत घरगुती उद्योगांचे शिक्षण घेतले होते. कऱ्हाड जवळच्या सैदापूर येथील

काडेपेटीच्या कारखान्यात ते एक कामगार होते. आमच्या लहानपणी हे आमचे काका आम्हाला देशप्रेमाची गाणी व पोवाडे म्हणून दाखवत व आमच्यांत मिसळत; तरीपण या सर्व मोठ्या मंडळींचा आम्हाला धाक वाटे.

१९०९ साली माझा जन्म झाला. त्याआधीपासूनच घरात वरील प्रकारे स्वदेशीचे वातावरण होते. घरात चहाचे प्रस्थ नव्हते. शिक्षणासाठी पहिल्यांदा मी मसूरला राहिलो. मसूरच्या ओढ्यापलीकडे ब्रह्मपुरीतल्या मारुतीच्या देवळात राहणारे पूज्य नारायण महाराज गोडसे यांचा सहवास झाला. हे नारायण महाराज, सांगलीला सराफ कट्ट्यावर मंगलमूर्ती विद्यालय नावाची गावठी शाळा चालविणारे कृष्णदास महाराज गोगटे यांचे शिष्य. कृष्णदास महाराज गोगटे चळवळीच्या काळात रत्नागिरीहून निघाले ते कोल्हापूर-सांगली-सातारा-कराड-सज्जनगड असे फिरले. तिथून माहुली येथे जाऊन स्थायिक झाले होते; आणि तिथेच ते समाधिस्थ झाले. माहुलीला यांची 'श्रीकृष्णधाम' नावाची समाधी आहे. त्यांच्या सहकारी व शिष्यांच्या एका गटाने सांगलीला सिटी हायस्कूल, समर्थ व्यायामशाळा वगैरे संस्था सुरू केल्या; तर दुसऱ्या गटाने श्रीकृष्णधाम विद्यामंडळातर्फे अकोल्यास वैदर्भ गुरुकुल, सरस्वती मंदिर व टिळक शाळा या शिक्षणसंस्था सुरू केल्या.

हे कृष्णदास रामदासीबुवा त्यावेळच्या तरुणांचे एक मोठे आकर्षण होते. यांच्या संबंधीच 'रामदासीबुवा' या नावाचे एक पुस्तक ह.भ.प. ल.रा. पांगारकरांनी छापले होते; ते इंग्रज सरकारने जप्तही केले होते. मी मसूरला शिकत असतानाची बहुतेक सारी सहाध्यायी मंडळी पुढे राजकीय चळवळीत पडणारीच निघाली. विष्णूपंत कुलकर्णी निगडीकर, आफळे, राघूआण्णा लिमये, काशिनाथ देशमुख, जगदाळे, मुल्ला, मुलाणी, जकाते वैद्यांची मुले वगैरे काहींची स्मृती मला अजूनही आहे. त्यावेळचे भा.भ.मालगावे व गुरुवर्य शेंडे मास्तर यांचीही आठवण कायम आहे.

मसूरनंतर मी सांगली अनाथ विद्यार्थी आश्रमात शिक्षणासाठी गेलो. गोडबोले वकील, पूज्य तोरो वगैरे, वर उल्लेखिलेल्या श्रीकृष्णदास महाराजांच्या सहकारी शिष्य मंडळींचाच तेथेही सहवास घडला. त्यामुळे रामायण, महाभारत व संत वाङ्मयाचे वाचन घडले. विशेषत: श्री विवेकानंद स्वामी, रामतीर्थ यांचे ग्रंथ व चरित्रे, तसेच दासबोध व समर्थांचे चरित्र यांचे संस्कार मनावर झाले. याचवेळी पूज्य विनायक महाराज मसूरकर यांची 'लक्ष दासबोध पारायण' व 'श्रीसूर्यनमस्कार' अशी चळवळ सुरू होती. सांगली हायस्कूलमध्ये आम्ही मित्रमंडळी लेखनकला हे हस्तलिखित मासिक काढीत होतो. वर्गात वर्गणी जमा करून सावरकरांचे 'श्रद्धानंद' व मसूराश्रमाचे 'दासबोध' घेत होतो. असल्या तेजस्वी वाङ्मयाचे विद्यार्थीदशेत वाचन करण्याची आमची रीत होती.

सांगली येथे गो.द.कुलकर्णी उर्फ गोप्या -नकली 'चंद्रशेखर आझाद', र.ग. क्षीरसागर बुवा-कुसगावकर (नंतरच्या काळात हे संघटनेसाठी पंजाबमध्ये गेले व तेथेच स्थायिक झाले. ते गांधर्व महाविद्यालय अमृतसरचे संस्थापक) दत्ता भिलवडीकर, वा.वि. पेंडसे बेळगावकर, द.भा.भिडे, शुक्ल, याळगी हे तरुण, आणि दत्त आपटे -व त्यांची श्रीधर दातार, दामले, बोडस वगैरे मित्रमंडळी; तसेच इतर अनेक समवयस्क विद्यार्थी संघटित होत होतो. सायमन कमिशन बहिष्काराचा हा काळ होता.

▪ ▪ ▪

दिल्लीच्या लाल किल्ल्यावर १९२८-२९ला सर्व भारतीय क्रांतिकारकांची एक सभा झाली. त्यावेळी तेथे बॅ.सावरकरांमार्फत, सांगलीतल्या आम्हा तरुणांची माहिती दिली गेली. दिल्लीच्या सभेत असे ठरविण्यात आले की, क्रांतिकार्यासाठी लागणाऱ्या रकमांसाठी खाजगी व्यक्तींवर डाके घालून जनतेची सहानुभूती गमावू नये. चळवळींना पैसा तर लागणारच. तो चळवळींकरिता उघड वर्गण्या, फंड वगैरेंनी; तसेच गुप्त चळवळीकरिता तयार केलेले जप्त होऊ शकणारे वाङ्मय विक्री करून; किंवा मग बँका, रेल्वेच्या पेट्रेन्स-कॅशट्रेन्स, तहसील ट्रेझरीज, पोस्टल-रनर्स वगैरेवर धाडी घालून जमवावा.

मी यावेळी १९-२० वर्षांचा होतो. सांगलीला आम्ही 'विद्यार्थी-शिवजयंती' साजरी केली. प्रमुख पाहुणे म्हणून युवकांचे पुढारी न.वि.उर्फ काकासाहेब गाडगीळ होते. याच सुमारास केव्हातरी, लाहोर कटातील क्रांतिकारक

जतींद्रनाथ दास याने तुरुंगात उपवास करून आत्मार्पण केले. देशात क्रांतिकारकांबद्दल सहानुभूतीची मोठीच लाट उसळली. सांगलीच्या व आसपासच्या जाणत्या व वडीलधाऱ्या लोकांत आम्हा तरुणांबद्दल यावेळी कौतुकाची वृत्ती दिसत होती. 'पोरं काहीतरी मोठं कार्य करू पाहात आहेत; त्यांना साहाय्य करावे, उत्साह द्यावा' -असे या मंडळींना वाटत असल्याचे आमच्या अनुभवास येत होते. दत्त आपटे यांच्याबद्दल आम्हाला मोठेच आकर्षण उत्पन्न झाले होते. सरदार भगतसिंगाप्रमाणे अस्तन्या दुमडलेले शर्ट घालून व मिशीला भगतसिंग कट देऊन वावरणारे दत्त आपटे व त्यांच्या भोवतालची आम्ही पोरे काहींच्या चेष्टेचाही विषय बनलो होतो.

माझे त्यावेळी सांकेतिक नाव एम.एम. २ असे ठेवण्यात आले होते. याचेच पुढे मुनी महाराज झाले. एम.एम.१ हे सांकेतिक नाव हुतात्मा शिवराम उर्फ बापू राजगुरूंचे होते. अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचे संस्थापक बापूसाहेब सहस्रबुद्धे हे 'हुतात्मा राजगुरूचे मामा' म्हणून भगतसिंगादींना भेटून, त्यांना तुरुंगातून पळवून नेण्याची योजना आखणाऱ्यांपैकी एक होते. ते १९२९ च्या लाहोर कॉंग्रेस अधिवेशनाला गेले होते.

सावरकर बंधू आम्हा तरुणांना उभयनिष्ठ गुप्त व प्रगट चळवळ चालविण्याचे वेळोवेळी सांगत. गुप्त चळवळीत भाग घेणाऱ्यांनी उघड चळवळीत भाग अजिबात घेऊ नये; अगदी त्रयस्थ राहावे. प्रसंगी त्या चळवळीची टवाळी करत असावे, असेही सुचवत. संघटनेतील तरुणांनी आपला फोटो कुठेही काढला जाणार नाही अशी दक्षता घ्यावी, असेही ते आवर्जून सांगत. त्याप्रमाणे देश स्वतंत्र होण्याआधी माझा कुठेही फोटो काढला गेलेला नाही!

सांगलीला बाबाराव सावरकरांच्या जवळ आम्ही इतिहास अभ्यासत असू. सांगली हायस्कूलसमोर कै.छापखाने वकीलांच्या घरी, आमची व त्यांची बैठक होई. संस्थांनी राजकारणातील एक मोठे कार्यकर्ते - सांगलीचे अभ्यंकर वकील, यांचीही मुले यावेळी आमच्या बरोबर असल्याचे मला अंधूकसे आठवते. 'त्यांची विचारसरणी भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने' या बॅ.सावरकरांच्या अखेरच्या ग्रंथातल्याप्रमाणे असे. 'काळ'कर्ते परांजपे यांचे 'मराठ्यांच्या लढाया' हे पुस्तक, तसेच बॅ.सावरकरांचे 'वॉर ऑफ इंडिपेन्डंस्' आणि 'मॅझिनी' इत्यादी पुस्तके वाचून घेणे, त्यांच्या प्रतिलिपी करणे, त्यांची विक्री व प्रसार करणे अशीही कामे तेव्हा चालत. ही पुस्तके तेव्हा सरकारकडून जप्त झालेली होती; पण तरुणांच्या मनांवर क्रांतिकारक संस्कार करणारी होती. सावरकरांचे पोवाडे पाठ करणे, गाणे, लिहून काढणे वगैरे गोष्टीही आम्ही करीत असू. सावळापूरकरकृत 'चुकलेला इतिहास', दे.भ.अ.ब.कोल्हटकरांचे लेख, जोगळेकरांची 'स्वातंत्र्याची मूलतत्वे' व 'मानवी कर्तव्ये' या ग्रंथांचाही अभ्यास होत असे. धाडसी वृत्ती वाढविण्यासाठी पायी प्रवास करणे, सहली काढणे, पुरातून पोहत वा होडीतून १०-१०, १५-१५ मैल जाणे-येणे वगैरे कार्यक्रम अधूनमधून होत असत.

१९२९ अखेरच्या लाहोर कॉंग्रेस ठरावानुसार २६ जानेवारी १९३०ला सांगलीत स्वातंत्र्यदिन पाळण्यात व झेंडावंदन करण्यात आम्ही तरुण मित्रमंडळींनी पुढाकार घेतला. आम्हाला या बाबतीत शंभूराव इनामदार यांच्या छापखान्याचा फार उपयोग झाला. आमच्यावर गुप्त पोलीसांचे लक्ष आहे हे यावेळेपासून आमच्या लक्षात आले. याच्या एक-दीड वर्ष अगोदरच, कोल्हापूरला तोफखान्यांच्या विद्यापीठात शिकत असलेल्या आत्माराम पाटील बोरगावकर यांच्याशी आमची मैत्री जमली होती. तसेच कोल्हापूरच्या दामू जोशांच्या 'शिवाजी क्लब'मधील, परागंदा झालेल्या एका देशभक्ताच्या दोन मुलांशीही यावेळी संबंध आला. -वसंत पाठक व यशवंत पाठक ही ती दोन मुले. कोल्हापूरच्या 'गुजरी'तील पाचलग सराफांची ही मुले. हे पाचलग सराफ अज्ञातवासात होते. 'पाठक' नावाचे पुजारी बनून निझाम राज्यातील माणिकप्रभूंच्या दरबारात, देगलूर-माणिकनगर वगैरे ठिकाणी ते राहात.

१९३० साली मी मॅट्रीकची परीक्षा दिली व परभारेच साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेतल्या शिबिरात दाखल झालो. शिबिराधिपती होते द.वा. परचुरेशास्त्री व शं.वि तथा बाबा लेले शास्त्री, हे वाईच्या प्राज्ञ पाठशाळेतील शिक्षक. आमच्या सांगलीकर मित्रमंडळींच्या बातम्या यांच्या कानावर गेलेल्या होत्याच. त्यांनी शिबिरातील अनेक

जबाबदारीची कामे माझ्यावर सोपवून ती करून घेतली. याच अवधीत बाल सत्याग्रही वि.वा.नेने, हरिहर साधले वगैरेंच्या बरोबर पाटण तालुक्यात फिरून जागृती करण्याचे काम मी केले. त्या तालुक्यातील कुंभारगाव व काळगाव ही दोन गावे मला अजूनही आठवतात. तसेच सांगलीहून निघून तासगावला जाऊन, व्याख्याने देऊन रातोरात परत सांगलीस येणे; सांगलीहून-सातारा-पुणे-कोल्हापूर वगैरे ठिकाणी पायी जाऊन येणे, असल्या गोष्टी केलेल्या आठवतात.

▪ ▪ ▪

बिळाशीच्या बंडात गाजलेले दत्तोपंत कुलकर्णी व बाबूराव चरणकर वगैरेंशी १९३० साली ओळख झाली. या आधी किवळ, रेठरे धरण वगैरे -सातारा जिल्ह्याच्या विविध ठिकाणी, जंगल सत्याग्रह झाले होते; त्यात समुदायाबरोबर मीही होतो. त्यात पकडला गेलो नाही. नंतर काशीच्या पं.चंद्रशेखर आझादांच्या टोळीत सामील होण्यासाठी, पुण्याहून सेनापती बापटांचा निरोप आला. त्याप्रमाणे निघालो व काशीला पं.आझादांची भेट झाली. त्यांच्या संघटनेचा पक्का शिपाई बनून साताऱ्यास पुन्हा शिबिरात परत आलो. काशीला राहात असताना साताराची फणसळकर मंडळी, व कराडचे आळतेकर यांची खूप मदत झाली. काशीहून येताना, गावठी बॉम्ब करण्याची कृती, नायट्रोग्लिसरीन करण्याची पद्धती, काही जप्त वाङ्मय व हिंदुस्थानी समाजवादी प्रजासत्ताक सेनेची प्रचारपत्रके इत्यादी साहित्य घेऊन आलो. निशाण-नाणे-शस्त्र-समानता अशी हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक सेनेची चतु:सूत्री होती.

साताऱ्यास सत्याग्रही शिबिराला पोलीसांचा वेढा पडून पुढे शिबिरच जप्त झाले. त्यावेळी मी वेड्याचे सोंग घेऊन वावरलो, त्यामुळे मला अटक झाली नाही. त्याच रात्री भाऊसाहेब सोमण यांचा जेलमधून निरोप आला म्हणून सातारा सोडून चंद्रशेखर आझादांच्या कार्यासाठी निघालो! सेनापती पं.चंद्रशेखर आझादांचा शिपाई म्हणून स्वतंत्रपणे क्रांतिकार्य करावयास निघताना, साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेतले, त्यावेळी अटक न झालेले शिक्षक हळवे, एकबोटे, साखळकर यांनी मला भावपूर्ण निरोप दिला. तो प्रसंग आठवला की आजही प्रेमाश्रूंनी माझे डोळे भरून येतात. एकाकडे भाजी-भाकरी खाऊन व एकाकडे पेलाभर ताक पिऊन रात्री मी निघालो!

परचुरे शास्त्र्यांनी काढलेल्या 'पोलीस बंधूंना आवाहन' या पत्रकाच्या प्रती, बॅ.सावरकरांच्या मॅझिनीच्या प्रस्तावनेच्या प्रती वगैरे वाङ्मय साहित्य बरोबर घेऊन आडवाटेने साताऱ्याच्या रिझर्व्ह पोलीस बराकीत त्याच रात्री शिरलो. सकाळी मला तेथून 'राष्ट्रीय शाळेतले खुळे' म्हणून हाकून देण्यात आले. पुढे स्वामी कृष्णप्रसाद या नावाने 'आर्यधर्माश्रम'या संस्थेचा चालक बनून आत्माराम पाटील यांच्याकडे राहिलो व बहे बोरगावला ग्रामशिक्षण कार्यक्रम चालू केला. आत्माराम पाटील तेव्हा भूमीगत होते. त्यांचा व माझा संबंध जोडून हा आश्रम जप्त करण्यात आला; मलाही पकडले. इस्लामपूरच्या तुरुंगात बिळाशीच्या बाबूराव चरणकरादींची तेव्हा पुन्हा भेट झाली. या खेपेला दोन-अडीच महिने मी इस्लामपूरच्या तुरुंगात होतो. त्या अवधीत, तहसील ट्रेझरीच्या कुलुपांचे मेणावर ठसे घेऊन किल्ल्या बनवून आणल्या व इस्लामपूर ट्रेझरी लुटण्याची योजना पक्की केली. बहे बोरगाव येथील आत्माराम पाटलांचे मोठे बंधू रामभाऊ पाटील यांचा जिवलग मित्र असलेल्या एका सोनार कारागिराचा त्या कामासाठी उपयोग झाला. महात्माजींनी उत्तम चरखा तयार करण्यासाठी एक लाख रुपये बक्षिस लावले होते; त्यासाठी हे सोनार गृहस्थ खटपट करीत होते. पुढे मी (विदर्भ) वऱ्हाडात आल्यावर हे सारे संबंध हळूहळू दुरावले. त्यामुळे त्या कामातील त्यांची प्रगती मी अजमावू शकलो नाही. माझ्याबरोबर असलेल्या १९३०च्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांपैकी, सांगलीचे सर्वोदयी कार्यकर्ते नेमीनाथ कत्ते अद्यापि माझ्या स्मरणात आहेत.

या सुमारास ताकारी-इस्लामपूर टपाल टांगा लुटून चळवळीला लागणारा पैसा जमा केलेला होता. सांगलीला मी 'नवीन शाळा' नावाचा क्लास चालवीत होतो, स्टेट सर्व्हेअरच्या ऑफीसमध्ये कारकुनीही करीत होतो. यावेळी सांगलीला स्टेट सर्व्हेअर हमीदवाडकर नावाचे गृहस्थ असल्याचे मला आठवते. बहे बोरगावी 'आर्यधर्माश्रम'

चालवीत होतो; तशीच एक व्यायाम शाळाही! यावेळी आमचा उत्साह इतका होता की, आम्हाला काय करू अन् काय नको असे झाले होते. सांगली-फलटण-औंध वगैरे मराठी संस्थाने आमची आश्रयस्थाने; -म्हणून तेथे प्रत्यक्ष कृती न करता ती वगळावीत, असे आम्ही ठरवून ठेवले होते.

इतक्यात गांधी-आयर्विन करार झाला. कराची काँग्रेसला जाण्यासाठी पात्र असा काँग्रेसचा कार्यकर्ता, म्हणून माझी इस्लामपूर तुरुंगातून सुटका झाली. चरणकर, आत्माराम पाटील व त्यांचे बंधू यांचीही येरवड्याहून सुटका झाली. कऱ्हाडचे समर्थभक्त स.खं.आळतेकर वकील (दादा आळतेकरांचे वडील) यांच्याबरोबर मी कराची काँग्रेसला मुंबईहून आगबोटीने गेलो. सोबत आत्माराम पाटील बोरगावकर होतेच.

त्यावेळी एका स्वामींचा आम्हाला फार उपयोग झाला. हा स्वामी भक्त 'सदगुरू स्वयंप्रकाश आत्मा' इतकेच बोलत असे, परंतु त्याच्याबरोबर कराचीमध्ये आमचा सर्वत्र अनिर्बंध प्रवेश होत असे. त्याच्यामार्फतच तेथे जमलेल्या क्रांतिकारकांशीही आमचा परिचय झाला. या स्वामींच्या अंगावर ठिकठिकाणी लाल व हिरवे ॐ गोंदलेले होते. मूर्ती जटाधारी, उंच बांध्याची, संन्यासी, विवेकानंदांप्रमाणे एकवस्त्री पेहेराव केलेली, कानापर्यंत उंच काठी हाती असलेली, गळ्यात झोळी अडकवलेली, गीता आणि दासबोध यांचे सतत वाचन करणारी अशी होती. बिळाशीच्या पोलीस अत्याचारांनी त्रस्त झालेल्या लोकांना ते धीर देत; तिथे त्यांची माझी प्रथम भेट झाली, दुसरी भेट साताऱ्याच्या शिबिरातून मी वेड्याचे सोंग घेऊन सटकलो त्यावेळी; व कराची काँग्रेस अधिवेशनात ही तिसऱ्यांदा गाठ पडली. त्यानंतर हे 'सदगुरू स्वयंप्रकाश आत्मा' कुठेच दिसले नाहीत.

या अधिवेशनाच्या नुकतेच आधी भगतसिंगादींना लाहोर तुरुंगात फाशी दिले होते; म्हणून क्रांतिकारकांनी चिडून महात्माजींना काळ्या फुलांचा हार या कराची अधिवेशनात घातला होता. लाल डगलेवाले 'खुदाई खिदमदगार;' त्रिमूर्तीच्या फाशी व दहनक्रियेबद्दलची हुतात्मा सुखदेवच्या बहिणीची व्याख्याने; हुतात्मा राजगुरू यांच्या मातोश्रीभोवती चालू असलेली पंजाबी व बंगाली तरुणांची भजने; व हुतात्मा भगतसिंगांचा, -हुबेहूब त्यांच्यासारखाच दिसणारा लहान भाऊ कर्तारसिंग, ही या कराची काँग्रेसची प्रमुख आकर्षणे ठरली. पं.मदनमोहन मालवीयांनी भगतसिंगादींच्या गौरवपर असे, मोठे भावपूर्ण भाषण काँग्रेसच्या अधिवेशनात केले. त्या हुतात्म्यांच्या बलिदानाचा गौरव करणारा ठराव पास करण्यात आला.

अधिवेशन संपल्यानंतर बोटीनेच परत मुंबईला उतरलो. तिथे माझ्या धाकट्या बहिणीचे यजमान वरुडकर कुलकर्णी यांचा परिचय झाला. ते सी.आय.डी. खात्यात नोकरीला होते. त्यांनी आग्रहाने घरी नेले, तिथे लहान बहिणीची भेट झाली. मी तिच्या लग्नाच्या वेळी नव्हतो. चार-आठ दिवस राहून मी निघून गेलो. त्यानंतर या बहिणीची १५ वर्षांनी १९४२ चा अज्ञातवास संपल्यावर १९४५ साली अचानक पुणे स्टेशनावर भेट झाली. त्यावेळी ती व मुलेबाळे यांना सहप्रवाशांच्या उपयोगी पडण्याच्या बुद्धीने मी जागा करून दिली. तेव्हा आम्ही एकमेकांना ओळखलेच नाही. घरी पोहोचल्यावर भाच्यांना हे आपले मामा असल्याची व बहिणीला हा आपला मोठा भाऊ असल्याची ओळख पटली. इतक्या वर्षांच्या भेटीनंतर एकमेकांना पाहिले म्हणून मग आनंदाश्रू वाहू लागले! सांगलीला दे.भ.बाबा सावरकरांनी शिकविलेला राजारामकालीन संताजी-धनाजींचा तो तेजस्वी मराठी इतिहास, स्वत:च्या जीवनात हा असा अनुभवला.

▪ ▪ ▪

१९३० च्या अखेरीस किंवा १९३१ च्या सुरुवातीस मसूरला लोकनायक बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली 'सातारा जिल्हा मुक्त राजबंदी परिषद' झाली. त्यास जोडून, टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरचे संस्थापक बापूसाहेब सहस्रबुद्धे यांनी सांगलीला आम्हा सर्व मंडळींची भेट घेतली, व 'सातारा जिल्ह्यातील सर्व व्याप गुंडाळून विदर्भात चलावे', अशी मध्यवर्ती मुख्य संघटनेची आज्ञा मला सांगितली. मी प्रथम गोपाळराव कुलकर्णी, दत्ता शुक्ल(पत्की), वसंत पाठक, किर्लोस्करवाडीचे गलगले, कुरुंदवाडचे कान्हेरे वगैरे तरुणांना बापूंच्याकडे पुढे पाठविले.

मग मीही अकोला येथे दाखल झालो. १९३१ मार्च-एप्रिलचा हा काळ असावा.

बापूसाहेब सहस्त्रबुद्धे पकडले गेल्यानंतर लोकसेवा मंडळ बोरगांव मंजू (जिल्हा अकोला) या संस्थेची स्थापना व संचालन मी केले. संस्थेची स्थापना २६ जानेवारी १९३४ची. पूज्य आबासाहेब कुलकर्णी अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचे प्रमुख व विदर्भ काँग्रेसचे कुशल कर्णधार, -त्यांच्या आग्रहाच्या सांगण्यावरून मी हे केले. आमचे नेते बापूसाहेब सहस्त्रबुद्धे पकडले गेले होते व आमच्या भोवती गोळा झालेली दहा-पंधरा तरुण मंडळी हकनाक पकडली जाण्याची भीती निर्माण झाली होती. त्यासाठी सावधगिरीचे पाऊल म्हणून हे करावे असे पूज्य आबांचे म्हणणे; ते आम्हालाही पटले. या 'लोकसेवा मंडळा'त गोंदियापासून गोव्यापर्यंतच्या दहशतवादी क्रांतिकारकांना व विधायक कार्यकर्त्यांना सर्व प्रकारचे साह्य दिले जात असे. लोकसेवा मंडळात त्यावेळी धर्मराज केदार, देवीदास पाठक, द.रा.जोशी, महादेव कान्हेरे, हरिभाऊ पाटील बोराखेडीकर, शंकरराव कासार, वसंत पाठक, अकोटचे देशपांडे वगैरे सदस्य असल्याचे मला आठवते. मंडळाला प्रारंभापासून शेवटपर्यंत बोरगाव(मंजू)चे नाईकजी व धोंडसे वगैरेंचे मोठेच साहाय्य होते. लाहोरला साँडर्सवरच्या गोळीबारानंतर पं.चंद्रशेखर आझाद वगैरेंना आश्रय देणाऱ्या काशीच्या शिवसागर दत्तांच्या काशी विद्यापीठाचा आदर्श आमच्यासमोर होता.

याच सुमारास मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'इंन्डिपेंन्डंट इंडिया' या नावाचे साप्ताहिक मतपत्र सुरू केले. याच्या उभारणीसाठी व लोकसेवा मंडळाच्या कामासाठी, माझे लहान बंधू राम कुलकर्णी यांनी आणलेले, व मी स्वत: शिकवण्या वगैरे करून मिळविलेले, -असे एकूण पंधरा हजार रुपये दिले. अकोटचे राजाराम व्यास यांनीही आठ हजार रुपये दिले. या रकमांतूनच त्र्यं.गु. देशमुख उर्फ मामा गुरुजी (राष्ट्रीय शाळा, अकोला) यांना पेढ्यांचा कारखाना व फराळाचे दुकान काढून दिलेले होते. अकोटचे टी.आर. देशपांडे यांनाही एक पुस्तकांचे व स्टेशनरीचे दुकान काढून दिले होते. त्यावेळी समर्पित जीवनाची कल्पनाच अशी होती की, संघटनेत सामील झालेल्या प्रत्येकाने अनेक मार्गांनी शक्यतो जास्त पैसा जमवून तो, -शक्यतो सर्वच्या सर्व क्रांतिकार्याला द्यायचा. म्हणूनच मी स्वत: फावल्या वेळेत बाहेर शिकवण्या करून पैसा मिळवू लागलो व राष्ट्रीय शाळेत निर्वेतन काम करू लागलो. समर्पणाच्या या तत्वाप्रमाणे मी, १९४८ साली प्रापंचिक होईपर्यंत वागलो. माझे बंधू राम कुलकर्णी यांनी एका श्रीमंताकडील दागिन्यांचा डबा लांबवून नागपूरला पाठविला. या दागिन्यांची रक्कमही हिवरखेडच्या संपतराव भोपळे यांच्यामार्फत बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांनाच मिळाली.

अकोटचे व्यास, माझे बंधू राम कुलकर्णी व 'बुलढाणा केस'चे लोक यांनी, लाल किल्ल्यावर झालेल्या क्रांतिकारकांच्या ठरावाविरुद्ध वर्तन करून शिस्तभंग केला; व त्यांना आम्ही -म्हणजे बापूसाहेबांच्या गटाने, सहानुभूती दाखविली असा प्रवाद आला. त्यातून आमच्याशी इतर क्रांतिकारकांचा अंतर्गत विरोध सुरू झाला पण हा विरोध पुढे लवकरच मावळला.

लोकसेवा मंडळ बोरगाव(मंजू) या संस्थेत डॉ.राजेंद्र प्रसाद, नेताजी सुभाषचंद्र बोस, पं.नेहरू, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान वगैरे देशभक्त येऊन चर्चा व विचारविनिमय करून गेलेले आहेत. बंगाली क्रांतिकारक सीतानाथ डे, सरदार पृथ्वीसिंह, नागपूरच्या मदनलाल बागडींच्या लाल सेनेचे महादेव गुरव वगैरे क्रांतिकारक विश्रांतीसाठी या लोकसेवा मंडळात राहून गेलेले आहेत. या संस्थेतर्फे 'ग्रामोद्धाराचे तत्वज्ञान' ही कुमारअप्पांच्या मुलाखतींच्या भाषांतराची पुस्तिका फैजपूर काँग्रेसवेळी प्रकाशित केली होती. हे भाषांतर सांगलीचे माझे स्नेही दत्त आपटे यांनी केलेले होते. तसेच डॅन ब्रिन या आयरिश देशभक्त क्रांतिकारकांच्या 'माय फाईट फॉर आयरिश फ्रीडम' या जप्त झालेल्या आत्मचरित्राचे भाषांतरही दत्त आपटेंनी केलेले होते. हे मराठी व त्याचे हिंदी भाषांतर छापून प्रसिद्ध करण्यात आले होते. बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या संपादकत्वाखाली 'उपाशी शेतकरी' या नावाचे साप्ताहिक आम्ही त्या सुमारास चालवीत होतो.

माझे धाकटे बंधू राम कुलकर्णी यांनी गोव्यात स्थायी होऊन क्रांतिकारकांना शस्त्रे व दारूगोळा पुरविण्याचे काम केले. तेथे त्यांनी साखळी या गावी 'आत्मोद्धार विद्यालय'

या नावाची शाळा सुरू केली व ना. श्री. पेंढे मास्तर या नावाने ते गोव्याचे नागरिक बनले. त्या 'आत्मोद्धार विद्यालया'चे प्रारंभीचे निर्माते व संचालक असलेले राम, आज अहमदाबादच्या कॅलिको मिलमध्ये अगदी सामान्य कामगार म्हणून दिवस कंठीत आहेत. एक जर्मन गृहस्थ कॅप्टन व्हॉज याच्यामार्फत त्यांनी, दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी शस्त्रे व दारुगोळ्याने भरलेले एक जहाज भारतीय क्रांतिकारकांना मिळवून देण्याची धाडसी योजना आखली होती. तिचे वर्णनसुद्धा मोठे रोमांचकारी आहे. या जहाजाची किंमत म्हणून दोन कोटि रुपयांचे सोने त्याला द्यायचे होते.

१९३९-४० साली वीर सावरकरांवरील बंदी उठली. नंतर ते हिंदूमहासभेचे अध्यक्ष झाले व अकोल्यास आले. अकोला येथे त्यांचे काँग्रेसकमिटीतर्फे मी स्वागत केले. मी त्यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचा सेक्रेटरी होतो. पुढे मी आणि वैद्य स.ग. पंडित यांनी खरे-नरिमन प्रकरणात काँग्रेस वर्कींग कमिटीचा जाहीर निषेध केला, त्यामुळे शिस्तभंगाखाली आम्हा दोघांना काँग्रेसमधून काढून टाकले.

हे वैद्य पंडित म्हणजे अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेतील पूज्य दादासाहेब पंडितांचे कनिष्ठ बंधू. आता ते घोडनदीला स्थायी झालेले आहेत. त्यावेळी राष्ट्रीय शाळेतले सर्वच शिक्षक व विद्यार्थी काँग्रेसचे कार्य करणारे होते. याच सुमारास कै.आगरकरांच्या पत्नी मातोश्री यशोदाकाकू आगरकर यांनी निवेदन केलेल्या कै. आगरकरांच्या आठवणी 'स्त्री' मासिकातून प्रकाशित झाल्या. त्यांचे संकलन मी केलेले होते. (दत्त आपटे यांनी ते चांगले लिहून किर्लोस्करांकडे पाठविले) या लेखनाबद्दल किर्लोस्करांकडून आलेले १००रुपये मातु:श्री यशोदाकाकूंनी घेतले नाहीत. दत्त आपट्यांनी, मी किंवा श्री.आगरकरांनीच ते स्वीकारावेत असा त्यांनी आग्रह धरला. शेवटी यथावकाश ती रक्कम व श्रीमती यशोदाकाकूंचे तैलचित्र, टिळक राष्ट्रीय शाळेला त्यांचे सुपुत्र अण्णा आगरकर यांनी सादर अर्पण केले.

▪ ▪ ▪

त्रिपुरा काँग्रेसवेळी सुभाषबाबूंची व माझी भेट झाली होती; जपानला कॅप्टन रासबिहारींकडे माझी रवानगी होणार होती. माझी त्याप्रमाणे तयारीही झाली होती. काँग्रेसचा 'चलो दिल्ली'चा वैयक्तिक सत्याग्रह युद्धविरोध म्हणून सुरू होता. पण लोकयुद्ध म्हणून रॉयचे अनुयायी त्या लढाईचा, इंग्रज सरकारकडून दरमहा १३,००० रुपये तनखा घेऊन त्यांचा प्रचार करीत होते. या रॉयिस्ट गटातले कॉ.वामनराव कुलकर्णी जतकर हे १९३० साली, परचुरे शास्त्रींचे व्याख्यान ऐकून व 'पोलीस बंधूंस आवाहन' हे पत्रक वाचून, पोलीसची नोकरी सोडून चळवळीत सामील झाले होते. हे प्रमुख रॉयिस्ट. त्यांच्या जोडीने बॅ. तारकुंडे, कर्णिक, मणिबेन कारा, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मसूरचे आबा फाटक वगैरे मंडळी असल्याचे मला आठवते. ४२च्या चळवळीबाबत यांचा-आमचा तात्विक विरोध असूनही यांनी आमच्या कामात कधीच अडथळे आणले नाहीत. मी व माझी मित्रमंडळी हत्यारे-पात्यारे दारूगोळा व घातपाता (Sabotage)च्या अवजारांसह मुंबईला रॉयिस्टांच्या अड्ड्यात उतरत असू. कऱ्हाडला भैयाशास्त्री वाटवे हे पण रॉयिस्ट. धावपळीनंतर त्यांच्याकडे निवांत विसावा घेत असू.

अकोल्याच्या लोकसेवा मंडळासारखाच बहे-बोरगावला 'आर्यधर्माश्रम' म्हणून एक आश्रम मी चालवीत होतो. १९३०-३१ साली बहे-बोरगावच्या या 'आर्यधर्माश्रमा'त अकरा सदस्य होते. राहाण्यासाठी केशवस्वामी इंदूरबोधनकर यांच्या गादीवरच्या रामदासी बुवांचा वाडा होता. समर्थ संप्रदायाचेच काम मी करीत आहे हे मान्य करून, त्यांनी आपल्याजवळची पुस्तके-पत्रके वगैरे देऊन मला त्यांच्यात सामील करून घेतले होते. (हे केशवस्वामी १९४२-४३ साली संस्थान सांगली जवळ डिग्रज मोटार अपघातात वारले.) आर्यधर्माश्रमातल्या आमच्या सहकाऱ्यांचे जेवणखाण ओली भिक्षा मागून होत असे. ग्रामसफाई, साक्षरता प्रसार आणि रात्री दासबोधावर माझे प्रवचन असा कार्यक्रम असे. त्यावेळीच न.के. रायरीकर नावाचे गृहस्थ किर्लोस्करवाडीची आपली नोकरी सोडून देशसेवेसाठी जीवन वाहण्याच्या बुद्धीने निघालेले, बहे बोरगावच्या या ठिकाणी भेटले. नंतर हे रायरीकर नगरला मोहनमुद्रामंदिरात नोकरी करून स्थायिक झाले.

▪ ▪ ▪

आम्ही बहे बोरगावला इस्लामपूर तालुका काँग्रेस कमिटी स्थापन केली. बंगालमध्ये काँग्रेस द्विखंड झाली तो हा काळ होता. तसा प्रकार महाराष्ट्रामध्ये न व्हावा म्हणून साताऱ्याला जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी बुवा गोसावी यांनी खटपट करून, वाळवे तालुका काँग्रेस कमिटी इस्लामपूर ऐवजी बोरगावला असल्याचे मान्य करून जुन्या नव्यातले भांडण तोडले. यावेळी इस्लामपूरचे मुंडले यांच्या छापखान्याचा, आम्हाला वाङ्मयप्रसारासाठी फारच उपयोग झाला. त्यांचे 'ब्राह्मणपत्रिका' अशा काही नावाचे वृत्तपत्र असावे.

'खेड्यातील यात्रा' हे परचुरे शास्त्र्यांचे, सातारा तालुक्यात केलेल्या कार्याचे अहवाल पुस्तक आम्हाला ग्रामसेवेचे मार्गदर्शन करीत होते. मधूनमधून सेवक सेवानंद नावाने पुढे प्रसिद्ध झालेले, पुण्याचे पूज्य बाळूकाका कानिटकर यांच्याही प्रचारपत्रकांचा आम्ही उपयोग करीत होतो. त्यांनी 'हिंदमाता मंदिराची' कल्पना घेऊन सात लाख खेड्यांमध्ये संघटना उभी करण्याचे ठरविले होते. तिच्याद्वारा स्वतंत्र भारताचे स्वप्न पाहाणाऱ्या बाळूकाका कानिटकरांचे आमच्यावर पहिल्यापासूनच लक्ष होते. 'शेतकरी छावण्यां'चा त्यांचा कार्यक्रम व सेनापती बापटांची 'गावगीता' व 'चैतन्यगाथा', हे आमचे मार्गदर्शक ग्रंथ होते. सरदार वल्लभभाईंच्या बारडोली तालुक्याचा आदर्श आमच्यासमोर होता; म्हणून आम्ही वाळवा तालुका शेतकरी परिषद घेण्याचा विचार ठरविला. वाळवे तालुक्यात ब्रिटिश सरकारचे राज्य नसून काँग्रेस सरकारचे राज्य आहे, असे एकदा तरी सिद्ध करून दाखविण्याचा हा प्रयत्न होता. वाळवा तालुक्यातील शेतकरी मंडळी दिंड्या काढून वाजत-गाजत परिषदेसाठी बोरगावला जमली. इतक्यांच्या जेवण्याखाण्यासाठी घराघरांतून आलेल्या भाकऱ्यांनी मारुतीच्या मंदिरातल्या ओवऱ्या भरलेल्या होत्या. दोन काहिली वरण-भाजीने भरलेल्या होत्या. याच सुमारास मसूरला मुक्त राजबंदी परिषद होती. तिला अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचे संस्थापक बापूसाहेब सहस्रबुद्धे आले होते, त्यांनी तो देखावा पाहिला. जवळ एक पैसाही नसणारे लोक परिषदा घेऊन त्या यशस्वी करतात, असा उल्लेख ते वेळोवेळी विदर्भाच्या कार्यकर्त्यांसमोर सभांतून करीत असत. किर्लोस्कर कारखानदार, पं.सातवळेकर, भैयाशास्त्री वाटवे, महाजनी शास्त्री, रयत शिक्षण संस्थेचे भाऊराव पाटील वगैरे सातारा जिल्ह्यातील पुढारी मंडळी बोरगावी आलेली मला आठवतात. आश्रम पुढे बंद पडला, कारण सर्वांसह मी वऱ्हाडात बापूसाहेब सहस्रबुद्धे यांचेकडे आलो. वाळवे तालुका मात्र नेहमी आघाडीवरच राहिला.

मीठ व जंगल सत्याग्रहात शिक्षा भोगून सुटलेले व पुढे काहीतरी देशसेवा करण्याची तळमळ असलेले लोक, तुरुंगातून सुटताच बहे बोरगावला येत असत. आंध्रमधील ताडीकोंडा सुब्बाराव पंत -जिल्हा कृष्णा, हे गृहस्थ मला आठवतात. त्यांच्यामार्फत दक्षिण भारतात संघटना उभारण्याचा प्रयत्न होता. कुरुंदवाडचे मा.गो. कुलकर्णी हे बनारसच्या क्रांतिकारकांच्या परिचयाचे होते. चितगाँव शस्त्रागार हल्ल्यात पायाला गोळी लागून ते लंगडे झालेले होते. त्यांच्यामार्फत उत्तर भारतातले संबंध पुन्हा सांधण्याचा प्रयत्न सुरू झाला. हे कुलकर्णी पुढे दक्षिण आफ्रिकेत स्थायी होऊन, आम्हाला मदत करीन म्हणत. त्यांच्या गोष्टींनी बापूसाहेबांसहित आम्ही भारावून जात असू. कर्नाटक केसरी गंगाधरराव देशपांडे व पुंडलिकजी कातगडे यांचीही ओळख असल्याचे ते सांगत. ते खादीधारी असून खादी प्रचारही करीत असत. पण पुढे त्यांच्यात परिवर्तन झाले. हिऱ्यांच्या चोरट्या व्यापारात ते पोलिसांच्या नजरेत आले, १९४५-४६ साली मुंबईला मरण पावले.

१९३१-३२ च्या सुमारास आत्माराम पाटील व क्रांतिकारक हुतात्मा पिंगळ्यांची बहीण शांताबाई पिंगळे यांची ओळख झाली, व ते उभयता विवाहबद्ध झाले. नंतर पुढे शांताबाई आपल्या तीन मुलींसह पुण्याला राहू लागल्या. हुतात्मा पिंगळे म्हणजे गदर पक्षात काम करून फाशी गेलेले विष्णू गणेश पिंगळे होत!

वऱ्हाडात आल्यावर सहस्रबुद्धे आमच्या गटाचे नेते ठरविले गेले. त्यांच्या हाताखाली सात वर्षांपर्यंत सर्वांनी काम करावे असे ठरले. १९३९अखेर ही मुदत होती. नागपूर-गोंदियापासून बेळगाव-गोव्यापर्यंत, वर्षातून निदान एक दोन फेऱ्या तरी मी करीतच असे; महाराष्ट्राच्या अनेक

गुप्त संघटनांशी संबंध येत असे. पण हा संबंध प्रत्यक्ष नसून बापूसाहेब सहस्रबुद्धे आमचे प्रमुख, या नात्याने त्यांच्यामार्फत असे. बापूसाहेब उघडपणे जहाल काँग्रेस कार्यकर्ते होते. ते कट्टर गांधीवादी असल्याचे दाखवीत; साम्यवादी विचारसरणीच्या तरुणांशी त्यांची चर्चा चाले. त्यांपैकी सध्या अकोल्यातील 'नवा जमाना'चे संपादक अच्युतराव देशपांडे व कामगार नेते बाबासाहेब कोथळकर हे होत.

पुण्याला राष्ट्रभाषा प्रचारक वैशंपायन यांच्यामार्फत महाराष्ट्रातल्या दहशतवादी गटांना शस्त्रे पोहोचविण्याचे काम मी स्वत: व कऱ्हाडचे गो.द.कुलकर्णी यांनी केले. पुण्याला रेसकोर्सवर विलिंग्डनला गोळ्या घालण्याचे कामही माझ्याकडेच आले होते; पण ऐनवेळी तो बेत बदलला गेला आणि सगळेच ओम्फस्स झाले. तसाच प्रकार फर्ग्युसनमधल्या हॉट्सनवरील हल्ल्याच्या वेळीही झाला. वासुदेव बळवंत गोगटे यांनी कै.भोपटकरांच्या वकीली सल्ल्याप्रमाणे आपली जबानी ऐनवेळी फिरवल्यामुळे, आम्ही अकोला येथून गं.बा.बापट यांच्या प्रेसमधून छापून घेतलेली पत्रके आणि वा.वि. साठ्यांची 'अहिंसेची मर्यादा' या नावाची व्याख्यानमालाही फोल ठरली! या पत्रकांबरोबरच 'बाँबचे तत्वज्ञान' ही पत्रकेही वाटली गेली होती.

मुंबईला मंत्री या नावाचे, डॉ.हर्डीकरांच्या सेवादल कार्यात भाग घेतलेले एक कार्यकर्ते परिचित झाले होते. यांच्याशी १९४२ पर्यंत आमचा संबंध होता. त्या चळवळीतही त्यांचा चांगलाच उपयोग झाला. सध्या हे गृहस्थ कुठे काय करतात याबद्दल काहीच वार्ता नाही. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मधु साठे वगैरेंशीही, गोव्यात स्थायी झालेले माझे बंधू राम कुलकर्णी यांच्यामार्फत माझी ओळख झालेली होती. सेनापती बापटांचे जुने सहकारी गोरे, देव,जोशी, फाटक वगैरे यांच्याशीही परिचय झाला. वऱ्हाडातील भारत भटकेश्वर मंडळातील कार्यकर्ते व नंतर 'बुलढाणा केस' म्हणून गाजलेल्या पंढरी पाटलांच्या गटातील कार्यकर्त्यांशीही संबंध आला. या केसमधील शांताराम उखळकर यांच्यावर केस चालू असताना मी त्यांच्या घरी सर्व प्रकारची मदत करीत होतो. अकोटचे राजाराम व्यास व दादरला स्थायी झालेले गादीवाले देशपांडे हे व आम्ही मूळच्या एका गटातलेच! हे सर्व पुढे रॉयिस्ट झाले. अकोल्याप्रमाणेच अकोटला एक राष्ट्रीय शाळा होती. तिच्यामुळे तेथेही क्रांतिकार्यात रस घेणारी मंडळी होती. अप्पासाहेब गाडेगावकर यांचा तर आद्य क्रांतिकारक चाफेकर यांच्याशी संबंध होता. शिवराम राजगुरुही काही दिवस त्यांच्याकडे होते.

■ ■ ■

युरोपातले दुसरे महायुद्ध, सुभाष बाबूंचे काँग्रेसचे अध्यक्षपद, व प्रतिसरकार स्थापण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारताचा गुप्त दौरा हे कार्यक्रम व घटना अती वेगाने घडल्या. १९४२ चे 'चले जाव' आंदोलनही सुरू झाले. या आंदोलनात भाग घ्यायचा माझा प्रथम मानस नव्हता, आंदोलन काय वळण घेते हे बारीक नजरेने आम्ही पाहात होतो. दि.१२ ऑगस्ट १९४२च्या स्त्रियांच्या मिरवणुकीच्या वेळी अकोल्याच्या राखीव पोलीसदलाचा प्रमुख गोरा अधिकारी पुढे घुसणाऱ्या स्त्रियांच्या स्तनावर हातातल्या छडीने रेटीत होता; ते दृश्य मला सहन झाले नाही. आयुष्यात एक तरी गोरा ठार करण्याची संधी घ्यायचीच या निश्चयाने मी त्याच्या नरडीला हात घातला. डोळे पांढरे करून तो खाली कोसळला व मी त्याच्या वर पडलो! नंतर १४-१५ लाठ्यांचे तडाखे खाऊन मी बेशुद्ध झालो! -आणि मी नकळतच चळवळीत ओढला गेलो. श्रीमती प्रमिलाताई ओक यांच्या निमित्ताने झालेल्या त्या लाठीमारात मी जखमी झालो, माझा उजवा कान गेला, व मी कायमचा अपंग झालो. माझे धाकटे बंधू डॉ.जगन्नाथराव हे-सुद्धा यावेळी माझ्यावरील मार झेलताना जखमी झाले. दोघांची वेगवेगळ्या इस्पितळांत रवानगी झाली. मी त्यांना भेटून, त्यांनी या चळवळीत पडू नये हे नीट समजावून सांगितले. पुण्याचे सेवानंद बाळूकाका कानिटकर यांच्या चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी स्वामीराव पोंक्षे हे अकोल्याचे म्युनिसीपल इंजिनियर होते, यांनीही त्यांचे मन वळविले. हे स्वामीराव आपल्या पगारातील मोठा हिस्सा क्रांतिकारकांना मदत करण्यासाठी

खर्च करीत असत. बाळूकाकांच्या कल्पनेतील आदर्श गावाचा नमुना म्हणून अकोल्याजवळचे कापशी गावाचे पुनर्वसन करण्याची त्यांची खटपट होती. त्यास माझे डॉ.बंधू जगन्नाथराव हे त्यांनी साहाय्यक म्हणून घेतले होते. मी त्यावेळी खाजगी शिकवण्या करीत असे. स्वामीरावांनी त्यांना वैद्य करण्याचे ठरविले होते, त्यांना संस्कृत शिकवण्याचे काम मला सांगितले. शिकवणीची रक्कम माझ्या हाती न पडता घरी शामगावला वडिलांकडे रवाना होऊ लागली होती. ४२ च्या चळवळीच्या काळातच माझा सर्वांत लहान भाऊ विनायक हा, पूज्य बाळूकाका कानिटकरांच्या मांडीवर डोके ठेवून, 'मी देशासाठी मरणार' असे म्हणत म्हणत आजारपणात पुण्यात हिंदमाता मंदिरातच दिवंगत झाला. कानिटकर मोठे द्रष्टे असे देशभक्त होते.

अकोल्यास झालेल्या लाठीहल्ल्यानंतर आठ-पंधरा दिवसांनीच अकोल्याच्या भूमीगत कार्यकर्त्यांची एक सभा भरली होती व तीत जिल्ह्याच्या घातपाती (सॅबोटेज) चळवळीचे प्रमुख पिंपळे गुरुजी नेमले गेले. त्यांच्या हाताखाली राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांनी व कार्यकर्त्यांनी काम करण्याचे ठरले; पण अचानक ते पकडले गेले. महाराष्ट्र चरखा संघाची कार्यालये व रंग कारखाने या सॅबोटेजच्या कामासाठी लागणारी अवजारे बनविण्यात व रसायने पुरविण्यात भाग घेऊ लागले होते. पूज्य अण्णासाहेब सहस्रबुद्धे हे या बाबतीत आमचे प्रमुख झाले, आणि त्यांनी आखून दिलेल्या झोनमध्ये मी कामाला लागलो.

आचार्य गुरुजींच्या खटपटीने लष्करी गाडी(मिलिटरी ट्रेन)चे नक्की वेळापत्रक मिळविले गेले. अकोल्याजवळ उमरी येथे लष्करी गाडी पाडण्याची धडक (मिलिटरी ट्रेन डिरेलमेंट ॲक्शन) घेतली व ती लष्करी गाडी पाडण्यात आम्ही यशस्वी झालो. या कामी राष्ट्रीय शाळेतले विद्यार्थी रामेश्वर राऊत, पुंडलिक राहूरकर, श्रीराम राठोड यांचा, व महाराष्ट्र चरखा संघातल्या आंबेगावकर नाटेकर व पुरुषोत्तम काकोडकर इत्यादींचा उपयोग झाला. या पद्धतीच्या कामासाठी मला सांगलीच्या जुन्या मित्रमंडळींचा फारच उपयोग झाला. ९ ऑगस्ट १९४२ चा 'छोडो भारत' (क्विट् इंडिया)चा ठराव होताच सांगलीचे माझे मित्र दत्त आपटे व विनायक आपटे मला भेटण्यासाठी नागपूरपर्यंत येऊन परत सांगलीला गेले. तिथं त्यांची व माझी भेट झाली.

काँग्रेस बुलेटीन काढण्याचे काम अकोला जिल्ह्यात शेवटपर्यंत चालू राहिले. त्या कामासाठी राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थी सदानंद उखळकर, ओं.ना. गिरी, एकनाथ कोठावदे, मधू घाटे (हे सध्या लंडनला स्थायीक झाले आहेत, ते जागतिक कीर्तीचे चित्रकार आहेत,) व लक्ष्मण गोडबोले यांचा वितरक म्हणून फारच उपयोग झाला. 'बुलेटीन काढणाऱ्यांना गोळ्या घालून ठार करा' असा सरकारी आदेश होता. पण ही कामे करणारे तरुण सापडलेही नाहीत. उलट रोजच्या रोज पोलीस कचेरीत काँग्रेस बुलेटीन शेवटपर्यंत पोहचवीत राहिले. बुलेटीन करिता मजकूर पुरविण्याचे काम मी, -महाराष्ट्रात कुठेही असलो तरी - नियमीत करीत होतो. बापूसाहेब सहस्रबुद्धे तुरुंगात 'कैदी जगत' नावाचे हस्तलिखित काढीत. त्यातला मजकूरही बुलेटिनद्वारा प्रसृत करण्यात येई. सांगलीच्या अमेरिकन मिशनमध्ये 'American Mercury' नावाचे मासिक येई त्यात 'Sabotage movement in occupied Europe' या नावाचा एक लेख होता. त्याची भाषांतरे करून सर्वदूरच्या घातपाती चळवळींना काँग्रेस बुलेटिनद्वारा मार्गदर्शन केले गेले.

▪ ▪ ▪

यावेळी अण्णासाहेब सहस्रबुद्धे हे काँग्रेसतर्फे आमचे प्रमुख होते. त्यांच्यामार्फत मुंबईला एस.दाजी आणि कंपनीचे शंकरराव कुलकर्णी (इचलकरंजीकर) यांची गुप्त भेट झाली. त्यांची व माझी १९३० सालची वाईची जुनी ओळखही निघाली. स्फोटक द्रव्यांसाठी लागणाऱ्या पोटॅशियम क्लोरेट व गंधकादी द्रव्यांची आणि ॲसिडस्‌ची ट्रकांनी वाहतूक करण्याइतकी व्यवस्था त्यांच्याकडून झाली. वाहतुकीचे काम माझे जुने मित्र कऱ्हाडचे गो.द. कुलकर्णी ट्रकवाले यांच्यामार्फत केल्याचे मला आठवते.

शोभेची व सुरुंगाची दारू तयार करणाऱ्या, पण सामान्यपणे पुढील कार्याची रूपरेषा पार पाडण्यात कोणता त्याग करावा लागेल याची पुरती जाणीव असलेल्या सांगलीच्या एका व्यक्तीस माधवनगर(बुधगाव)

स्टेशनजवळ दोन प्लॉट्स घेऊन दिले. आम्ही त्याला मिस्त्री म्हणून ओळखत होतो. मुंबईहून येणारा माल माधवनगरला उतरवून घेण्याची व्यवस्था केलेली होती. कुरुंदवाडचे माधव कान्हेरे यांनी तिथे राष्ट्रभाषा प्रचार केंद्र सुरू केले होते. लोकसेवा मंडळातील ते जुने सहकारी मित्रच होते. (सध्या ते फलटण येथे स्थायी झालेले आहेत.) या मिस्त्रीने संस्थानिक श्रीमंत राजे बुधगावकराकडून परवाना मिळवून घेतला होता; त्या परवान्यात दोन वेळच्या आरतीस व उत्सवास रॉयल्टी म्हणून, दारूगोळा पुरविण्याची अट होती. अशा प्रकारे काही संस्थानिकांचीही आमच्या कामास अनुमती व छुपी मदत होती. युरोपात दुसरे महायुद्ध भडकले तेव्हापासून आमचे हे उद्योग सुरू झालेले होते.

या बेचाळीसच्या चळवळीच्या वेळी सांगलीला 'Arms or Ammunation Factory in a miniature Form' उघडून भूमिगतांना लागणारी शस्त्रे व दारूगोळा पुरविण्याची एक योजना आखली जात होती. त्यासाठी किमान गरजा (मिनिमम रिक्वायरमेंटस्) ची यादी नेण्यासाठी अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांचा निरोप घेऊन शिरूभाऊ लिमये सांगलीला दत्त आपटे यांच्याकडे आले व आम्हाला भेटले. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हे यावेळी शंकरलाल या नावाने व एस.एम. जोशी इमामसाहेब या नावाने वावरत होते. शिरुभाऊनी सांकेतिक खुणाही पटविल्या व मग दत्त आपटे यांच्या लेटरहेडवर अवजारांची यादी व खर्चाचे अंदाजपत्रक करून ते घेऊन गेले. अर्थात आमचे काम आधीपासूनच जोरात सुरू झालेले होते. अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचे प्रचारक गोडबोले गुरुजी यांनी तात्पुरत्या कामासाठी लागणारी रक्कम म्हणून तीन-चार हजार रुपये आम्हास पोचविले होते; अकोल्याचे किसनलाल ओंकारदास यांनी ती रक्कम दिली होती, असे आम्हास नंतर कळले. बेळगावचा नाकाडे नावाचा एक तरुण नायट्रोग्लिसरिन तयार करून, त्याची टेस्ट दाखवण्याचा निश्चयच करून सांगलीस आला होता.

सांगली येथे सांभारे गल्लीत कुंभार खिंडीच्या तोंडाशी एका खोलीत त्याने काम सुरू केले. माझे धाकटे बंधू राम कुलकर्णी त्याच्या मदतीला होते. पण नवख्या तरुणांची ये-जा व ॲसिडस्‌चा भपकारा यांमुळे आसपासच्या लोकांत कुतुहल उत्पन्न झाले. मग ती जागा सोडून, तेथून तीन मैलांवरील हरीपूर येथे भैय्याशास्त्री वाटव्यांच्या ओसाड पडक्या वाड्यात त्याला जागा दिली. काहीही उपकरणे हाताशी नसताना, नुसता स्टोव्ह व एनामेल बेसीन यांच्या साह्याने त्याने अव्वल दर्जाची स्फोटके बनवून दिली. यावेळेस नाशिक येथील गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसमधील दोन तरुण सांगलीस येऊन आम्हाला भेटले. बनावट नोटा छापून देतो असे ते म्हणू लागले. चलनावरील विश्वास गेला की ब्रिटिश राज्य गेले, असा आमचा विचार झाला. मुंबईच्या भूमीगत कार्यकर्त्यांच्या सभेपुढे आपले म्हणणे मांडण्यासाठी त्यांना पाठविण्याचे ठरले. इतक्यात अण्णासाहेब सहस्त्रबुद्धेच सांगलीला कुंटे यांच्याकडे आले. त्यांच्यामार्फत पुरुषोत्तमदास त्रिकमदास, अच्युतराव पटवर्धन, एस.एम, साने गुरुजी वगैरेंची संदेशवजा आज्ञा आली की, बनावट चलन करणे ही स्टेप मुळीच घेऊ नये. तेव्हा त्या बिचाऱ्यांची निराशाच झाली. आम्हालाही त्या पुढाऱ्यांच्या कोटिक्रमाचे हसू आले, पण इलाज नव्हता.

▪ ▪ ▪

सातारा जिल्ह्यातल्या पत्री सरकारच्या म्हणजे प्रतिसरकारच्या, 'धन्वंतरी' टोपणनावाने वावरणाऱ्या लक्ष्मणराव कासेगावकरांच्या न्यायमंडळाच्या, ग्रामस्वराज्याच्या रोमांचकारी कथा कानावर येत होत्या. त्यांची भेट व परिचयही झाला होता. शामगावला घरी असताना गिरिजाशंकरच्या डोंगरात लपून राहाणाऱ्या कॉंग्रेसच्या भूमिगतांना, आई 'शंकराचा निवद' म्हणून भाकरी व फुले पाठवीत असे. तिला त्या भूमिगतांत मी व माझे धाकटे बंधू राम कुलकर्णी हेच दिसत होतो. या भूमिगतांत यशवंतराव चव्हाणही काही काळ होते, असे मला नंतर कळले. यशवंतरावांच्या मनात आम्हा क्षीरसागर बंधूंबद्दल विलक्षण आपलेपणा व जिव्हाळा आहे, असे आजही जाणवते.

माझे बंधू राम कुलकर्णी यांनी एका धाडसी योजनेत कॅप्टन व्हॉजकडून क्रांतिकार्यासाठी मोठ्या प्रमाणात शस्त्रे व दारुगोळा मिळवून देण्याची किंमत म्हणून २ कोटि रुपये द्यायचे ठरलेले होते. सुवर्ण चलनाच्या रूपात हे दोन कोटि

रुपये अण्णासाहेब सहस्रबुद्धेंना मिळू शकले नाहीत. मुंबईच्या चळवळीला पैसा पुरवणारे श्रीमंत लोक, 'याला अंगात एक कोट वापरायची ऐपत नाही व हा दोन कोट मागतो' अशी कोटी करून त्यास हसले.

सांगलीचा दारुगोळ्याचा छोटा कारखाना सुरू करण्याची सर्व तयारी झाली; आणि एक दिवस सेनापती बापटांकडून खास दूत आला. त्याने 'चैतन्यगाथा' हे खुणेचे पुस्तक दाखविले व सांगितले की शिरूभाऊ पकडले गेलेत, तुमच्या कारखान्याची बित्तंबातमी ब्रिटिश गुप्तचरांच्या हाती पडली आहे; तेव्हा जड सामानाच्या लोभात न पडता तरुणांची 'चैतन्ये वाचवा' हे ऐकून आमची तर कंबरच खचली. आम्ही रात्रभर आवराआवरी करीत होतो. जुन्या सांगलीत बक्षींच्या बोळातल्या माडीवर दत्त आपटेंची अभ्यासाची खोली होती. ही खोली स्फोटक द्रव्यांचे कोठारच झालेले होते. ते ठिकाणही पोलीसांच्या डोळ्यावर आले असेल असे समजून, तिथलेही सामान खाली करीत होतो, पण ही आवराआवर करून करून करणार तरी काय? शेवटी शरीरं थकली, डोळे पेंगुळले, व बसल्या बसल्याच झोप येऊ लागली.

एवढ्यात पोलीस मोटारींचे कर्णकर्कश सायरन ऐकू आले; दत्त आपटे यांच्या घराला वेढा पडला. सकाळी सहा-साडेसहाचा सुमार होता. सांगलीच्या भावे इंजिनियर यांचेकडे मुंजी होत्या, त्यांच्यासाठी निघण्याच्या गडबडीत घरातली इतर मंडळी व पाहुणे मंडळी होती. त्यातच ही झडतीची गडबड सुरू झाली.

झडती वॉरंट व शिरुभाऊंच्या हस्ताक्षरातील, दत्त आपट्यांच्या लेटरहेडचा कागद पाहाताच एकूण सर्व प्रकाराची कल्पना आली. दत्त आपट्यांनी 'शिरूभाऊ कोण ते माहीत नाही' -वगैरे वगैरे वकिली डावपेचांची उत्तरे देऊन पाहिली, तरीही झडतीला सुरुवात झालीच! आपट्यांच्या जुन्या घरातल्या माडीवर मागल्या बाजूस आम्ही पिस्तुले आणि रिव्हॉल्व्हर्सच्या ट्रायल्स घेत असू. तिथे त्याची रिकामी काडतुसं (पुंगळ्या) इतस्तत: पडलेली होती. पण त्यावेळी मार्गदर्शक म्हणून आलेल्या सहानुभूतीच्या पोलीस अधिकाऱ्यांनी, आम्हाला ती लगबगीने जमा करून लपविण्याची संधी दिली. त्यामुळे काहीच मुद्देमाल सापडला नाही. यावेळी सांगलीच्या पोलीस अधिकाऱ्यांत आमच्या बरोबरच शिकलेली व वाढलेली मित्रमंडळी होती. या सुमारास सांगलीचे राजेसाहेब, त्यांचा लाडका मुलगा प्रतापसिंह याच्या तथाकथित विमान अपघातातल्या निधनामुळे विवश होते. शेजारीच असलेल्या किर्लोस्करवाडीच्या लोखंड कारखान्यातल्या देशप्रेमी पंड्यास्वामी इंजिनियरच्या नुकत्याच झालेल्या तेजस्वी बलिदानाने हवा तप्त झालेली होती. अंबूताई ताम्हणकर दत्त आपट्यांच्या भगिनी, त्याच घरात शेजारी राहात. त्यांनी समयसूचकता दाखविली. ॲसिड्स्च्या बरण्यांची तोंडे रेशमी फडक्यांनी बांधून, त्या सोवळ्यातल्या लोणच्याच्या बरण्या असल्याची पूर्वनियोजित बेमालूम बतावणी त्यांनी केली. त्यामुळे त्यांच्याही घराची झडती होऊन हत्यारे व स्फोटक द्रव्यांचा साठा तेथे असूनही काही सापडले नाही. तब्बल तीन-चार तास झडती होऊनही पुण्याहून तयारीनिशी आलेले पोलीस अधिकारी तसेच मोकळ्या हाती परत गेले. या प्रसंगाची सत्यवर्णने कथा कादंबरीप्रमाणे कल्पित वाटतील अशीच आहेत. Carting Centre म्हणून 'राष्ट्रभाषा प्रचार सभा माधवनगर' हा पत्ता होता. तो शिरुभाऊंच्या कागदावर नमूद होता. म्हणून राष्ट्रभाषा प्रचारक कान्हेरे यांना पकडले होते. त्यांना पुण्याला नेणार होते तेव्हा त्यांना सोडवून आणण्याचेही काम अंगावर होतेच. मीही पोलिसांना हवा होतो; पण माझी ओळख पटविणारे काहीच नसल्यामुळे मी 'भिलवडीकर' या नावाने उघडपणी संचार करीत राहिलो. माधवनगरला जाऊन कान्हेरे यांना सोडवून घेऊन आलो. भिलवडीकर हे विनायक आपट्यांच्या कोल्हापूरच्या एका जीवलग मित्राचे नाव! हा भिलवडीकर त्यावेळी नुकताच वारला होता. मिस्त्रीचा उल्लेख कोठेच नव्हता, म्हणून तो बचावला. त्याचे ते माधवनगरचे प्लॉट्स व शोभेच्या दारूचा कारखानाही वाचला! नाहीतर एका भयंकर गुप्त कटाचा इतिहास लिहिला गेला असता; व त्यात मिरज-सांगली-बुधगाव-औंध-फलटण ही संस्थानेही गोवली गेली असती!!

यानंतर थोड्याच दिवसांनी अण्णासाहेब सहस्रबुद्धेही मुंबईला अशाच प्रकारच्या स्फोटक द्रव्यांच्या कोठारात

पकडले गेले. त्यांचा खूप छळ करूनही पोलिसांना हवी असलेली काहीच माहिती वा बातमी न मिळाल्यामुळे तेही सहीसलामत सुटले. बेचाळीसच्या आंदोलनातील दारुगोळ्याच्या कारखान्याची ही हकिगत, कथा म्हणून शिल्लक राहिली.

▪ ▪ ▪

लष्करी गाडी पाडण्याच्या (मिलिटरी ट्रेन डिरेलमेंट) अकोल्याच्या घटनेसारखीच घटना आसाममध्ये घडली, अशी नोंद 'टॉटनहॅम' पत्रिकेत आहे. ठिकठिकाणी मालगाड्या पाडून त्या लुटण्याचे प्रकार झाले, पण ब्रिटिश सरकारने त्यांची नोंद घेतली नाही. सांगलीच्या आसपासही असले प्रकार घडलेच. तासगावच्या कोणा सोवनी नावाचा या घटनांशी संबंध असल्याचे बोलले जात असे. अकोल्याच्या घटनेनंतर आमची टोळी तिथून निघून गेली. ठिकठिकाणी घातपाती चळवळ करणाऱ्यांना मार्गदर्शनाचे काम करू लागली. अकोल्याजवळच बोरगावी प्रवासी गाडी पडल्याची एक घटना घडली; तिच्याशी आमचा काहीएक संबंध नव्हता. जनतेवर दहशत बसावी या हेतूने; वा क्रांतिकारी देशभक्तांबद्दल तिटकारा वाढावा या हेतूने इंग्रज सरकारने हे बनाव घडवून आणले असावेत किंवा रेल्वे कर्मचाऱ्यांच्या चुकांमुळे घडलेले हे अपघातही असावेत. आम्ही फक्त लष्करी हालचालींना पायबंद पडावा व ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नांना हाणून पाडावे म्हणून योजनाबद्ध कामे केली. त्यात लष्करी सामान वाहून नेणाऱ्या गाड्या व मालगाड्याच पाडल्या.

अकोल्याप्रमाणेच आपल्याही जिल्ह्यात Sabotage चे काम व्हावे म्हणून भूमीगत कार्यकर्त्यांमध्ये अहमहमिका सुरू झाली होती. आम्ही मुंबईत असताना अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या मार्फत अच्युतराव पटवर्धन यांची भेट झाली. अकोल्याप्रमाणेच नगर जिल्ह्यात एखादी गाडी पाडावी अशी त्यांनी गळ घातली. वराडे म्हणून कोणी एक तरुण तेथील माहितगार आम्हाला साहाय्यक म्हणून दिला. नगरला असलेले डेन्टिस्ट कुलकर्णी यांची व माझी सांगलीच्या अनाथ विद्यार्थी आश्रमातील विद्यार्थीदशेपासूनची ओळख असल्यामुळे, आमची टोळी त्यांच्याकडेच उतरली. वर्किंग कमिटीचे सभासद पकडून कोठेतरी अज्ञात स्थळी नेलेले आहेत अशी बातमी यावेळी पसरल्याने लोक फिकीरीत होते. ते अज्ञात ठिकाण म्हणजे नगरचा किल्ला असल्याचे, येथे या कुलकर्णी डॉक्टरांच्यामुळे मला नक्की कळले. आम्ही लगेच ती बातमी कॉंग्रेस बुलेटीनद्वारा सर्व देशभर पसरविली.

तथापि नगरची ही घातपाती कार्यवाही (Sabotage Action) घडू शकली नाही! कारण आम्ही निवडलेल्या ठिकाणावर अचानक मिलिटरी पहारा बसविण्यात आला आहे, असे आमच्या निदर्शनास आले. नगर जिल्ह्यात ही ॲक्शन घेण्याचे ठरले त्याची बातमी, ब्रिटिश सरकारला कशी कळली हे एक गूढच आहे. मी स्वत: किंवा माझे कोणी सहकारी पोलिसांच्या हाती पडलो नाही. याचे एक कारण, स्वत:ला पकडून घेऊन तुरुंगात जाऊन बसणे हे देशकार्य आमच्या दृष्टीने गौण होते. दुसरे कारण आमचा निर्भयपणा किंवा बेडरपणा हे; व तिसरे कारण म्हणजे याविषयी लिखापढी वा बकवास बिलकुल न करणे हे होते! या खेरीज पोलीस अधिकाऱ्यांचीही सहानुभूती व तीमुळे आम्हाला पकडण्यात त्यांनी दाखविलेली उदासीनता, काहीशी दहशत व थोडा योगायोग इत्यादी कारणांचाही त्यात समावेश करता येईल.

▪ ▪ ▪

होता होता ४२ साल संपून गेले. चळवळीचा जोर ओसरू लागला. ठिकठिकाणी विखुरलेल्या भूमिगत कार्यकर्त्यांना काम देणे व त्यांचा चरितार्थ चालविणे कठीण जाऊ लागले, पैसा संपला! जो जो जिथे असेल तिथे त्याने काही उद्योग करून स्थायिक व्हावे, व योग्य वेळेची व पुढील आज्ञेची वाट पाहावी असे ठरले. पुण्याला डेक्कन जिमखाना भागातील एका बंगल्यात एका दक्षिणसंस्थानची मराठा राणी राहात असे; तेथे आऊट हाऊसेस मध्ये जागा मिळवून माझे अकोल्याचे सहकारी राहू लागले. चरखा संघासारख्या विधायक कार्य करणाऱ्या संस्थांनी इतर अनेक कार्यकर्त्यांची सोय लावली; तशी यांचीही सोय वर्ध्याच्या विणाई विद्यालयात करण्यात आली.

१९४४ साल उजाडले. महात्मा गांधी सेवाग्रामला

येऊन दाखल झाले. त्यांनी 'सर्व भूमीगतांनी ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन व्हावे' असे फर्मान काढले. भूमीगत असलेले हिंगणघाटचे घटवाई वकील वर्ध्याला ध्वजवंदन करून पोलिसांच्या स्वाधीन झाले. पोलीस त्यांना पकडून घेऊन गेले व रीतसर त्यांना शिक्षाही झाली. त्यावेळी मी महात्माजींची भेट घेतली व १९३९ पासूनच्या आमच्या उलाढालींची सर्व हकीगत त्यांच्या कानावर घातली. 'आम्ही सध्या तुम्हाला आमचे नेते मानतो, आमचा अहिंसेवर बिल्कुल विश्वास नाही पण तुमच्या नेतृत्वावर मात्र शंभर टक्के विश्वास आहे' असे मी स्पष्ट सांगितले. तेव्हा महात्मा गांधी जरा गंभीर झाले व 'आप यहाँ से तुरंत चले जाईये!' एवढेच बोलले.

अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेतले माझे दोघे सहकारी राहुळकर व राठोड हे चरखा संघातल्या विणाई विद्यालयात विणकाम शिकत होते. रामेश्वर राऊत नावाचे तिसरे सहकारी वर्ध्याला बच्छराज फॅक्टरीत कोल्हापूरच्या मेथे मास्तर यांच्या हाताखाली टर्निंग मोल्डिंग वगैरेचे शिक्षण घेत होते. सेवाग्रामजवळ एक महारोग्यांची वसाहत वाईच्या परचुरे शास्त्रींच्यामुळे स्थापिली गेली, तिचे नाव दत्तपूर. मी सेवाग्रामला आल्यावर दत्तपूरला परचुरे शास्त्रींना भेटल्याशिवाय परत जात नसे. यावेळीही, बापूजींच्या भेटीचा अहवाल त्यांच्या कानावर घालावा व त्यांचा निरोप घेऊन जावे म्हणून मी त्यांच्याकडे गेलो. तेथेच महात्माजींची व माझी पुन्हा दृष्टभेट झाली. पूज्य परचुरे शास्त्री मला म्हणाले, ''बापूजी आलेत, तू आता जा!'' मी तेथून निघालो, पण माझ्याआधीच महात्माजी -आपल्या नित्याच्या रूग्णसेवेत खंड पाडून पाठ फिरवून वेगाने निघूनही गेले होते. परचुरे शास्त्रींची व माझी ही शेवटचीच भेट ठरली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या रोगमुक्त असलेल्या दोन मुलांना अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेत प्रवेश मिळावा म्हणून खटपट केली गेली, पण ते जमले नाही.

परचुऱ्यांच्याकडून मी निघालो तो विणाई विद्यालयात आमच्या सहकाऱ्यांची भेट घेण्यासाठी आलो. यावेळी विद्यालय प्रमुख ल.रा.पंडित होते. यांचा आदेश होता की, 'कोणत्याही कार्यकर्त्यानि पंक्तीला आपले पाहुणे आणू नयेत, आज बापूजी पंक्तीला भेट देणार आहेत.' झाले! आता मला दुपारच्या जेवणाचा प्रश्न पडला; शेवटी माझ्या या सहकाऱ्यांनी 'आमची पांजण चालू आहे' असं सांगून आपली जेवणं मागावरच मागविली; व तिथे दोन ताटात तिघं जेवलो. नंतर मी मेटपल्लीला रवाना झालो.

माझ्यावरील वॉरंटे रद्द झाल्याचे मला नक्की कळल्यावर व राष्ट्रीय शाळेच्या आबासाहेब कुलकर्णींचे मला शाळेला येऊन मिळण्याचे पत्र आल्यावर मी पूर्वीप्रमाणे राष्ट्रीय शाळेत कामाला लागलो.

अज्ञातवासात सांगलीला आपटेंकडे राहात असताना, त्या भागात भूपाल कत्ते यांचा गट, रत्नाप्पा कुंभार यांचा गट आणि वसंतदादा पाटील यांचा गट असे काम करीत होते. प्रत्यक्षात त्यांच्याशी माझा कधीही संबंध आलेला नाही. आमच्याकडून स्फोटके शस्त्रे वगैरे सामान कदाचित त्यांना मिळाले असणे शक्य आहे. कारण वितरणाची व्यवस्था अत्यंत गुप्त स्वरूपाची होती व या वस्तू पुरविण्याचे काम फक्त आम्हीच करीत होतो.

आपटेंच्याकडे पावसाळ्यात एका दिवशी दुपारच्या वेळी आम्ही विश्रांती घेत असताना, सांगलीच्या तुरुंगातून पोलिसांच्या बंदुका घेऊन किल्ल्याच्या तटावरून उड्या टाकून राजकीय कैदी पळून गेल्याचे कानावर आले. पसार झालेली ही मंडळी व नदीच्या पलीकडे-अलीकडे सांगलीचे राखीव पोलीस दळ, यांचा गोळागोळीचा सामना चांगला अर्धातास तरी चालला होता. पोलिसांशी झुंज घेणाऱ्या, तुरुंगातून पसार झालेल्या, लढणाऱ्या मंडळीतच वसंतदादा पाटील व त्यांच्या गटातील काहीजण होते असे नंतर आम्हाला कळले.

■ ■ ■

१९४५ नंतर, अकोला राष्ट्रीय शाळेत पूर्वीप्रमाणे माझ्या नोकरीला सुरुवात झाली. चळवळीतील जुने सहकारी व मित्रमंडळी जोमाने कामाला लागली. पूज्य अण्णासाहेब सहस्रबुद्धे, संस्थेतले उद्योग वाढावेत म्हणून संस्थेत पैसा ओतू लागले होते. विणाई विद्यालय जोरात सुरू झाले होते. एवढ्यातच मुंबईला आरमारी हवाईदलाचेही बंड झाले. आपल्या देशातून इंग्रज निघून जाण्याची नक्की तारीखही लागली; १५ ऑगस्ट १९४७ ला देश द्विखंड होऊन पूर्ण

स्वतंत्र झाला!

या आधीच देशात पूर्वनियोजित असे हिंदू मुसलमानांचे दंगे होऊ लागले होते. त्याविरोधात काही तरी केले पाहिजे, म्हणून मन उसळ्या घेत होते. स्वातंत्र्य दरवाज्यात आले होते; त्यास अपशकून करण्यासाठी प्रतिगामी शक्तीही देशभर उफाळत होत्या. अशा स्थितीत निझामाची दक्षिण पाकिस्तानची डरकाळी उठली. भारताचा पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल हे गृहमंत्री होते. त्यांनी विलीनीकरणाचा तहनामा करून साडेपाचशे संस्थानिकांचा प्रश्न निकालात काढला. तथापि काश्मीर आणि हैद्राबाद यांचा प्रश्न मात्र चिघळला.

हैद्राबाद संस्थानात कारवाई करायची, तर तेथील लष्करीदृष्ट्या तयारीची गुप्त बातमी काढण्याचे काम आमच्याकडे आले, व ते मी पार पाडले. यावेळेपासूनच राष्ट्रीय शाळेत उर्दू प्रचाराला जोराने चालना मिळाली. हैद्राबाद पोलीस ॲक्शनसाठी भारताच्या गृहखात्याने शाळेचे प्रमुख आबासाहेब कुलकर्णी यांच्याकडे माझी मागणी केली. त्यावेळी माझे लग्न ठरत होते, तरीपण लग्न लांबणीवर टाकून मी या कामात उडी घेतली. त्यावेळी मला हैद्राबाद येथील विवेकवर्धिनी शाळेतले शिक्षक तसेच डेक्कन आयुर्वेदिक फार्मसीचे संचालक माझे मित्र डॉ. दिवेकर इत्यादींचे बहुमोल साहाय्य झाले. तसेच रेल्वे कामगार संघटनेचे प्रमुख नेते कॉम्रेड खेडगीकर यांचे बंधू स्वामी रामानंदतीर्थ यांचाही मोठा उपयोग झाला.

भारत सरकारला मुख्यत: हैद्राबादचे लष्कर सामर्थ्य, त्याच्या वाढीच्या योजना, विमानदल, पेट्रोल साठे, टेक्नीशिअन्स वगैरे संबंधी माहिती हवी होती. ती बहुतेक सर्व विश्वासार्ह अशी माहिती, टेक्नीशिअन्सचे विदेशातील पत्ते, शस्त्रास्त्रांचे नियोजित कारखाने, रबर उत्पादनाच्या योजना, समुद्र किनारा हवा म्हणून गोवा खरीदण्याची त्यांची योजना, इत्यादी माहिती मी नव्या भारत सरकारला पुरविली. त्यावेळी विवेकवर्धिनीतले चित्रकला व भूगोल शिक्षक यांच्याकडून, अत्यंत थोड्या वेळात सबंध संस्थानचे टोपोशिट मॅप्स तयार करून मिळाले.

मी हैद्राबाद येथे असतानाच दिल्लीला महात्मा गांधींची हत्या झाली. निझामने दहा दिवसांचे सुतक जाहीर केले. शहरात ताबडतोब हरताळ पडला, हत्या करणारा हिंदू असल्याचे रझाकारांनी ध्वनिक्षेपकात जाहीर केले व सुलतानबझार भागातल्या हिंदूंची लुटालूट सुरू केली. त्या चौकात पाच-सहा हिंदूंना भोसकण्यातही आले. कासीम रिझवीची हिंदूविरुद्ध मुसलमानांना भडकविणारी भाषणे मोहल्ल्या-मोहल्ल्यातल्या सभांतून होऊ लागली. त्या सभांचे चक्षुर्वैसत्यं अहवाल मी भारताच्या गृहखात्याकडे पाठविले होते. त्या दिवसांत हैदराबादला इतर हिंदूंप्रमाणे माझेही जीवन धोक्यात होतेच; पण मी अगदी निर्भयपणाने आपले कर्तव्य करीत होतो!

▪ ▪ ▪

स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी विधायक कार्यावर व त्यासाठी शुद्ध शिक्षणावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे, असा विचारप्रवाह टिळक राष्ट्रीय शाळा अकोला या संस्थेत प्रभावी ठरला. आणि राजकारणापासून अगदी अलिप्त राहून फक्त शिक्षणकार्यच चालवावे, असा प्रयत्न सुरू झाला. मग संस्थेचे ब्रीदवाक्यही बदलविण्यात आले. सांगलीच्या अनाथ विद्यार्थी आश्रमाचे ब्रीदवाक्य 'शीलं परं भूषणम्' हेच याही संस्थेचे ब्रीदवाक्य असावे, असे ठरविण्यात आले.

फक्त शिक्षणकार्याला वाहून घेतले तरी, ही संस्था काँग्रेसवाल्यांचीच असा जनतेचा ग्रह काही कमी होईना. फॉरवर्ड ब्लॉकच्या लोकांचे एक अखिल भारतीय शिबीर त्यावेळी अकोल्यात होणार होते, त्याला संस्थेने जागा द्यावी असा विचार पुढे आला व तसे ठरलेही. पण नंतर आबासाहेब कुलकर्णी यांनी, 'सोशॅलिस्ट गटाशी आपण युती केली तर त्याचा जनतेकडून मिळणाऱ्या मदतीवर अनिष्ट परिणाम होईल' असे सांगून ते टाळले. त्यावेळी विनोदाने ते असेही म्हणाले, ''१९४२च्या चळवळीत लुटल्या गेलेल्या धुळ्याच्या खजिन्यापैकी चार-दोन लाख रुपये जर तू आपल्या संस्थेकरिता आणले असतेस, तर आपण या जनतेच्या मदतीची आणि मताची पर्वा न करता एकदम सोशॅलिस्ट झालो असतो.''

१९४८च्या मार्चमध्ये मी विवाहित झालो. म्हसवडच्या केसकर घराण्यातली माझी पत्नी; माझे सासरे कृ.न.केसरकर यांचे वडील बंधू विष्णू नरहर केसकर उर्फ

भाऊसाहेब केसकर हे अलाहाबाद विद्यापीठातून एल.एल.बी. फर्स्टक्लास फर्स्ट आले होते. ते खामगाव (जिल्हा-बुलढाणा)येथे सबजज्ज म्हणून होते. पण असहकाराच्या आंदोलनात नोकरी सोडून ते चळवळीत सामील झाले होते. पुढे ते पुसदला कोषटवार हायस्कूल येथे शिक्षक म्हणून स्थायिक झाले. त्यांनीच अकोल्याला स्थायी झालेल्या दत्तोपंत क्षीरसागर (सेवानिवृत्त तहसीलदार) यांच्या मध्यस्थीने माझे लग्न आपल्या पुतणीशी निश्चित ठरविले. दारव्हा (जिल्हा-यवतमाळ) येथील प्राथमिक शाळेत असलेली सरकारी नोकरी सोडून या वधूने माझ्या जीवनात प्रवेश केला. अमरावतीच्या पी.टी.सी. ट्रेनिंगसाठी त्यावेळी तिची निवड झाली होती, पण तेव्हा तो योग नव्हता. पुढे तिने महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई असताना प्रयत्न करून शिक्षिकेची नोकरी मिळविली. ती अकोला जिल्हा परिषदेच्या उमरी येथील प्राथमिक शाळेत नोकरी करते, व आज मुलाबाळांसह माझा चरितार्थ चालविते.

राष्ट्रीय शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचेच कार्यकर्त्यांत रूपांतर होत होते. त्यांची शैक्षणिक पात्रता वाढविण्याचा प्रयत्न पूज्य आबांच्या बरोबर मीही करू लागलो. मी स्वत:ही पूज्य आबासाहेब कुलकर्णी व पूज्य दादासाहेब पंडित यांच्याजवळ अभ्यास करून बी.ए.बी.टी. झालो व टिळक राष्ट्रीय शाळेचा मुख्याध्यापक नेमला गेलो. 'टिळकांच्या पुण्याच्या शिक्षण संस्थांप्रमाणे या संस्थेतही मुख्याध्यापकत्व आळीपाळीने बदलणारे असावे' असे सुचवून मी १९५३ साली साधा भाषा शिक्षक म्हणून त्याच संस्थेत काम करू लागलो. पूज्य आबासाहेबांची इच्छा होती की, शाळेने एक प्रशिक्षण विद्यालय चालवावे, व त्यातून विशुद्ध राष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणारे शिक्षक तयार करून बाहेर सोडावेत -म्हणजे महात्मा गांधी आदींच्या शैक्षणिक विचारांना योग्य तो प्रतिसाद मिळेल व देशाचे भले होईल. त्या दृष्टीनेच मी सेवाग्रामच्या 'नई तालीम भवन'चा अभ्यासक्रम पुरा केलेला होता. पण पूज्य आबासाहेब अकाली गेले व संस्था संचालनातील व्यापक विचारही नष्ट झाला. शाळेला 'स्पेशल स्कूल' म्हणून मिळालेली सरकार मान्यता टिकविण्यासाठी सरकारी यंत्रणेशी मला खूपच झगडावे लागले. आचार्य गुरुजी हे प्रमुख लिपिक, ते लेखणीचे पक्के होते, म्हणूनच या बाबतीतली लिखापढी मी वर्षानुवर्षे करू शकलो. १९५३ नंतर हळूहळू शाळा पूर्णपणे सरकारी यंत्रणेच्या आधीन होत गेली, व आज पूर्ण त्या चाकोरीनेच चाललेली आहे.

पण आता आज वीस वर्षानंतर, पूज्य अण्णासाहेब सहस्रबुद्धे संस्थेचे अध्यक्ष झालेले आहेत. ते पुन्हा संस्थेला सरकारी चाकोरीतून बाहेर काढण्याचा, व पुन्हा जनताभिमुख बनविण्याचा नेटाचा प्रयत्न करून पाहात आहेत.

▪ ▪ ▪

१९४५ साली सुरू होताना शाळेला जशी नुकसान भरपाई मिळाली तशीच मलाही नुकसान भरपाई मिळवून घ्यावी असा विचार निघाला. त्यासाठी पूज्य आचार्य गुरुजींनी खूप खटपट केली. अशा नुकसान भरपाई द्यावी लागणाऱ्या व्यक्तींची व संस्थांची चौकशी करण्यासाठी जुन्या मध्यप्रांत सरकारने एक चौकशी समिती नेमली. तिचे नाव हरदास ट्रिब्यूनल. या समितीपुढे माझ्या केसचा पुरावा मांडला गेला. अकोल्याच्या बापूसाहेब फडक्यांचे चिरंजीव आबासाहेब फडके हे सध्या दिल्लीला सुप्रीम कोर्टात बॅरिस्टर म्हणून प्रॅक्टीस करतात, यांची साक्ष झाली. मला नुकसान भरपाई मिळावी असे ठरले. Workmen's Compensation Act ला अनुसरून माझ्या शारीरिक अपंगत्वाची किंमत -पोलीस लाठीमारात गेलेला एक कान व एक हात यांची २१००/- रु. ठरली. पोलीसांनी जप्त केलेल्या, माझ्या नावावर असलेल्या एका खोलीतील मालमत्तेची किंमत रु. २५०/- लावली. हे असे मिळून २३५०/-रुपये मला तत्कालीन मध्यप्रांत वऱ्हाड सरकारने दिले. ही १९५० सालची घटना.

आम्हा सर्व मंडळींच्या मनावर १९३७ सालापासूनच कॉम्रेड एम.एन. रॉयच्या 'Political Revolution is dalayed Social revolution' या विचारांचा प्रभाव होता. त्यादृष्टीने सामाजिक सुधारणा म्हणून हरिजनांची स्थिती सुधारण्यासाठी मी घूसर (जि-अकोला) येथील गोपनारायण व डोंगरदिवे अशा दोन हरिजन कुटुंबाना स्वत:च्या

घरात ठेवून घेऊन त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सक्रीय भाग घेतला. तीन जण मॅट्रीकनंतर पी.टी.सी. ट्रेन्ड, व एक मुलगी नर्सिंग कोर्स पास करून आज स्वत:च्या पायावर उभी आहेत व ते स्वाभिमानाने जगत आहेत.

जातपात नष्ट करण्याच्या दृष्टीने अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेतल्या नवीन पिढीतले सदानंद उखळकर-जैन यांचा, सासवड(जि-पुणे) येथील दामल्यांच्या म्हणजे -कोकणस्थ ब्राह्मणाच्या मुलीशी विवाह लावून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. १९४९ साली दामल्यांच्या दोन अल्पवयीन मुली, अकोल्यास पहाटेच्या मेलने पु.धों. उर्फ आबासाहेब कुलकर्णी यांच्याकडे अचानक येऊन दाखल झाल्या. आबासाहेब कुलकर्णी पडले ब्रम्हचारी! तेव्हा अकोल्यात स्वत:बद्दल गैरसमज न पसरावा म्हणून त्या दोघींना माझ्या घरी रवाना केले. मी तेव्हा नुकताच विवाहित झालेलो व गावाबाहेर माझ्या शेतावर राहात असे. त्यामुळे या अचानक आलेल्या मुलींना आश्रय देण्याच्या कामी, पूज्य आबांना बिनबोभाटपणे माझी मदत घेता आली. पुढे त्या मुलींची सेवाग्रामला व्यवस्था करण्यात आली. या प्रकरणात आचार्य भागवत, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, शंकरराव देव, प्रेमाबाई कंटक वगैरे मंडळी होती. मुली अल्पवयीन म्हणून, वयात येईपर्यंत त्यांची सेवाग्रामला आर्यनायकम् व आशादेवी यांच्याकडे व्यवस्था करण्यात आली. ही व्यवस्था लागेपर्यंत माझी मदत घेण्यात आली होती. त्या मुलींपैकी मोठी मुलगी गोदावरी दामले हिचे टिळक राष्ट्रीय शाळेतील एक शिक्षक त्र्यं.गु.देशमुख उर्फ मामा गुरुजी यांच्यावर प्रेम होते. त्यांच्याशी तिचा विवाह होणार होता. पण ते निघाले क्षयरोगी! म्हणून मग हिचा तो मित्र-विवाह न होता चरखासंघातील गोरे नावाचे एक कोकणस्थ ब्राह्मण कार्यकर्ते, यांच्याशी लावून देण्यात आला. लहान मुलगी मीरा दामले हिचा विवाह मात्र ठरल्याप्रमाणे उखळकरांशी रजिस्टर पद्धतीने लावण्यात आला. समाजसुधारणेसाठी जातपात तोडणाऱ्या असल्या उपायांचा परिणामकारकपणा अजून सिद्ध व्हावयाचा आहे. माझ्या दृष्टीने असले उपाय मूलगामी नाहीत.

हरित क्रांतीनेच भारताचे आर्थिक व सामाजिक उत्थान होईल, अशी माझी पक्की धारणा झालेली आहे. तेव्हा त्या दृष्टीने प्रयत्न करणे हीच माझी आता देशसेवेची कल्पना आहे. त्यादृष्टीने मी कामालाही लागलो आहे. डॉ.खानखोजे या विख्यात क्रांतिकारकाने ती दृष्टी दिली आहे.

▪ ▪ ▪

महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासनाच्या विभागातून स्वातंत्र्यसैनिकांना साहाय्य करण्याचे ठरवून इतर अनेकांबरोबर मला आधी दरमहा ५००रुपयांचे साहाय्य दिलेले आहे. स्वातंत्र्यसैनिकाची मुले म्हणून माझ्या मुलांना शैक्षणिक सवलतीही मिळाल्या आहेत. नंतर १९६६ साली मला सन्मानपत्र देऊन माझा गौरव केला. तत्पूर्वी १९६५ साली वयाच्या ५५ व्या वर्षी मी एम.ए. झालो. लाठीमारात उजवा कान गेलेला आहे. त्यावेळी आलेले अपंगत्व म्हातारपणामुळे जास्त जाणवते आहे.

मी स्वातंत्र्यसंग्राम सैनिक म्हणून सरकारकडे जमीन मागितली नाही. शासनयंत्रणेत -म्हणजे जिल्हा परिषदा किंवा कौन्सिले यांसारख्या संस्थांतून जागा मिळविण्याचाही मी कधी प्रयत्न केलेला नाही. तथापि स्वातंत्र्याच्या रजतमहोत्सव प्रसंगी (१९७२) भूमीगत स्वातंत्र्यसैनिकांना ताम्रपट मिळावेत, पेन्शन मिळावे, भारतभ्रमणाचे प्रवास परवाने मिळावेत, सरकारी अधिकाऱ्यांकडून कृतज्ञता बुद्धीने वेळोवेळी विचारपूस केली जावी व राष्ट्रीय उत्सव प्रसंगी खास आमंत्रणे देऊन गौरव करावा, अशा सूचना केल्या आहेत.

उर्वरित आयुष्य अध्ययन, अध्यापन व स्वराज्यहितचिंतन करीत करीत शांतपणे कंठण्याची आता इच्छा करीत आहे. हरित क्रांतीचे कार्य सतत चालू राहाणारे; म्हणून ते मी स्वीकारले आहे.

'प्राप्तं प्राप्तं उपासीत हृदयेनापराजित: ।।
सुखं वा यदि वा दु:खं प्रियं वा यदि वाऽऽ प्रियम ।।'

'अनायासेन मरणं विनादैन्येन जीवनम् ।।' हे आता माझ्या जीवनाचे सूत्र आहे. महात्मा गांधीपुरस्कृत 'सत्याग्रही जीवननिष्ठा' हीच खरी भारतीय आध्यात्मिक जीवननिष्ठा होय, अशी माझी धारणा होत चालली आहे. 'योऽर्थे शुचि: सहि शुचि:।' या सूत्राप्रमाणे चाललेले माझे हे जीवन निरपवादपणे शेवटास जावो!

ज्ञात्वा ज्ञात्वा कृतेनाय विधिनाऽविधिनाऽपिवा।
प्रीणातु भगवानीश: कर्मणाऽनेन शाश्वता ।।

● ● ●

माणसे जातात पण संस्था अजरामर असतात. असे काही अजरामर घडविण्याचे भाग्य, श्रेय मिळाले की, स्वाभाविकच घडविणारांना आपणही चिरंजीव झाल्याचा आनंद होणे स्वाभाविक आहे. विशेषत: जोमाने, ईर्षेने, स्वाभिमानाने व ध्येयधोरणाशी यत्किंचितही तडजोड न पत्करता आम्ही यश मिळविले असल्याने, ज्यांना असे वाटते की, संस्था म्हटल्यानंतर नमते घ्यावे लागते, स्वाभिमानाला मुरड घालावी लागते त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, आपले कार्य एक समाजोपयोगी कार्य असल्याने तसे काही एक करण्याची आवश्यकता नाही. समाज एवढा जाणकार आहे की, त्याच्यासाठी काही विधायक करू इच्छिणाऱ्यांना मानाने कसे जगवावे हे त्याला चांगले समजते. आपला दुबळेपणा झाकण्यासाठी समाजाची भीती पुढे करणे म्हणजे स्वतंत्र भारतातील समाजावर अन्याय करण्यासारखे आहे. तोच भाग सरकारला भिण्याचा!

आमची शिक्षणसंस्था जर काही राष्ट्रीय स्वरूपाचे विधायक मौलिक कार्य करीत असेल व त्या कार्याला वशिला अगर लाचलुचपत यांच्या आहारी जाऊन कोणी उपद्रवी भूमिका घेत असेल तर भारतीय लोकशाहीच्या प्रगतीला मारक आहे हे सिद्ध करण्यासाठी जर आम्ही उभे राहिलो नाही तर आम्ही स्वातंत्र्य लढा का दिला असा प्रश्न निर्माण होईल. शिक्षकी पेशा अशी दुबळी भूमिका घेऊन टिकवावा हे आम्हाला पटत नाही. पेशाशी विसंगत भूमिका घेऊन कार्य(?) करण्यापेक्षा अन्य व्यवसायांत पडलेले काय वाईट?


आमच्या शिक्षणसंस्थेचा हा धावता इतिहास कथन करीत असताना कोणाला हिणविण्याचा, निंदण्याचा उद्देश नाही. अलीकडच्या काळात शिक्षणसंस्थांच्या कार्यपद्धतीवर अकारण टीकेची झोड उठविण्यात आली आहे, यामधील राजकारण तपासणे अत्यावश्यक झाले आहे. शिक्षणक्षेत्र स्वयंपूर्ण करण्याची खटपट दीर्घकाल केल्यानंतर या तप:श्चर्येचे फळ म्हणून दुय्यम शिक्षण विभाग काहीसा स्वयंपूर्ण झाला आहे. हा तयार झालेला भाग आयता ताब्यात घेण्यासाठी काही शिक्षकांना आता उत्सुकता आहे. त्यांची वर्दळ शिक्षणखात्यात संघटितपणे चालू झाल्याने हांजीखोरीला चटावलेला अधिकारी वर्ग संस्थांवर सर्रास दडपण आणू लागला आहे. सवंग लोकप्रियतेच्या आहारी गेलेले लोकाग्रणी यांची या प्रकरणी झालेली दिशाभूल संस्थांना बदनामीकारक व शिक्षणक्षेत्राला घातक ठरू लागली आहे.

ही आव्हाने कोणीतरी स्वीकारणे भाग होते. आमच्या संस्थेने ती स्वीकारली. सुदैवाने सर्व शिक्षणसंस्थांना आमचा हा दृष्टिकोण अभिनंदनीय वाटला. सांगलीच्या दोन पिढ्यांना ज्ञात असाच हा इतिहास आहे.

*विद्यालयीन भिंतीपलीकडे, विश्वाच्या अनंत पसाऱ्यात ज्ञानभांडार खुले आहे. आपण ते अनुभवाने साध्य केले. आपला परिसर फुलविण्यासाठी जनजीवनाधार निर्मितीसाठी कारणी लावले. आणि म्हणूनच मा.वसंतरावजी पाटील,आमचा हा छोटासा अनुभव आपणांस प्रेमादरपूर्वक अर्पण केला आहे.*

*-दत्त आपटे*

*कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्यु.सोसायटी*




| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | जीवनातील ती सकाळ | ५९ |
| २ | प्रताप स्कूल | ६२ |
| ३ | एकत्रीकरण | ७५ |
| ४ | प्रताप ते आरवाडे हायस्कूल | ८३ |
| ५ | क्रीडांगण | १०० |
| ६ | विकास घर बांधणी संस्था | १०४ |
| ७ | संस्थेची संस्कार क्षमता | १११ |
| ८ | रौप्य महोत्सव | ११५ |
| ९ | उचित गौरव अनुचित उपद्रव | ११९ |
| १० | प्रकट चिंतन | १२० |
| ११ | संस्था एक कुटुंब | १२८ |



# यंगमेन्स मॉडेल एज्यु.सोसायटी - वाटचाल

## जीवनातील ती सकाळ

१९३४ च्या जून महिन्यातील ती एक सकाळ होती. व्यक्तिश: माझ्या व माझ्या सहकाऱ्यांच्या जीवनात, ती सकाळ निश्चितच महत्वाची ठरली आहे. त्या सकाळची ती घटना अद्यापि जशीच्या तशी माझ्या डोळ्यांपुढे उभी राहात आहे.

माझे सहकारी का.द. साने हे एका व्यक्तीला घेऊन त्या सकाळी माझ्याकडे आले होते. त्यांच्याबरोबर आलेली व्यक्ती, कधीतरी पाहून मला माहीत होती. गिड्डासा बांधा, दात जरा पुढे आलेले, काळा वर्ण, आणि अंगावर मळकट कपडे अशा वेशात साने यांच्यासोबत आलेली व्यक्ती, नावनिशीवार मात्र माझ्या माहितीची नव्हती.

माझी त्या वेळची मन:स्थिती मोठी चमत्कारिक होती. घरगुती स्वरूपाच्या लाख अडचणी आ वासून माझ्यापुढे उभ्या होत्या. राजकीय आंदोलनांकडे माझे पाय खेचले जात होते. त्यांत अनेक स्नेही-सोबती अडकले होते. संस्थानी हद्दीचा फायदा घेऊन त्यांच्या बचावाचे काम करावे लागत होते. आर्थिक व प्रापंचिक अडचणींमुळे शिक्षण केव्हाच बंद पडले होते. या साऱ्या घटनांमुळे मनाला आलेली अस्वस्थता दूर करण्यासाठी म्हणून, बराचसा वेळ मी लेखन वाचनांत खर्च करीत होतो. मुंबई बार कौन्सिलची 'हायकोर्ट प्लीडर' या नावाची परीक्षा त्यावेळी अस्तित्वात होती; जमल्यास तिला बसावे म्हणून कायदे विषयक पुस्तके वाचण्याचा माझा उपक्रमही चालू होता.

वास्तविक साने हे माझ्या थोरल्या बंधूंचे, -विनायकरावांचे-वर्गमित्र, आणि विनायकराव तर नागपुरात -तेव्हा साने त्या व्यक्तीला घेऊन माझ्याकडे का यावेत याचा काहीच अंदाज लागेना. ''हे श्री.याळगी. काही कामासाठी आपल्याकडे आलेले आहेत,'' -अशी सान्यानी ओळख करून दिली. श्री.याळगी हे नाव माझ्या परिचयाचे होते; पण आलेली व्यक्ती हेच याळगी आहेत, हे मात्र मला आत्ताच कळले. याळगी व त्यांचे स्नेही किल्लेदार हे एक रात्रशाळा चालवीत असत, ती शाळा त्या उभयतांच्या खाजगी मालकीची असली तरी, त्या कारणाने याळगींच्या नावाचा मला परिचय होता.

'सांगली सिटी हायस्कूल' नामक ज्या माध्यमिक शाळेत मी स्वत: शिक्षण घेत होतो, त्यावेळी ह.स. गोखले व ज.वा. पाटणकर हे दोघे शिक्षक म्हणून तिथे काम करत होते. त्या दोघांसह सांगली (सरकारी) हायस्कूलमधील रामभाऊ मुजुमदार इत्यादी मंडळींनी याळगी यांच्या रात्रशाळेचे रूपांतर दिवसाच्या शाळेत करून, एका नव्या माध्यमिक शाळेची उभारणी केली. त्या कामात ते गढून गेलेले असल्याच्या वार्ता सांगलीत प्रसृत झाल्या होत्या. सांगलीचेच भगवंत अंबाजी व गणेश अंबाजी हे दफ्तरदार बंधू, स.पां.सहस्त्रबुद्धे, बापूराव खाडिलकर वगैरे पदवीधर मंडळीही त्या योजनेत सामील

झाल्यामुळे सांगलीच्या शिक्षण क्षेत्रात एक नवीन पर्व चालू झाल्याची हवा निर्माण झाली होती. दफ्तरदार हे तेव्हापासूनच वृत्तपत्र प्रतिनिधी म्हणून काम करीत असल्यामुळे, त्या नव्या संस्थेचा भरघोस प्रचार सर्वत्र झालेलाच होता.

सांगली संस्थानाचे सरकारी हायस्कूल आणि सांगली सिटी हायस्कूल या दोन माध्यमिक शाळांतून काम करणारे काही अनुभवी शिक्षक, या ना त्या कारणाने बाहेर पडले होते; तेच या नव्या हायस्कूलात एकत्र आलेले होते. त्यांनी श्री.याळगींच्या शाळेचे रूपांतर करण्याचा चंग बांधला असल्याने, नव्याने आकार घेऊ लागलेली ही शाळा सांगलीच्या नागरिकांत कौतुकाचा विषय बनली होती, यात काही आश्चर्य नाही.

पण एकाएकी या साऱ्या बनावाला निराळीच कलाटणी मिळाली. मूलत: त्या शाळेत मालकी हक्काने वावरणारे याळगी व किल्लेदार यांच्याशी, नव्याने गोळा झालेल्या सर्व पदवीधर शिक्षक मंडळींचे जमेनासे झाले होते. त्यामुळे एक दिवस असा उजाडला की, शाळेचे बहुसंख्य विद्यार्थी व काही सामानसुमान घेऊन या माध्यमिक शाळेतून ती नवी मंडळी बाहेर पडली. त्यांनी सांगलीच्या सदासुख थिएटरनजिक एका वाड्यात 'मॉडेल स्कूल' या नावाची आपली स्वतंत्र माध्यमिक शाळा सुरू केली. रात्रीच्या शाळेतून जन्माला येऊ घातलेली सांगलीतली नवी तिसरी माध्यमिक शाळा, नव्या 'मॉडेल एज्युकेशन सोसायटी'च्या 'मॉडेल स्कूल'ला जन्म देऊन, स्वत: मात्र मोडकळीस आली.

तत्कालीन संस्थानी शिक्षण खात्याची मान्यता याळगी यांच्याकडे असल्याने, त्यांची ही माध्यमिक शाळा तत्वत: चालू राहिली; तथापि तिथले शिक्षक आणि विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणांत बहिर्गमन केल्याने त्यांची शाळा, तसेच तिचे जनक याळगी व किल्लेदार यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. त्या साऱ्या प्रकरणाचा प्रचार वृत्तपत्रे व नागरिकांतून रात्रंदिवस चालू होता; त्यामुळेच याळगींचे नाव माझ्या परिचयात होते. प्रत्यक्ष याळगीना घेऊन साने एवढ्या सकाळी माझ्याकडे का यावेत असा एक प्रश्न माझ्या मनात आला.

नंतरच्या बोलण्यावरून जो मथितार्थ लक्षात आला तो एवढाच होता की, मॉडेल हायस्कूलच्या निर्मितीमुळे झालेली वाताहात सावरून, आपल्या शाळेचे रूपांतर पुन्हा एका प्रमुख माध्यमिक शाळेत व्हावे या दृष्टीने श्री.याळगी काही माणसे जोडण्याच्या नादात होते. श्री.साने हे त्यांच्या शाळेत जाऊ लागले होते, आणि मीही यावे म्हणून सान्यांना घेऊन ते मजकडे आले होते. त्यांच्या शाळेत एक शिक्षक या नात्याने नोकरी करणे मला अर्थात अप्रस्तुत वाटत होते. याच उद्देशाने आणखी काही व्यक्ती याळगी यांनी जोडल्या आहेत की काय याची मी चौकशी केली. आज मुंबईला कामगार कायद्यात ख्यातनाम झालेले नारायण वासुदेव फडके हेही या शाळेत काम करणार आहेत, असे मला सांगण्यात आले. फडके हे सांगलीच्या बलभीम व्यायामशाळेत आमच्या बरोबरीचे असल्याने मी याळगी यांच्या विनंतीनुसार या कामी लक्ष घालण्यास होकार दिला.

त्या शाळेसंदर्भात प्रत्यक्ष पाहणी करताना मात्र परिस्थिती थोडीशी निराशाजनक दिसून आली. त्या काळी प्राथमिक शाळेची अंतिम परीक्षा -म्हणजे मराठी सातवी - पास झालेल्या मुलांना, माध्यमिक शाळेच्या पहिल्या तीन इयत्तांचा अभ्यासक्रम एका वर्षात शिकविण्याची खास तरतूद असे. हा वर्ग त्यावेळी व्हर्नाक्युलर फायनल (व्ह.फा.) म्हणून ओळखला जाई. या वर्गात तीन वर्षांचा इंग्रजीचा अभ्यासक्रम पुरा करून, मुलांना त्यावेळच्या इंग्रजी चौथीत प्रवेश मिळे. याळगी यांच्या शाळेत केवळ पंधरा मुले शिल्लक राहिली होती. फडके शिकवीत असलेला वर्ग हा मॅट्रीकचा वर्ग असला तरी, तो केवळ शिकवणीवर्ग म्हणून चाललेला होता. म्हणजे याळगी यांची दुय्यम शाळा, ही असून नसल्यासारखी होती! हा व्ह.फा.वर्ग सोडल्यास, ज्यांना 'या शाळेचे रीतसर विद्यार्थी' म्हणता येतील अशी, इंग्रजी चौथी पाचवीच्या वर्गांत मिळून जास्तीत जास्त दहाबारा मुले शिकत होती; आणि या माध्यमिक शाळेची विद्यार्थीसंख्या सगळी मिळून तीस-चाळीसच्या दरम्यान होती. नव्याने निघालेल्या मॉडेल हायस्कूलने विद्यार्थ्यांबरोबरच बरेचसे सामान-सुमानही हलविल्यामुळे, इथे मागे राहिलेले सामान इतके जुजबी होते की, ते एखाद्या मोडक्या बाजारातच शोभले असते!

ही सर्व अवस्था पाहिल्यानंतर या शाळेत जाऊन काय करायचे असा प्रश्न माझ्यापुढे तर निर्माण झालाच; पण साने यांनी तरी ही जबाबदारी का पत्करली असावी - याचेही कोडे मला पडले. दुसरीही एक महत्त्वाची बाब अशी की, ही शाळा म्हणजे आपली खाजगी मालमत्ता असावी त्याप्रमाणे श्री.याळगी शाळेचे सर्व व्यवहार हाताळीत. फी किती जमते? खर्च किती होतो? विद्यार्थी केव्हा येतात? केव्हा जातात? - याचा काहीएक थांगपत्ता लागत नसे. काही विद्यार्थी फक्त परीक्षेपुरते येत व पास होऊन जात. जणू काही प्रशस्तिपत्रे देण्याचा अधिकार या संस्थेलाच देण्यात आला होता.

माझी तत्कालीन आर्थिक परिस्थिती अशी होती की, काहीतरी करून दहापाच रुपये मिळविणे आवश्यक होते. ही आत्यंतिक गरज असूनसुद्धा अशा तऱ्हेचे व्यवहार चालणाऱ्या एखाद्या शाळेत शिक्षकाचे काम करून ती भागवावी, यासाठी माझे मन घेईना. स्वाभाविकपणे पहिल्या एकदोनच दिवसांनंतर माझा या शाळेशी संबंध तुटला. अर्थात या मंडळींची अशी कल्पना झाली की, पुरेसे वेतन मिळण्याची शक्यता नसल्याने मी येणे बंद केले!

माझ्या न येण्यासंदर्भात व फिरून माझी चौकशी करण्यासाठी म्हणून, याळगी माझ्याकडे आले. मी त्यांना असे सांगितले की, ''या शाळेचं आजचं स्वरूप पाहता हा तुमचा एक खाजगी व्यवसाय, असं असल्यानं तिथं काम करण्यात मला स्वारस्य नाही. आपली खाजगी मालकी विसर्जित करून, एका स्वतंत्र शिक्षणसंस्थेमार्फत ही दुय्यम शाळा यापुढं चालणार असेल तर तिच्या प्रगतीसाठी काही धडपड करणे मला शक्य आहे.'' एक चांगली शिक्षणसंस्था निर्माण करावी अशी अपेक्षा, विश्वविद्यालयाच्या जगात वावरत असतानाच आम्ही धरली होती. त्यामुळे या कार्यात मला जरूर रस होता. पण याळगी जर या शाळेचे रूपांतर सार्वजनिक शिक्षणसंस्था म्हणून करणार असतील, तरच त्या शाळेसाठी काही करणे मला शक्य होते. त्यांना मी तशी जाणीव करून दिली.

यानंतर याळगी उत्तरले, ''मी आजपर्यंत ही शाळा कशी का चालविली असेना, पण ज्या पद्धतीने या शाळेची आज दुर्दशा होऊन मला अकारण बदनाम करण्यात आले आहे, त्याचा विचार करता मला माझे सर्वस्व हिरावून घेतल्याप्रमाणे झाले आहे. ही भकास झालेली शाळा ऊर्जितावस्थेला यावी. तिने अन्य प्रथितयश शाळेच्या बरोबरीने यश मिळवावे हीच आता माझी इच्छा आहे; आणि त्यासाठी आपण सांगाल ते मान्य करण्याची माझी तयारी आहे.''

यानंतर असे निर्णय घेण्यात आले की, एक स्वतंत्र शिक्षणसंस्था नोंदणी करून घ्यावी व त्या संस्थेकडे या शाळेचे संचलन देण्यात यावे. व्यक्तिश: याळगींना त्या संस्थेचे आजीव सभासदत्व देण्यात यावे. आज त्यांच्या शाळेकडे असलेल्या मालमत्तेची रास्त किंमत त्यांना देण्यात यावी, म्हणजेच एका खाजगी मालकी असलेल्या शाळेचे सार्वजनिक शिक्षणसंस्थेच्या शाळेत रूपांतर करण्यात यावे. संस्थेचे आजीव सेवक सभासदत्व पत्करल्यानंतर, कोणीही विशिष्ट पगाराचा आग्रह धरायचा नाही. शाळेचा अन्य खर्च भागवून जे काही राहील त्यात समान भागिदारी सर्वांनी स्वत:साठी घ्यावयाची.

ब्रिटिश अमदानीतील संस्थानी अंमलात दुय्यम शाळांना अनुदान देण्याबाबत काही नियमावली नसल्याने, शाळेला संस्थानची मान्यता असली तरी संस्थान सरकारचे अनुदान मिळण्याची शक्यता नव्हती; आणि तसे ते कित्येक वर्षे मिळतही नव्हते. किल्लेदार हे सरकारी नोकरीत असल्याने त्यांनी आजीव सभासदत्व पत्करण्यास स्वाभाविकपणे नकार दिला. याआधी ते फावल्या वेळी आवड म्हणून शिक्षकाचे काम करीत. शिक्षणसंस्थेच्या निर्मितीत त्यांना स्वाभाविकच फारसे स्वारस्य नव्हते. साने त्याबाबतीत उत्सुक होते, त्यामुळे त्यांनी आजीव सदस्य सेवकत्व तत्काळ पत्करले.

यानंतर काही घटना फारच झपाट्याने घडल्या.

●●●

## प्रताप स्कूल

१९३५चा जानेवारी महिना. त्या पौष पौर्णिमेला खग्रास चंद्रग्रहण होते. ग्रहण संपून गेल्यानंतर आमच्या मातोश्रींच्या प्रकृतीला उतार पडेल या भाबड्या आशेने पौर्णिमेची ती काळरात्र केव्हा संपते म्हणून आम्ही वाट पाहात होतो. पण घडणारे टळणार नव्हते. सकाळीच माझ्या थोरल्या बंधूंना, श्री.विनायकरावांना तार करून नागपूरहून परत येण्याबद्दल मी कळविले. बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर व्यापारात पडण्याचा निर्णय घेऊन ते नागपुरास आमच्या मावसबंधूच्या पेढीकडे रवाना झाले होते.

मातोश्रींच्या निधनामुळे मी एकटा पडल्यासारखा झालो होतो. इतर भावांच्या विभक्तपणामुळे भकास झालेले आमचे घर व निराधार होऊन अलीकडेच घरी आलेली एक भगिनी, यांचा विचार करून विनायकरावांनी आता सांगलीतच राहण्याचे ठरविले. आम्हास एक नवीन आजीव सेवक उपलब्ध झाला.

आजचे कामगार कायदेपंडित बा.गो.नाईक, व त्यावेळचे कवी विश्वास हेही येऊन संस्थेत दाखल झाले. शिक्षणसंस्था निर्मितीसाठी व ती यशस्वीपणे चालविण्यासाठी जिद्दीने काम करू शकतील अशी कार्यकर्ती मंडळी हाताशी आली होती. आता नागरिकांचा पाठिंबा आवश्यक होता. त्यावेळची ठळक नागरिक मंडळी त्या काळात प्रसिद्ध असलेल्या सांगली एज्युकेशन सोसायटीत वावरत असल्याने, आम्हाला नवीन मंडळी जोडणे भाग होते. तत्कालीन सांगलीच्या व्यापारी विश्वात ठळकपणाने ज्ञात असलेले बापूभाई रतनचंद शहा यांची भेट घेण्यात आली. लीलाचंद रेठरेकर हे शाळेच्या स्थापनेदिवशी संस्थेत आले, आणि सतत तेहत्तीस वर्षे संस्थेत राहिले. त्यांच्या निधनामुळेच संस्थेची व त्यांची फारकत झाली. सांगलीच्या 'दक्षिण महाराष्ट्र' या साप्ताहिकाचे संपादक हरिभाऊ टिळक वकील, दत्तात्रय गोविंद लिमये वकील, व आम्ही चौघे आजीव सेवक सदस्य; अशांचे एक मंडळ बनले. घटना तयार करून शिक्षणसंस्था नोंदविण्यात आली, आणि 'यंग मेन्स सोसायटी'चा जन्म झाला.

एके दिवशी माझे स्नेही असलेले कवी सी.म.बापट हे मला भेटले व म्हणाले, ''तुम्ही नवीन शिक्षणसंस्था काढली आहे व एक दुय्यम शाळाही चालवावयास घेत आहात. या संस्थेमध्ये माझे एक जुने स्नेही शं.गो.गोखले यांचा समावेश करता आला तर पहा.'' त्यावेळी 'किर्लोस्कर' मासिकात शं.गो.गोखले काही कथालेखन करीत. सांगली हायस्कूलमधील एक शिक्षक एम.जी.गोखले यांचे ते धाकटे बंधू. पूर्वी ते सरकारी नोकरीत होते, त्यामुळे 'मिळाला तर पगार, नाही तर फुकट' अशा अवस्थेतील आमच्या शाळेतील नोकरी म्हणजे अळवावरचे पाणी! पण सी.म.बापट यांनी विचारणा केल्यामुळे मी एवढेच म्हणालो, ''आमचा मामला हा असा आहे. त्यांना तो मान्य होत असेल तर पहा. आमची ना नाही.'' मग एक दिवस शं.गो.गोखले हे एक नवे आजीव सेवक सदस्य आमच्या शिक्षणसंस्थेला येऊन मिळाले.

याळगींची ही शाळा, सांगलीच्या मध्यवर्ती पाण्याच्या टाकीनजीक असलेल्या गणपती पेठेतील वाडेकर यांच्या इमारतीत तिमजल्यावर होती. या दुय्यम शाळेत व्हर्नाक्युलर फायनल, आणि इंग्रजी पाचवी, सहावी असे एकूण तीन वर्ग तीन खोल्यांत भरत. बाहेरच्या गच्चीत एक बाक टाकून, आम्ही मोकळ्या तासाचे शिक्षक बसत असू. आमची ही नवी वर्दळ पाहून घरमालक वाडेकर थोडे अस्वस्थ झाले. याळगींची तीही शाळा एका सार्वजनिक संस्थेच्या ताब्यात गेली असून, आपल्या जागेचा वापर भाडेकरू या नात्याने एका व्यक्तीकडे न राहता, एक संस्था आपली भाडेकरू बनणार ही गोष्ट त्यांना फारशी संमत झाली नसावी. त्यामुळे त्यांनी याळगी यांना जागा सोडण्यासाठी तगादा चालू केला.

शिक्षणसंस्थेचा व्याप वाढविण्याच्या दृष्टीने ही जागा आम्हाला अपुरी व गैरसोयीची होतीच. आम्ही स्वाभाविकपणे नवीन जागेच्या शोधात होतो. गणपती पेठेतीलच एक प्रशस्त इमारत आमच्या पाहण्यात आली. या वाड्याबद्दल त्या भागात बरेचसे गैरसमज पसरले असल्याने, जागा अल्प भाड्यात मिळण्याची शक्यता

असूनही आम्ही त्या जागेचा नाद सोडला. मग एक दिवस सांगलीच्या गोवर्धन संस्थेची जागा उपयुक्त होईल का, याद्दष्टीने पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

गोवर्धन संस्थेच्या इमारतीबाबत काही आख्यायिका होत्या. या वास्तूत उगम पावणाऱ्या संस्थांचा हमखास उत्कर्ष होतो अशी एक भावना होती. याच संस्थेत सांगली नगर वाचनालय जन्मास आले आणि आज ते आपल्या मध्यवर्ती भव्य वास्तूत नांदत आहे. याच संस्थेत सांगली एज्युकेशन सोसायटीचा जन्म झाला आणि अल्पावधीतच तिने आपल्या मालकीच्या जागेत प्रवेश करून एक नामवंत शिक्षणसंस्था म्हणून लोकांत स्थान मिळविले. स्वाभाविकपणे ही जागा संपादन करण्याकडे आमचेही लक्ष लागले यात काही आश्चर्य नाही.

या गोवर्धन संस्थेची इमारत सांगलीच्या सरहद्दीवरून वाहणाऱ्या कृष्णामाईच्या तीरावर आहे. या इमारतीचा दुसरा मजला त्यावेळी जुनाट अवस्थेत असला तरी, तसा मोठा प्रशस्त होता. सांगलीत येणाऱ्या नाटक कंपन्यांचे आवडते मुक्कामस्थान म्हणजे गोवर्धन संस्थेची - पांजरपोळची ही इमारत! माडीवरील पश्चिमेच्या खिडक्यांतून निसर्गाचे मनोरम स्वरूप दृष्टीस पडे, शिवाय ही इमारत गावाबाहेर असल्याने, शालेय वातावरणाला आवश्यक अशी प्रगाढ शांतताही तिथे लाभत असे. इमारतीच्या अंगणात गार्यीसाठी प्रशस्त गोठे होते; पण गार्यींची अधिकांश वस्ती संस्थेच्या चराऊ रानात असल्याने या गोठ्यांत त्यांची वर्दळ क्वचितच असे. पावसाळ्याखेरीज अन्य ऋतूंत त्या बहुधा बाहेरच असत. दुय्यम शाळेच्या दृष्टीने जागा सर्वस्वी अनुकूल असली तरी, ती संपादन कशी करावी हा प्रश्न होता. तालमीचे शौकीन व राष्ट्रीय चळवळीत उलाढाली करणारे तरुण म्हणून आम्हाला सांगलीत ओळखत असल्याने, आमच्या या शिक्षणकार्याबद्दल जनता साशंक आहे की काय, असा एक न्यूनगंड आम्हास जाणवत असे. यामुळे पांजरपोळासारखी धनाढ्य संस्था आपली ही वास्तू शाळेसाठी आम्हास वापरू देईल किंवा नाही याचीच शंका होती. तरीही संस्थाचालकांना भेटण्याचा आम्ही निर्णय घेतला.

तत्कालीन सांगलीच्या सार्वजनिक जीवनात ठळकपणाने वावरणाऱ्या दोन व्यक्ती म्हणजे अण्णासाहेब राजमाने व अप्पासाहेब जोग ह्या होत. पांजरपोळ संस्थेच्या कारभाराची सूत्रे ह्या उभयतांच्या हाती होती. राजमान्यांच्या त्यावेळच्या काळ्याभोर मिशा आता पांढऱ्या शुभ्र झाल्या आहेत. डोकीचे केस पांढरे झाले असून किंचित टक्कलही पडले आहे. पण चालण्याची त्यांची ती पैलवानी ढब व ताडकन् खड्या सुरात बोलण्याची लकब अद्यापि शाबूत आहे. आप्पासाहेब जोग मात्र आता दिसत नाहीत. त्यांचा एक विलक्षण नाद असा होता की, त्यांना बांधकामे करण्याची व पाहण्याची विलक्षण आवड. गावच्या कोठल्याही भागात कसलेही बांधकाम चालू असले की अप्पांनी त्याला भेट दिली नाही असे कधीच होत नसे. विशेषत: सार्वजनिक संस्थांच्या बांधकामावर त्यांची विशेष प्रीती! सार्वजनिक पैशांचा बांधकामासाठी उपयोग करून ते आपली हौस पुरी करण्याचा जरूर प्रयत्न करीत.

आमच्या संस्थेसाठी ही पांजरपोळची जागा जर मिळाली तर त्या इमारतीत दुय्यम शाळेसाठी आवश्यक अशा सर्व सुधारणा या उभयतांकडून आम्हास क्रमश: करून मिळतील याची आम्हांस खात्री होती. या जागेची पाहणी करत असताना अनपेक्षितपणे आम्हाला आणखी एक व्यक्ती गाठ पडली. बाळा नाना चौगुले हे भाऊराव पाटलांचे चाहते असल्याने आमच्या शिक्षणसंस्थेला सहकार्य देण्याचे त्यांनी मान्य तर केलेच, पण आमच्यासाठी पांजरपोळची इमारत उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य देण्याचेही मान्य केले.

एक दिवस आम्ही अण्णासाहेब राजमाने व अप्पासाहेब जोग यांना भेटलो. आमच्या शिक्षणसंस्थेसाठी पांजरपोळची इमारत भाड्याने मिळण्याबाबत विनंती केली. शिक्षणसंस्थेसारखा कायम भाडेकरू गोवर्धन संस्थेला उपलब्ध होत असल्याने त्यांनी आमची मागणी मान्य करून वरचा मजला आमच्याकडे भाड्याने देऊ केला. अधूनमधून येणाऱ्या नाटक कंपन्यांना भाड्याने देण्यासाठी तळमजला आपणाकडे राखून ठेवला.

ही घटना मोठीच लाभदायक झाली. वाडेकरांच्या इमारतीमधून यंग मेन्स एज्युकेशन सोसायटीच्या दुय्यम

शाळेचे स्थलांतर करून ती शाळा या इमारतीत नेण्याचे निश्चित झाले. ही जागा तशी प्रशस्त असल्याने किमान सात वर्ग मावून शिवाय शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध होण्याजोग्या होत्या. तथापि ही सर्व जागा थोड्याफार दैन्यावस्थेत असल्याने तिची साफसफाई करून ती सुस्थितीत आणण्यासाठी १९३५चा सर्व मे महिना खर्ची पडला. जुन्या काळी शिक्षणसंस्थांच्या संस्थापकांनी केलेले काबाडकष्ट आमच्यापुढे आदर्श म्हणून असल्याने, या प्रचंड इमारतीची डागडुजी करण्यासाठी सर्वांनी - विशेषत: वि.ना.आपटे व का.द.साने यांनी -घेतलेले कष्ट आजही स्मरणात आहेत. अनेक खटपटी लटपटी करून १९३५च्या जून महिन्यात शाळेचे या इमारतीत स्थलांतर झाले.

या शाळेच्या तळमजल्यावर नंतर एक दिवस 'आनंद संगीत मंडळी'चा मुक्कामही पडला. या नाटक मंडळींचे, आचार्य अत्रे लिखित 'साष्टांग नमस्कार' हे नाटक त्यावेळी लोकप्रियतेच्या शिखरावर होते. सांगली मुक्कामात कंपनीने आचार्यांचा सत्कार आयोजित केला, आणि एक दिवस आचार्यांचा मुक्काम पांजरपोळाच्या तळमजल्यातील कंपनीच्या बिऱ्हाडी पडला. सायंकाळच्या सत्कार सभेत आचार्य अत्रे आपल्या नेहमीच्या विनोदी स्वभावानुसार म्हणाले, ''माझा मुक्काम कृष्णा तीरावरील इमारतीत आहे. त्या इमारतीत वर पोरे व खाली ढोरे आहेत. कंपनीने मला चांदीचा तांब्या भेट दिला आहे; पण सकाळी कृष्णाकाठावर हा तांब्या घेऊन जाणे शक्य नाही...''

आचार्य अत्र्यांची विनोदी बुद्धी एका दृष्टीने आमच्या पथ्यावर पडली. नाटक कंपन्यांना हा तळमजला वापरणे गैरसोयीचे होऊ लागले. विद्यार्थ्यांच्या धुडगुसामुळे त्यांना दिवसा झोपा काढता येईनात अगर रात्रीच्या नाटकासाठी तालमीही घेता येईनात. नाटक कंपन्या दुसऱ्या जागेच्या शोधात दिसताच, आम्ही या इमारतीचा तळमजलाही शाळेच्या वाढत्या व्यापासाठी हस्तगत करण्याच्या विचारास लागलो. गोवर्धन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे बोलणी चालू केली.

याळगींचे मोडकळीस आलेले हायस्कूल एव्हाना निकालात निघाले असावे, अशीच सांगलीच्या नागरिकांची कल्पना होती. त्यामुळे पांजरपोळच्या इमारतीत रात्री अपरात्री चालू झालेल्या हालचाली त्यांना कुतुहलजनक वाटत होत्या. या इमारतीत एखादी शाळा येणार, याची त्यांना कल्पना असावी, पण ती कोणत्या संस्थेची कोणती शाळा हे कळण्यास मात्र मार्ग नव्हता. आम्हांपैकी कोणालाच प्रसिद्धी-तंत्रांची कल्पना नव्हती, अगर त्याची अपेक्षाही नव्हती. जे काही करावयाचे ते अबोलपणाने प्रत्यक्ष करून दाखवायचे, असाच आमचा खाक्या असल्याने जे घडत होते ते प्रत्यक्ष घडल्यानंतरच लोकांपुढे यावयाचे.

आता आमच्यापुढे एक महत्त्वाचा प्रश्न होता, तो म्हणजे नव्या हायस्कूलच्या मान्यतेचा! याळगींच्या शाळेला संस्थान सरकारची मान्यता होती. आता त्या शाळेतून फुटून दूर गेलेल्या 'मॉडेल स्कूल'ला संस्थानी शिक्षणखात्याने मान्यता दिली होती. त्या शाळेचा अल्पसा शेष भाग आमच्या 'यंग मेन्स सोसायटी'ने आपल्याकडे घेतला होता. आता त्या शाळेची मालकी आमच्या शिक्षणसंस्थेकडे आल्याने, नव्याने अर्ज केल्यास दरबारची मान्यता मिळेल अगर नाही याची शंका होती. कारण शिक्षणखात्याची सूत्रे हाती असलेला अधिकारीवर्ग असे बोलून दाखवी की, दरबारचे सरकारी हायस्कूल, सांगली एज्युकेशन सोसायटीचे सिटी हायस्कूल, आणि पदवीधर शिक्षकांनी काढलेले नवे मॉडेल हायस्कूल यांचा विचार करता तुम्ही हाती घेतलेली ही शाळा चालणे कठीण आहे. तुमचे तारुण्य व शक्ती या खटपटीत अकारण खर्च करण्यापेक्षा तुम्ही अन्य काही करावे हे अधिक चांगले; अशा नव्या नव्या शाळांना अनुदान देणेही दरबारला शक्य होणार नाही. अर्थात आम्ही काय समजायचे ते समजून चाललो होते. तूर्तातूर्त याळगींच्या शाळेचीच मान्यता चालू ठेवून काम करीत राहावयाचे, आणि तीही मान्यता काढून घेण्याबद्दल जर काही हालचाल झाली तर पुढे काय ते ठरवावयाचे; अशा धोरणाने आमची नवी शाळा गोवर्धन संस्थेच्या इमारतीत चालू राहिली. सुट्टीच्या काळात काही पालकांना भेटून, त्यावेळच्या इंग्रजी पहिलीसाठी काही विद्यार्थी पटावर नोंदविण्याची व्यवस्था केली. मग दरबारच्या शिक्षणखात्याला आमची मान्यता काढून घेणे

अशक्यप्राय व्हावे या हेतूने एक योजना अंमलात आणली.

सरकारच्या न्याय खात्यातून नुकतेच सेवानिवृत्त झालेले डी.के.उर्फ बंडोपंत जोशी हे, सांगलीचे युवराज श्रीमंत माधवराव पटवर्धन व राजकुमार प्रतापसिंह यांचे शाळासोबती! मुंबईस भरलेल्या स्काऊट जांबोरी व अनेकविध मर्दानी व मैदानी खेळ यांच्यामुळे आम्ही या उभयतांशी परिचित होतो. संस्थेच्या दृष्टीने याचा फायदा उठविण्याचा निर्णय आम्ही घेतला.

एक दिवस या उभयता राजपुत्रांची पांजरपोळातील आमच्या शाळेत भेट असून उभयता सरकारस्वाऱ्या तिकडे जाणार असल्याची माहिती संस्थानी शिक्षणखात्याला मिळाली. सांगलीतील अन्य शाळांचे भव्य चित्र आमच्यापुढे उभे करून अप्रत्यक्षपणे आमच्यावर दडपण आणणारे शिक्षणखात्याचे सर्व अधिकारी, आपापली उपरणी सावरीत पांजरपोळच्या इमारतीत येऊन दाखल झाले. सर्व इमारत जुनी असली तरी लख्ख होती. विद्यार्थ्यांची छोटेखानी संख्या गणवेशात राजकुमारांच्या स्वागतासाठी खडी होती. गोवर्धन संस्थेत राजकुमार येणार असल्याने त्याही संस्थेने आम्हाला सर्व सहकार्य देऊ केले होते. आणि त्यामुळे सांगलीच्या शिक्षणखात्यातील प्रतिष्ठित मंडळींना जरा चक्करमक्करच झाले.

उभयता राजपुत्रांना अल्पाहार देताना आम्ही राजकुमार प्रतापसिंहांना विनंती केली की, 'आपण एक अव्वल दर्जाचे क्रीडापटू असल्याने आमच्या या नव्या शाळेला आपले नाव देण्याची आमची मनीषा आहे.' क्षणाचाही विलंब न लावता उभयता राजकुमारांनी तत्काळ मान्यता दिली. कोणाच्या तरी कैवाराने आम्हाला भेडसाविणारी दरबारी मंडळी गोरीमोरी झाल्याचे आम्ही पाहात होतो. तत्काळ यंगमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या 'प्रताप स्कूल'चा फलक गोवर्धन संस्थेच्या पांजरपोळ इमारतीवर लटकविण्यात आला.

सांगलीच्या नागरिकांना कळून चुकले की, याळगींची शाळा मोडली तर नाहीच पण 'प्रताप' नाव घेऊन नव्या स्वरूपात अवतीर्ण झाली आहे; आणि सांगलीच्या दरबारच्या शिक्षण खात्याचे अधिकारी आता या संस्थेच्या मार्गात अडचणी निर्माण करू शकणार नाहीत.

विश्वविद्यालयीन काळातील आमचा ध्येयवाद साकार होण्याची प्रसादचिन्हे दिसू लागली. आमच्या बौद्धिक व शारीरिक कुवतीला आता आव्हान मिळाले होते. ते स्वीकारण्याची आमची मानसिक तयारी होती.

●●●

## पहिले विद्यार्थी, पहिले संमेलन

आमच्या या माध्यमिक शाळेतील पहिल्या वर्षात, पालकांना भेटून बोलावून आणल्यामुळे इंग्रजी पहिलीमध्ये विद्यार्थ्यांची संख्या थोडीफार बरी होती. मराठी सातवी पास होऊन एका वर्षात तीन इयत्ता करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या चांगली असल्याने, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांची संख्या सगळ्याच इयत्तांमध्ये समाधानकारक राहील याची आम्हास खात्री वाटत होती.

प्रथमपासूनच्या हालचालींमध्ये आम्हाला एक प्रत्यय असा येत होता की, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची सहानुभूती व ओढा सातत्याने आमच्या संस्थेकडे होता, व आजही आहे. पहिल्या वर्षी, त्यावेळच्या आमच्या इंग्रजी सहावीमध्ये फक्त दोन विद्यार्थी होते. मॅट्रिकच्या आधीच्या त्या वर्षात ह्या शाळेत शिकण्याचा धोका पत्करावा की नाही, असा विचार मुलांच्या पालकांच्या मनांत येणे स्वाभाविक होते. पुढील सालात मॅट्रिकचा वर्ग चालविण्यास विद्यापीठ आम्हाला मान्यता देणार नाही ही गोष्टही स्पष्ट दिसत होती. त्यामुळे पुढील वर्षात मॅट्रिकसाठी मुलांचा अन्यत्र प्रवेश मिळवणे हे पालकांना अडचणीचे वाटणार

होते. पण एवढा सगळा धोका पत्करूनही हे दोन बहाद्दर विद्यार्थी आमची शाळा सोडण्यास तयार नव्हते. त्यापैकी एक विद्यार्थी म्हणजे गजाननराव हुद्दार आणि दुसरे विद्यार्थी म्हणजे डिग्रजकर सरंजामदारापैकी काका उर्फ के.के.चव्हाण. हे चव्हाण आज प्रगतीशील शेतकरी म्हणून प्रसिद्ध आहेत; तर गजानन हुद्दार आजच्या जिल्हा परिषदेचे प्रसिध्दी अधिकारी व मुंबईच्या वृत्तपत्रांचे वार्ताहर आहेत.

१९३५सालच्या अखेरीस गोवर्धन संस्थेने आपल्या पांजरपोळ इमारतीचे बरेचसे नूतनीकरण करून घेतले. त्या संस्थेचे ऑफीस वजा जाता बाकी सर्व इमारत आमच्या दुय्यम शाळेसाठी देऊन टाकली. विश्वविद्यालयाच्या परिसरात असताना आमचाच ध्येयवाद बोलून दाखविणारे आमचे समवयस्क अनेक पदवीधर सहकारी, आमच्या या माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करण्यास सिद्ध झाले. अर्थात ही सारी सेवा विनावेतन करणे भागच होते. शाळेच्या इमारतीचे भाडे व अन्य गरजा भागून फीच्या उत्पन्नातून फारच थोडा भाग शिल्लक राही. गरीब विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्याची संधी फीसाठी नाकारायची असे आमच्या मनात कधीच आले नसल्याने नादार विद्यार्थ्यांची संख्या भरघोस असे. स्वाभाविकपणे विनावेतन अगर अत्यल्प वेतनावर काम करणे याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. तथापि 'हे असे किती दिवस चालणार' अशी शंका मनात येणारी बरीचशी माणसे, अन्यत्र नोकरी उपलब्ध होताच ही शाळा सोडून जात.

सांगलीच्या संस्थानी नोकरीत, व संस्थानच्या विलीनीकरणानंतर आजच्या सरकारी नोकरीत असलेले - अगर निवृत्त झालेले -कित्येक लोक, प्रारंभकालात आमच्या शिक्षणसंस्थेत काम केलेले आहेत. पुढील काळात आमच्या शिक्षणसंस्थेला त्यांच्याकडून नेहमीच सहकार्य झाले; त्यामुळे संस्थेसंदर्भात कित्येक गोष्टी सुलभही झाल्या.

आमच्या शिक्षणसंस्थेकडे उपेक्षेने पाहता येणार नाही असा समज १९३६च्या शैक्षणिक वर्षापासून बळावू लागला. मराठी सातवी पास झालेल्या, बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांचा ओघ आमच्या शिक्षणसंस्थेकडे वळल्याने शालेय वातावरणात एक प्रकारे रगेल व रंगेलपणा आल्यासारखे झाले. नेताजी पाटील, शंकर माळी, हमीद जमादार या खेळाडू मंडळींनी क्रीडाक्षेत्रात संस्थेचे नाव सर्वतोमुखी केले. संस्थेला सरकारकडून अद्यापि अनुदान मिळत नव्हते, आणि ते मिळण्याची शक्यताही नव्हती. कारण आम्ही शिक्षक काय, अगर आमचे विद्यार्थी काय; कोठे ना कोठे स्वातंत्र्य-चळवळीच्या संबंधात येत असू. त्यामुळे सरकारी अधिकारी या संस्थेकडे थोड्याफार नाराजीने पाहात. फार काय, 'प्रताप स्कूल' हे नावही खुद्द राजेसाहेबांना सम्मत नाही असेही आमच्या कानावर उडत उडत येई. स्वाभाविकपणे संस्थानी अंमलातील प्रतिष्ठेच्या कल्पना अभ्यासून तशी प्रतिष्ठा संस्थेला मिळविण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू झाले.

अशी प्रतिष्ठा मिळविण्याचा एक मार्ग म्हणजे संस्थेला मान्यवरांच्या भेटीगाठी घडवून आणणे. स्नेहसंमेलन त्या दृष्टीने एक चांगली पर्वणी असते. आम्ही आमच्या पहिल्या स्नेहसंमेलनासाठी १९३६ साली हरिभक्तीपरायण सोनोपंत दांडेकर यांना पाचारण केले आणि ते आलेही! सांगलीच्या लब्धप्रतिष्ठितांची एक विशिष्ट धाटणी आहे. एखाद्या भल्या गोष्टीला मोडता घालण्यासाठी अनाहूत पण कुत्सित सल्ला देण्यात त्यांना मौज वाटते. आमच्याकडे जाऊ नये म्हणून सल्ला देणारी माणसे दांडेकरांना भेटली, त्याचेही मुळीच आश्चर्य नाही. पण त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. दांडेकरांचे कुतुहल यामुळे जागे झाले आणि ते अगत्याने आमच्या कार्यक्रमास आले. अत्यंत गोड शब्दांत मन:पूर्वक सहानुभूती दाखवून व आशीर्वाद देऊन ते परत गेले.

सांगलीच्या नागरिकांपुढे आता प्रताप स्कूल व मॉडेल स्कूल या दोन शाळा कुतुहलाचा विषय होत्या. सिटी हायस्कूल व सांगली हायस्कूल या दोन माध्यमिक शाळांतून बाहेर पडलेला अनुभवी व पदवीधर शिक्षकवर्ग मॉडेल स्कूलमध्ये संघटित झाला; त्यांची सिटी हायस्कूलबरोबर शैक्षणिक स्पर्धा करण्याची मनीषा स्पष्ट दिसत होती. ह्या स्पर्धेत 'प्रताप स्कूल' ही माध्यमिक शाळा फारशी कोणी मोजावयास तयार नव्हते. आम्ही मात्र मनोमनी असे गृहीत धरले होते की, आज ना उद्या आम्ही बाजूने मार्ग काढून पुढे गेल्याशिवाय राहणार नाही. खुद्द मॉडेल स्कूलची जडणघडण अशी होती की, आम्ही ज्या पद्धतीने त्यांची कळ काढू शकू, त्या पद्धतीने या मंडळींना ते जमणे शक्य

होऊ शकणार नाही. तशी आमची मनोमनी खात्री होती. सांगलीतील दप्तरदार बंधू ही जोडगोळी त्या संस्थेचा उपयोग पाय ठेवण्यासाठी दगड म्हणून करणार हे स्पष्ट होते. सिटी हायस्कूलने पाच-दहा रुपये जास्तीचे आमीष दाखविताच हे बंधूद्वय मॉडेल स्कूल सोडून सिटी हायस्कूलमध्ये दाखल झाले. सरकारी नोकरी याहून अधिक बरी म्हणून त्यांनी सांगली हायस्कूलची नोकरी मिळविण्याची खटपट तिथून चालवली व तशी संधी साधलीही. विलीनीकरणाच्या काळात गणपतराव दप्तरदार यांनी काँग्रेस सरकारच्या शिक्षणखात्यात प्रवेश केला. बाकीचे सर्व शिक्षक होते तिथेच राहिले, गणपतराव मात्र एकटेच पुढे गेले. त्यांच्या ह्या करामतींचा उल्लेख मी जाणूनबुजून स्पष्टपणाने करीत आहे; त्याचे एकच कारण म्हणजे नंतर आमच्या संस्थेला बदनाम करण्यासाठी या उभयतांच्या ज्या ज्ञात व अज्ञात हालचाली होत्या, त्यांचा सर्वंकष समाचार पुढे घ्यायचा म्हटले तर त्याचे मूळ लक्षात यावे.

वैयक्तिक चरितार्थासाठी अत्यंत साध्या राहणीला पाच सहा रुपये पगार त्या काळात पुरेसा होई. आमच्यापैकी बहुतेक सर्वजण दाभणकाठी धोतर, शर्ट व गांधी टोपी यावरच आपला शिक्षकी पेशा सांभाळून असल्याने तेवढ्या मिळकतीवर आम्ही दीर्घकाळ टिकाव धरू शकू, पण ही गोष्ट मॉडेल स्कूलमध्ये असलेल्या शिक्षकांना कितपत चालेल ही आमची शंका होती; आणि ती खरी होती. अन्यत्र वाव मिळेल तशी या शिक्षकांची धरसोड चालू राहिली. अन्य प्रस्थापित दुय्यम (माध्यमिक) शाळा आम्हा उभय संस्थांचा उल्लेख करताना  मॉडेलचे 'मोडेल' व प्रतापचा 'पडेल' स्कूल असा करीत. या साऱ्या टीकेमधून मार्ग काढण्याची आमची धडपड चालू होती. या कार्यात उतरताना आमच्या संस्थेच्या आजीव सेवकांचा एक विशेष दृष्टिकोण असल्याने, आम्ही न कचरता वाटचाल करीत होतो.

राष्ट्रीय चळवळींचा परिणाम म्हणून आज ना उद्या भारत स्वतंत्र झाल्याशिवाय राहणार नाही, अशी आमची श्रद्धा होती. 'स्वातंत्र्याच्या मार्गावर असलेल्या भारताचा बलसंपन्न, चारित्र्यसंपन्न, कृतीसंपन्न, ज्ञानपिपासू असा भावी नागरिक बनविण्याची खटपट आम्ही करीत आहोत', ही अंतरीची प्रेरणा जागृत होती. केवळ चरितार्थाचे साधन म्हणून आम्ही ह्या कार्यात रस घेतलेला नसून नावीन्यपूर्ण असे काहीतरी घडविण्याची ती प्रेरणा होती. राष्ट्रीय आंदोलनाने व तत्कालीन राजकारणाने आमच्या मनाची पकड घेतली होती. आम्ही सर्व जागरूकतेने सभोवारची बदलती परिस्थिती पाहात होतो व त्यापासून अलिप्त नव्हतो. सांगलीच्या बलभीम व्यायाम शाळेने आमचा पिंड घडविलेला होता, या तालमीचा समर्थ हात आमच्या पाठीशी होता. खाण्यापिण्याचा सोस आम्हाला नव्हता, उंची कपड्या-लत्याचीही आवड नव्हती. संस्थानी अंमलाची कृपा अगर अवकृपा असो, संस्थेचा गाडा तन मन धन वेचून खेचत राहणे एवढेच आम्हाला माहीत होते. शाळेतील शिकविण्याची वेळ साडेअकरा ते पाच असली तरी, यंग मेन्स सोसायटीचे काम सकाळी सातपासून चालू होई ते तहत रात्री अकरा-बारापर्यंतही चाले. हितसंबंधितांच्या कुचेष्टांना तोंड देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपल्या शिक्षणसंस्थेची नेत्रदीपक प्रगती घडवून आणणे, एवढेच आम्हाला माहीत होते.

एके काळचे माझे शिक्षक, व सिटी हायस्कूलमधून काही काळ बाहेर पडून फिरून सिटी हायस्कूलमध्ये आजीव सेवक म्हणून परत गेलेले फाळके गुरुजी एक दिवस मजकडे आले. फाळक्यांचा एक रिवाज असा की, गावात नव्याने आलेला असो अगर मूळचा गावचा असो - कोणाही अधिकाऱ्याचा अगर धनिकाचा परिचय करून घेतल्यावाचून ते राहायचे नाहीत. असे परिचय संस्थेच्या दृष्टीने उपयुक्त असतात, असेही धोरण त्यांच्या मनात असावे.

१९३५ साली सांगलीच्या टुमदार परिसरात एका कुटुंबाचा बोलबाला विशेषत्वाने ऐकू येऊ लागला होता. तत्कालीन सांगलीत एक महिला डॉक्टर येऊन दाखल झाल्या होत्या. त्यांची चिमुकली फोर्ड गाडी सांगलीच्या रस्त्याने कधीतरी धावताना दिसे. या डॉक्टरीणबाई म्हणजे गोपाळ कृष्ण देवधरांच्या कन्या, व बर्माशेल या विदेशी तेल कंपनीमधील एक अधिकारी ना.प.थत्ते यांच्या पत्नी सौ.मनोरमाबाई थत्ते ह्या होत.

आपल्या स्वभावाप्रमाणे फाळके गुरुजींनी या कुटुंबाचा परिचय करून घेतला असल्यास आश्चर्य नाही. हे फाळके गुरुजी एक दिवस माझ्या घरी येऊन म्हणाले, ''चल माझ्याबरोबर तुला थत्त्यांची ओळख करून देतो.'' त्यावेळच्या माझ्या देहस्वभावानुसार मी उत्तरलो, ''माझे त्यांच्याकडे काहीच काम नाही.'' ''त्यांनी तुला घेऊन येण्यास मला सांगितले आहे. माझा विद्यार्थी म्हणून तुला घेऊन येण्याचे आश्वासन मी दिले आहे.'' फाळक्यांचा आग्रह.

मला आश्चर्य वाटले. ज्या गृहस्थांना मी कधी पाहिलेही नाही, त्यांनी मला घेऊन येण्याबद्दल का सांगावे, हेच मला कळेना. कदाचित त्यांचा एखादा मुलगा शाळेत घालावयाचा असेल अशीही शंका आली. पण सामान्यत: सधन सुस्थितीतील पालकांची मुले आमच्या शाळेत येण्याचा परिपाठ नसल्यामुळे या बाबतीतही मला कोडे पडले. मी म्हटले, ''तुम्ही काहीतरीच सांगताहात. माझा त्यांचा परिचय नसताना मला घेऊन येण्यास त्यांनी तुम्हाला सांगावे हे मला पटत नाही.''

''त्यांच्याकडे राजकारणावरील पुस्तकांचा मोठा संग्रह असल्याने तुला त्याचा चांगलाच उपयोग होऊ शकेल, ह्या दृष्टीने का होईना तू ह्या ओळखीचा फायदा घ्यावास हे बरे.'' ''पण मुद्दाम ओळख करून घेणे मला जमणार नाही आणि मला आज तरी तशी आवश्यकता दिसत नाही.''

मग मात्र फाळके गुरुजींनी वस्तुस्थिती स्पष्ट केली. ते म्हणाले, ''थत्ते हे महात्माजींचे व काँग्रेसचे मोठे चाहते आहेत. अकोला काँग्रेस कमिटीने प्रसिद्ध केलेले, जे.सि.कुमारप्पा यांच्या 'फिलॉसॉफी ऑफ व्हिलेज मूव्हमेंट' या पुस्तिकेचे मराठी भाषांतर त्यांच्याकडे आले असून, त्यावर अनुवादक म्हणून दत्त आपटे सांगली असे नाव आहे. त्यामुळे 'सांगलीचे हे दत्त आपटे कोण?' अशी त्यांनी माझ्याकडे चौकशी केली व तुला घेऊन येण्यास मला आग्रहपूर्वक सांगितले आहे. माझा विद्यार्थी या नात्याने मी ती गोष्ट मान्य केली; व तशी हमी देऊन आलो आहे. गृहस्थ मोठा हौशी व चोखंदळ वाचक असल्याने तुला त्यांचा मोठा उपयोग होईल.''

एवढे बोलणे झाल्यानंतर मी ती गोष्ट मान्य केली व एक दिवस सकाळी फाळके गुरुजींबरोबर थत्ते यांच्या गणपती पेठेतील घरी दाखल झालो. त्यांचा ग्रंथसंग्रह बारकाईने पाहिला. मार्क्सपासून गांधीजींपर्यंत सर्व विचारसरणीचे रेलचेल वाङ्मय तिथे दिसून आले. राष्ट्रीय चळवळ व गांधीजी यांच्याबद्दल त्यांना विपुल आस्था असल्याचेही दिसून आले. खादीचा भरघोस वापर घरात सर्वत्र दिसत होता. पण एकूण वातावरण अशा श्रीमंती ऐश्वर्याने कोंदून भरले होते की, त्यांचा गांधीवाद हा केवळ हौसेचा, चर्चेचा विषय असावा, एवढीच मी कल्पना केली. किरकोळ मामुली चर्चा झाल्यानंतर, माझ्या स्वभावदोषामुळे या कुटुंबाशी जमणार नाही असा विचार करून मी घरी परत आलो, व सांगलीत थत्ते नावाचे कोणी गृहस्थ आहेत हे विसरूनही गेलो. शिक्षणसंस्था व तिचे प्रताप स्कूल यांचा थत्ते कुटुंबियांशी कधी काळी निकट संबंध येईल व या कुटुंबाचे संस्थेच्या प्रगतीसाठी बहुमोल साहाय्य होईल अशी कल्पनाही त्यावेळी माझ्या मनास शिवली नव्हती.

●●●

मी त्याना विसरलो पण थत्त्यांची तशी तयारी नव्हती. दुसऱ्या अगर तिसऱ्या दिवशी त्यांचा माणूस त्यांची गाडी घेऊनच माझ्या दाराशी आला व 'साहेबांनी बोलावले आले' असे म्हणू लागला. अर्थात जाणे भाग होते; नाहीतर उद्धटपणा दिसला असता. त्या दिवशी प्रथमत: डॉ.मनोरमाबाई थत्ते व सौ.मालतीबाई थत्ते माझ्यापुढे प्रगट झाल्या. चहापाण्याचा आग्रह झाला. ओळख-परिचय सर्व काही अगत्यपूर्वक झाले आणि मग क्रमश: हा स्नेहसंबंध इतक्या घरोब्याचा होत गेला की, आमच्या शिक्षणसंस्थेच्या प्रपंचात थत्ते कुटुंब एकजीव होऊन गेले. एके दिवशी तासगावचे एक वृद्ध वकील मला त्या संबंधात म्हणाले, ''अल्लाउद्दीनचा राक्षस तुमच्या हाती लागला आहे. हा खूश आहे तोपर्यंत तुमच्या संस्थेचे कोणतेही काम नडणार नाही.''

त्यांचे हे भाकीत खरे होते. संस्थेचे सभासद झालेले थत्ते संस्थेच्या शैक्षणिक उणीवा भरून काढण्यासाठी तत्परतेने तयार असत. संस्थेच्या आरंभ कालात सांगलीतील एक प्रभावी शिक्षणसंस्था म्हणून आमची संस्था पुढे आणण्यासाठी थत्ते कुटुंबियांची मिळालेली जोड ही एक मौल्यवान बाब ठरली. त्यांची मोटारगाडी, त्यांच्या घरचे अन्य सामानसुमान ह्या गोष्टी -संस्थेच्या मालकीच्या असल्याप्रमाणे -आम्ही हक्काने वापरू लागलो. मग आम्हाला आमच्या दुय्यम शाळेस मॅट्रिकच्या वर्गासाठी मुंबई विद्यापीठाकडून मान्यता मिळविणे शक्य होईल अशी आशा वाटू लागली.

मॅट्रिकच्या वर्गासाठी मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळविणे, व दुय्यम शाळेसाठी संस्थेच्या मालकीची प्रशस्त व सुंदर इमारत उभी करणे ह्या दोन गोष्टी ठळकपणे आमच्यापुढे होत्या. त्या काळात या कामासाठी लागणारा किमान पन्नास हजारांचा निधी कसा गोळा करावा हा प्रश्न आम्हाला भंडावून सोडीत होता.

या सुमारास 'किर्लोस्कर' मासिकाने बुवाबाजीविरुद्ध मोहीम उघडली होती. बुवाबाबांनी जमा केलेल्या अफाट संपत्तीचे वर्णन वाचून, आम्हाला असा मोह होऊ लागला की एखादा बुवा गाठून त्याला प्रसन्न करून घ्यावे; त्याच्याकडून काही लाभ होतो का ते पाहावे. राजपुत्राच्या नावामुळे सांगलीच्या राजेसाहेबांकडून संस्थेला काही अर्थलाभ होईल ही कल्पना आता फोल ठरली होती. राजपुत्राचे नाव आम्ही शाळेला दिले आहे हेच राजेसाहेबांना मान्य नव्हते. शिवाय राजकीय चळवळींशी आमच्या असलेल्या संबंधामुळे राजेसाहेबांकडे अहवाल सादर करण्यात दरबारचे पोलीसखाते 'तत्पर' असल्याने राजेसाहेबांकडून संस्थेला काही लाभ मिळण्याची शक्यता नव्हती. राजेसाहेबांनी केडगावच्या नारायण महाराजांना चाळीस हजार रुपये दिले असून, त्यांचे शिष्यत्व पत्करले असल्याची एक वदंता होती. मग आम्ही असा बेत केला की, शिष्यापेक्षा गुरूलाच गाठून काही लभ्यांश होतो का पाहावे.

मी स्वत: व माझे स्नेही का.द.साने असे उभयता केडगावला जाण्यास निघालो. माझा वर्गमित्र व आता नव्यानेच अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेचा आजीव सदस्य बनलेला अनंता क्षीरसागर उर्फ मुनी हाही आमच्याबरोबर यावयास निघाला. अकोल्याची ती राष्ट्रीय शाळा आमच्याप्रमाणेच पैसे हुडकण्याच्या कामात तत्पर असल्याने, मी मुनीला बरोबर घेण्यास तयार नव्हतो. दोन याचकांनी एकाच वेळी दारात भिक्षेला जाणे मला प्रशस्त वाटत नव्हते. पण मुनी दाद देण्यास तयार नव्हता. मुनीचा क्रांतिकारक चळवळीशी दाट संबंध असल्याने, त्या कार्यासाठीही तो पैसे हुडकीत हिंडत असे. तो म्हणाला, ''मी महाराजांच्याकडे काही एक मागणी करणार नाही; मग तर झाले ना? तिथे सुमारे तीनशे तोळ्यांची सोन्याची एक दत्तमूर्ती आहे; ती लांबविता येणे शक्य आहे किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी मी येत आहे. तुला महाराजांकडे जे मागावयाचे आहे ते खुशाल माग. त्यात मी माझी मागणी पुढे करणार नाही.''

त्याचे हे बेदरकार उत्तर ऐकून साने जरा कावरेबावरेच झाले. केडगावच्या नारायण महाराजांना अंतर्ज्ञान असल्याने ते आपले स्वरूप ओळखतील व आपला निष्कारण हेलपाटा

होऊन कार्यनाश होईल, असे त्यांच्या मनाने घेतले. आपल्या मनातील पापी विचार काढून टाकण्याचे आश्वासन अनंताने दिल्यानंतर साने शेवटी तयार झाले. मग मात्र सायंकाळी आम्ही केडगावच्या धर्मशाळेत मुक्काम टाकला. आमचे एक जुने चित्रकार सहकारी मित्र नारायणराव ओक आम्हांस अनपेक्षित तेथे भेटले. ते म्हणाले, ''मी येथे महाराजांच्या सेवेस गेली काही वर्षे आहे.''

धर्मशाळेत आमच्या शेजारीच मुक्काम टाकलेले दुसरे एक साने आम्हास भेटले. हे गृहस्थ लष्करी खात्याच्या हिशेब विभागात काम करणारे असून त्यांनी नारायण महाराजांच्या सामर्थ्याचा आपणास कसा अनुभव आला याचे रसभरीत वर्णन ऐकवले; त्याचबरोबर आम्ही कोण कोठले कशासाठी आलो आहोत वगैरे माहितीही विचारून घेतली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तिघे नारायण महाराजांच्या दर्शनास गेलो. महाराज झोपाळ्यावर बसून झोके घेत होते. दिवाणखान्याच्या दरवाजात मला पाहताच ते म्हणाले, ''या सांगलीकर आपटे, बसा असे माझ्याजवळ.'' पहिल्याच भेटीत नारायण महाराजांनी नावगावासकट मला हाक मारली. त्यामुळे त्यांच्या अंतर्ज्ञानाबद्दल मला थोडेफार खरे वाटू लागले; पण नारायणराव ओकांनी अगर धर्मशाळेत गप्पा मारणाऱ्या सान्यांनी नारायण महाराजांना कदाचित अगाऊ वर्दी दिली असावी अशीही शंका मनात डोकावून गेली. चेहऱ्यावर कोणतीही चलबिचल न दाखविता मी महाराजांजवळ झोपाळ्यावर जाऊन बसलो. औपचारिक गप्पा मारता मारता महाराजांच्या वैभवाचे माझे निरीक्षण चालू होते. वैभव तर मोठे विलोभनीय होते यात मुळीच शंका नाही! सर्व इमारती अगदी लखलखीत होत्या. दिवाणखान्यातील प्रत्येक वस्तू रेखीव व सौंदर्यसंपन्न होती. खुद्द आम्ही बसलेला झोपाळा काळ्याभोर शिसवी लाकडाचा असून त्याच्या साखळ्या चांदीच्या होत्या. महाराजांनी तोंडात तांबूल चघळण्याचे काम चालू ठेवले होते. त्या तांबूलाच्या स्वादाने माझ्याही तोंडाला पाणी सुटले. मग महाराजांनी आपल्या जाकीटाच्या खिशातून सोन्याच्या साखळीला लावलेले आपले 'ओमेगा' कंपनीचे सोन्याचे घड्याळ बाहेर काढले व मला विचारले,

''या घड्याळाची किंमत काय असेल?''

मी उत्तरलो, ''अंदाचे पाचशे रुपयांपर्यंत असेल.''

''तुमच्या हातात घड्याळ आहे त्याची किंमत काय?''

''तीस रुपये.''

''माझे घड्याळ पाचशे रुपयांचे, आणि तुमचे तीस रुपयांचे असे का?''

''मी ते विकत घेतले आहे आणि तुम्हाला ते कोणीतरी शिष्याने फुकट दिले आहे. मला असा एखादा शिष्य मिळेपर्यंत माझे घड्याळ असे गरीबच असणार.''

मग महाराजांनी मला हाताला धरून, एकांतात बसण्याच्या त्यांच्या जागी नेले. तेथे आमची बैठक पडल्यानंतर ते मला म्हणाले, ''हे पहा, या दुष्काळी भागात मिशनऱ्यांचे फार बंड होते. ते मी मोडून काढले आहे. गरिबांना मोफत अन्नदान होत आहे. मराठी सात इयत्तांपर्यंत मोफत शिक्षणाची सोय आहे. अनेक गायी, शेतकरी कुटुंबे, शिक्षक कुटुंबे यांना माझ्या या संस्थानात आश्रय आहे. किर्लोस्कर तरी हातचलाखी केल्याशिवाय पैसे मिळवितात काय? माझी ही हातचलाखी आहे असे म्हटले तरी, तीही एका चांगल्या कामासाठीच आहे. तेव्हा तुमच्यासारख्या शहाण्या माणसांनी आम्हाला समजून घेतले पाहिजे. हे पहा, तू देणगीसाठी आला आहेस, पण सध्या माझ्याकडे रक्कम नाही. तुझ्या संस्थेला मी सध्या एक्कावन्न रुपये देणगी देतो. पण मी लवकरच सांगलीस येणार आहे, त्यावेळी मात्र तुझ्या राजाकडून तुझ्या संस्थेला मी काहीतरी चांगली देणगी देववीन.'' सांगलीच्या राजेसाहेबांचा पूर्वग्रह विचारात घेता, हे घडणार नाही हे मला माहीत होते. तथापि नंतर दीर्घकालाने तसे घडले हेही तितकेच खरे! राजेसाहेबांच्याकडून एक बहुमोल देणगी संस्थेला पुढे मिळाली.

आम्ही महाराजांकडून उठून बाहेर आलो. वर्तक इंजिनियर भेटले. ब्रिटिशांच्या गुप्तचर खात्यातील कोणी एक अधिकारी देशपांडे म्हणून भेटले. त्यांना पाहताच अनंतरावांनी तोंड चुकविले. साने मुकाट्याने वावरत होते. महाराजांच्या अंतर्ज्ञानावर त्यांची श्रद्धा होती, आणि महाराजांनी आपणाला विन्मुख पाठविले नाही यातच त्यांना कृतार्थता वाटत होती.

महाराजांच्या आग्रहाखातर मी सायंकाळी तेथे एक प्रवचन झोडून केडगाव सोडले. दत्त मंदिरात अनंतरावांची दत्तमूर्तीपुढे लागलेली तंद्री पाहून त्यांच्या भक्तीबद्दल मला शंका आली. पण दत्तमूर्तीभोवती भल्या दांडग्या कर्नाटकी भटजींचा घोळका पाहून अनंतराव क्षीरसागरांनी आपला बेत डोक्यातून काढून टाकला असावा. आमच्या यंग मेन्स एज्युकेशन सोसायटीला मिळालेली पहिली-वहिली देणगी, तीही नारायण महाराज केडगावकरांकडून! परतीच्या प्रवासातील वाटखर्चासाठी या देणगीच्या रकमेतील एक पैसाही खर्च करावयाचा नाही असा साने यांचा आग्रह असल्याने, एखाद्या भाविकाने प्रसाद जपून घरी आणावा त्याप्रमाणे ती रक्कम सांगलीपर्यंत जपून आणण्यात आली. सांगलीत आल्यानंतर मी 'सकाळ'मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'तेज' नावाच्या वृत्तपत्रामध्ये नारायण महाराज केडगावकरांबद्दल एक लेख प्रसिद्ध केला, व त्याद्वारे एक प्रकारे शं.वा.किर्लोस्करांच्या केडगावविषयक प्रश्नाला उत्तरच दिले. स्वाभाविक शंवाकि यांचा माझ्यावर थोडाफार घुस्सा झाला -पण पुढच्या काळात तो निघाला!

●●●

## श्रीमती यशोदाबाई आगरकर

अनंत क्षीरसागर अकोल्याच्या राष्ट्रीय पाठशाळेत असल्याने व तेथे काम करता करता राष्ट्रीय चळवळीतील अनेक उपद्व्याप त्याने चालू ठेवले असल्याने, या शाळेचे स्वरूप समजावून घ्यावे व महाराष्ट्रातील क्रांतिकारक चळवळीबद्दल काही विचारविनिमय करता आल्यास पाहावे, म्हणून मी १९३५ सालच्या अखेरीस अकोल्यास गेलो.

तसे पाहिले तर अकोल्यास माझी ही काही पहिलीच भेट नव्हती. अकोल्यास गेल्यानंतर गाठीभेटी घेण्यासाठी आमची काही ठराविक ठिकाणे असत. गावाबाहेरील फडके वकीलांचा मळा, ताजना पेठेतील नानाभाई इच्छाराम यांचे घर, त्याचप्रमाणे गावाबाहेरील राष्ट्रीय शाळेचा परिसर अशी ती ठिकाणे असत. या खेपेस मात्र एक चमत्कारिक योगायोग आला. मी नानाभाईच्या घरी बसलो असताना अत्यंत किरकोळ बांध्याची गिड्डी अशी एक वृद्धा मजपाशी आली, आणि मला म्हणाली, ''बाळा, तू सांगली-कऱ्हाडकडचा का रे?''

शुद्ध सातारी मराठी भाषेतील ही अचूक विचारणा ऐकून मी चकित झालो व म्हटले, ''होय, पण आजी तुम्ही कशावरून ओळखलेत?''

''अरे, मी मूळची कऱ्हाडचीच आहे. तुझी ठेवण-बांधा पाहूनच मला 'कृष्णाकाठ' आहे हे जाणवले, म्हणूनच विचारले. तू मुनीचा स्नेही ना? -मग काहीतरी उपद्व्याप चालू असणारच! उद्या त्याला घेऊन आमच्या घरी जेवायला ये.'' वृद्धेचे बोलणे इतके प्रेमळ, लाघवी व आपुलकीचे होते की, मी एरवी कोठेही जेवणासाठी न जाणारा असूनही चटदिशी हो म्हणून गेलो. आजी कोण, कोठच्या, नाव -काही कशाचाही थांगपत्ता नसताना मी त्यांना होकार देऊन मोकळा झालो होतो.

मुनी उर्फ अनंता क्षीरसागर ह्याला याबाबत विचारता तो म्हणाला, ''अरे, त्या आगरकर काकू. प्राचार्य आगरकरांच्या त्या पत्नी.'' मी आश्चर्याने थक्क झालो. एका महान समाजसुधारकाची पत्नी अकोल्यात हयात असावी, आणि महाराष्ट्रातील विद्वानांना तिची दखल असू नये याचे मला मोठे आश्चर्य वाटले. प्राचार्य आगरकरांचे चरित्र लिहिणारे प्राध्यापक आळतेकर यांनाही आगरकर कुटुंबियांची माहिती नव्हती, हेही एक महदाश्चर्य होते. आपल्याला मिळालेले आमंत्रण किती मोलाचे आहे, याची जाणीव मला झाली.

मी दुसरे दिवशी काकूंच्या घरी गेलो. त्यांचे व प्राचार्य आगरकरांचे दोन चिरंजीव अण्णा व दादा मला भेटले. सप्तरंगी सूर्यकिरणांची जी एक विशिष्ट चिकित्सा पद्धती

आहे, त्या पद्धतीने सप्तरंगी बाटल्यातील पाणी औषध म्हणून गोरगरिबांना देण्याचे काम काकू करीत. त्यांची ही मोफत उपचार पद्धती अनेक गोरगरिबांना उपयुक्त ठरली असावी, हे तिथे उपचारासाठी आलेल्या अनेक रुग्णांवरून स्पष्ट दिसत होते.

हा परिचय सहजावारी दवडण्यास मी तयार नव्हतो. आगरकरकाकूंच्या प्राचार्य आगरकरांबाबतच्या सविस्तर आठवणी त्यांच्याकडून वदवून घेण्यात आल्या. त्यांच्यावर आवश्यक ते वाङ्मयीन संस्कार करण्यात आले. या आठवणींच्या प्रसिद्धीकरणातून मिळणारा पैसा माझ्या शिक्षणसंस्थेला देणगी म्हणून घेण्यास काकूंची संमती मिळविली; आणि मग किर्लोस्करवाडीला मासिकांचे संपादक शं.वा.किर्लोस्कर यांच्याकडे येऊन दाखल झालो.

समाजसुधारक आगरकरांच्या आठवणींचा हा ठेवा, शं.वा.कि.सारखा कर्तबगार संपादक हातचा सोडणे शक्यच नव्हते. 'स्त्री' मासिकात ह्या आठवणी क्रमश: प्रसिद्ध झाल्या. त्याचा मोबदला म्हणून आलेली रक्कम ही 'यंग मेन्स एज्युकेशन सोसायटी'ची दुसरी महत्त्वाची देणगी ठरली.

ह्या आठवणींच्या प्रसिद्धीकरणामुळे प्रा.आळतेकर व आचार्य अत्रे यांना अत्यंत हर्ष झाला. त्याचबरोबर आपणास या थोर व्यक्तीची दखल नव्हती, याबद्दल त्यांना विषादही वाटला.

नारायण महाराज केडगावकर व श्रीमती यशोदाबाई आगरकर यांच्या देणग्यांनी संस्थेच्या कार्याचा शुभारंभ झाल्याने, संस्थेच्या इतिहासात त्या मोलाच्या ठरल्या आहेत. या देणग्या रकमेच्या दृष्टीने फार मोठ्या नसल्या तरी संस्थेच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने त्या लाखमोलाच्या होत्या, यात मुळीच शंका नाही.

●●●

## सामाजिक प्रतिष्ठा

या नव्या संस्थेची सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून अनेक खटपटी लटपटी करण्यात आमचा वेळ जाऊ लागला. आम्ही व आमच्या भोवती असलेला मित्र परिवार, तालमीच्या नादामुळे खोडकर-बेगुमान होता; तरीही आम्ही नेहमीच पथ्य पाळीत असू. ते म्हणजे समाजातील अपप्रवृत्तीविरुद्ध आमचा झगडा असे. आमच्या या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे काही हितसंबंधी लोक आमच्याबद्दल गैरसमज निर्माण करण्याकडे उपयोग करून घेत. आमच्या ह्या शिक्षणविषयक प्रयोगाकडे 'एक उपद्व्याप' म्हणून काही माणसे पाहात असत. आम्ही या कामाची तड लावू शकू असा विश्वास आमच्या चाहत्यांना असला तरी संस्थानी अंमलातील संकुचित सामाजिक विश्वात, या शिक्षणसंस्थेची बाल्यावस्था व नवखेपणा पुरेसा विश्वास निर्माण करण्यास अपुरे पडत होते. यासाठी काही नामवंत व्यक्तींची सहानुभूती मिळविणे संस्थेला अत्यावश्यक होते. स्नेहसंमेलन ही एक पर्वणी अशी असते की, त्या निमित्ताने थोरामोठ्यांचा सहवास लाभणे शक्य असते.

पहिल्या स्नेहसंमेलनासाठी कै.सोनोपंत दांडेकर आम्हास पाहुणे लाभल्यामुळे बऱ्याचशा वयोवृद्ध व भक्तिमार्गी मंडळींचा या संस्थेशी परिचय झाला. दुसऱ्या स्नेहसंमेलनासाठी याच्याही पुढे आघाडी मारून आम्ही शंकराचार्य डॉ.कुर्तकोटी यांना पाहुणे म्हणून त्यांचे अगत्य संपादन करण्यात यश मिळविले. पूर्वी १९२० साली लोकमान्यांचे बरोबर डॉ.कुर्तकोटी सांगलीस आले असल्याने जुन्या पिढीला त्यांचा चांगला परिचय होता. स्नेहसंमेलनासाठी शंकराचार्य आमच्याकडे येत असल्याचे ऐकून श्रीमंत राजेसाहेबांनाही या स्नेहसंमेलनाची दखल घेणे भाग पडले. पांजरपोळ संस्थेसमोरील कैंगणेश्वरीचा प्रसिद्ध चौक नागरिक स्त्री-पुरुषांनी फुलून गेला होता.

आमच्या संस्थेचा हा फारच मोठा विजय होता. शंकराचार्य स्थानापन्न झाले आणि तेवढ्यात एक नाट्यमय प्रसंग घडला. संत पाचलेगावकर महाराज सभास्थानी अनपेक्षितपणे येऊन दाखल झाले. त्यांनी शंकराचार्यांना वंदन करून त्यांच्याजवळ आसन तर मिळविलेच. पण 'संस्थेतील मंडळींचा निकट ऋणानुबंध असल्याने, व या मंडळींना शंकराचार्यांचा आशीर्वाद असल्याने आपण समारंभासाठी मुद्दाम आलो.' असे जाहीर केले. संस्थेला अत्यंत अभिमानास्पद गोष्ट म्हणजे, नव्यानेच चालू झालेल्या मुंबई आकाशवाणीवरून भाषण करताना डॉ.कुर्तकोटीनी आमच्या या नव्या शिक्षणसंस्थेचे कोडकौतुक केले. डॉ.कुर्तकोटींचा संस्थेशी हा ऋणानुबंध त्यांच्या हयातीपर्यंत टिकून राहिला. 'गीतेतील साम्ययोग' या त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी प्रबंधाचे मराठी भाषांतर मी करावे अशी त्यांची मनीषा होती; पण त्यांच्या वृद्धापकाळामुळे हा योग येऊ शकला नाही.

नुकतेच कैलासवासी झालेले जगद्‌विख्यात तत्त्ववेत्ते धुंडिराजशास्त्री विनोद हे आमच्या तिसऱ्या स्नेहसंमेलनाचे पाहुणे म्हणून आले. मग सांगलीच्या नागरी जीवनात या संस्थेचे एक विशिष्ट स्थान निर्माण झाले. संस्थेच्या प्रपंचात नव्यानेच येऊन मिसळलेली थत्ते कुटुंबीय मंडळी संस्थेच्या अभ्युदयासाठी सतत झटताना दिसू लागली. ह्याच सुमारास साहित्यसम्राट न.चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांनीही आमच्या शिक्षणसंस्थेस भेट देऊन आमच्या प्रयत्नशीलतेचे व ध्येयवादाचे कौतुक केले.

पाठोपाठ पहिल्या लोकसभेचे अध्यक्ष दादासाहेब मावळंकर संस्थेस भेट देण्यासाठी आले. स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रसभेच्या धुरीणांपैकी ते एक असल्याने, सांगली नगरवासियांना आमच्या संस्थेबद्दल आदर व अचंबा वाटू लागला. धर्म-धुरीणांपासून राजकारण-धुरीणांपर्यंत सर्वांचीच वर्दळ संस्थेकडे होऊ लागल्याने आम्हाला हवीशी वाटणारी संस्थेची सामाजिक प्रतिष्ठा क्रमश: वाढत गेली. या संस्थेकडे उपेक्षेने पाहणारी सांगलीची जनता आता कौतुकाने पाहू लागली. संस्थेला आर्थिक साहाय्य देण्यास सांगली दरबार अद्यापि तयार नसला तरी, संस्थेकडे आता उपेक्षाबुद्धीने पाहता येणार नाही एवढे समजून चुकला.

मध्यंतरीच्या काळात आमच्या आधी स्थापन झालेल्या मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या हालचालींना थोडीफार प्रतिकूल अवस्था आली. त्या संस्थेत आजीव सदस्य म्हणून आलेले दप्तरदार बंधू, थोडाफार अर्थलाभ होताच सिटी हायस्कूलमध्ये जाऊन दाखल झाले. सिटी हायस्कूलमधून मॉडर्नमध्ये गेलेले माधवराव देवधर आमच्या शाळेत येऊन दाखल झाले. बापूराव खाडिलकर यानीही त्या शाळेचा संबंध सोडला. यामुळे संस्थेच्या कारभाराला एक प्रकारचा डळमळीतपणा आला. संस्थेचे अध्यक्ष गणेश कोंडो गोडबोले(वकील) हे संस्थेच्या भवितव्याबाबत साशंक होऊ लागले.

आत्तापर्यंत आमच्या दोनही संस्था इंग्रजी सहावीपर्यंतचे वर्ग चालवीत असत. पण पुढे मॅट्रिकसाठी मात्र ह्या विद्यार्थ्यांना, मुंबई विद्यापीठाची मान्यता असलेल्या सांगली हायस्कूल अगर सिटी हायस्कूल या दुय्यम शाळेत प्रवेश घ्यावा लागे. अर्थात विद्यार्थी व पालक यांना ते गैरसोयीचे असे. शिवाय नव्या शाळांची अडवणूक करण्याचे एक साधन या जुन्या शाळांच्या हाती अनायासे असल्याने, प्रवेश देताना का होईना पण आमच्या या नव्या शाळांच्या शिक्षणाबद्दल शेरेमारी केल्यास, मुलांना व पालकांना ती ऐकून घ्यावी लागे. हे टाळण्यासाठी आमच्या शाळेतील मॅट्रिकच्या वर्गाला विद्यापीठाकडून मान्यता घेणे आवश्यक होते. दोन्ही शिक्षणसंस्था आपापल्या दुय्यम शाळांना मॅट्रिकवर्ग चालू करण्यास परवानगी मिळावी म्हणून मुंबई विद्यापीठाकडे अर्ज करण्याच्या विचारात होत्या.

वस्तुस्थिती अशी होती की, मॅट्रिकच्या वर्गाला परवानगी मिळावी अशी आवश्यक ती शैक्षणिक जुळणी आम्हा उभयतांकडेही नव्हती. पण एकाने अर्ज केल्यास दुसऱ्याला अडचण होईल, म्हणून आम्हा उभय संस्थांचे -मॅट्रिकला परवानगी मिळण्याबाबतचे -अर्ज मुंबईला एकदमच दाखल झाले. दुर्दैवाची गोष्ट अशी की, सांगलीतील एका मान्यवर संस्थेने 'यांना परवानगी मिळू नये' असा अर्ज विद्यापीठाकडे दाखल केला. विद्यापीठाने आमची प्रतिक्रिया समजून घेण्यासाठी हा अर्ज आमच्याकडे धाडून दिला. शैक्षणिक क्षेत्रातील ह्या मनोवृत्तीबद्दल अधिक न लिहिणे बरे!

१९३८च्या अखेरीस मुंबई विद्यापीठामार्फत एस.आर.

व के. आर. या कानिटकर द्वयांना, आमच्या अनुक्रमे मॉडेल व प्रताप स्कूल या दोन दुय्यम शाळांची पाहणी करून अहवाल सादर करण्यासाठी सांगलीस पाठविण्यात आले. हे उभयता सांगलीत येऊन दाखल झाले. आम्हास मनोमनी खात्री होती की, आमच्या दोन्ही संस्थांना विद्यापीठाकडून मान्यता मिळणे शक्य नाही. साधनांचा अपुरेपणा, याबरोबरच कुत्सित बुद्धीच्या मंडळींनी केलेले अर्ज यांचा, येणाऱ्या प्रतिनिधींच्या मनावर प्रतिकूल परिणाम होण्याची सर्व शक्यता होती. समितीकडून किमान काही सूचना मिळाल्यास तेवढ्याचाच उपयोग करावा; व पुढील साली फिरून मागणी करावी, अशा मन:स्थितीत निदान आम्ही तरी होतो. पण या समितीच्या आगमनानंतर काही आश्चर्यकारक प्रत्यय येऊ लागले. 'शिक्षणक्षेत्रात असूया बाळगणे हे गलिच्छ मनोवृत्तीचे निदर्शक असल्याने, आपल्याला मान्यता देण्याबाबत काय करता येईल हे पाहण्याच्या दृष्टीनेच आम्ही आलो आहोत;' असा समितीचा स्पष्ट अभिप्राय पडला.

उभयता कानिटकर हे मिरजेच्या वयोवृद्ध राजेसाहेबांकडे उतरणार होते. त्यांना पहाटेच्या मेलवर मिरज स्टेशनला उतरून घेऊन राजेसाहेबांच्या बंगल्यावर पोहोचते करण्याची कामगिरी माझ्याकडे होती. त्या मार्गात झालेल्या चर्चेवरून मला असा अंदाज आला की, ही मंडळी दूषित पूर्वग्रहाने आमच्या प्रश्नाकडे न पाहता शिक्षणप्रसाराच्या एका विशिष्ट दृष्टिकोणातून संस्थांचे निरीक्षण केल्याशिवाय राहणार नाहीत.

दुपारी हे प्रतिनिधी पांजरपोळच्या इमारतीत आमच्या शाळेत येऊन दाखल झाले. इमारतीचे दृश्य स्वरूप, विद्यार्थ्यांची संख्या, शैक्षणिक साहित्यातील उणीवा या गोष्टी विचारात घेता, मॅट्रिकच्या वर्गाची आमची मागणी असफल होणार हे स्पष्ट होते. पायंडा पाडण्यासाठी चढाईचे राजकारण म्हणून आम्ही हा अर्ज केला होता. शाळा पाहून झाल्यानंतर कानिटकरद्वयांनी असा सवाल केला की, ''आत्ता तुमच्याकडे किती निधी उपलब्ध आहे? किमान वीस-पंचवीस हजार रुपये खर्च करून शिक्षणविषयक उणीवा दूर करण्याची तयारी असेल तरच आपल्या मागणीचा विचार विद्यापीठ करू शकेल.''

फीच्या उत्पन्नातून आम्ही आमचा सर्व खर्च भागवीत असल्याने, आमच्याकडे शिल्लक असण्याचा प्रश्नच नव्हता; उलट देणी मात्र होती! तथापि पैशाची जुळणी दाखविता आली तर विद्यापीठ आमच्या मागणीचा विचार करेल हे दिसू लागल्याने आमची आशा दुणावली. नव्यानेच संस्थेचे अध्यक्ष झालेले, ना.प.थत्ते म्हणाले, ''एवढेच ना! मीच आज पंधरा हजार रुपये देतो.'' त्यानी खिशातून चेकबुकही काढले. तेवढ्यावर मग कानिटकर द्वय म्हणाले, ''ठीक आहे! ठीक आहे!! आम्ही मॉडेल स्कूलला भेट देऊन येतो.''

थत्त्यांनी प्रसंगावधान राखल्याने व तयारी दाखविल्याने 'बहुधा फड जिंकू' या मनोराज्यात आम्ही गढून गेलो. थत्त्यांचे एक वयोवृद्ध स्नेही -तासगावचे परांजपे वकील त्यावेळी तेथे उपस्थित होते. ते मला म्हणाले, ''नारायणराव थत्त्यांचा जमदग्नी तुम्हांस अनुकूल झाला आहे हे एक नवलविशेष आहे. हा तवा तापला आहे तोपर्यंत हव्या तेवढ्या पोळ्या भाजून घ्या. एकदा निवला की मग संपले.''

दुसऱ्या दिवशी विद्यापीठ समितीने मॉडेल स्कूलचीही पाहणी केली. मॉडेल स्कूलचा एके वेळचा बहर व जोम आता संपूर्ण ओसरला होता. हणमंतराव गोखले, सदूभाऊ सहस्रबुद्धे व रामभाऊ मुजुमदार ह्या तिघांखेरीज बाकीची सर्व उमेदीची माणसे बाहेर पडून अन्यत्र उद्योगाला लागली होती. या संस्थेचे अध्यक्ष म्हणून असलेले गणेश कोंडो गोडबोले हे, ह्या संस्थेचे अपयश आपल्या पुढारीपणाला दूषणच ठरणारे आहे हे ओळखून, संस्थेच्या भवितव्याबद्दल चिंतातूर झाले होते. विद्यापीठ समितीचा अभिप्राय प्रतिकूल पडल्यास तीही एक नामुष्की पत्करावी लागणार होती. गणपतरावजी गोडबोले यांचे खरे मानसिक असमाधान याशिवाय एका विशिष्ट गोष्टीत सामावले होते. ती बाब लक्षात येण्यासाठी सांगलीच्या त्या काळच्या सामाजिक जीवनातील काही प्रवाहांची दखल घेणे भाग आहे.

सांगली एज्युकेशन सोसायटीचे आधारस्तंभ म्हणून जी काही प्रतिष्ठित मंडळी वावरत, त्यांच्या विरोधी गटाचे नेतृत्त्व गणपतरावजी गोडबोले यांच्याकडे असे. सांगली एज्युकेशन सोसायटीला शिक्षणक्षेत्रात प्रतिस्पर्धी निर्माण करण्याच्या ईर्षेने त्यांनी मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या कामात लक्ष घातले होते. या संस्थेत आलेला बराचसा

शिक्षक वर्ग, आधीच्या सांगली एज्युकेशन सोसायटीमधून आलेला असल्याने, व त्यांनीही त्या शिक्षणसंस्थेला शहरात शह देण्याचा चंग बांधलेला असल्याने, स्वाभाविकपणे गणपतरावजींची अशी भावना झाली की, ह्या प्रकरणी आपल्याला अपयश आल्यास विरोधकांच्या हाती कोलीत मिळणार आहे. विद्यापीठ समितीच्या कामकाजावर यासाठीच त्यांनी बारकाईने लक्ष ठेवले होते. आमची संस्था व आमच्या संस्थेचे अध्यक्ष ना.प.थत्ते यांना, सांगलीतील अशा स्थानिक गटांचे सोयरसुतक नव्हते. आपण अध्यक्ष असलेल्या शिक्षणसंस्थेला प्रतिष्ठा लाभावी व तिचे हितसंबंध डावलले जाऊ नयेत म्हणून त्यांनीही विद्यापीठ समितीशी सतत संपर्क ठेवला होता. उभयता कानिटकर पुण्याचे, व आमच्या गोपाळराव देवधरांचे निकटवर्ती होते. स्वाभाविकच देवधरांची कन्या सौ.मनोरमाबाई थत्ते यांच्या ते संपूर्ण परिचयाचे. अर्थात आमच्या संस्थेची वकिली त्या करीत होत्या.

समितीपुढे असा पेच निर्माण झाला की, आम्हा उभय संस्थांना नकार तरी दिला पाहिजे; अगर उभयतांना मान्यता दिली पाहिजे. आमच्यातील एकाला नकार व एकाला होकार देणे कठीण आहे. आम्ही तर नकार घेण्यास मनाने तयार होतोच, पण मॉडेल स्कूलची तशी तयारी नव्हती. त्यांच्याकडून सतत रदबदली चालू होती. या रदबदलीचा इष्ट परिणाम झाला तर, गडबड न करता आमचेही साधणार होते!

कानिटकरद्वय चांगलेच पेचात सापडले होते. ही पुणेरी जोडी तितकीच कसबी व मातब्बर असल्याने त्यांनी स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला की, ''प्रताप अगर मॉडेल या दोन्ही माध्यमिक शाळांची आजची एकूण अवस्था विचारात घेता यांपैकी कोणालाही मान्यता देता येणे शक्य नाही. अन्य शाळांनी काहीही तक्रार केली तरी सांगलीत तिसऱ्या माध्यमिक शाळेला वाव आहे हे मात्र आम्हाला मान्य आहे. या दोनही शाळा उणीवांच्या दृष्टीने एका समान पातळीवर असल्याने, एकीला मान्यता देऊन दुसरीवर अन्याय करण्याची आमची तयारी नाही. पण एक पर्याय मात्र आम्ही सुचवू शकतो. या दोन्ही शिक्षणसंस्था एकत्र येतील व आपल्या दोन्ही माध्यमिक शाळा एकत्र करतील तर विद्यार्थीसंख्या, शिक्षणसाहित्य इत्यादी उणीवा थोड्याफार भरून निघतील आणि मग या एकत्रीकरणातून तयार होणाऱ्या तिसऱ्या माध्यमिक शाळेला मान्यता देणे विद्यापीठाला शक्य होईल. हे नवीन शैक्षणिक वर्ष चालू होण्यापूर्वी जर आपण हे घडवून आणणार असाल तर आम्ही विद्यापीठास तशी शिफारस करू.''

●●●

## एकत्रीकरण

विद्यापीठ समितीची सन्मान्य मंडळी सांगलीस येऊन निघून गेली. आम्हांस मान्यता मिळणार नाही हे आमचे गृहीत सत्य असल्याने, 'ना खेद ना खंत' अशा अवस्थेत आमचा दैनंदिन कार्यक्रम चालू झाला. दोन संस्थांच्या एकीकरणाचा प्रश्न विचारात घेण्याची आमची मानसिक तयारी नसल्याने तोही प्रश्न आम्ही हाताबाहेर ठेवला होता. पण या दोन शिक्षणसंस्थांचे अध्यक्ष मात्र विद्यापीठ समितीची ही सूचना दुर्लक्षिण्यास तयार नव्हते.

या दोन्ही शिक्षणसंस्थांत आजीव सदस्य शिक्षणपद्धती होती. स्वत: शिक्षणकार्य करणाऱ्या व्यक्तींनी शिक्षण विकास विस्तार कार्याला वाहून घेण्याचे ठरविल्यावाचून, शिक्षणसंस्थांचा कारभार सुरळीत चालू शकत नाही. ही महाराष्ट्राची शिक्षण परंपरा इतरत्रांप्रमाणे आम्हीही सांभाळली होती. 'यंग मेन्स एज्युकेशन सोसायटी'चे आम्ही पाच आजीव सदस्य आमच्या भूमिकेला, ध्येयधोरणाला ठामपणाने चिकटून राहून संस्थेच्या प्रगतीसाठी झगडा देण्यास सज्ज असल्याने, आज ना उद्या आम्ही यशस्वी होणार ही आमची खात्री होती. त्यामुळे आमची काडीमात्र

चलबिचल झाली नव्हती. मान्यतेसाठी काही काळ थांबावे लागले तरी आमची त्यास मानसिक तयारी होती. मॉडेल स्कूलमधील घडामोडींवर आमचे तसे बारीक लक्ष होते. आमच्यातील एक शिक्षक व सिटी हायस्कूलमधील आमचे गुरुजी माधवरावजी देवधर हे मॉडेल स्कूल सोडूनच आमच्याकडे आले असल्याने त्यांच्या तोंडून तेथील हकीगती ऐकावयास मिळत. त्यावरून असे कळून येई की, त्यांच्यातील बरेचसे आजीव सदस्य संधीमार्गावर असल्याने आज ना उद्या त्या संस्थेला आपल्या भवितव्याची चिंता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. आर्थिक टंचाई ही तर आमची सवयच असल्याने त्या बाबतीतही आम्ही हार जाण्याची शक्यता नव्हती.

मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांचाही विश्वास डळमळीत होऊ लागल्याच्या वार्ता येत होत्या. त्यामुळे या घटकेला एकीकरणाचा घोळ आपण घालण्यापेक्षा काही काळ थांबणे श्रेयस्कर आहे अशी आमची ठाम मनोभूमिका होती. पण आता मॉडेल स्कूलचे अध्यक्ष थांबण्यास तयार नव्हते; आणि कोणत्याही गोष्टीची घाई हा आमच्या अध्यक्षांचा देहस्वभाव असल्याने या दोन अध्यक्षांनी एके दिवशी दोन संस्थांच्या एकीकरणाच्या प्रश्नाला चालना दिली. एकीकरणाची रूपरेषा ठरविण्यासाठी विलिंग्डन कॉलेजचे तत्कालीन प्राचार्य डी.जी.कर्वे यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली.

आमच्या शिक्षणसंस्थेच्या वतीने शं.गो.गोखले, व मॉडेल स्कूलच्या वतीने स.पां.सहस्रबुद्धे हे उभयता वाटाघाटीच्या पहिल्या फेरीसाठी कर्व्यांकडे गेले. परंतु ह्या वाटाघाटी मुळीच यशस्वी झाल्या नाहीत. उभयतांचे तेथे काय बोलणे झाले ते कळण्यास मार्ग नाही. पण प्राचार्य कर्वे नंतर म्हणाले, ''तुमचे हे प्रतिनिधी एकी होऊ नये म्हणून आले होते की काय, हेच मला कळत नाही. दोन संस्थांच्या एकीकरणाचा उद्देश असेल तर तुम्हाला अन्य पर्याय हुडकला पाहिजे.''

अर्थातच हे प्रतिनिधी बाजूस ठेवण्यात येऊन आता उभय अध्यक्षांनीच वाटाघाटी कराव्यात असे ठरले. दोन संस्थांच्या एकीकरणाबाबत येणाऱ्या अडचणींपैकी मूलभूत अडचण अशी होती की, आमच्या संस्थेचे आजीव सदस्य पाच होते; पण मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सदस्यांची संख्या घटून आता फक्त तीनवर आली होती. यामुळे एकीकरणानंतर निर्माण होणाऱ्या नव्या संस्थेत आठ आजीव सदस्य होणार, तरीही आमची संख्या पाच असल्याने संस्थेत आमचेच हुकुमी बहुमत राहणार अशी भीती मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या लोकांना वाटत होती. आमचे याबद्दल म्हणणे असे होते की, नव्याने निर्माण होणाऱ्या संस्थेत आपण आठ आजीव सदस्य झाल्यानंतर पाच आणि तीन असा भेदाभेद होऊ शकत नाही. नव्या संस्थेचे आपण सर्वजण आठ सदस्य होणार आहोत.

आमचा हा दृष्टिकोण खिलाडू वृत्तीचा निदर्शक असला तरी तो मॉडेल एज्युकेशन सोसायटीला मान्य होण्याजोगा नव्हता. त्यांना तीन आणि तीन असे सहाच आजीव सदस्य हवे होते. आमच्यापैकी कोणातरी दोघांनी माघार घ्यावी असे त्यांचे म्हणणे होते. आमच्यापैकी कोणीच सदर योजना मान्य करण्यास तयार नव्हते. शेवटी असा पर्याय काढण्यात आला की, एकत्रीकरणानंतर पुरी एकवाक्यता निर्माण होईपर्यंत आमच्यापैकी दोघा सदस्यांनी किमान दोन वर्षे मतदानाचा हक्क वापरू नये. एकत्रित काम चालू झाल्यानंतर अल्पावधीतच एकजिनसीपणा होऊन आठ लोकांचे नवे आजीव सदस्य मंडळ तयार होईल; मग पाच आणि तीन असा भेदाभेद राहणार नाही.

इतकी घासाघीस करून व परस्पर अविश्वासाचे वातावरण ठेवून आपण एकत्रीकरणाचा आग्रह धरूच नये, असे आम्ही आमच्या अध्यक्षांना सांगितले. पण त्यातूनही विद्यापीठाच्या मान्यतेसाठी एकत्रीकरण व्हावेच असा आपला आग्रह असेल तर पुढील अटींवर या एकत्रीकरणास आमची मान्यता राहील, अशी भूमिका आम्ही मांडली.

१. नव्या शिक्षणसंस्थेचे नाव 'यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी' असे राहील.
२. एकत्रित दुय्यम शाळेचे नाव प्रताप मॉडेल हायस्कूल असे राहील.
३. नव्या शिक्षणसंस्थेचे आजीव सदस्य पाच अधिक तीन असे आठ राहतील.
४. नव्या दुय्यम शाळेची सुरुवात पांजरपोळच्या इमारतीतच होईल.

५. मॉडेल स्कूलचे सर्व साहित्य मे महिन्याची सुट्टी संपण्यापूर्वी पांजरपोळच्या इमारतीत आले पाहिजे.

आमच्या या सर्व अटी काहीशा चढाईखोर व आक्रमक वाटणार असल्याने त्या अटी स्वीकारून एकीकरणास मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे लोक तयार होणार नाहीत अशी आमची खात्री होती. 'हे एकत्रीकरण न झाल्यास बरे' अशी आमची आरंभापासूनच धारणा असल्यामुळे आम्ही आमच्या हट्टाग्रहास चिकटून होतो. या आक्रमक हालचालींना मॉडेल स्कूलच्या आजीव सदस्यांचा कडवा विरोध असणे स्वाभाविक होते. पण हे असे असूनही एकीकरणाची आश्चर्यकारक घटना घडू शकली. मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गणेश कोंडो गोडबोले यांनी आपल्या तीन आजीव सदस्यांना बोलावून चक्क सल्ला दिला की, ''तुम्ही जर हे करणार नसाल तर मी माझ्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन मोकळा होतो. आत्तापर्यंत आपल्या संस्थेत झालेली विघटना विचारात घेता, हे कार्य आपण तडीस नेऊ शकाल असा विश्वास मला वाटत नाही.''

हा निर्वाणीचा इशारा मिळाल्यानंतर मात्र जलद हालचालींना सुरुवात झाली. चढाईची संधी मिळताच त्वरित हालचाली करणारे आमचे अध्यक्ष ना.प.थत्ते यांनी इतक्या द्रुतगतीने हालचाली केल्या की, चार-आठ दिवसांत सामिलीकरण करार तयार होऊन त्यावर उभय अध्यक्षांच्या सह्या झाल्या. 'यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी' १९३९च्या मे महिन्यात अस्तित्वात आली. पांजरपोळावर 'यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन'चे 'प्रताप मॉडेल हायस्कूल' असा फलक लावला गेला.

आधीच्या यंग मेन्स एज्युकेशन सोसायटीचे दोन आजीव सदस्य अद्यापि पदवीधर झालेले नव्हते. व्यक्तिश: माझा शिक्षणक्रम -आर्थिक परिस्थितीमुळे - इंटर आर्टस् मध्येच बंद पडला होता. ह्यामुळेच काहीजणांनी विद्यापीठ समितीपुढे आक्षेप घेतला. त्यासाठी ह्या समितीचाच लवाद मान्य करण्यात आला.

मी व शं.गो.गोखले उभयता प्रामुख्याने मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना शिकवीत असल्याने, आमचे काम पाहून लवाद समितीने निर्णय दिला की, आम्हा उभयतांना पदवीधर शिक्षक समजून वेतन द्यावे व आम्हाला पदवीधर बनण्यासाठी शाळेतील त्यांचे काम अर्धवेळ करून संधी द्यावी. या निर्णयामुळेच आम्ही उभयता पदवीधर झालो. हा वेतनाचा वाद निघाला नसता तर कदाचित पदवीप्राप्तीची ही गोष्ट आम्ही केलीही नसती. अर्थात पदवी आणि विषय शिकवण्याची पात्रता यांचा परस्पर निकट संबंध नाही हेही त्यामुळे कळून आले.

या नव्या हायस्कूलच्या मॅट्रिक वर्गाला मुंबई विद्यापीठाकडून मान्यता मिळणेबाबतचा अर्ज तत्काळ दाखल केला गेला. विद्यापीठाची कानिटकर द्वयांची जुनी समिती पाहणी करण्यासाठी पुन्हा सांगलीस आली. या पाहणीनंतर १९३९ च्या १२ ऑगस्टला आमच्या या नव्या दुय्यम शाळेला विद्यापीठाची मान्यता मिळाल्याचे समारंभपूर्वक जाहीर करण्यात आले. सांगलीला नव्यानेच तयार झालेल्या जयश्री चित्रमंदिरात यासाठी एक समारंभ आयोजित करण्यात येऊन बारा ऑगस्ट हाच आमच्या नव्या संस्थेचा वर्धापनदिन म्हणून जाहीर करण्यात आला.

दोन माध्यमिक शाळांच्या एकत्रीकरणामुळे एकत्र आलेला सेवकवर्ग आता संख्येने थोडाफार जास्तच होता. पण त्या सर्वांना सामावून सांभाळून घेण्यात आले. विद्यापीठाची मान्यता मिळूनही ह्या संस्थेला अनुदान देण्यास सांगली दरबार तयार नव्हता. स्वाभाविकपणे केवळ फीच्या उत्पन्नातूनच संस्थेला आपला सर्व खर्च भागवावा लागे; आणि यातच सेवकवर्गाची खरी कसोटी लागणार होती. आजीव सेवक म्हणून एकत्रित आलेल्या आठ मंडळींनी हा आर्थिक ताण सोसून सेवकवर्गाला संरक्षण देणे भाग होते. पण ही भूमिका सर्वांना कशी काय मानवणार हा प्रश्न होता. आर्थिक प्रश्नावरच प्रथम वाद निर्माण झाला. काही आजीव सेवकांनी 'किमान अमुकएक वेतन मिळत असेल तरच काम करणे शक्य होईल' असा निर्वाणीचा खलिता दिला. 'आजीव सेवकांनी पदरी पडेल ते वेतन समान पद्धतीने घ्यावे' या भूमिकेशी ही मागणी विसंगत असल्याने प्रश्न निर्माण झाला. संस्थेच्या नियामक मंडळामध्ये काही व्यक्तींची अशी धारणा होती की, 'शाळेच्या अस्तित्वाला पोषक अशी काही मंडळी असल्याने त्यांच्या आर्थिक मागण्या डावलता येणार नाहीत;

बाकीच्या आजीव सदस्यांनी काय करावे हे आम्ही सांगत नाही. पण अशा काही वेचक व्यक्तींच्या किमान मागण्यांना नकार देऊन चालणार नाही.' आरंभीच्या अवस्थेत केवळ आर्थिक प्रश्नावर वादंग माजू नये म्हणून आमच्याकडून ह्या गोष्टींना मान्यता देण्यात आली. पण ह्यामुळे जी वैचारिक दरी निर्माण झाली तिचा परिणाम, संचालनात्मक एकसूत्रीपणा राहील अगर नाही अशी शंका निर्माण करण्यास कारणीभूत झाला. काही काळ संयमाने वागण्याचा निर्णय घेऊन ही विसंगतीही चालू ठेवण्यात आली. या कालखंडात न.ग.कमतनूरकर पतीपत्नी, हरी गोविंद टिळक (वकील) अशी काही हौशी मंडळी संस्थेच्या कामात रस तर घेऊ लागलीच, पण शिक्षकाचे काम करण्यासही पुढे आली. गावातील प्रतिष्ठित मंडळी अधूनमधून शिक्षक म्हणून येऊ लागल्याने विद्यार्थ्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले.

र.वा.मुजुमदार उर्फ कवी साधूदास यांची आम्हा परिचितांना हाक मारण्याची एक विशिष्ट ढब होती. ते नावाचा उच्चार न करता नुसताच 'अहोऽ' असा दीर्घ स्वर काढून हाक मारीत. एक दिवस त्यांची हाक ऐकून मी थबकलो. मी सांगली हायस्कूलमध्ये मॅट्रिकला असताना एकच वर्ष त्यांचा आवडता विद्यार्थी होतो. त्यांची हाक ऐकून मी थबकलो, पण मराठी विषयाचे शिक्षक म्हणून त्यांना पांजरपोळात घेऊनच आलो. सांगलीच्या सरकारी हायस्कूलमधून ते नुकतेच सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांनी मराठी विषयापुरते आमच्या शाळेत काम करण्याचे मान्य केले होते. त्यांच्या शिकविण्याची शैली, भाषेचा रसाळपणा, शीघ्रकवित्व, त्यांची ख्यातनाम काव्ये व कादंबऱ्या यांमुळे, आमच्या नव्या हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून त्यांची जोड मिळताच आमच्या हितशत्रूंना एक जबरदस्त धक्का बसला.

दुपारची वामकुक्षी आटोपल्यानंतर तांबूल चघळीत व संथ पाऊले टाकीत साधुदास शाळेकडे येत. त्यांचे घर व शाळा यामधील अंतर जास्तीत जास्त शंभर पावलांचे असेल, पण तेवढे अंतर काटण्यास ते सहज दहा मिनिटे घेत. त्यांच्या सर्व लहरी सांभाळून ते सांगतील त्या अटी मान्य करून त्यांना मराठीचे शिक्षक म्हणून स्वीकारावेच, असा हा महापुरुष होऊन गेला. साधुदासांना येण्यास कितीही उशीर लागो मॅट्रिकच्या वर्गातील विद्यार्थी मुकाट्याने वाट बघत बसत. त्यांची ओघवती, रसवंती वाणी, हजरजबाबीपणा, विषयातील पांडित्य, व शिकविताना तल्लीन होऊन जाण्याची वृत्ती ह्यांमुळे विद्यार्थी रंगून जात. ते तासाला खडू नेत नसत, फळ्याचा वापर करीत नसत, अगर बसली जागा सोडत नसत. आजच्या शिक्षणशास्त्रात माहात्म्य पावलेली कोणतीही साधनसामग्री न बाळगता 'त्यांच्यासारखा शिक्षक झाला नाही' असे म्हणणे भाग आहे. हल्लीच्या शिक्षण-साहित्याचे अवास्तव स्तोम पाहिले म्हणजे, त्यातले काहीही नसताना पूर्वीचे शिक्षक अधिक सरस शिक्षण विद्यार्थ्यांना कसे देऊ शकत याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती व ज्ञानदान करण्याबाबत शिक्षकांची तन्मयता हेच शिक्षणशास्त्रातील खरे भांडवल आहे, असे म्हणणे भाग आहे. चालू जमान्यातील थाटमाट हा कापड पेठेत काचेच्या पेटीत ठेवलेल्या प्रदर्शनीय पुतळ्यापेक्षा अधिक मोलाचा असेल असे नाही.

संस्थेच्या चिरकाल लक्षात राहील असे एक अपवादात्मक शिक्षक संस्थेकडे आले होते; ते म्हणजे श्रीकृष्ण भिलवडीकर हे होत. ते स्वत: बी.ए.बी.टी. असून कोल्हापूरचे रहिवासी होते. वडिलांचे एकुलते एक चिरंजीव. कोल्हापुरात मालकीचे घरदार असूनही निव्वळ योगायोगाने ते आमच्या संस्थेत शिक्षक म्हणून आले. १९४२ च्या मे महिन्यात एकदा त्यांचे वडील सांगलीस आले व आपल्या मुलाला कोल्हापूर दरबारची कायम नोकरी मिळत असल्याचे सांगू लागले. अर्थात, कोणाचीच अडवणूक न करण्याचा संस्थेचा बाणा असल्याने, भिलवडीकर यांना सोडण्यास संस्था तयारच होती; पण काही झाले तरी संस्था सोडण्यास तेच तयार नव्हते! ते संस्थेमध्ये इतके रमले होते की, वडिलांच्या इच्छेस मान देऊन कोल्हापुरास जाण्यास तयार नव्हते. 'वृद्ध वडिलांच्या विनंतीला मान द्यावा व कोल्हापुरास जावे' असा सल्ला आम्ही मित्रमंडळींनीच दिल्यामुळे शेवटी त्यांनी अत्यंत नाखुषीने सांगली सोडली. आश्चर्याची दु:खद घटना अशी घडली की, त्यानंतर अवघ्या एक महिन्यातच त्यांचा

विषमज्वराने अंत झाला. अलोट दु:खाने व्याकूळ झालेले त्यांचे वडील म्हणाले, ''मी माझ्या हाताने मुलाला तुमच्याजवळून काढून मृत्यूच्या खाईत घातले.'' आता या घटनेला दीर्घ काळ लोटला, पण अद्यापि भिलवडीकर कुटुंब आमच्याशी जिव्हाळ्याचे संबंध टिकवून आहे. हाडाचा ध्येयवादी शिक्षक ही एक दुर्मीळ गोष्ट आहे हेच खरे.

त्या काळातील आमचा सर्व शिक्षकवर्ग सर्वच दृष्टींनी कार्यक्षम असल्याने विद्यार्थीसंख्या झपाट्याने अपेक्षेबाहेर वाढत होती. कारण काय होते सांगता येत नाही; पण एक गोष्ट लक्षात येण्याजोगी होती ती ही की, प्रताप स्कूलच्या स्थापनेपासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा ओढा त्याकडे विशेष होता -व आजही आहे! आमचे राजकीय लागेबांधे ह्या घटनेला कारणीभूत असण्याची शक्यता वाटते. दुसरी महत्त्वाची कारणीभूत बाब म्हणजे, अल्पस्वल्प फीबाबतसुद्धा गरीब विद्यार्थ्यांना संरक्षण देण्याचे धोरण संस्थेने स्वीकारले होते. त्यामुळे बहुजन समाजाचा ओढा ह्याच शाळेकडे असे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या आमच्या ह्या दुय्यम शाळेत भरमसाठ असल्याने लब्धप्रतिष्ठित व संकुचित कल्पनांच्या आहारी गेलेल्या पालकांना, आपल्या मुलांचे शिक्षण आमच्या शाळेहून अन्यत्र ठिकाणी व्हावे असे वाटे. ग्रामीण भागातील मुलांच्या सहवासात आपली मुले शिकायला ठेवल्याने आपल्या मुलांचा दर्जा खालावेल अशा भीतीने ते वावरत. या प्रतिष्ठित वर्गाला स्वाभाविकपणे आपल्या पाल्यांना अन्य संस्थेत ठेवण्यात मोठेपणा वाटे. पण आमच्या संस्थेचा सामाजिक दर्जा व लौकिक, समाजातील सर्व थरांना चित्तवेधक वाटतो हेही तितकेच खरे आहे. प्रवेश देण्याबाबत काहीतरी बंधन घालून, शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची कुचंबणा होऊ न देण्याचा आमचा निर्धार असल्याने, संस्थेत प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या मार्गात कोणताही अडसर निर्माण करण्यात येत नाही. आम्ही असेच मानीत आलो आहोत की, निरलसपणे विद्यादान करणे हे आपले काम आहे. विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ती असेल त्या प्रमाणात ते यशाचे वाटेकरी ठरतील! आमच्या ह्या धोरणामुळे बौद्धिकदृष्ट्या कमी अगर मध्यम प्रतीच्या अनेक विद्यार्थ्यांना यशोमंदिराचे दरवाजे सहजपणी खुले झाले आहेत.

●●●

## समाजाभिमुख शिक्षण संस्था

दिवसेंदिवस वाढणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे दुय्यम शाळेसाठी संस्थेच्या मालकीची स्वतंत्र इमारत बांधणे एव्हाना अत्यावश्यक होऊन बसले. इमारतीसाठी आवश्यक जागा व इमारतीसाठी लागणारा निधी ह्यासाठी काय करावे, ही आमची एक दैनंदिन चिंता होऊन बसली. त्या काळच्या सांगली परिसराचा विस्तार विचारात घेता गावाच्या दोन टोकांना माध्यमिक शाळा उपलब्ध होत्या. गावाच्या मध्यभागी आमची दुय्यम शाळा असली तरी ती तशी बाजूला होती. बाजारपेठेच्या मध्यभागी हायस्कूलच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध झाल्यास फारच मोठी सोय होणार होती. अशा दोन जागा आमच्यापुढे होत्या. एक म्हणजे सध्या विष्णूदास भावे नाट्यमंदिर ज्या जागेत आहे ती पुराणिक वाड्याची जागा; आणि दुसरी म्हणजे आज ज्या ठिकाणी आमची संस्था आहे ती कऱ्हाडे वाडा या नावाने ओळखली जाणारी जागा. या दोन्ही जागा मध्यवस्तीत पेठभागात असून हरभट रोड ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हमरस्त्यावर होत्या. पैकी पहिल्या जागेत खुद्द दरबारच्या अनेक योजना असल्यामुळे, ती तशी दुष्प्राप्य होती. कऱ्हाडे वाडा मात्र आम्हाला उपलब्ध होण्याची जास्त शक्यता होती.

हा वाडा कित्येक दिवस ओसाड व पडीक होता. 'भुताटकीचा वाडा' म्हणून त्याची ख्याती होती. या

वाड्यात किती मालक व किती वाटेकरी निश्चित आहेत याचाही थांगपत्ता लागत नव्हता. या वाड्याचा अत्यंत अल्पसा भाग -त्यातील एक हिस्सेदार भडकमकर यांच्याकडून -मॉडेल एज्युकेशन सोसायटीने खरेदी केला होता. या खरेदी जागेच्या आधारे सर्वच जागा सरकारमार्फत शाळेच्या इमारतीसाठी संपादन करून घ्यावी, ह्या हेतूने आमच्या हालचाली सुरू झाल्या. वाड्यावर मालकी सांगणारे कोणीही प्रत्यक्ष त्या वास्तूत राहात नव्हते. अनेक उपऱ्या लोकांनी तिथे घुसून आपले हितसंबंध निर्माण केले होते, आणि ह्या वाड्याची एक झोपडपट्टीच तयार केली होती. या परिस्थितीत मालकांशी चर्चा करून जागा खरेदी करणे हा पर्यायच उपलब्ध नव्हता. मग सरकारमार्फतच हा वाडा खरेदी करणे श्रेयस्कर व सोयीचे असल्याने, संस्थेने त्याबाबत हालचालींना सुरुवात केली.

सांगलीचे एक धनिक वि.रा.वेलणकर यांनी दुय्यम शाळेला आपले नाव देण्याच्या अटीवर माध्यमिक शाळेच्या होणाऱ्या संभाव्य इमारतीसाठी संस्थेला वीस हजाराची देणगी देऊ केली. 'प्रताप स्कूल' हे नाव देताना मनोमनी जो संकल्प ठेवला होता, त्याबाबत काहीतरी निश्चित निर्णय झाल्याशिवाय या देणगीचा स्वीकार करणे कठीण होते. तशात दुर्दैवी घटना अशी घडली की, दुसऱ्या महायुद्धकालात राजकुमार प्रतापसिंह यांचे निधन झाले होते. अर्थात त्यांचे यथोचित स्मारक या शाळेच्या रूपात झाल्यास हवेच होते. पण सांगलीच्या श्रीमंत राजेसाहेबांचा या शाळेस ते नाव न देण्याचा निर्णय अद्यापि कायम असल्याने आमचा नाइलाज झाला. राष्ट्रीय चळवळीच्या काळातील आमचे संबंध व आमच्या हितशत्रूंची दरबारी असणारी वर्दळ, यांमुळे श्रीमंतांच्या मनात गैरसमज वावरत आहे. याची स्पष्ट कल्पना आम्हांस होती; पण त्या काळात तरी तो समज दूर करण्याचे साधन आम्हांपाशी नव्हते. राजेसाहेबांकडून प्रतापसिंहांचे नाव देण्यास स्पष्ट नकार आल्यानंतर वेलणकरांच्या देणगीचा विचार संस्थेपुढे आला.

वेलणकरांच्या अटींमध्ये प्रमुख दोन गोष्टी समाविष्ट होत्या. एका अटीन्वये संस्थेने एका वर्षाच्या आत त्यांच्या खाती वीस हजार रुपये जमा करावयाचे; व त्यांचे वीस हजार भरीला घेऊन चाळीस हजारांच्या निधीवर इमारतीचे काम चालू करावयाचे. दुसरी अट अशी होती की, शिक्षणसंस्था बुडाल्यास आज होणारी इमारत वेलणकरांच्या मालकीची व्हावी. ह्या अटींबाबत आम्ही अनुत्सुक होतो. एकूण इमारतीचा जागेसुद्धा खर्च तर दीड लाखाच्या पुढे जात होता. म्हणजे अन्यत्रांकडून एक लाखाहून अधिक देणगी गोळा करावयाची; पण इमारतीवर मालकी मात्र वेलणकरांची ठेवायची. याचा अर्थ असाही होता की, या अटीवर अन्य कोणीही संस्थेला देणगी देणे शक्य नव्हते; आणि घडलेही तसेच!! संस्थेच्या नियामक मंडळातील काही सभासदांच्या आग्रहाखातर हा करार संस्थेने स्वीकारला. एक वर्षाच्या आत वीस हजारांचा निधी संस्थेला उपलब्ध न झाल्याने वेलणकरांनी आपली देणगी परत घेतल्याचे संस्थेला कळविले, व ह्या प्रकरणावर कायमचा पडदा पडला.

१९३९ साली दुसरे महायुद्ध चालू झाल्यावर अनेक पदवीधरांना चांगल्या पगाराच्या विपुल नोकऱ्या अन्यत्र उपलब्ध होऊ लागल्या. त्यामुळे शिक्षकवर्गात मोठी चलबिचल निर्माण होऊ लागली. संस्थांचे एकूण भवितव्य भविष्यकाळात काय स्वरूप धारण करेल याचा निश्चित अंदाज नसल्यामुळे, द्विधा मन:स्थितीत असलेला शिक्षकवर्ग अन्य सरकारी नोकऱ्यांत जाऊ लागला. काहींनी जुन्या काळापासून चालत आलेल्या व स्थिरप्रद झालेल्या संस्थांकडे धाव घेतली. राष्ट्रीय आंदोलन जोरात चालू झाल्याने उलाढाली पूर्वपरिचित लोकांची सांगलीत वर्दळ वाढू लागली. १९४२ सालापासून या वर्दळीला इतका बहर आला की, प्रत्यक्ष शिकविण्याचे काम सांभाळण्यापलीकडे संस्थेच्या अन्य बाबींकडे लक्ष देण्यास आम्हांस फुरसदही मिळेनाशी झाली. ब्रिटिश हद्दीतील कार्यकर्ते, संस्थांनी हद्दीत येऊन सर्व चळवळी करीत. संस्थानच्या पोलिस खात्याला ह्याची दखल नसे असे मुळीच नाही. पण सांगलीबाबत एवढे ठाम मत होते की, ह्या चळवळ्यांना राजकीय आश्रय देण्यात सांगली दरबार मुळीच हयगय करीत नव्हता.

अशी दोन वर्षे गेली. एव्हाना १९४४ साल संपत आले. राजकीय वातावरण निवळत आले. भारतीय स्वातंत्र्यप्राप्ती आता दीर्घकाळ थांबू शकत नाही याची मनोमनी जाणीव झाली. भविष्यकाळात शिक्षणाची पुनर्रचना करावयास

लागणारी सर्व तयारी मनाशी धरून आम्ही काही नव्या उपक्रमास हातही घातला होता. सहकारी पद्धतीने चालणारे शालेय वस्तू भांडार संस्थेने चालू केले होते. काहीतरी काम करून शिक्षणासाठी अल्पस्वल्प वेतन मिळवू इच्छिणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना, दैनंदिन गरजेच्या अनेक वस्तू या भांडारामधून विक्रीसाठी पुरविण्यात येत. या वस्तू माफक दरांत मिळाव्यात ह्या दृष्टीने अनेक घाऊक व्यापाऱ्यांशी संधान बांधण्यात आले होते. संस्थानी अमदानीत सरकारी कचेऱ्यांना लागणारे स्टेशनरी सामान पुरविण्याचे कामही या भांडारामार्फत केले जाई. शालेय जीवनाशी निगडीत अशा अनेकविध उपाधींचे संघटन करण्यासाठी आवश्यक त्या प्रशस्त जागा व इमारती यांची जुळणी करण्याखेरीज गत्यंतर नाही, याची जाणीव संस्थेला आता होऊन चुकली.

ब्रिटिश मुलुखात येणाऱ्या राजकीय सुधारणा, समांतर पद्धतीने आपल्या संस्थानात चालू करण्याची परंपरा सांगलीच्या राजेसाहेबांनी जतन केली होती. १९४५ साली ब्रिटिश मुलुखात जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात आली; त्याचबरोबर सांगली संस्थानातही विधिमंडळ व लोकनियुक्त मंत्रीमंडळ अस्तित्वात आले. हे लोकनियुक्त मंत्रीमंडळ राजकीय जीवनाशी परिचित असल्यामुळे, आमच्या संस्थेला सरकारी पाठिंबा मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली. पहिले लोकनियुक्त मुख्यमंत्री बी.एस.कोरे यांनी आमच्या संस्थेला दोन हजार रुपयांचे वार्षिक अनुदान सुरू केले. अनुदान देण्याबाबत निश्चित अशी नियमावली अस्तित्वात नसल्यामुळे मिळणारे अनुदान म्हणजे 'सरकारी मान्यतेचे निदर्शक' या स्वरूपाचेच मानले जाई. या प्रकारे सरकारी मान्यतेमुळे संस्थेच्या कामाला एक स्थैर्य प्राप्त झाले.

संस्थेच्या ताब्यात असलेल्या कऱ्हाडे वाड्यातील संपादित भागाचा आधार घेऊन, दुय्यम शाळेच्या इमारतीसाठी सर्वच कऱ्हाडे वाडा सरकारमार्फत संपादन करून मिळावा अशी खटपट याच काळात चालू करण्यात आली. कोणाही मालकाला हा वाडा लाभत नाही अशी एक भ्रामक कल्पना प्रसृत असल्याने, या वाड्याच्या परिसरात मालक म्हणून कोणीही व्यक्ती वावरत नव्हती. वाड्याच्या दर्शनी दरवाजावरच कुणीतरी 'भुताटकीचा वाडा' असे लिहून ठेवले होते, आणि ही अक्षरे पुसण्याची दक्षताही कोणी घेत नव्हते. त्यामुळे हा वाडा संपादन करण्याचा प्रयत्न संस्थेने करू नये असा बऱ्याच चाहत्यांचा अभिप्राय होता. पण शहराच्या मध्यभागी दुसरी जागा उपलब्धच नसल्याने आम्हाला अन्य पर्याय नव्हता. याच वाड्याच्या पिछाडीस गणपती देवस्थानच्या मालकीची बरीच प्रशस्त खुली जागा पडीक असल्याने, पुढेमागे या जागेचा क्रीडांगण म्हणून शाळेस उपयोग होणार असा कयास होता. सदरची खुली जागा गणपती देवस्थानच्या मालकीची असली तरी काही अटीवर तिची वहिवाट नगरपालिकेकडे देण्यात आली होती. संस्थेचे एक आजीव सदस्य बा.गो.नाईक हे नगरपालिकेचे अध्यक्ष असल्याने, आमची शाळा पांजरपोळात असतानाच या खुल्या जागेचा काही भाग संस्थेने क्रीडांगणासाठी म्हणून -नाममात्र भाड्याने -नगरपालिकेकडून घेतला होता. ही खुली जागाही डोळ्यासमोर ठेवून संस्थेने असा विचार केला की, भविष्यकालीन विस्ताराच्या दृष्टीने कऱ्हाडेवाडा संपादन करणे श्रेयस्कर आहे. मग आम्ही त्या उद्योगास लागलो.

संस्थेचे एक आजीव सदस्य हणमंत सदाशिव गोखले यांनी १९४६ साली प्रकृती-अस्वास्थ्यामुळे शाळेत येणे बंद केले. त्यांच्या जागी बा.गो.नाईक हे प्रताप मॉडेल हायस्कूलचे काम पाहू लागले. सांगलीच्या सार्वजनिक जीवनात त्यावेळी बा.गो.नाईक ठळकपणाने वावरत. शिक्षणसंस्थेतील कामे भराभर पुढे ढकलण्याच्या दृष्टीने त्यांच्या सार्वजनिक जीवनातील हालचाली चांगल्याच पोषक ठरल्या. जागा संपादन करण्याच्या कामी आवश्यक ती सरकारी प्रसिद्धी तातडीने करून, संपादन करण्यात यावयाच्या जागेची किंमत म्हणून संस्थेने सरकारात सोळा हजार रुपये भरावेत असा आदेश कोरे यांच्या मंत्रीमंडळाने दिला. आम्ही त्या कामास सुरुवात करण्याचे ठरविले. बा.गो.नाईक, वि.ना.आपटे, मी स्वत:, व मुजुमदार अशा चौघांनी निधी मोहीम सुरू केली. जागा संपादन करण्याचा मर्यादित हेतू तूर्त समोर ठेवून हे काम आम्ही चालू केले. दात्यांना आम्ही असेही सांगत असू की, 'इमारत फंडासाठी म्हणून फिरून एकदा आम्ही आपणास तसदी देण्यासाठी येणारच आहोत.' तत्कालीन सांगलीची बाजारपेठ अशा

भरभराटीत होती की, अवघ्या चार पाच दिवसांत आम्ही सोळा हजारांची रक्कम भरून टाकली. अल्पावधीतच जागा संपादण्याचे काम पूर्ण होऊन कऱ्हाडे वाड्यावर 'संस्थेच्या संकल्पित इमारतीची जागा' म्हणून पाटी लावून टाकली.

बऱ्याच लोकांची अशी धारणा होती की, आम्ही सामाजिक व राजकीय विषयात जो रस घेत होतो तसा रस घेणे शिक्षणकार्याच्या दृष्टीने घातुक आहे. ब्रिटिश राजवटीत किंवा संस्थानी राजवटीत शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींबद्दल तयार झालेली ही मते, स्वत:ला वकील वा संपादक म्हणविणारी बुद्रुक मंडळीही आम्हाला ऐकवीत असत. त्यांना ही जाणीव नव्हती की राष्ट्रीय चळवळींना जीवन देणारी ब्रिटिश अमदानीतील बरीचशी मंडळी ही शिक्षण क्षेत्रातच वावरणारी होती. स्वतंत्र भारतात अशी ही बुद्रुक मते कवडीमोल किंमतीची ठरणार, याची दखल आम्हांस असल्यामुळे आम्ही या टीकेची उपेक्षा करून चालत होतो. 'शिक्षण हे शालेय भिंतींच्या कक्षेपुरते मर्यादित असून त्याचा राजकीय अगर सामाजिक जीवनाशी सुतराम संबंध नाही', असे मानणाऱ्या मंडळींनीही लोकशाही देशांतील शिक्षणपद्धतींचा व शिक्षणक्षेत्रांत वावरणाऱ्या व्यक्तींचा अभ्यास केलेला नाही, एवढाच याचा अर्थ होता.

शिक्षक या नात्याने सामाजिक जीवनाशी एकरूप होऊन, त्यातही काही विधायक मूल्ये निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न होता. साहजिकच सांगलीचे बहुसंख्य नागरिक आमच्याकडे केवळ शिक्षक म्हणून न पाहता, 'कोणत्याही विधायक कार्यात रस घेणारी माणसे' या नात्यानेही पाहात. आमच्या या वृत्तीमुळे संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आमचा कार्यक्रम जलदगतीने फलद्रूप होत गेला. सांगली शहरातील गरीबातल्या गरीब माणसापासून तो धनिकातल्या धनिक माणसापर्यंत आम्हांस सर्वांचे सहकार्य सातत्याने लाभत गेले.

एकदा आचार्य भागवतांनी आमच्या शिक्षणसंस्थेस भेट दिली. संस्थेचा एकूण व्याप व परिसर पाहून ते तृप्त मनाने म्हणाले, ''साने गुरुजींसारख्या मातब्बर माणसाचे नाव घेऊन आम्ही निधीसाठी सारा महाराष्ट्र धुंडला तेव्हा आम्हाला एकूण ऐंशी हजारांचा निधी मिळाला, त्यातील दहा हजार रुपये निधी गोळा करण्यासाठी खर्च झाले. पण तुमच्या या शिक्षणसंस्थेने एका सांगली शहरात लाखो रुपयांचा निधी गोळा करण्यात यश मिळविले; यावरून तुमच्या संस्थेची लोकप्रियता सिद्ध होते.''

शिक्षक म्हटल्यावर त्याला राजकीय अगर सामाजिक जीवन असू नये, हे म्हणणे मूर्खपणाचे निदर्शक आहे. शिक्षकी पेशाच्या दृष्टीने विवेकाचा भाग एवढाच आहे की, आपल्या शालेय कार्यक्रमात कोणावर आपली राजकीय मते लादण्याचा प्रयत्न केला जाऊ नये. आमच्या शिक्षणसंस्थेने ह्या बाबतीत कटाक्षाने काही मूल्ये पाळली आहेत. ज्ञानार्जन वा ज्ञानदान करण्याची कुवत ओळखूनच संस्था माणसे जोडते. एखाद्या माणसाची मते विचारात घेऊन संस्थेने त्यास नियुक्त केल्याचा -किंवा न केल्याचा -दाखला नाही. शिक्षणसंस्था संचलनात आमची मते विद्यार्थी वा सेवकवर्ग यांच्यावर लादली जाऊ नयेत, अशीही दक्षता घेण्यात आली आहे. लोकशाहीत अभिप्रेत असलेले मतस्वातंत्र्य मिळाले तरच खिलाडू वृत्तीची जोपासना होऊ शकते. शिक्षणसंस्थेला या खिलाडू वृत्तीची आत्यंतिक गरज असल्याने सामाजिक जीवनातील सर्वच विचारप्रवाहांशी जुळतेमिळते घेण्याची सवय ही शिक्षण क्षेत्रातील एक पायाभूत गरज आहे. यामुळे आमच्या शिक्षणसंस्थेला कोणा एखाद्या राजकीय पक्षाचा टिळा कदापि लागलेला नाही.

काही शिक्षणसंस्थांना चोरून राजकारण करावयाचे असते. शिक्षण हे राजकारणापासून अलिप्त असावे, असा भास त्यांना निर्माण करावयाचा असतो. पण समाज डोळस असल्याने हे ढोंग पचत नाही. मग जातीय वा पक्षीय संस्था म्हणून त्यांच्या कपाळी बसावयाचा तो शिक्का बसतोच! आमच्या संस्थेच्या खिलाडू धोरणामुळे लोकप्रियतेबाबत संस्था नेहमीच आघाडीवर राहिलेली आहे. आमची अशी श्रद्धा आहे की, समाजाच्या सर्व थरांमधून संस्थेबाबत आत्मीयता निर्माण करण्याकामी आम्ही बऱ्यापैकी यशस्वी झालो आहोत.

●●●

आवश्यक ती सरकारी कारवाई होऊन कऱ्हाडेवाडा प्रत्यक्ष ताब्यात येण्यापूर्वी, या शिक्षणसंस्थेच्या मनात एक प्राथमिक शाळा चालू करण्याचा विचार घोळत होता. पांजरपोळची इमारत सकाळी प्राथमिक शाळेसाठी व दुपारी माध्यमिक शाळेसाठी वापरता येण्याजोगी होती. म्हणजे प्राथमिक शाळा सुरू करण्याच्या विचाराला मूर्त स्वरूप तर आणता येईलच व दुय्यम शाळेलाही जोड मिळेल असा विचार चालू होता. प्राथमिक शाळेला चालना देण्याचा विचार चालू असतानाच एक अनपेक्षित घटना घडली.

पूर्वीपासून राष्ट्रीय चळवळीत रस घेणाऱ्या मंडळींनी 'मंगलमूर्ती विद्यालय' म्हणून एक प्राथमिक शाळा पांजरपोळापासून नजिकच असलेल्या सांगलीच्या सराफकट्टा भागात सुरू केली होती. कालांतराने या प्राथमिक शाळेचे हस्तांतर होत होत ती शाळा पुढे 'गावठी शाळा' म्हणून ओळखली जाऊ लागली. तिचे संचलन मंगळवेढेकर नावाच्या एका वयोवृद्ध शिक्षकाकडे आले होते. एक प्रकारे ही एकशिक्षकी शाळा असून, मराठी एक ते चार इयत्तांपर्यंतचे वर्ग एकाच मोठ्या माडीवर भरत असत. या चारही वर्गांना एकच शिक्षक -श्री.मंगळवेढेकर हे शिकवीत असत. एकच शिक्षक, चारी वर्गांच्या बैठकीची जागा एकच, अशा सर्व शैक्षणिक गैरसोयी असूनही पालक मात्र अगत्याने आपल्या पाल्यांना या शाळेत पाठवीत. सांगलीत ही पहिलीच प्राथमिक खाजगी शाळा होती. २०व्या शतकाच्या आरंभकाळात ती निर्माण झाली असल्याने तिला एक परंपरा होती. सराफकट्टा आणि गणपतीपेठ या दोन व्यापारपेठांतील धनिक व्यापारी मंडळींचे प्राथमिक शिक्षण ह्याच शाळेत झाले असल्याने, स्वाभाविकपणे त्यांची मुलेही याच शाळेत होती. 'छडी लागे छमछम' या मंत्रावर पालकांची व शिक्षकांची श्रद्धा असल्याने या शाळेतील विद्यार्थी लेखन, गणित इत्यादी विषयांत चांगले पारंगत असत. सर्वच मुले चुणचुणीत व तत्पर असत. एकाच जागेत चारही प्राथमिक वर्गांचे काम शिक्षक करीत असतानासुद्धा ही गोष्ट साध्य होऊ शकते, ह्याचे प्रत्यंतर ही शाळा पाहिल्यानंतर येई. ही किमया साध्य करीत असताना मंगळवेढेकर मास्तर हे आपल्या स्वर व श्रवणेंद्रियांना गमावून बसण्याच्या स्थितीत आले होते. वयोमान झाल्याचाही थोडाफार परिणाम होता. स्वाभाविकपणे ही शाळा एखाद्या चांगल्या संस्थेच्या स्वाधीन करावी व आपण निवृत्त व्हावे, अशा विचारात ते बऱ्याच दिवसांपासून होते. त्यांच्या मनाशी काही निर्णय झाल्यानंतर ते एक दिवस पांजरपोळ येथील आमच्या संस्थेच्या कचेरीत येऊन दाखल झाले.

जुनी परंपरा असलेली, व सांगली सिटी हायस्कूल काढणाऱ्या मंडळींनीच एके काळी स्थापन केलेली ही शाळा आमच्या हाती सुपूर्त करता आली तर पहावी, या हेतूनेच मंगळवेढेकरांचे आगमन आमच्या संस्थेत झाले होते. अन्यत्र कोठेही चौकशी न करता मंगळवेढेकर थेट आमच्याकडे आल्यानंतर आम्ही त्यांच्या प्रस्तावाला नकार देणे शक्यच नव्हते. मंगळवेढेकरांना आम्ही त्यांची प्राथमिक शाळा ताब्यात घेण्याचे आश्वासन तर दिलेच, पण त्यापुढील कार्यवाही इतक्या तातडीने केली की, नव्या शैक्षणिक वर्षात -१९४६ मध्ये -'नूतन मराठी विद्यालय' या नावाने आमची प्राथमिक शाळा पांजरपोळच्याच इमारतीत सकाळ सत्रात भरू लागली. दीर्घकाळ सांभाळलेल्या आपल्या प्राथमिक खाजगी शाळेचे व्यवस्थित स्थलांतर व रूपांतर झाल्याचे पाहून मंगळवेढेकर सेवानिवृत्त झाले. त्यांनी आमच्यावर दाखविलेल्या विश्वासाचे प्रतीक म्हणून आमच्या संस्थेने त्यांच्या हयातीपर्यंत त्यांना निवृत्तीवेतन चालू ठेवले.

ह्या प्राथमिक शाळेत प्रथमत: एक ते चार इयत्तांचेच वर्ग आम्ही पूर्वीसारखे चालू ठेवले होते. सरकारमार्फत कऱ्हाडेवाडा संपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवस, कऱ्हाडेवाड्यातच उपलब्ध असलेल्या रिकाम्या जागेत हे वर्ग भरू लागले. पण ही योजना फार काळ नांदू शकली नाही. संस्थेच्या माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी हा जुना वाडा जमीनदोस्त करण्याचे ठरले. मग प्राथमिक शाळेचे वर्ग फिरून पांजरपोळच्या इमारतीत आणणे भाग पडले.

कऱ्हाडेवाडा सरकारमार्फत ताब्यात घेताना सर्व वाडा

खाली करून ताब्यात घ्यावा असा आग्रह धरला गेला होता. कारण वाड्यातील बऱ्याचशा जागांत काही मंडळींनी दडपून आपली बिऱ्हाडे थाटली होती. वाड्याला अनेक मालक असल्यामुळे कोणता भाडेकरू कोणत्या मालकाला भाडे देतो अगर नाही, याचा काही थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळे सरकारमार्फतच जागा खुली करून घेऊन रीतसर कब्जाच घ्यावा, हे रास्त होते. पण तेथे वस्ती करणाऱ्या मंडळींनी गयावया करून भीड घातली. 'तुम्ही आज कब्जा घेताना, रिकाम्या जागेचा कब्जा मिळाला असे म्हणण्यास हरकत नाही. तुम्ही नंतर ज्यावेळी संस्थेच्या इमारतीचे काम हाती घ्याल त्यावेळी आम्ही ताबडतोब जागा खाली करून देऊ. या कामी किंचितसुद्धा आडकाठी आम्ही करणार नाही. पण आजच जर तुम्ही जागा रिकामी करून देण्याचा आग्रह धरला तर मात्र सरकारी अधिकारी एका रात्रीत आम्हाला सडकेवर उभे करतील!' असे त्यांचे म्हणणे पडले. केवळ सहानुभूती म्हणून संस्थेने बिऱ्हाडकरूंची ही मागणी मान्य केली. प्रत्यक्षात मात्र ह्या मंडळींनी नंतर निराळा अनुभव दिला.

१९४६ ते १९४८ हा कालखंड संस्थेच्या दृष्टीने जरा चालढकलीतच गेला. १९४८च्या ३० जानेवारीला महात्मा गांधींची हत्या झाली, आणि फेब्रुवारी १ तारखेस गांधीवधाची प्रतिक्रिया -विशेषत: महाराष्ट्रात -उमटली; तिचा हादरा सांगलीस बसल्याशिवाय राहिला नाही. सांगली शहरात जाळपोळ व विध्वंसक कृत्ये यांनी असा धुमाकूळ घातला की, साऱ्यांची मने विषण्ण होऊन गेली. काय करावे, काय बोलावे हे सुचेनासे झाले. ही सारी अवस्था काही काळ टिकली, पण तिचा एक परिणाम असा झाला की, संस्थानांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया झटपट झाली. सांगली संस्थान मुंबई राज्यात विलीन केले गेले. ॲडमिनिस्ट्रेटर या हुद्द्याचा अधिकारी कारभार पाहण्यासाठी सांगलीत येऊन दाखल झाला. सामाजिक उत्पातांनी निर्माण केलेल्या दुरवस्थेवर काळ हाच एक उत्तम औषधोपचार असतो. कलुषित मने क्रमश: निवळू लागली. समाजजीवनावर आलेले अभ्रपटल नाहीसे होऊन पूर्ववत् दिलखुलास व्यवहारांना चालना मिळू लागली. संस्थेच्या इमारत कामाला हात घालण्याचा आता आम्हांस मोह पडू लागला.

प्रथमत: जुनाट कऱ्हाडेवाडा पाडून जमीनदोस्त करणे भाग होते. या कामाला हात घालताच आधीच्या बिऱ्हाडकरूंनी आपली शब्दयोजना बदलली. 'बाहेर जागा मिळू दे... आम्ही प्रयत्नात आहोत.... जागा मिळाली की आम्ही जातो-' अशी त्यांची भाषा सुरू झाली. या बिऱ्हाडकरूंना काढण्यासाठी दावेकज्जे चालू केल्यास दीर्घकाळ इमारत बांधताच येणार नाही; याची आम्हांस जाणीव असल्याने व 'खुल्या जागेचा कब्जा आम्ही घेतला आहे' असे कागदावर नमूद असल्याने आम्ही बेधडक वाडा पाडण्यास सुरुवात केली. नकळत झालेल्या शहाणपणाचा एक भाग असा होता की, मध्यंतरीच्या काळात कोणाकडूनही भाडे घेतले गेले नव्हते. स्वाभाविकपणे, जागा व्यापून बसलेल्या मंडळींना जागा सोडून जाण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही.

मनुष्य कितीही जडवादी नास्तिक असला तरी, त्याच्यावर परंपरागत संस्कार काही ना काही मानसिक दडपण आणल्याशिवाय राहात नाहीत. या वाड्याच्या परसदारी दोन पिंपळ, व अंगणात एक औदुंबर(उंबर) वृक्ष उभा होता. तो तोडण्यापूर्वी त्या दडपणास तोंड देत हे वृक्ष कोणी व कसे तोडावेत असा प्रश्न निर्माण झाला. शेवटी एक अग्निहोत्रीबुवा पुढे आले, त्यांनी धर्मकार्यार्थ समीधांसाठी पिंपळवृक्षाची मागणी केल्याने आम्ही मोठ्या खुशीने ते त्यांना देऊन टाकले, आणि त्या दोन जुनाट वृक्षांच्या नाशापासून निर्माण होणाऱ्या साऱ्या पापपुण्याची जबाबदारी, अग्निहोत्री बुवांवर सोपवून रिकामे झालो. वाड्याच्या मध्यभागी उभ्या असलेल्या औदुंबर वृक्षास मात्र हात लावण्यास कोणीच तयार होईना. स्वत:ला सुधारक म्हणवून घेणारे बा.गो.नाईक हेसुद्धा, या वृक्षाला हात न लावता संस्थेची इमारत कशी बांधता येईल या विवंचनेस लागले. त्यावेळी नगरपालिकेकडे दांडेकर ह्या नावाचे गृहस्थ आर्किटेक्ट म्हणून कामास होते. एक आजीव सदस्य वि.ना.आपटे हे तर स्थापत्य शास्त्रातील दर्दी असल्याने ते, बी.जी.नाईक व दांडेकर या त्रिवर्गाने मिळून, उंबराच्या झाडाला हात न लावता संस्थेच्या दुय्यम शाळेची भव्य इमारत कशी बांधता येईल याचा सुंदर आराखडा तयार

केला.

संस्थेच्या आरवाडे हायस्कूलची तिमजली भव्य इमारत ह्या औदुंबर वृक्षाच्या सभोवार आज उभी आहे. या औदुंबर वृक्षाच्या छायेतच संस्था खंबीरपणाने सतत प्रगतीपथावर मार्ग आक्रमत आहे. त्याकाळी न कळत मनात आलेल्या श्रद्धेला परिस्थितीने सदैव पुष्टी दिल्याने ह्या वृक्षाला धक्का लावण्याचे आता कोणाच्याही मनात येत नाही; उलट शेजाऱ्यांपैकी कोणी तसा प्रयत्न केल्यास तोही कडाडून हाणून पाडला जातो.

१९४८च्या अखेरीस वाड्यातील सर्व जुन्या पडक्या इमारतींची वासलात लावून, एक औरस चौरस खुले मैदान तयार झाले. मग तिथे पायाभरणी समारंभ करण्याची कल्पना डोकावू लागली. नाममात्र समारंभ करावयाचा, आणि पुढे दीर्घकाळ कामाला मात्र हात लागावयाचा नाही, ही कार्यपद्धती आम्ही कधीच स्वीकारलेली नाही. इमारतीसाठी काही निश्चित निधी जमा करून मगच हा समारंभ करावा, आणि इमारतकामाला तत्काळ धडाक्यात सुरुवात करावी, या दृष्टीने 'इमारतफंड' ह्या सदराखाली नोंदविता येतील अशा आमच्या हालचाली सुरू झाल्या.

दुसऱ्या जागतिक युद्धाचा काळ व त्यानंतरची गेली काही वर्षे म्हणजे सांगलीच्या बाजारपेठेचे सुवर्णयुग होते. सांगलीतील व्यापारीवर्ग आपल्या व्यवसायात अमाप पैसा मिळवून राहिलेला होता. व्यापारी मंडळी आपल्या उलाढालीत इतकी मग्न असत की, आम्ही दारी जाताच विचारले जाई, ''काय हो, फिरून आता काय काढले आहे?''

''काही नाही; इमारतीसाठी जागा संपादन झाली आहे, आता इमारतीसाठी निधी हवा आहे.''

लगेच मालक ओरडून दिवाणजीला सांगत, ''अरे, यांना एक पाचशे एक रुपये दे बरं!''

कोणी म्हणत, ''२५१ रु. आत्ता घेऊन जा; मग पुढे आणखी पाहू.''

अशा तऱ्हेने सांगलीच्या उदात्त धनिकांचे रान झोडपत आम्ही झपाट्याने पुढे जात होतो. मनात असा आनंदही वाटत होता की, नागरिकांचा असा विश्वास संपादन करण्याइतके आम्ही काही करू शकलो आहोत. सांगलीच्या गणपती मंदिरापासून दुतर्फा सुरुवात करून आम्ही वखारभाग ओलांडला, व पुढे तेल गिरणी भागात प्रवेश केला. एके दिवशी सकाळी गिरणी भागातील महावीर ऑईल मिलमध्ये आम्ही दाखल झालो.

सकाळी नऊचा सुमार असावा. गिरणीचे मालक श्री.गणपतराव आरवाडे मलमलीचे एक कुडते अंगात घालून व मांडी ठोकून, भल्या मोठ्या लाकडी पेटाऱ्यावर बसले होते. त्यांच्या राहत्या जागेचा व गिरणीच्या आवारातील एकूण देखावा निरीक्षण केल्यानंतर आमची अशी कल्पना झाली की, शे-दोनशे रुपयांच्या पलीकडे फारसे काही हाताला लागणार नाही. आम्हां तिघा -चौघांचा घोळका आत आलेला पाहताच मुद्रा आश्चर्यचकीत करीत गणपतराव म्हणाले, ''काय मंडळी, काय काढले आहे?'' त्यांचे धाकटे बंधू रामभाऊ आरवाडे हे लोकरीचा शानदार कोट व काळी टोपी घालून गडबडीने इकडे तिकडे वावरताना दिसत होते. आम्ही काहीतरी फंड मागण्यास आलेले असू, आणि हा नेहमीचाच प्रकार आहे, अशा भावनेने ते वावरत असल्याने आमच्या संभाषणात विशेष रस दाखविण्याची त्यांची तयारी दिसत नव्हती. बैठक जमविल्यावर काही काळाने गणपतरावांनी विचारले, ''शाळेला प्रतापसिंहांचे नाव आहे ना?''

''आमचा तसा विचार होता पण श्रीमंतांची ह्या गोष्टीस मान्यता नसल्याने आता तो विचार सोडून दिला आहे.''- आमचे उत्तर.

''शाळेच्या इमारतीस कोणाची तरी देणगी घेऊन तुम्ही शाळेला त्याचे नाव देणार होता असे कळले, त्याचे काय झाले?'' गणपतरावानी चौकशी केली.

''तो व्यवहार अजून जमला नाही. काही विशिष्ट परिस्थितीमुळे ही गोष्ट घडू शकली नाही.'' आम्ही खुलासा केला.

''मग दुसऱ्या कोणी अशी देणगी देऊ केल्यास शाळेला त्याचे नाव देण्याची संस्थेची तयारी आहे काय?'' गणपतराव सावधपणे म्हणाले.

''जरूर आहे!'' आम्ही उत्तरलो. ''तसा कोणी दाता भेटल्यास आम्ही आमच्या माध्यमिक शाळेला तसे नाव देऊ. आपल्या माहितीत तसा कोणी दाता असल्यास जरूर

सांगा.''

''तसे काही नाही. उगीच विचारणा केली. पण तुम्ही उद्या आलात तर मी चौकशी करून ठेवीन.'' गणपतरावानी गोष्ट सहजावारी घेतल्याचे दिसले.

अर्थात दुसऱ्या दिवशी सकाळीच येण्याचे मान्य करून आम्ही तेथून बाहेर पडलो. देणगी देण्याचे मनात नसल्यास ती लांबणीवर ढकलण्यासाठी अगर टाळाटाळ करण्यासाठी अशी काही उत्तरे आम्ही अनुभवली होती; पण हेलपाटे घालण्यास न कंटाळण्याची आमची रीत असल्याने, दुसऱ्या दिवशी सकाळी ठरल्या वेळी आम्ही गणपतरावांच्या तेल गिरणीत जाऊन दाखल झालो. आमची कोणाचीच अशी कल्पना नव्हती की, खुद्द गणपतराव आरवाडेच अशी एखादी मोठी देणगी देण्यास तयार असतील. कालच्याप्रमाणे आजही उभय बंधूंच्या पोशाखात काहीच फरक नव्हता. एकूण वातावरण तेच. फरक एवढाच होता की, काल गणपतराव बोलत होते, पण आज रामभाऊ बोलण्यात पुढाकार घेत होते.

''देणगी देणाऱ्या कोणाचेही नाव तुम्ही द्याल काय?'' रामभाऊ.

''होय'' आम्ही स्पष्ट केले.

''तो ब्राह्मणच असावा असा काही आग्रह नाही ना?'' रामभाऊचा प्रश्न अनपेक्षित होता.

आम्ही हसून म्हटले, ''आम्ही आमच्या शिक्षणकार्याला चालना देण्याबाबत आग्रही आहोत; त्या कामी जातिभेदाचा क्षुल्लक विचार आम्ही कधीच करीत नसतो.''

''मग दादांचे नाव तुम्ही द्याल?'' रामभाऊंनी असे विचारून आम्हास गोंधळात टाकले.

दादांचा अवतार पाहिल्यानंतर, देणगीबाबत ह्या मंडळींचा अंदाज तरी काय आहे याची कल्पनाच आम्हास येईना.

''इमारतीला एकूण खर्च काय येईल?'' रामभाऊनी चौकशी केली.

''जागेच्या किंमतीसह तळमजल्याला अंदाजे दोन लाख रुपये खर्च येईल.'' आम्ही सांगून टाकले.

''मागे तुम्ही वीस हजार रुपयांना मान्यता दिली होती ना?'' याना सगळे ठाऊक होते.

''दिली होती. पण तो व्यवहार आता अस्तित्वातच नाही.'' आमचा खुलासा.

''आम्ही पंचवीस हजार दिल्यास दादांचे नाव द्याल काय?'' रामभाऊंचा देकार आला.

''जरूर देऊ. पण आपल्या काही अटी-बिटी आहेत काय?'' आधीच्या अनुभवांतून आम्ही विचारले.

''दानधर्माला अटी कसल्या? नाव दिले म्हणजे त्यात सर्व काही पावले!'' ते म्हणाले.

व्यवहार चुटकीसरशी उलगडला. आम्ही गणपतराव आरवाडे यांचे नाव देण्यास तयार होऊ किंवा नाही याची शंका या मंडळींना का आली असावी तेच आम्हांस कळत नव्हते. आजीव सदस्यांमध्ये बा.गो.नाईक हेच काय ते मराठा, व आम्ही सर्व ब्राह्मण, ह्यामुळे आम्ही कदाचित संकुचित जातीयवादाच्या आहारी तर नाही ना अशी शंका त्यांच्या मनात असावी. प्रथमपासूनच राष्ट्रीय चळवळीशी संबंधित असल्याने तशा संकुचित जातीयवादाचा स्पर्श आमच्या मनास कधीच झालेला नाही. आमच्या दुय्यम शाळेचे -प्रताप स्कूलचे, प्रताप मॉडेल हायस्कूल झाले, आणि नंतर ह्या देणगीमुळे 'श्री.गणपतराव आरवाडे हायस्कूल' असे नाव झाले.

गणपतराव व रामभाऊ हे आरवाडे बंधूद्वय २५ हजाराचा निधी घेऊन संस्थेच्या साहाय्यास आल्यामुळे आम्हाला दुहेरी आनंद झाला. आमच्या महत्वाकांक्षा फलद्रूप होण्यास संधी मिळाली हा एक आनंद, तर दुसरा आनंद म्हणजे आम्ही एवढ्या मोठ्या देणगीचा रास्त विनियोग करण्याइतपत समर्थ आहोत, असा धनिक वर्गात विश्वास निर्माण झाला आहे हा होय.

●●●

## भूमीपूजन व पायाभरणी

गांधी हत्येनंतर सांगलीला झालेल्या जखमा क्रमश: नष्ट होत गेल्या. संस्थानांचे विलीनीकरण झाल्यानंतर काही काल कारभाराबाबत आलेले अस्थैर्यही क्रमश: कमी होत जाऊन घडी बसत चालली. सांगलीचे एव्हाना दक्षिण सातारा जिल्ह्यात रूपांतर झाले व जिल्हाधिकारी म्हणून पां.ज.चिन्मुलगुंद आय.सी.एस. यांची नियुक्ती झाली.

१९४९च्या मार्च महिन्याअखेरीस, तत्कालीन भारत सरकारच्या मंत्रीमंडळातील वीज व खाणमंत्री न.वि.उर्फ काकासाहेब गाडगीळ यांना संस्थेच्या इमारतीच्या पायाभरणी कार्यक्रमासाठी पाचारण करण्यात आले. काकासाहेबांनीही आमच्या आमंत्रणाचा अगत्यपूर्वक स्वीकार केला.

कऱ्हाडे वाड्यातील सर्व अडगळ नाहीशी करून तेथे आता एक सपाट मैदान तयार झाले होते. त्या मैदानावर सुशोभित शामियाना उभा करण्यात आला. संस्थेचे शिक्षक, विद्यार्थी व अन्य कर्मचारी यांनी रात्रंदिवस राबून पायाभरणी कार्यक्रमाची जुळणी केली होती. कार्यक्रमाच्या दिवशी सकाळी गणपतीच्या मूर्तीची यथासांग स्थापना करण्यात आली. संस्थेचे प्रथमाध्यक्ष ना.प.थत्ते व सौ.मालतीबाई थत्ते यांच्या शुभ हस्ते श्रीगणपती पूजन पार पडल्यानंतर काकासाहेबांच्या हस्ते कोनशिला बसविण्याचा विधी झाला. कोणाला स्वप्नातही वाटले नसेल की, कऱ्हाडे वाड्याच्या ह्या परिसरामध्ये असा उदात्त व भव्य समारंभ कधी काळी घडून येईल! मानवी जीवनात चढउतार दृष्टोत्पत्तीस येतात. वास्तूच्या बाबतही असे काही घडत असावे! एके काळी भकास, उदास असलेला कऱ्हाडे वाडा भुईसपाट होऊन जातो काय, आणि त्या ठिकाणी एका नव्या वास्तूचा संकल्प एका केंद्रीय मंत्र्याच्या हातून घडतो काय! हे दृष्य पाहिल्यानंतर एके काळच्या कऱ्हाडे वाड्याची अवकळा संपून त्याला ऊर्जितावस्था येऊ लागली आहे, याची मनोमनी खात्री पटली. असे वाटू लागले की, मानवी जीवनाप्रमाणेच वास्तूलासुद्धा अधोगती वा प्रगतीचे चक्र यथाक्रम स्पर्श करून जात असले पाहिजे.

या प्रसंगी केलेल्या आपल्या भाषणात कै.काकासाहेब गाडगीळ म्हणाले, ''वस्तुत: एखाद्या शिक्षणसंस्थेच्या इमारतीचा पाया घालण्यासाठी माझ्यासारखा वीजखाण मंत्री आणण्यापेक्षा संस्थेने एखाद्या शिक्षणतज्ज्ञास पाचारण केले असते तर अधिक बरे झाले असते. संस्थेने मला का बोलावले हे कळत नाही.'' काकासाहेबांच्या ह्या शंकेने निरसन आभार प्रदर्शनावेळी करण्यात आले. मी म्हणालो, ''माननीय काकासाहेबांनी जी शंका प्रदर्शित केली, तिला उत्तर म्हणून एवढेच सांगता येईल की, या शिक्षणसंस्थेच्या इमारतीसाठी लागणारी हरेक बाब आज सरकारी नियंत्रणाखाली आहे आणि ती संपादन करण्यासाठी काकासाहेबांच्या वरदहस्ताची संस्थेला गरज आहे. शिक्षणतज्ज्ञ बोलून जातील पण काम होणार नाही. काकासाहेबांनी कोनशिला बसविली असल्याने शिक्षणकार्याला आवश्यक अशी वास्तू निर्माण करण्यासाठी संस्था आता काकासाहेबांच्या दारातच उभी राहणार आहे.''

-आणि यानंतर इमारत कामासाठी अत्यावश्यक असणाऱ्या सिमेंट, लोखंड इ. वस्तूंचे परवाने इतक्या मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले की, आमच्या ह्या शिक्षणसंस्थेची किमया लोकांच्या कौतुकाचा विषय झाली.

माध्यमिक शाळेला आवश्यक अशी भव्य इमारत उभी करण्यासाठी आमचा सारखा आटापिटा चालू होता. दैनंदिन शालेय शिक्षणाचे काम सांभाळून, त्याशिवाय या कामासाठी आमचे अनेक तास दिवसाकाठी खर्ची पडत होते. निधी गोळा करणे, इमारतीसाठी आवश्यक अशा दुरापास्त वस्तूंचा पुरवठा करून घेणे, चाललेल्या कामात कोठे दोष राहू नये म्हणून डोळ्यात तेल घालून पाहणी करणे, अशी अनेक कामे आम्हांस वेळीअवेळी करावी लागत असत. आणि म्हणूनच सध्याच्या दुय्यम शिक्षणातील एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख या ठिकाणी ओझरता करणे भाग पडत आहे.

शिक्षण विषयक संघटना निर्माण करत असताना आज हे गृहीत मानले जात आहे की, 'शिक्षक ह्या नात्याने

वावरणारी सारीच माणसे समान भूमिकेवर व समान अधिकारास पात्र असतात; शिक्षणसंस्था अकारण काहीतरी भेदाभेद करीत असतात; शिक्षकांच्या हितसंबंधांना व हक्कांना अकारण बाध आणीत असतात; विशेषत: शिक्षणसंस्था चालविणारी मंडळी केवळ धंदेवाईक पद्धतीने शिक्षणसंस्था चालवून शिक्षक मंडळींची अकारण कुचंबणा करीत असतात..., इत्यादी.

-आमच्या शिक्षणसंस्थेचा अनुभव ह्याहून सर्वस्वी भिन्न आहे. आम्ही काही शिक्षक मंडळींनी विशेष ध्येयवाद उराशी बाळगून शिक्षणकार्याला हात घातला. दीर्घकाळ अनेकविध कार्यात धडपडी केल्या, तिचा परिणाम म्हणून संस्थेने काही प्रतिष्ठा संपादन केली, आणि मग जनता आमच्याकडे अपेक्षेने पाहू लागली. परिणामी दुर्भिक्ष्य कालातील संस्थेच्या अडचणी निवारण करण्यासाठी समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींची व सामाजिक संस्थांची मदत मिळणे सहज सुलभ झाले. सांगलीत येणाऱ्या प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या सहकार्याची हकिगत वेळोवेळी सांगितली जाईल. पण हे सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या मंडळींनी सामाजिक जीवनातील विविध समस्या सोडविण्यासाठी हालचाली करूच नयेत असा जो आकुंचित समज आहे तो दूर व्हावा. या संस्थेने या शहरात याबाबत केलेला कार्यभाग बहुमोल आहे, आणि त्यामुळेच संस्थेला सरकार दरबारी प्रतिष्ठा मिळालेली आहे. या गोष्टी हाताळताना कित्येक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनाही आम्ही सहभागी केलेले आहे. शिक्षक हे केवळ चार भिंतीतच बंदिस्त असत नाहीत. नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाची जडणघडण करण्याच्या कामात विद्यार्थी व शिक्षकांना सहभागी करणे हेसुद्धा एक अत्यावश्यक शिक्षणच आहे. पुस्तकी ज्ञान देण्यापलीकडे विधायक कार्य करण्यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्या नागरिकाचा पिंड घडविणे हेसुद्धा शिक्षणच आहे.

या साऱ्या कार्यात आमच्या दिवसाचा जास्तीत जास्त भाग खर्ची पडत असे. पण या बाबतीत आम्हाला कधीच असे वाटले नाही की, आपली ही राबणूक व्यक्तिगत अर्थलाभाच्या दृष्टीने निरर्थक आहे. कार्य उभे करण्याचा संकल्प होता. जीवनावश्यक अर्थलाभाची अपेक्षा होती; पण तो एकमात्र सर्वस्वी जीवनहेतू मात्र खचितच नव्हता.

आजच्या जमान्यात या परिश्रमांची अपेक्षा फलद्रूप होणे बहुतांशी कठीण आहे. कदाचित काहींना ही आत्मप्रौढी वाटेल. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांवर ही अकारण टीका आहे असेही काहींना वाटेल; पण गेल्या ३५ वर्षांत जे वातावरण प्रत्यक्ष अनुभवले, व जे सभोवार पाहिले त्यावरून असा एक कयास येऊ लागला आहे की, शिक्षकी पेशाची कक्षा आता शालेय भिंतीपुरती मर्यादित झाली असून तिची कार्यमर्यादा दिवसाकाठी ठराविक पाच तासापलीकडे पोचलेली नाही. क्षेत्र व मर्यादा कदाचित वाढली गेली असल्यास ती तर घराच्या मर्यादेत गेली आहे एवढेच! ज्ञानदान आणि पैसा या गोष्टी एकत्र करण्याचा अनधिकृत प्रयत्न याच्या बुडाशी असेल; आणि त्याला खतपाणी घालण्याचे काम -अप्रत्यक्षपणे -लोकप्रियतेच्या आहारी गेलेल्या सरकारकडे आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती नाही.

भूमीपूजनाच्या समारंभानंतर इमारतीच्या बांधकामाचे काम तातडीने हाती घेण्यात आले. संभाव्य इमारत प्रामुख्याने दुय्यम शाळेकरिता असल्याने स्वाभाविकपणे तिच्यावर गणपतरावजी आरवाडे यांच्या नावाचा फलक लागणार होता व यासाठी त्यांच्या पंचवीस हजारांचा निधी हाती आलेलाच होता.

कऱ्हाडे वाड्याची जागा कृष्णा नदीच्या नजिकच असल्याने पाया बराच खोल काढला जाण्याची शक्यता होती. चाचणी घेण्यासाठी काढलेला खड्डा १२ फूट खाली गेला तरी खडक लागण्याचे चिन्ह दिसेना. आणखी दहा फूट खाली गेल्यानंतर मात्र 'माण' या नावाने ओळखली जाणारी तांबूस चिकणमाती दिसू लागली. ही माती लागल्यानंतर 'मुरूम लागेपर्यंत पाया खाली नेण्याची गरज नाही' असा तज्ज्ञ मंडळींचा अभिप्राय पडल्याने प्रत्यक्ष इमारत बांधकामास आरंभ करण्याचा निर्णय घेण्यात आला. इमारत बांधण्याच्या कामी आम्ही विशेष भाग्यवान ठरलो. याच संधिकालात बांधल्या गेलेल्या इमारती व आमची इमारत, यांची तुलना करता असे दिसून येईल की, सौंदर्य, मजबुती आणि खर्च या सर्वच दृष्टींनी आमची

इमारत खूप पुढच्या पायरीवर आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे, ह्या संस्थेच्या नियामक व आजीव सदस्य मंडळांतील सर्व माणसे ठाम, अनुभवी व कृतिशील होती. इमारत सामान खरेदी करणे, सिमेंट, लोखंड वगैरे दुर्मीळ वस्तूंचे परवाने संपादन करणे, मक्तेदाराशी घासाघीस करून दरदाम ठरविणे या सर्वच बाबतीत आमचा संच कोणासच हार जाणारा नव्हता. राजकीय उलाढालीतील सर्व तपश्चर्या त्या कामी आमच्या उपयोगी पडत होती आणि त्यामुळे कामाचा उरक झपाट्याने होत होता.

आमचे पहिले मक्तेदार होते बाबूशेटी वडर. आजच्या समाजात असा माणूस हुडकून मिळणार नाही. काळ्या कभिन्न देहावर पांढरेशुभ्र कपडे घालून, धार्मिक वृत्तीचा हा ८० वर्षाचा तगडा माणूस पायाखुदाईपासून तो इमारत पूर्ण होईपर्यंत कामावर सदैव खडा असे. शिक्षण अजिबात नाही पण, नकाशा पाहून त्याबरहुकूम काम वठविण्याचे त्याचे कसब तज्ज्ञ पदवीधर इंजिनिअरलाही मागे सारणारे होते. बाबूशेटी नाईकांकडे काम सोपविले म्हणजे मग पाहायलाच नको अशी सांगलीकरांची धारणा! नाईकांनी पाया अकरा फुटांपर्यंत खोल नेला. त्याचा फायदा घेऊन पुढील भागात तळघर काढण्याची कल्पना वि.ना.आपटे यांनी काढली. मजबुतीसाठी मोठ्या प्रमाणात सिमेंट व सळी वापरून इमारतीच्या सभोवार एक काँक्रीटचा कृत्रिम खडकच निर्माण करण्यात आला.

हां हां म्हणता पाया भरून काम जोत्यापर्यंत आले; आणि अनपेक्षित संकट पुढे आले!

●●●

## थोडा इतिहास

कऱ्हाडेवाडा सरकारमार्फत संपादनासाठी लागणारी आवश्यक ती सोळा हजारांची रक्कम आमच्याकडून सरकार दरबारी भरली गेली होती. वाड्याशी संबंधितांनी त्या रकमेची उचल सरकारमधून आपापल्या हिश्श्यांप्रमाणे करावयाची होती; सरकारमार्फत तसे जाहीर करण्यात आले होते. कऱ्हाडे वाड्याच्या अनेक मालकांपैकी एक तात्यासाहेब पटवर्धन म्हणून कोणी सेवानिवृत्त इंजिनियर होते. सदर पटवर्धन यांनी, 'भूमीसंपादन कायदेशीर व न्याय्य न झाल्याने ते रद्दबादल करावे' असा दावा सांगली न्यायालयात दाखल केला. संस्थान आता विलीन झाल्याने हा दावा त्यावेळच्या मुंबई सरकारविरुद्ध त्यांनी केला होता; व संस्थेलाही प्रतिवादी केले होते.

हा दावा दाखल केल्यानंतर त्यांनी न्यायालयात विनंती अर्ज करून, संस्थेचे चालू बांधकाम बंद ठेवावे अशा हुकुमाची मागणी केली. न्यायालयाने तसा मनाई हुकूम दिला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश कोंडो गोडबोले हे असल्याने, व तेच संस्थेचे वकीलही असल्याने आम्ही सर्वजण ह्या प्रकरणी थोडेफार गाफीलच होतो. कसेही झाले तरी शाळेचे जोत्यापर्यंत आलेले बांधकाम तर बंद पडले.

भूमी संपादनाचे काम संस्थान काळात झाले; पण मध्यंतरी झालेल्या विलीनीकरणामुळे कागदपत्रांच्या अनेकदा उलथापालथी झालेल्या होत्या. संस्थान काळात भूमीसंपादनाच्या झालेल्या सर्व कारवायांचे कागदपत्र नवीन जिल्हाधिकारी यांना उपलब्ध होईनात. त्यामुळे न्यायालयीन कामकाज दिरंगाईवर पडू लागले. कधी सरकार मुदत मागणार तर कधी पटवर्धन! त्यामुळे महिनान् महिना इमारतकाम बंद पडून राहिले. त्या काळात सिमेंट ही अतिशय दुर्मीळ वस्तू होती. आम्ही तर सिमेंटची शेकडो पोती कामावर आणून ठेवली होती. पावसाळा तोंडावर आल्याने या सिमेंटचे मातेरे होण्याची शक्यता होती. आमच्या विश्वात सर्वत्र एकच निराशा पसरली. गणपतराव आरवाडे तर हताशपणे बोलून गेले, ''पहा बुवा, मी तर पैसे देऊन चुकलो आहे, आता जर इमारत झाली नाही तर संस्थेचे नुकसान आहेच, पण माझे श्रेयही नाहीसे होणार!''

मी त्यांना ठामपणे असे आश्वासन दिले की, ''आमची मनगटे पोलादाची आहेत. तुम्ही दिलेले साहाय्य आम्ही फुकट जाऊ देणार नाही.''

हा पेच सोडविण्यासाठी काय करावे याबाबत मग चर्चा सुरू झाली. आमची कुचंबणा व होणारी अडवणूक पाहून न्यायालयालाही कीव आली. 'काहीतरी तडजोड करून पहा' असा न्यायमूर्तींनी सल्ला दिला. मग तडजोडीसाठी पटवर्धन यांच्या मनधरण्या चालू झाल्या. आम्ही अडचणीत आलो आहोत असे पाहून, ते तडजोडीसाठी वीस हजारांची अवास्तव मागणी करू लागले. सर्व वाड्याला दिलेल्या किंमतीपेक्षाही त्यांच्या हिश्शाची ही मागणी जास्त होती! तडजोड न केल्यास, किंमत कमी झाली म्हणून याशिवाय निराळा दिवाणी दावा दाखल करण्याचीही त्यांनी तयारी केली होती. एवढी मोठी रक्कम आमच्या हातची गेल्यानंतर इमारत-काम सुरू करण्यातही काही स्वारस्य नाही, अशी अवस्था येणार होती. बऱ्याच मंडळींनी, 'काही सोसून संपविता आले तर हे संपवावे' अशा सदीच्छेने आठ हजार रुपयांपर्यंत देण्याची तयारी केली. पण तेवढ्यावर हा व्यवहार पटत नाही असे दिसल्यानंतर मात्र, या प्रकरणाची कड लावण्याचा आणखी काही मार्ग उपलब्ध होतो का हे पाहाण्याचे ठरले. या सर्व कामाला एकसूत्रीपणा आणण्यासाठी व आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी, एकमताने ठराव करून त्यासंबंधी सर्व अधिकार माझ्याकडे देण्यात आले.

प्रथमत: सरकारी वकील दादासाहेब खाडिलकर यांना भेटून असे ठरविण्यात आले की, आमची संस्था व सरकार हे उभयता प्रतिवादी असल्याने संस्थेचे वकीलपत्रही त्यांनीच घ्यावे. गोडबोले व खाडिलकर या उभयतांचे पक्षीय पातळीवर हाडवैरच होते; तेव्हा संस्थेचे सर्व कागदपत्र खाडिलकरांच्या हवाली करणे व त्यांनी वकीलपत्र देणे हे गोडबोल्यांना मान्य होते की नाही अशी शंका होती. पण गोडबोले हे आपल्या जीवनात नेहमीच खिलाडू वृत्तीने वागत आले होते. त्यांनी तत्काळ सांगितले, ''सर्व अधिकार तुमच्याकडे असल्याने, तुम्ही लागेल ती योजना जरूर पार पाडा. आवश्यक वाटल्यास खाडिलकरांना योग्य ती मदत मी देईनच.'' -कार्यवाहीला वेळ तर चांगली लागली.

मग मी मुंबई राज्याच्या महसूलमंत्र्यांना -नामदार मोरारजीभाई देसाई यांना -भेटलो व अडचण सांगितली. सरकारकडून मुदत मागणीसाठी अर्ज जाऊ नये यासाठी, आवश्यक त्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचे त्यांनी मान्य केले. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची बाब त्यांनी सांगितली. ते म्हणाले, ''तडजोड करण्यासाठी एवढी मोठी रक्कम देण्याचे मुळीच कारण नाही. जास्तीत जास्त काय होईल? न्यायालयाने भूमीसंपादनाचा निर्णय जर दोषस्थळ राहिल्यामुळे अवैध ठरविला तर, मालकी मूळ मालकाकडे जाईल. पण यामुळे सरकारचा फिरून भूमीसंपादन करण्याचा अधिकार काही काढून घेतला जात नाही. तेव्हा न्यायालयाचा निर्णय शक्यतो त्वरित लावून घेण्याचा प्रयत्न करा. निर्णय तुमच्या विरुद्ध गेल्यास आवश्यक त्या दुरुस्त्या करून भूमिसंपादनाची कारवाई सरकार फिरून करू शकेल. निर्णय अनुकूल लागला तर प्रश्नच उद्‌भवत नाही.''

मोरारजीभाईंचा हा बहुमोल सल्ला त्या अडचणीच्या काळात संस्थेवर एक अनुग्रहच ठरला. सांगलीत परत येताच असे आढळून आले की, सरकारी वकील दादासाहेब खाडिलकर आवश्यक त्या सर्व कागदपत्रांनिशी सज्ज होऊन बसले होते. पहिल्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांचा सरकारी यंत्रणेवर केवढा वचक होता याचे प्रत्यंतर त्या घटनेने आले. आता सरकारकडून मुदत मागणीचा अर्ज येण्याची तर शक्यताच नव्हती; पण पटवर्धनांचा अर्ज येणार हे ठरल्याप्रमाणेच होते. त्यांनी पुण्यात आजारी असल्याचा बहाणा करून मुदतीसाठी अर्ज दिला. पण त्यांचे सांगलीतले अस्तित्व आमच्या तीक्ष्ण नजरेतून सुटले नव्हते. संस्थेची अपरंपार नुकसानी होत आहे म्हणून सदर कज्जाचा निकाल त्वरित लागावा अशी विनंती संस्थेने न्यायालयाला केली. त्यामुळे त्यांच्या मुदतमागणीच्या अर्जाला न्यायमूर्तींनी विशेष महत्त्व न देता मूळ दाव्याचे काम चालू केले. झालेले भूमीसंपादन रास्त व न्याय्य आहे असाच निकाल सुदैवाने दिला गेल्याने पुढील सर्वच यातायात वाचली. कामात आलेला व्यत्यय दूर होऊन फिरून झपाट्याने बांधकाम चालू झाले.

आजवर पांजरपोळच्या इमारतीत वावरणारे शिक्षक व विद्यार्थी आता नव्या इमारतीत येण्यास आसुसले असल्याने

बांधकामाच्या पूर्ततेसाठी त्यांनी शारीरिक श्रम करण्यासही कमी केले नाही. बा.गो.नाईक व मी स्वत:, निधी व बांधकाम सामानाची जुळणी यांचा मक्ता घेतल्याप्रमाणे होते. का.द.साने सूक्ष्म दृष्टीने हिशेबी कामे पाहात होते. वि.ना.आपटे सातत्याने इमारतीच्या बांधकामावर देखरेख करीत असत. सर्व व्यवहार अत्यंत काटकसरीने व दक्षतेने पार पाडले जात होते.

श्रमदानाची कसोशी सातत्याने चालू होती, आणि त्यामुळे अल्लाउद्दीनच्या राक्षसाने एका रात्रीत प्रासाद उभा करावा त्याप्रमाणे झपाट्यात संस्थेची इमारत वाढत होती. सांगलीचे नागरिक येता जाता मोठ्या कौतुकाने पाहणी करीत होते. हात पसरण्याचा अवकाश जो तो आपल्या कुवतीप्रमाणे देणग्यांचा वर्षाव करीत होता. दुर्मीळ वस्तूंच्या व साहित्याच्या पुरवठ्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीत गेल्यास निमिषार्धातच परवाना पत्रे मिळत होती. जिल्हाधिकारी पां.ज.चिन्मुलगुंद संस्थेचे साहाय्यक सचिवच बनून राहिले होते. त्यांच्या पत्नी खास करड्या आंग्ल विदुषी होत्या, यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या त्या विशेष चाहत्या होत्या. त्यानंतरच्या काळात शैलेंद्र एकनाथ सुखथनकर हे जिल्हाधिकारी म्हणून आले.

कामाचा उरक झपाट्याने होऊ लागल्याने दर आठवड्यास कंत्राटदार बाबूशेटी नाईक यांना हजारो रुपये देणे भाग पडू लागले. बाबूशेटी तसे पैशाने घनगंभीर होते. ह्या संस्थेचा पैसा अडणार नाही अशी त्यांची खात्री होती, कारण संस्थेचे आश्रयदातेही काही सामान्य असामी नव्हते. तरीही आश्रयदात्यांना वारंवार तसदी देणे सोयीचे नसल्याने, सांगली बँकेकडून चाळीस हजार रुपयांची रक्कम कर्जाऊ घेण्याचा आम्ही निर्णय घेतला.

शिक्षणसंस्थेला एवढी मोठी रक्कम कर्ज म्हणून दिली गेल्यास या रकमेची काटेकोर वसूली करणे अवघड जाईल, म्हणून बँक कर्ज देण्यास थोडीशी नाखूश होती. याच सांगली बँकेत सांगली संस्थानचे निम्मे भाग भांडवल होते. सांगलीच्या राजेसाहेबांकडून नियुक्त केली जाणारी व्यक्ती बँकेची चेअरमन म्हणून राहात असे. संस्थान विलीन झाल्यानंतर हे भाग भांडवल मुंबई सरकारकडे गेले; आणि मुंबई सरकारचे प्रतिनिधी म्हणून आता बँकेच्या चेअरमनचे पद जिल्हाधिकारी यांच्याकडे आले. आम्ही कर्जमागणी केली त्यावेळी सांगली बँकेचे चेअरमन -जिल्हाधिकारी - शैलेंद्र सुखथनकर होते.

सुखथनकर हे लष्करी अधिकारी असल्याने, कायदेशीर बारकाव्यांवर भर देऊन विधायक कार्याचा खोळंबा करणे, हे त्यांना मुळीच मान्य नव्हते. संस्थेने मांडलेला व्याप, संस्थेतील व्यक्तींनी विविध क्षेत्रांत केलेली कामगिरी, ह्यांचा विचार करून सुखथनकर यांनी कर्जास मंजुरी दिली. संस्थेची संभाव्य इमारत व आजीव सदस्यांची वैयक्तिक जामीनदारी या तारणावर आठ वर्षांच्या मुदतीचे चाळीस हजार रुपयांचे कर्ज संस्थेला मंजूर झाले. ह्याशिवाय सागवानी लाकूड खरेदीसाठी प्रत्यक्ष दांडेलीच्या जंगलभागापर्यंत जाण्यास संस्थेला सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य त्यांनी उपलब्ध करून दिले.

सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा सहकार्यामुळे इमारतीचा संपूर्ण तळमजला व पुढच्या भागातील तळघर असे बांधकाम १९५१च्या अखेरीस पूर्ण झाले. किरकोळ खर्चासाठी आता जादा दोन तीन हजार रुपयांची गरज होती. ती दूर करण्यासाठी अचानक साहाय्य झाले; ते नृत्यतारका श्रीमती रोहिणी भाटे यांचे! अगदी अचानक व सहजपणे त्यांची गाठ पडली. 'संस्थेच्या मदतीसाठी म्हणून त्यांनी सांगलीत आपल्या नृत्यसंघाचे दोन कार्यक्रम करावेत' अशी विनंती केली गेली. त्यांनी ती मान्य तर केलीच, पण शाळेच्या मदतीसाठी होणाऱ्या प्रयोगांपूर्वी सांगलीच्या परिसरात अन्यत्र कोठेही त्यांचे नृत्यप्रयोग न करण्याचे आश्वासन दिले. यात उद्देश एवढाच होता की, संस्थेच्या प्रयोगांना जास्तीत जास्त उत्पन्न व्हावे! याबाबतीत अज्ञात 'हितचिंतकांनी(?)' केलेली विलक्षण कारवाई -कार्यक्रम पार पडल्यानंतर -त्यांनी मुद्दाम आमच्या निदर्शनास आणली!

ते एका प्राध्यापकाचे पत्र होते. सांगलीत आमचा कार्यक्रम होण्यापूर्वी सांगली सभोवारच्या वीस मैलांच्या परिसरात आपला नृत्यप्रयोग न करण्याचे अभिवचन नृत्यांगनेकडून दिले गेले असल्याने, त्यांनी प्राध्यापकांना कार्यक्रमाबाबत स्वाभाविक नकार दिला होता. सदर

गोष्टीची खंत वाटून त्या प्राध्यापक महोदयांनी श्रीमती भाटे यांच्या पालकत्वाचा आव आणून त्याना लिहिले होते, ''ज्या लोकांचा कार्यक्रम आपण स्वीकारला आहे ते लोक तसे भयंकर आहेत. सांगलीच्या जाळपोळीतही त्यांचा हात असावा असे मानले जाते. आपली बिदागी अगर प्रवासखर्च ही माणसे देतील असा भरवसा नाही. तेव्हा आपण ह्या गोष्टींचा विचार करा. आपली फसवणूक होण्याचा धोका आहे.''

सांगलीत त्यांचे दोन भरघोस कार्यक्रम झाले. सांगलीच्या जनतेला केवळ नृत्याचा कार्यक्रम तसा अपरिचित होता. पण संस्थेच्या आर्थिक साहाय्यासाठी कार्यक्रम असल्याने जनतेने भरपूर सहकार्य दिले. श्रीमती भाटे यांची यथायोग्य संभावना करूनही या प्रयोगातून संस्थेला दोन हजार रुपये शिल्लक मिळाले.

दरसाल त्या आपल्या नृत्यवर्गाचा वर्धापनदिन पुणे मुक्कामी साजरा करीत असतात. त्यांच्या एका वर्धापनदिनाच्या कार्यक्रमास मी उपस्थित असताना त्यांनी सुहास्य मुद्रेने माझे स्वागत केले, व आपणास सल्ला मसलत देणाऱ्या त्या 'हितचिंतकाची' सुरस कथा माझ्या निदर्शनास आणली. अर्थात सांगलीस परत आल्यानंतर मी व बी.जी.नाईक या उभयतांनी -आमच्या देहस्वभावाप्रमाणे -त्यांना छेडल्याशिवाय सोडले नाही.

या घटनेचा उल्लेख एवढ्याचसाठी केला की, आमच्या संस्थेबाबत अकारण झुरणाऱ्या व्यक्तींचा कुत्सित भाव वेळोवेळी कसा प्रकट होत होता, याचे दर्शन व्हावे.

●●●

## उद्घाटन व शैक्षणिक धोरणे

मार्च १९५२ च्या सुमारास तळमजल्याचे काम पूर्ण झाले, आणि गणपतराव आरवाडे यांच्या ऋणातून मुक्त झाल्याचा आनंद आम्हांस मिळाला. त्यावेळच्या ११वी च्या विद्यार्थ्यांनी, 'थोडे दिवस तरी नव्या वास्तूत आपले शिक्षणकार्य व्हावे' असा आग्रह धरला. किर्लोस्कर मासिकाचे यशस्वी संपादक शं.वा.किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली त्या सालचे स्नेहसंमेलन नव्या जागेत साजरे करण्यात आले. शं.वा.किर्लोस्करांनी आमची ही नवी इमारत, काम सुरू झाल्यापासून अवघ्या दीड वर्षात पुरी झाल्याचे ऐकून सानंद कौतुक प्रदर्शित केले. अकरावीच्या विद्यार्थ्यांची पूर्वपरीक्षा आवर्जून याच इमारतीत घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या अमर्याद उत्साहामुळे १९५२च्या जूनपासून माध्यमिक शाळेचे सर्वच वर्ग ह्या नव्या इमारतीत भरविण्याचे मुक्रर झाले. मुख्य रस्त्याला लागून असलेली इमारतीच्या उत्तर भागातील एक मोठी खोली, गणपतराव आरवाडे हायस्कूलचे ऑफीस म्हणून सजविण्यात आली. बा.गो.नाईक यांनी सांगलीचे नगराध्यक्षपद भूषविले असल्याने, त्यांच्या कार्यपद्धतीला व नीटनेटकेपणाला एक आगळीच झलक होती. स्वाभाविकपणे मुख्याध्यापक या नात्याने आपल्या ऑफीसची जागा ठाकठीक व रेखीव करण्याची त्यांनी कसोशी केली होती, पण त्यांचे दुर्दैव असे की त्यांना या योजनेचा लाभ घेताच आला नाही. संस्थेच्या इतिहासात त्या प्रकरणाचे बारकावे देण्याचे वस्तुत: कारण नाही. पण नाईक हे एक कर्तबगार आजीव सदस्य असल्याने, व त्यांच्यावर आलेली आपत्ती नैसर्गिक नसल्याने, या घटनेचा उल्लेख करणे वावगे ठरणार नाही.

बा.गो.नाईक हे त्या साली इयत्ता ११वी ला म्हणजे शालांत परीक्षेस एस.एस.सी.बोर्डाने नियुक्त केलेले परीक्षक होते. सामाजिक जीवनातील काही मतभेदांमुळे, त्यांच्या व्यक्तिगत दोषांवर बोट ठेवण्यास टपलेल्या काही मंडळींनी, ते ज्या घरी पेपर तपासण्याचे काम करीत त्या ठिकाणी दारूबंदीच्या नावाखाली छापा घातला. तेथील कपाटात असलेल्या बोर्डाच्या पेपरांचा (उत्तरपत्रिकांचा) गठ्ठा जप्त

केला. नगरपालिकेच्या एका लेखनिकाच्या घरी दारूसाठी छापा पडण्यास कोणतीही नैसर्गिक पार्श्वभूमी नव्हती; पण त्या निमित्ताने उत्तरपत्रिका जप्त करणे हाच महत्त्वाचा भाग होता. त्यासाठी अशी घटना योजून घडविण्यात आली होती. अर्थात एस.एस.सी.बोर्डाने ह्या प्रकरणी चौकशी करून, 'पेपर तपासणीबाबत कोणताही गैरप्रकार झालेला नाही' असा अभिप्राय नमूद केला. ह्या प्रकरणी पुढे ज्या काही घटना घडल्या त्या सर्व मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्यापुढे संस्थेने मांडल्या. सरकारच्या शिक्षणखात्याने व पोलिसानी ह्या प्रकरणी कसा दूषित दृष्टिकोण स्वीकारला आहे, याची कल्पना आणून दिली. ह्या प्रकरणी नाईक ह्यांना निवृत्त होण्याची इच्छा असल्याने शेवटी तडजोड होऊन संस्थेने त्यांना नुकसान भरपाई देऊन निवृत्त केल्याचे जाहीर केले. ह्या नुकसान भरपाईचा निम्मा भाग सरकारनेही उचलला.

सामाजिक वा राजकीय जीवनात आपणास डोईजड ठरतील, अशांना नामोहरम करण्यासाठी सांगलीतील काही धंदेवाईक पुढारी नेहमीच सज्ज असतात. मी साम्यवादी असल्याच्या अशाच तक्रारी रिकामटेकड्या पुढाऱ्यांनी अनेक वेळा केल्या आहेत. पण सावध झालेल्या सरकारी यंत्रणेने त्यांची दखल घेतली नाही, उलट त्या माझ्या नजरेस मात्र आणल्या! विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ज्यांना वैयक्तिक चारित्र्य नाही अशीच माणसे हे क्षुद्र धंदे करण्यात गढलेली असतात. बऱ्याच वेळी त्यांच्या ह्या निर्लज्ज हालचालींना भिऊन, विधायक कार्य करणारी माणसे निवृत्त तरी होतात अगर नाइलाजाने त्यांच्याच कच्छपी लागतात. तसल्या उचापतींना आळा घालणे म्हणजे झगडा देणे, असा प्रकार असल्याने विधायक कार्यातील माणसे कंटाळतात. समाजकंटकांना तेवढा एकच उद्योग असल्याकारणाने ते मात्र कंटाळत नाहीत! शेक्सपियरच्या नाटकातील ज्यूलीयस सीझरची पत्नी संशयातीत असावी हे जरी सत्य असले तरी, संशयातीत नसलेल्या सीझरच्या पत्नीला नोकरशाहीत अवास्तव महत्त्व मिळते. संस्कृत साहित्यिक भर्तृहरीला नृपांगणात खल शिरल्याचे जे शल्य वाटते, त्याची जाणीव अशा वेळी झाल्याशिवाय राहात नाही. ह्या घटनेमुळे संस्थेला बा.गो.नाईकांसारख्या एका कर्तबगार शिक्षकाला मुकावे लागले. नाईकांच्या चारित्र्याचा पंचनामा करणाऱ्यांचीही चरित्रे पोलीसखात्यात नोंद असण्याची शक्यता आहे. कोणी सांगावे? एक काळ असा येईल की, त्यांनाही जनतेपुढे त्यांच्या चारित्र्याचा जाब द्यावा लागेल.

संस्थेच्या इतिहासामध्ये ह्या प्रकरणाचा उल्लेख ओझरता करून वस्तुत: भागले असते. ही संस्था उभी करण्यासाठी आम्ही ज्यावेळी एकत्रित आलो, त्यावेळी विशिष्ट ध्येयधोरण डोळ्यापुढे ठेवून एकत्र आलो होतो. ब्रिटिश अमदानीतील शिक्षण सरकारी हुकुमाची बटीक म्हणून राबत होते. लोकशाही भारतात शिक्षण हे स्वयंपूर्ण, स्वतंत्र राष्ट्रीय गरजांच्या अनुरोधाने वाटचाल करणारे, भावी लोकशाही नागरिकांचा पिंड घडविणारे, त्यांना स्वयंपूर्ण बनविणारे... असे काही भव्य दिव्य असावे; अशा आशा आकांक्षा उराशी बाळगून ही शिक्षणसंघटना आम्ही निर्माण केली. अवास्तव, अतिरेकी व दुष्ट बुद्धीने करण्यात आलेली आक्रमणे ही वैयक्तिक स्वरूपाची असोत अगर सरकारी असोत, -सहन करण्याच्या मन:स्थितीत आम्हीच काय, आमचे आश्रयदातेही नव्हते! त्याहून विशेष कौतुकाची बाब म्हणजे, तत्कालीन मंत्रीमंडळातही स्वपक्षीयांच्या बेजबाबदार दुष्कृत्यांना संरक्षण देणारे कोणी नव्हते. संस्थेचा शिक्षणविषयक दृष्टिकोण समजू शकणारी, व त्याकडे कौतुकाच्या भावनेने पाहाणारी माणसे तत्कालीन मंत्रीमंडळात होती. संस्थेने बी.जी.नाईक यांच्याबाबत घेतलेल्या भूमिकेचा सारासार विचार करून सरकारकडून असा निर्णय घेण्यात आला की, सरकारी आदेशानुरूप एखादी कारवाई झाली तर संबंधी शिक्षकाला द्याव्या लागणाऱ्या आर्थिक लाभाचा आवश्यक तो वाटा सरकारने उचलला पाहिजे. स्वातंत्र्याच्या आरंभकाळात मानसिक विकृतीने पछाडलेले अधिकारी व मंत्री सहसा नव्हते. आता मात्र त्यांची समृद्धी दिसू लागली आहे. त्याचे एकच कारण म्हणजे, निवडणुकीसाठी वशिलेबाजी व लाचलुचपत ह्यांच्या जोरावर अनिर्बंध कारभार करण्याची निर्माण झालेली चटक हेच होय!!

मध्यंतरीच्या या सर्व वावटळींचा समाधानकारक शेवट झाल्यानंतर, शिक्षणाच्या पुनर्रचनेच्या आणि शिक्षणक्षेत्रात

विविध नवीन प्रयोग व उपक्रम चालू करण्याच्या कामी आम्हाला लक्ष घालणे सुलभ झाले. शैक्षणिक प्रयोगांच्या कामी नेहमीच नावीन्यपूर्वक काही करीत राहणे हाच संस्थेचा स्वभावधर्म आहे. तथापि त्या स्वभावात दोष एवढाच आहे की, संस्थेला अवास्तव प्रसिद्धीचे तंत्र जमत नाही.

आपल्या नव्या वास्तूचा उद्‌घाटन समारंभ १९५२ साली सप्टेंबरच्या ५ तारखेस, नामदार मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते झाला. १९४७ सालापासून ना.मोरारजीभाई देसाई व संस्था ह्यांचा निकट परिचय प्रस्थापित होत आला. त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनाचा व सहकार्याचा लाभ संस्थेला नेहमीच मिळत गेल्याने, कित्येक अडचणींना समर्थपणे तोंड देऊन संस्था आपला प्रगतीमार्ग झपाट्याने आक्रमत आली.

स्वतंत्र भारताला राष्ट्र म्हणून जगावयाचे झाल्यास भारतीय तरुणांनी शिस्तीचे लष्करी शिक्षण व त्या अनुरोधाने येणाऱ्या अन्य बाबींचेही शिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने विचार करून संस्थेने एक प्रकल्प तयार केला. लष्करी शिक्षणाबरोबरच शस्त्रशिक्षणासाठी रायफल चालविण्याची योजना मांडली. चालू लष्करी युगातील प्रमुख शस्त्र म्हणजे आधुनिक रायफल. हे शस्त्र वापरता यावे म्हणून संस्थेने माध्यमिक शाळेसाठी रायफल संघाची(क्लब) तरतूद केली. ही योजना तत्कालीन मुंबई सरकारच्या गळी उतरविताना संस्थेला बरीच खटपट करावी लागली. त्यावेळच्या मुंबई राज्याच्या मंत्रीमंडळाने सर्व साधक बाधक प्रश्नांचा विचार करून महाविद्यालये व दुय्यम शाळा यांना रायफल संघ काढण्यास संमती देण्याचा निर्णय घेतला. या योजनेचा पहिला अंमल आमच्या श्री.गणपतराव आरवाडे हायस्कूलने केला, हे साभिमान नमूद करायलाच हवे. आज संस्थेकडे विद्यार्थ्यांच्या निशाणबाजी शिक्षणासाठी आवश्यक तो दारूगोळा व रायफली यांचा संग्रह आहे.

या रायफल संघाचा उद्‌घाटन समारंभ १९५४ साली त्यावेळचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस श्री.कामटे व हिज् हायनेस श्रीमंत राजेसाहेब(सांगली) या उभयतांच्या हस्ते साजरा झाला. विद्यार्थ्यांना निशाणबाजीचे शिक्षण देण्यासाठी राजेसाहेबांच्या माळबंगल्यासमोरील गोळीबार मैदान उपलब्ध करून घेण्यात आले. हा रायफल क्लब महाराष्ट्र व अखिल भारतीय क्लबशी संलग्न करण्यात आला.

आमची माध्यमिक शाळा पांजरपोळच्या इमारतीतून निघून नव्या इमारतीत आल्यानंतर पांजरपोळची इमारत, केवळ प्राथमिक शाळा व शक्य झाल्यास तिथे वसतिगृह काढावे म्हणून संस्थेने आपणाकडेच ठेवून घेतली होती.

तत्कालीन सांगलीत वसंतराव(दादा) पाटील, वि.स.पागे, राजारामबापू पाटील वगैरे काँग्रेसपक्षीय मंडळी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह चालवीत असत. ते वसतिगृह आमच्याकडे चालविण्यास देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या मंडळींचा आणि संस्थेचा तसा पूर्वापार ऋणानुबंध असल्याने व संस्थेची एकूण धारणा समानतेची व राजकीय दृष्ट्या पुरोगामी असल्याने, ह्या मंडळींनी घेतलेला हा निर्णय संस्थेला स्वागतार्ह वाटला. संस्थेने तत्काळ ह्या गोष्टीस संमती दिली.

त्यावेळी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात धान्य वसूली (लेव्ही) केली जात असे. सरकारला जास्तीत जास्त धान्य देणाऱ्या गावांना बक्षीस म्हणून काही रकमा बाजूला काढलेल्या असत. या बक्षिसांच्या रकमांमधून, ग्रामीण मुलांच्या शिक्षणासाठी सांगली शहरात सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात असाही एक विचार त्यावेळी या मंडळींच्या डोक्यांत येत होता. आम्ही हे वसतिगृह चालविण्यासाठी घेतल्यानंतर काही आर्थिक बोजा आल्यास, ह्या रकमेतून स्वाभाविकपणे तरतूद होण्याजोगी होती. वसतिगृहासाठी आधी खरेदी केलेले काही सामानसुमान, स्वयंपाकाची भांडी वगैरे या मंडळींनी आमच्या संस्थेच्या ताब्यात दिल्या. सर्व जातिजमातींना खुले असलेले 'विद्यार्थी वसतिगृह' पांजरपोळच्या इमारतीत चालू केल्याचे संस्थेने जाहीर केले. परंतु ह्या प्रकरणी एक नवीनच अडचण उपस्थित झाली.

मालकीच्या नव्या इमारतीत आमची माध्यमिक शाळा गेल्यानंतर, आपली जागा खाली करून देण्याबद्दल पांजरपोळ संस्थेने तगादा लावला. ही जागा खाली करून द्यायची, तर तिथली प्राथमिक शाळा व वसतिगृह यांचे काय करावयाचे हा मोठा प्रश्न होता. एवढी मोठी जागा

जवळपास उपलब्ध नसल्याने हा प्रश्न कसा सोडवावा ही चिंता होती. तथापि अडवणुकीच्या पद्धतीने पांजरपोळची इमारत ताब्यात ठेवणे संस्थेला नैतिक दृष्ट्या नामंजूर होते. आरंभकालात ह्या संस्थेने दिलेले सहकार्य नाकारणे आम्हांस शक्य नव्हते. म्हणून पांजरपोळची इमारत खाली करून देणे हे आम्ही महत्त्वाचे मानत होतो.

नव्या इमारतीत प्राथमिक शाळा सकाळच्या वेळी भरविण्याचे ठरवून अर्धा प्रश्न सुटला. उरलेल्या प्रश्नावरती पर्याय म्हणून आमच्याकडे ज्या पद्धतीने वसतिगृह आले त्याच पद्धतीने आम्ही ते दत्तक दिले. कुंडलचे नाथाजी लाड यांनी सांगलीत 'महाराष्ट्र शिक्षण संस्था' स्थापन करून शिक्षण कार्यात प्रवेश केला होता. त्यांनी त्यांच्या शिक्षण संस्थेमार्फत वसतिगृह चालविण्याची इच्छा बाळगली होती. आम्ही आमचे वसतिगृह त्यांच्या ताब्यात दिले, व त्यांनी सांगलीच्या खणभागातील आपल्या वसतिगृहात ते सामील करून घेतले. अशा तऱ्हेने आमच्या ह्या दोन्ही शाखांची सोय लागून पांजरपोळची इमारत आम्हाला खाली करून देता आली. पांजरपोळसारखी विस्तृत इमारत भाडे नियंत्रण कायद्याखाली अल्प भाड्यात आमच्या ताब्यात ठेवता आली असती पण या शिक्षणसंस्थेने 'दानत' हे मूल्य नेहमीच महत्त्वाचे मानले असल्याने गोवर्धन संस्थेची कोणतीही अडवणूक न करता पांजरपोळची इमारत आम्ही खाली करून दिली.

व्यावसायिक नीतिमत्ता व दिलेल्या शब्दांची पूर्तता यांसाठी, पडतील त्या अनेक अडचणींना व संकटांना संस्थेने तोंड दिले. खूप खस्ता खाल्या. पण दिलेल्या शब्दाचे नैतिक पालन करण्याबाबत मात्र कधीच हयगय केलेली नाही.

विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच समाजसेवा, विधायक कार्य व लोकशाही नागरिकत्वाची पूर्वतयारी यांची जोड मिळाली पाहिजे, याबाबत आरंभकाळापासूनच संस्थेने दक्षता घेतली आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये जनतेच्या सहकार्यावाचून कोणतेही विधायक काम मूर्त स्वरूप घेऊ शकणार नाही. स्वातंत्र्योत्तर कालातील सरकार, केवळ स्वत:च्या हिम्मतीवर विसंबून विकास कार्य पार पाडू शकणार नाही हे जाणून, विद्यार्थी व शिक्षकांनी विधायक कार्यासाठी चंग बांधावा, यासाठी आम्ही त्यांना उत्तेजित केले आहे.

●●●

## संस्कार मंदिर

भारत सेवक समाजामार्फत अगर भारत सरकारच्या शिक्षण खात्यामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या, ग्रामीण विभागातील प्रत्येक शिबिराचे संचलन मार्गदर्शन व प्रत्यक्ष काम या बाबतींत १९५६ सालापासून संस्थेने आघाडीवर राहून काम केले आहे. वसगडे, येळावी, हरीपूर, महांकाल कवठे, डिग्रज, माहुली अशा विविध ग्रामांमधून संस्थेने बजावलेली कामगिरी कौतुकास्पद ठरलेली आहे. सांगलीपासून पुणे रस्त्यावर दोन मैलांपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंस उभ्या असलेल्या वृक्षांना जर बोलता आले तर, 'हे रोपण या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी केले आहे' असे ते वृक्ष सांगतील.

सांगलीपासून दोन मैलांवर असलेल्या हरीपूर गावातील शिबिर विशेष उल्लेखनीय आहे. हरीपूर येथे पुरातन देवालय असून सांगली-हरीपूर रस्त्याची रहदारी फार मोठी आहे. इमारत कामासाठी लागणारी वाळू व या गावातील हळदीची पेवे यामुळे अवजड वाहनांची वाहतूक त्या रस्त्यावर आहे. हरीपूर गाव बुधगाव संस्थानात समाविष्ट असल्याने, संस्थानी अंमलात बुधगाव व सांगली या दोन संस्थानिकांमार्फत त्या रस्त्याची देखभाल केली जाई. संस्थानांच्या विलीनीकरणानंतर त्या रस्त्याची एवढी आबाळ झाली की, या दोन गावांमध्ये कधी काळी रस्ता अस्तित्वात होता किंवा नाही याची शंका निर्माण व्हावी. सांगली

नगरपालिका, हरीपूर ग्रामपंचायत व जिल्हा लोकल बोर्ड (नंतर जिल्हा परिषद) अशा तिघांच्या वांध्यात या रस्त्याचा प्रश्न लोंबकळत राहिल्यामुळे रस्ता झडून जाऊ लागला. एवढेच नव्हे तर बाजूचे शेतकरी आपल्या शेतांच्या हद्दी रस्त्यात घुसडू लागले. या साऱ्या भानगडींमुळे उभय गावच्या नागरिकांची भयानक कुचंबणा होऊ लागली. अशा या रस्ता-आणीबाणीच्या काळी संस्थेकडे भारत सरकारच्या शिक्षण खात्याकडून ग्रामीण भागात शिबिर घेण्याबद्दल विचारणा झाली. संस्थेने तत्काळ शिबिर घेण्यास संमती दिली व कामासाठी हरीपूर गावाची निवड करण्यात आली.

संस्थेचे विद्यार्थी व शिक्षक शिबिरासाठी हरीपुरात दाखल झाले. हरीपूर वेस ते संगमेश्वर मंदिरापर्यंत दोन फर्लांगाचा रस्ता आधी हाती घेण्यात आला. लोकल बोर्डाकडून रोड-रोलर पैदा करण्यात आला. सांगली नगरपालिकेने पाणी पुरविण्यास संमती दिली. ग्रामपंचायतीने खडी आणि वाळू यांचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. मग एका सकाळी रस्ता करण्याचे काम सुरू झाले. शिक्षक, विद्यार्थी आणि काही ग्रामस्थ यांचे शेकडो हात रस्ता खणणे, खडी पसरणे या कामांत गुंतलेले दिसू लागले. लोकल बोर्डाचा रोड-रोलर फिरू लागला. सांगली नगरपालिकेचा अग्निशामक पाणी मारू लागला. रात्रीच्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमांनी गाव गजबजून गेला. सुमारे तीन आठवड्यांत ग्रामस्थांना दोन फर्लांगांचा सुंदर रस्ता तयार करून मिळाला. सदर शिबिराची सुरुवात आजचे पाटबंधारे मंत्री वसंतरावदादा पाटील यांनी केली होती. तर या रस्त्याचे उद्घाटन त्यावेळचे उद्योगउपमंत्री जी.डी.पाटील यांनी केले. या शिबिरातील शिक्षकांनी हरीपूर गावाची आर्थिक व सामाजिक पाहणी करून एक छोटीशी पुस्तिका प्रकाशित केली. ग्रामीण भागांतील वस्तुस्थितीचे मूल्यमापन चिकित्सक बुद्धीने केल्यास काय प्रगट होते, याचा स्पष्ट पुरावा त्या पुस्तिकेतून उपलब्ध झाला.

गावातील रस्ता तयार झाल्यामुळे आता हरीपूरच्या ग्रामस्थांना सांगली रस्ता दुरुस्त होण्याची निकड भासू लागली. संस्थेने आणखी एखादे शिबिर संघटित करावे म्हणून त्यांचेकडून तगादा सुरू झाला. सांगलीच्या सर्व दुय्यम शाळांनी मिळून एन.सी.सी.मधील विद्यार्थ्यांचे एक श्रमशिबीर सांगली-हरीपूर रस्त्यावरील गणपतीच्या बागेत भरविले. वेशीपासून गणपती मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आली. हा रस्ता ग्रामपंचायतीच्या कक्षेबाहेर होता. जिल्हा परिषद व सरकारी दळणवळण खाते यांच्याकडील वांध्यात रस्त्याची सामान्य सफाई होण्यापलीकडे फारसे काही झाले नाही. तरी लोकजागृतीच्या कामी या शिबिराचा उपयोग होऊन, या रस्त्याबाबत जनतेने एवढा दबाव आणला की, नंतर सांगली हरीपूर हा डांबरी रस्ता तयार झाला. एस.टी.ची नियमित वाहतूक चालू झाली आणि हरीपूर हे आता सांगलीचे उपनगर बनण्याच्या तयारीत आले.

संस्थेच्या ह्या पूरक उपक्रमांचे शैक्षणिक महत्त्व आगळे आहे. याबाबत आणखी एका गोष्टीचा खास उल्लेख करणे आवश्यक आहे. हरीपूर शिबिरासाठी म्हणून सरकारने बराच मोठा निधी उपलब्ध करून दिला होता. शिबिराच्या कार्यक्रमात कोणतीही उणीव राहू न देता, या शिबिरावर झालेला खर्च संस्थेच्या काटेकोरपणामुळे अपेक्षेपेक्षा कमी झाला. सरकारकडे सुमारे सहाशे रुपये संस्था परत करू शकली. याच कालावधीत या विभागात झालेल्या अन्य शिबिरांमधून जो खर्च झाला, तो विचारात घेता कार्यहानी होऊ न देता, सरकारच्या -म्हणजे पर्यायाने समाजाच्या - पैशांचा विनियोग पद्धतशीर कसा करावा याचा सर्वोत्कृष्ट पायंडा याच संस्थेने पाडून दिला, असे म्हणावयास हरकत नाही.

शिबिरांचे संघटन, संचलन व उद्दिष्टे पार पाडण्यासाठी खास परिश्रम करणाऱ्या शिक्षकांमध्ये सौ.इंदिराबाई राजवाडे, कु.हंचनाळकर व श्री.माणगावकर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. शाळेने संघटित केलेल्या बहुतेक सर्व श्रमशिबिरांमध्ये आमच्या शालेय विद्यार्थ्यांचा फार मोठा भाग असल्याने, समाजसेवेचे प्राथमिक धडे विद्यार्थ्यांना आपोआपच मिळत गेले.

याच कालावधीत संस्थेने भारत सरकारकडून सभागृहासाठी सुमारे वीस हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध करून घेतले. या अनुदानात वीस हजारांची भर घालून एक भव्य सभागृह उभारण्यात संस्थेने यश मिळविले.

सभागृहाच्या उभारणीचे काम त्यावेळचे शिक्षणमंत्री हितेंद्रभाई देसाई यांचे हस्ते सुरू झाले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी श्रमाचा बराच मोठा वाटा उचलून सभागृहाचे काम पूर्ण केले. या सभागृहाचे उद्घाटन त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.यशवंतरावजी चव्हाण यांनी केले.

श्री.यशवंतरावजी चव्हाण यांच्या अनुरोधाने एका गोष्टीचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. शैक्षणिक दृष्ट्या लोकशाही परंपरा जोपासण्याचे काम करणे हे संस्थेने आपले ध्येय मानले. त्या दृष्टीने १९५६ साली संस्थेने हाताळलेला, संस्थेच्या इतिहासातील एक संस्मरणीय कार्यक्रम आहे. त्या सालात संयुक्त महाराष्ट्र चळवळीला इतका विलक्षण जोर चढला होता की, आजवर मुंबईत गुण्यागोविंदाने नांदणारे त्रिभाषक एकमेकांचे कट्टे वैरी बनून हातघाईवर आले होते. भारतीय एकात्मतेला भाषिक वादाने लावलेला हा सुरुंग, शैक्षणिक व लोकशाही परंपरेच्या दृष्टीने अत्यंत विघातक असल्याने संस्थेने या कामी ठामपणाने व अत्यंत धडाडीने पाऊल टाकले.

विशाल द्विभाषिकांची भूमिका ऐनवेळी मान्य करून, संयुक्त महाराष्ट्र चळवळीला यशवंतरावजी चव्हाणांनी तोंडघशी पाडले व महाराष्ट्राचा विश्वासघात केला, असा आक्षेप होता. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्रातील लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध होते. त्यांच्यावर अपशब्दांचा भडिमार तर चालू होताच, पण सार्वजनिक सभासंभाषणात भाग घेण्यासही त्यांच्यावर सामाजिक बंदी घातल्याप्रमाणे झाले होते. संस्थेचा नि त्यांचा थोडाफार पूर्व-ऋणानुबंध असल्याने, व संस्थेने आयोजित केलेल्या एका लोकयात्रा कार्यक्रमात त्यांनी अगत्यपूर्वक भाग घेतलेला असल्याने, संस्थेने त्यांना आपल्या स्नेहसंमेलनासाठी पाचारण केले. संस्थेची भूमिका ठाम होती. राजकीय मतभेदांमुळे एखाद्या व्यक्तीला सार्वजनिक सभा-समारंभात आपले विचार मांडू देण्यास संधीच द्यावयाची नाही, हा अविवेक लोकशाही परंपरेशी विसंगत असल्यामुळे संस्थेने चव्हाणांना जाणूनबुजून पाचारण केले होते.

संस्थेच्या स्नेहसंमेलनातील पाहुण्यांचे भाषण हे आमच्या विद्यार्थ्यांपुरते कधीच मर्यादित नसते. संस्थेचा नागरिकांशी निकट संबंध असल्याने व श्री.यशवंतरावजींच्या बाबतीत बाहेर निर्माण झालेल्या राजकीय वावटळींमुळे संमेलनाच्या कार्यक्रमास जाहीर सभेचे स्वरूप येणार हे स्पष्ट होते. संस्थेने टाकलेले हे पाऊल यशवंतरावांच्या विरोधकांना मान्य नसल्यामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांमार्फत काही गडबडगुंडा करता आल्यास पाहावे असा अप्रत्यक्ष प्रयत्न त्यांनी चालू ठेवला होता. पण आमचे विद्यार्थी संस्थेची परंपरा जाणणारे असल्याने त्या प्रयत्नांना व प्रचारांना काडीमात्र यश आले नाही.

या बाबतीत संस्थेचा दुसराही एक विशेष उपयुक्त ठरला. संस्थेने सर्व राजकीय पक्षांशी इतके जिव्हाळ्याचे व आत्मीयतेचे संबंध निर्माण केले आहेत की, ही संस्था प्रत्येकालाच आपलीशी वाटते. त्यामुळे ह्या कार्यक्रमाविरुद्ध अनुचित हालचाल न करण्याचा निर्णय त्या सर्वांनीच घेतला होता. आज पक्षोपक्षांत असलेली ही सर्व मंडळी एके काळी स्वातंत्र्यसंग्रामात एकाच पठडीत वावरणारी असल्याने मनोमनी सर्वांनाच यशवंतराव व संस्था या उभयतांविषयी जिव्हाळा होता. तरीही काही विपरीत घडू नये म्हणून पोलीस खात्याची दिवसभर धावपळ चालू होती. विपरीत तर काही घडले नाहीच. उलट यशवंतरावांचे विरोधक त्यांच्याच पंक्तीत बसून त्यांच्याशी गप्पागोष्टी करताना दिसू लागले.

यशवंतरावांचे आमच्या संस्थेतील भाषण तर निर्विवाद पार पडलेच, पण रात्रीची त्यांची जाहीर सभाही निर्वेध पार पडली. अशा रीतीने यशवंतरावांचे राजकीय जीवन महाराष्ट्रात नव्या दिमाखाने चालू राहिले. लोकशाही मूल्यांच्या जोपासनेसाठी संस्थेने उचललेले पाऊल व याबाबत मिळविलेले यश ही तत्कालीन परिस्थितीतील एक महत्त्वाची बाब समजली पाहिजे. या घटनेमुळे संस्थेच्या लोकप्रियतेला व प्रतिष्ठेला धक्का तर लागला नाहीच, उलट उजाळा मात्र मिळाला! लोकशाही परंपरा जोपासण्यासाठी बेडरपणाने वाटचाल करणे, हा लोकशाही समाज शिक्षणातील एक महत्त्वाचा भाग आहे असे संस्था मानते. संस्थेने ही परंपरा निर्भयपणे जोपासण्यात यश मिळविले आहे.

संस्थेने बांधलेल्या ह्या सभागृहाचा उपयोग 'संस्कारकेंद्र' म्हणून करण्यात येऊ लागला. जिल्हा

परिषदांच्या निर्मितीनंतर या सभागृहात 'पंचायत राज' संदर्भात एक परिसंवाद आयोजित करण्यात आला. आजचे मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक व बळवंतरायजी मेहता या उभयतांनी तयार केलेल्या प्रस्तावित आराखड्यावर पंचायत राज्याची उभारणी करायची असल्याने या परिसंवादाचे उद्घाटन व आवश्यक ते मार्गदर्शन श्री.वसंतरावजी नाईक यांनीच केले. अनेक प्राध्यापकांनी, तज्ज्ञांनी व कार्यकर्त्यांनी या परिसंवादात भाग घेऊन बहुमोल विचारविमर्श केला. बाळासाहेब देसाई यांनी या परिसंवादाची सांगता केली. संस्थेने आयोजित केलेल्या अनेकविध उपक्रमांतून लोकशिक्षण व लोकरंजन ह्या दृष्टीने या संस्कारमंदिराच्या रूपाने बजावलेली कामगिरी, किमान ह्या शहरात तरी अतुलनीय म्हणावी लागेल.

कामगारांच्या एका मेळाव्याचे मार्गदर्शन माधवरावजी माने व शांतिलाल शहा या उभयतांनी याच संस्कारमंदिरात केले. शिक्षणसंस्था व शिक्षकांचे प्रश्न या संदर्भात शिक्षणमंत्री अनुक्रमे हितेंद्रभाई देसाई व शांतिलालजी शहा यांनी विचार मांडले. ग.श्री.खैर इत्यादींची त्यांच्याशी दिलखुलास चर्चा याच संस्कारमंदिरात झालेली आहे. याशिवाय आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, श्रीमती गोदावरी परुळेकर, एन.डी.पाटील, कृष्णराव धुळप, क्रांतिवीर नाना पाटील, जॉर्ज फर्नांडिस इत्यादी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत नावाजलेल्या व्यक्तींनी आपापल्या वक्तव्याने संस्कारमंदिर गाजविलेले आहे. या संस्कार मंदिराचा परिसर जसा राजकीय गर्जनांनी दुमदुमला, तसाच तो कलाकारांच्या संगीतसुरांनीही भारावून गेलेला आहे. भारताच्या विकासाची प्रदर्शने येथे भरलेली आहेत. 'युसिस'सारख्या संस्थांनी आपले ज्ञानभांडार ह्या मंदिरात खुले करून नागरिकांना ते परिचित करून दिले आहे.

सांगलीच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात संस्थेने व ह्या संस्कारमंदिराने बजावलेली कामगिरी समाजशिक्षणाची एक उल्लेखनीय बाब मानावी लागेल. याच संस्कारमंदिरात आचार्य विनोबा भाव्यांच्या आगमनप्रसंगी गांधीसेवासंघाचे एक शिबिर आयोजित करण्यात आले. अनेकविध चळवळींमुळे या शिक्षणसंस्थेचे आवार हा एक जागृत परिसर म्हणून ओळखला जातो. सामाजिक जीवनावर विधायकतेचा ठसा खोलवर उमटविण्यासाठी या संस्थेने केलेली कामगिरी सांगलीच्याच काय, पण आजूबाजूच्या ग्रामीण भागातील जनतेच्या लक्षात राहण्याजोगी झाली आहे.

●●●

## दातृत्व - सहकार्य

संस्कारमंदिराच्या उभारणीबरोबरच संस्थेच्या इमारतीचा दुसरा मजलाही पुरा करण्यात आला. सांगलीचे एक ख्यातनाम धनिक सोमचंद मानचंद शहा यांनी सात-आठ हजार रुपये खर्च करून आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ एका वर्गाची उभारणी करून दिली. सांगलीचे दुसरे एक कर्तबगार धनिक वेलणकर यांचा खास गौरव करण्यासाठी म्हणून, संस्थेने स्वखर्चाने उभारलेल्या प्रशस्त प्रयोगशाळेस 'धनी वेलणकर विज्ञानमंदिर' असे नाव दिले. अर्थात् धनी वेलणकरांनी संस्थेचे कौतुक करण्यासाठी म्हणून, तीन हजार रुपयांचे आर्थिक सहकार्य प्रसंगोपात् दिले आहे.

शिक्षणसंस्थेने शहराच्या मध्यभागी अद्ययावत, भव्य व सर्व सुखसोयींनी सज्ज अशी इमारत उभारण्यात यश मिळविले. शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी त्या इमारतीचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचे धोरण संस्थेने पहिल्यापासूनच ठेविले आहे. त्यामुळे सकाळी

साडेसहापासून रात्री दहा-बारा वाजेपर्यंत शिक्षणसंस्थेचा परिसर गजबजलेला जागृत-जिवंत दिसतो.

लोकशिक्षण मंडळाने चालू केलेले रात्रीचे हायस्कूल याच इमारतीत भरू लागले. जिल्हा सहकारी मंडळाने चालू केलेले सहकारी शिक्षणवर्ग याच इमारतीत भरू लागले. गोवर्धन संस्थेची सांगलीत जी ख्याती आहे, तशीच ख्याती आमच्या शैक्षणिक संस्थेसही मिळू लागली. या वास्तूच्या आश्रयाने प्रारंभ झालेली प्रत्येक संस्था आता आपल्या मालकीच्या इमारतीत जाऊन कार्य करीत आहे. तथापि ह्याला एकच संस्था चांगल्या अर्थाने अपवाद ठरली. या संस्थेने आपला निराळा प्रपंच न थाटता, या संस्थेच्या परिसरात जन्म घेतला व याच संस्थेत स्वत:चे विलीनीकरण करून घेतले. ही संस्था म्हणजे 'दक्षिण सातारा तांत्रिक शिक्षणसंस्था' होय.

माहुलकर, मालदार, हिरकुडे वगैरे काही तरुण मंडळींनी 'दक्षिण सातारा टेक्निकल एज्युकेशन सोसायटी' या नावाची शिक्षणसंस्था स्थापन करून तांत्रिक शिक्षण देण्याची सोय करण्याचा निर्णय घेतला होता. आर.एन.जोशी हे ख्यातनाम प्राध्यापक, भावे इंजिनियर वगैरे नामांकित मंडळी अध्यापनाचे काम करणार होती. याशिवाय वसंतरावदादा पाटील, राजारामबापू पाटील, गुलाबराव पाटील, जी.डी.पाटील, एम.एस.कराळे यांचे त्या संस्थेला सहकार्य व मार्गदर्शन लाभले होते. या संस्थेला जागेची सोय करण्यासाठी आमच्या संस्थेने सहकार्य देऊ केले व आमच्या इमारतीत तांत्रिक शिक्षणाचे त्यांचे वर्ग भरू लागले.

त्या वेळी सांगलीत आय.टी.आय. हा सरकारी तांत्रिक शिक्षणक्रम चालू नव्हता. बहुतेक सगळ्या विकास विभागांतून तांत्रिक शिक्षणासाठी, सरकारमार्फत विद्यावेतन देऊन या तंत्रशिक्षण संस्थेकडे विद्यार्थी पाठविण्यात येऊ लागले. ग्रामीण भागाचे विद्युतीकरण व त्या अनुषंगाने येत चाललेले यांत्रिकीकरण यामुळे या अभ्यासक्रमाला चांगली चालना मिळाली. संस्थेचा व्याप वाढू लागला. या वाढत्या व्यापासाठी स्वाभाविकपणे स्वतंत्र सोय असावी म्हणून, नव्याने बांधण्यात आलेल्या काँग्रेसच्या इमारतीत त्या संस्थेने आपले सर्व वर्ग हलविले. पण अल्पावधीतच त्यांच्या कार्यकर्त्यांत काही मतभेद व धुसफूस चालू झाली. तशातच सांगलीच्या औद्योगिक वसाहतीत सरकारमार्फत तांत्रिक शिक्षणकेंद्र चालू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे त्या संस्थेच्या भवितव्याबाबत चिंता निर्माण झाली, आणि या संस्थेच्या संचालक मंडळाने आमच्या संस्थेशी विचार विनिमय चालू केला. संपूर्ण विचार केल्यानंतर उभय संस्थांच्या संचालक मंडळींनी असा निर्णय घेतला की, या तांत्रिक शिक्षण संस्थेचे संपूर्णत: विलीनीकरण आमच्या शिक्षणसंस्थेत करून टाकावे. तांत्रिक शिक्षण संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष एम.एस.कराळे व याच संस्थेचे वर नमूद केलेले नियंत्रण मंडळ यांचे संपूर्ण सहकार्य या कामी मिळाले. तांत्रिक शिक्षण संस्थेत असलेला सेवकवर्ग व त्या संस्थेची एकूण मालमत्ता यांना सुस्थिरता लाभावी म्हणून हा निर्णय राबविण्यात आला. अशा रीतीने आमच्या शिक्षण संस्थेतच जन्म घेऊन अल्पकाळ बाहेर गेलेली ही तंत्रसंस्था फिरून परत आली व आमच्या संस्थेत विलीन होऊन गेली.

विलीनीकरणाचे काम पूर्ण होताच आमच्या संस्थेने या विभागाची सोय लावण्यासाठी, आमच्या माध्यमिक शाळेला तांत्रिक वर्गांची जोड करून दिली. माध्यमिक शाळेचे तांत्रिक शाळेत(टेक्निकल हायस्कूल) रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. अशा रीतीने श्री.गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये सामान्य(ॲकॅडेमिक) व तांत्रिक(टेक्निकल) अशा दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम चालू करण्यात आले.

सरकारच्या औद्योगिक शिक्षण केंद्र निर्मितीमुळे आमच्या संस्थेत तोपर्यंत असलेले तत्सदृश अभ्यासक्रम क्रमश: बंद करीत आणले. तथापि हे कार्य संपूर्णत: थांबू नये म्हणून फक्त शिवणकाम, विद्युतीकरण, रेडिओ अशा काही विभागांचे शिक्षणक्रम चालू ठेवण्यात आले. आता श्री.गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये इ.११वी पर्यंतचे तांत्रिक शिक्षण उपलब्ध झाले व त्याचबरोबर नित्योपयोगी असे कलाशिक्षण देण्याचीही सोय करण्यात आली. या विभागाचा विस्तार व कार्यक्षमता नमूद करण्यापूर्वी संस्थेला लाभलेल्या क्रीडांगणाचा उल्लेख आवश्यक आहे. कारण या जागेच्या प्राप्तीमुळेच तांत्रिक शिक्षण विस्तार व त्याचा

विकास शक्य झाला आहे.

आमच्या शिक्षण संस्थेचे कामकाज पूर्वी गोवर्धन संस्थेच्या इमारतीत चालू असतानाच, क्रीडांगणासाठी म्हणून कऱ्हाडे वाड्याच्या पिछाडीस असलेल्या व 'मरळीकर ओत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, नगरपालिकेच्या ताब्यातील खुल्या जागेचा काही भाग संस्थेने नगरपालिकेकडून क्रीडांगण म्हणून अल्पशा भाड्याने घेतला होता. सदरची सर्व जागा नव्याणऊ वर्षांच्या कराराने आमच्या शिक्षणसंस्थेला क्रीडांगणासाठी नगरपालिकेने भाड्याने द्यावी, अशी सतत खटपट चालू होती. एकेकाळी नगरपालिकेने तसा ठरावही केला, पण पुढे काय झाले कोणास ठाऊक! सदर ठराव नगरपालिकेने सरकारी मान्यतेसाठी पाठविला नाही. त्यामुळे हे प्रकरण तसेच लोंबकळत पडले होते. कऱ्हाडे वाड्याच्या जागी आता संस्थेची नवी इमारत उभी राहिली तरी मागील बाजूस लगतच असलेली ही खुली जागा संस्थेला क्रीडांगण म्हणून उपलब्ध होईना!

ही जागा सांगली गणपती संस्थानच्या मालकीची होती. सांगली दरबारच्या गणपती पंचायतन कायद्याप्रमाणे तिची मालकी गणपती संस्थानकडे होती; पण वहिवाट मात्र काही अटींवर नगरपालिकेकडे देण्यात आली होती. शाळेच्या निकटून पिछाडीस असलेल्या या सुमारे ७० हजार चौरस फूट जागेचे स्वरूप भयानक होते. वेश्यांची वस्ती, दारू-जुगाराचे अड्डे चहूबाजूंनी वसले होते. त्यामुळे सध्या शाळेच्या ताब्यात असलेल्या अल्पशा भागाचाही उपयोग क्रीडांगण म्हणून करणे अशक्यप्राय झाले होते. वस्तुत: शाळेच्या लगत असलेली ही खुली जागा, नगरपालिकेने अशा अवस्थेत ठेवणे सर्वच दृष्टींनी अयुक्त होते. तरीही संस्थेच्या विनंतीला म्हणावा तसा प्रतिसाद नगरपालिकेकडून मिळत नव्हता.

तत्कालीन स्थानिक स्वराज्य मंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनीही समक्षात समग्र परिस्थिती पाहिल्यानंतर संस्थेची बाजू विचारात घेऊन काहीतरी इलाज करण्याचे नगरपालिकेला सुचविले. त्याचाही फारसा उपयोग झाला नाही. मग मात्र संस्थेने ठाम भूमिकेने अन्य दिशांनी काही हालचाली करण्याचा निर्णय घेतला.

नगरविकास विभाग नव्याने कार्यान्वित झाला होता. या विभागामार्फत सांगली नगररचनेचा नवा आराखडा तयार होऊ लागला होता. या आराखड्यामध्ये 'मरळीकर ओत' नावाने ओळखली जाणारी ही सर्व जागा क्रीडांगण म्हणूनच नोंदविली जावी याबाबत संस्थेने हालचाली केल्या. स्थानिक स्वराज्य मंत्रालय व कोल्हापूर विभागातील नगररचना (टाऊन प्लॅनिंग) कचेरी या उभयतांच्या बहुमोल सहकार्यामुळे आमच्या प्रयत्नांस पहिले यश मिळाले, आणि सांगलीच्या नव्या नगररचना आराखड्यात ही जागा क्रीडांगण म्हणून राखून ठेवण्यात आली. आता प्रश्न एवढाच शिल्लक राहिला की, क्रीडांगण म्हणून 'राखीव' झालेली ही जागा संस्थेच्या मालकीची कशी व्हावयाची? -लवकरच संस्थेला याही प्रश्नाचे उत्तर उपलब्ध झाले.

गणपती संस्थान हा खाजगी विश्वस्त निधी असून या निधीचे एकमेव विश्वस्त सांगलीचे राजेसाहेब असत. त्यावेळचे विश्वस्त हिज हायनेस चिंतामणराव पटवर्धन यांची आम्ही गाठ घेतली. त्यांच्यापुढे आमची क्रीडांगणाची गरज मांडली. राजेसाहेबांनी संस्थेच्या अडचणींचा विचार करून, व या जागेचा उपयोग एका सत्कार्यासाठी होत आहे हे पाहून, संस्थेच्या क्रीडांगणासाठी सदर जागा देण्यास मान्यता दिली. पण 'देवस्थानची ही जागा असल्यामुळे संस्थेने काही किंमत देऊन ही जागा विकत घ्यावी' असा सल्लाही त्यांनी दिला. गावाच्या मध्यभागी असलेली सुमारे ७० हजार चौरस फुटाची ही जागा, संभाव्य किंमत विचारात घेऊन खरेदी करणे आर्थिक दृष्ट्या संस्थेला अशक्य बाब होती. त्याचबरोबर गणपती संस्थानला तर नगरपालिकेकडून कराराप्रमाणे काहीच उत्पन्न मिळत नव्हते. उलट तिथे वेश्या व मदिरा यांचा तळ होता. संस्थानच्या दृष्टीने ही जागा तशी निरुपयोगीच झालेली असल्याने, संस्थेने राजेसाहेबांना विनंती केली की, जागा अल्प किंमतीस आम्हाला विकत मिळावी.

या जागेचे शुद्धीकरण होऊन ती विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणून वापरण्यास मिळणार असल्याने, श्री गजाननाच्या जागेचा हाच सदुपयोग आहे, असा विचार करून राजेसाहेबांनी केवळ पाच हजार रुपयास सदर जागा आमच्या संस्थेला देऊ केली. संस्थेचे प्रतिनिधी बोलून गेले, ''सदर

जागेची किंमत अत्यंत अल्प आहे. हे आम्हास मान्य आहे. तथापि क्रीडांगण म्हणून वापरात येण्यासाठी त्या जागी जे संस्कार करावे लागतील त्यांचा विचार करता, चारएक हजार रुपयांस ती मिळाली असती तर अधिक बरे झाले असते. पण ५ हजारासही काही हरकत नाही. तथापि खरेदीची रक्कम दरसाल पाचशेच्या हप्त्याने दहा वर्षात आम्ही पुरी करू.'' श्रीमंतांनी ही गोष्टही मान्य केली. प्रत्यक्ष खरेदीपत्रावेळी श्रीमंतांच्या दातृत्वाचा आगळाच अनुभव आला. खरेदीपत्र करून देण्यासाठी म्हणून आलेले श्रीमंतांचे प्रतिनिधी आम्हांस म्हणाले, ''श्रीमंतांच्या आदेशाप्रमाणे संस्थेच्या इच्छेनुरूप चार हजार रुपयांचेच खरेदीपत्र करावयाचे असून रकमेची पूर्तता दरसाल चारशेच्या दहा हप्त्यांनी व्हावयाची आहे.'' सदर जागा गणपती संस्थानच्या मालकीची होती. त्यांच्याकडून मालकी हक्क आमच्या संस्थेने विकत घेतला.

आज ती पूर्तता झाली आहे; पण हा करार करणारे श्रीमंत राजेसाहेब हयात नाहीत. मृत्यूपूर्वी थोडे दिवस त्या क्रीडांगणावर मुले खेळताना पाहून, त्यांना वाटलेला आनंद त्यांनी एक दिवस -मुद्दाम रस्त्यात गाडी उभी करून - संस्थेच्या कार्यवाहांपाशी प्रगट केला होता.

संस्थेने गणपती संस्थानची ही जागा आपल्या मालकीची केली, पण संस्थेला कब्जा मिळाला नव्हता. जागेची वहिवाट नगरपालिकेकडे होती. कब्जा देण्यास नगरपालिका अनुकूल नव्हती. नाइलाजाने नगरपालिकेविरुद्ध न्यायालयात दाद मागावी लागली. पण तितक्यात सांगलीचे प्रख्यात मल्ल जोतीरामदादा पाटील उर्फ पेहेलवान हे नगराध्यक्ष झाले. हा प्रश्न सामोपचाराने सोडविण्याचे त्यांनी मनावर घेतले. त्या जागेची शोचनीय अवस्था पाहून त्यांना आश्चर्य तर वाटलेच, पण नगरपालिकेने शिक्षण संस्थेला क्रीडांगण उपलब्ध करून देण्याकामी अशी दुराग्रही भूमिका घेणेही त्यांना अप्रस्तुत वाटले. नगरपालिकेचे कायदा सल्लागार व सांगलीचे प्रख्यात कायदेपंडित के.जी.कुलकर्णी यांच्याशी सल्लामसलत करून, त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे या कामी तडजोड करण्यात करण्यात आली. 'मरळीकर ओत' ह्या खुल्या जागेचा संपूर्ण ताबा मालकी हक्कानिशी संस्थेला देण्यात आला. सांगलीचे राजेसाहेब व नगरपालिका यांच्या सहानुभूतीपूर्वक सहकार्यामुळे संस्थेला विस्तृत क्रीडांगण उपलब्ध झाले.

●●●

## क्रीडांगण

संस्थेला क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध झाली, पण या जागेवर अतिक्रमणे झाली होती. तेथे उभारण्यात आलेल्या झोपड्यांमधून धुमाकूळ चालू होता तो दूर करून जागा क्रीडांगण म्हणून वापरात येण्यासाठी बरेच सोपस्कार करावे लागले. त्यांमधून अनेक कायदेशीर खटले कज्जे निर्माण झाले. या झोपड्यांत राहणारे लोक, विद्यार्थी व शिक्षक यांना हैराण करून सतावून सोडीत. त्यामुळे न्यायालयीन मार्गाने त्या सर्व गोष्टी सुसूत्र करून घ्याव्या लागल्या. अर्थात या कामी थोडाफार कालावधी लागला तरी मार्ग निष्कंटक झाला. विद्यार्थी व शिक्षक यांच्या परिश्रमांतून क्रीडांगण वापरण्यात येण्याजोग्या अवस्थेमध्ये अल्पावधीतच आले. या सर्व प्रकरणामध्ये संस्थेला सतत दहा वर्षे झगडावे लागले. अनेक कागदपत्रे तयार करून घ्यावी लागली. पण या सर्व बाबींचा शेवट चांगला झाल्याने, त्यासाठी झालेले परिश्रम व खर्च सार्थकी लागल्याप्रमाणे झाले.

क्रीडांगणाच्या या प्रकरणात कार्यवाह म्हणून मी व अन्य काही शिक्षकांवर एक फौजदारी कज्जा दाखल करण्यात आला होता. या कज्जातून निष्पन्न मात्र काहीच झाले नाही. या कज्जामध्ये काही 'विशेष हितसंबंधी' गट अगत्यपूर्वक लक्ष घालून वृत्तपत्रीय प्रचार करीत होते. हा प्रचार तरी का झाला? याची पार्श्वभूमी संस्थेच्या इतिहासात विशेषत्वाने

चर्विणे भाग आहे. कारण पुढे निर्माण झालेले तसेच एक प्रकरण संस्थेला थोडेफार त्रासदायक झाले. म्हणूनच ही घटना बुद्धिपुरस्सर नमूद करायला हवी. प्रसंगी स्वत:वरही आघात झाला तरी शिक्षणसंस्था शिक्षकांना संरक्षण देत असे. पुढील काळात ज्या घटना घडल्या व त्या घडविण्यासाठी ज्यांनी हालचाली केल्या, त्यांचे शिक्षकी पेशातील मूल्यमापन व संस्थेच्या दातृत्वाचा त्यांनी केलेला दुरुपयोग, यांचे स्पष्ट चित्र समाजापुढे येणे आवश्यक आहे. शिक्षणसंस्था संचलनात भाग घेणाऱ्या मंडळींनाही या घटनांच्या निर्देशामुळे काही मार्गदर्शक तत्वे उपलब्ध होणार आहेत.

एके शनिवारी सकाळी आमच्या शिक्षणसंस्थेची बदनामी करणारा मजकूर ओरडत एक वृत्तपत्र गावात विकले जात होते. त्यापूर्वी पुण्याच्या 'प्रभात' व 'सकाळ' या प्रतिष्ठित वृत्तपत्रांमधूनही, आमच्या संस्थेतील एक शिक्षक व शिक्षिका यांच्या वर्तनाबाबत काही मजकूर छापला गेला होता. 'ही संस्था म्हणजे प्रेमाचे विद्यापीठ आहे' असे शाळेपुढे ओरडत पेपरवाला फिरत होता. सकाळच्या शाळेत आलेले विद्यार्थी वृत्तपत्रे अर्थातच अगत्याने व उत्सुकतेने खरेदी करीत होते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्येही हा विषय चर्चेचा झाला. या सर्व प्रकरणामुळे निर्माण झालेली अस्वस्थता संस्थेच्या दृष्टीने बाधक असल्याने संस्थेने ही बदनामी टाळण्यासाठी, संबंधी वृत्तपत्रावर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. स्वाभाविकपणे संबंधी शिक्षक व शिक्षिकेला संरक्षण देऊन, त्यांच्यामार्फत ही कारवाई करणे आवश्यक होते. संस्थेने ह्या कामी पुढाकार घेऊन खर्चवेचासह सर्व तयारी करून संबंधी शिक्षकांकरवी वृत्तपत्रावर दावा करविला. तो यशस्वी करण्यासाठी कायदाविषयक सर्व बाबी काटेकोरपणाने सांभाळून हा खटला यशस्वी करून दाखविला. सांगली शहरात संबंधी वृत्तपत्र हे पीत वृत्तपत्र (यलो जर्नल) म्हणून जनता ओळखत असल्याने, संस्थेने ह्या वृत्तपत्राला अद्दल घडविली म्हणून अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी संस्थेचे कौतुक केले. परंतु सर्वात आश्चर्याची गोष्ट ही की, स्वत:ला विद्याविभूषित म्हणविणारी माणसे शहाजोग समजून आपणच पुरोगामीत्वधुरीण आहोत, असे मानू लागली.

शिक्षकी पेशामध्ये एकत्र वावरत असल्याने, सध्याच्या जमान्यात मानवसुलभ अशा काही गोष्टी घडल्यास संस्था त्याकडे अुपेक्षेने पाहते. मात्र त्या गोष्टींमुळे विद्यार्थी मनावर कुसंस्कार होणार नाहीत अगर शिक्षकांचेबद्दल त्यांच्या मनांत अनादराची भावना निर्माण होणार नाही, एवढा किमान विवेक शिक्षणक्षेत्रात असावा. ह्यापलीकडे अशा प्रश्नांबाबत संस्थेने कधीच असहिष्णू धोरण ठेवलेले नाही. अपेक्षा अशी होती की, शिक्षक म्हणविला जाणारा माणूस, त्यास संस्थेने दिलेल्या वागणुकीचा समंजसपणाने विचार करून रास्त भूमिकेवर येईल! प्रत्यक्षात मात्र असे दिसून आले की, बेजबाबदार वागणूक हा आपला हक्क आहे आणि आपल्या पुरोगामी विचारसरणीचे ते द्योतक आहे, असा सोयीस्कर समज ह्या मंडळीने करून घेतला. एवढेच नव्हे तर, कृतघ्नपणाचा कळस म्हणून पुढे एके प्रसंगी, संस्थेच्या विरुद्ध अपप्रचार करून संस्थेला हरेक प्रयत्नांनी त्रास देण्याचाही प्रयत्न केला. संस्थेच्या इतिहासातील ते एक मोठेच स्मरणीय प्रकरण असल्याने ते सविस्तरपणे देणे अप्रस्तुत नाही.

●●●

## तांत्रिक माध्यमिक शिक्षण विभाग

संस्थेच्या माध्यमिक शाळेचे, तांत्रिक माध्यमिक शाळेत रूपांतर करण्याचे ठरल्यानंतर पहिली दोन वर्षे - म्हणजे इयत्ता आठवी व नववी या दोन वर्गांचे -क्रमश: तांत्रिक वर्गात रूपांतर झाले. सरकारने ह्या विभागाला अनुदान दिले नाही. त्या योजनेच्या स्थिरस्थावर होण्याचा आणि विकासाचा सर्व खर्च संस्थेला करावा लागला.

आय.टी.आय.सदृश तांत्रिक शिक्षण अभ्यासक्रम आमच्याकडे क्रमश: बंद करीत आणला. त्या विभागासाठी संस्थेच्या नोकरीत असलेला शिक्षकवर्ग माध्यमिक शाळेतही तांत्रिक शिक्षण विषयांचे काम करीत असे. दक्षिण सातारा तांत्रिक शिक्षणसंस्था ही पूर्वी वेगळे काम करीत असे. तिची उद्योगशाळा वखारभागातील एका जुन्या इमारतीत होती. अर्थात हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक अभ्यासाला ही उद्योगशाळा खूपच लांब पडत असे. तिचे अंतर्गत स्वरूपही शैक्षणिक दृष्ट्या फारसे चांगले नव्हते. पुढच्या दोन वर्षांत आमच्या माध्यमिक शाळेतील तांत्रिक शिक्षणक्रमाचे विद्यार्थी शालांत परीक्षेला बसणार; त्यांच्यासाठी संस्थेची उद्योग शाळा माध्यमिक शाळेच्या जवळपास असणे आवश्यक होते. यासाठी नव्या क्रीडांगणाच्या पूर्व सरहद्दीवर सुमारे पाच हजार चौरस फूट क्षेत्राची उद्योगशाळा बांधण्याचा निर्णय घेतला. त्या इमारतीस जोडूनच एक हजार चौरस फुटांची लोहशाळा बांधण्याचे ठरले.

माधवनगरचे शेठ रतिलाल विठ्ठलदास गोसलिया यांनी मूळच्या तांत्रिक विभागाला बारा हजार रुपयांची देणगी देऊन आपले नाव दिले होते. त्याशिवाय महाराष्ट्र सरकारने दिलेले चाळीस हजार रुपये व संस्थेने जमविलेले पन्नास हजार रुपये, अशा एकूण नव्वद हजार रुपयांची जुळणी होताच तो प्रकल्प हाती घेण्यात आला. भूमीपूजनाचा कार्यक्रम वसंतरावजी(दादा) पाटील व महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष त्र्यं.शि.भारदे ह्या उभयतांच्या हस्ते साजरा झाला. भारताचे माजी अर्थमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी त्या इमारतीची कोनशिला बसविली, तर एस.एम.जोशी यांनी पहिली वीट चढविली. त्यानंतर अल्पावधीतच, सांगलीच्या इंजिनियरींग कॉलेजचे माजी प्राचार्य केळकर यांनी पहिली कैची चढविली. इतक्या साऱ्या शुभ घटना एकामागून एक घडत गेल्याने ह्या कामाची पूर्तता होण्यास विलंब लागणे शक्यच नव्हते. १९६७ साली माजी केंद्रीय रेल्वेमंत्री स.का.पाटील यांच्या शुभहस्ते या भव्य उद्योगशाळेचे उद्‌घाटन झाले.

या उद्योगशाळेच्या बांधकामाचा एकूण खर्च ८७हजार रुपये झाला. उद्योगशाळेतील यंत्रसामग्री व इतर अवजारे यांची किंमत एक लाखादरम्यान आहे. त्यात महाराष्ट्र सरकारने इमारत व यंत्रसामग्रीसाठी दिलेले अनुदान ८५हजारांचे असून, संस्थेने घातलेला निधी सुमारे एक लाखांचे घरात आहे. दुय्यम शाळेच्या तांत्रिक शिक्षण विभागाला लाभलेल्या आधुनिकतेमुळे शालांत परीक्षेच्या तांत्रिक विभागाचे केंद्रही संस्थेमध्ये चालू आहे.

या उद्योगशाळेतच ग्रामोद्योग मंडळाकडून मिळालेल्या १२ हजार रुपयांच्या आर्थिक साहाय्यामुळे कागद व साबण निर्मिती या हस्तव्यवसायांच्या शिक्षणक्रमांची सोय करण्यात आली. हे शिक्षण विद्यार्थ्यांना एक छंद म्हणून उपयुक्त ठरावे एवढीच अपेक्षा होती. जीवनसाधन देणारा एक व्यवसाय म्हणून ह्या शिक्षणाचा कितपत उपयोग होईल ह्याबद्दल आम्ही फारसे आशावादी नाही; पण एक छंद या दृष्टीने अभ्यासक्रमाकडे पाहिल्यास त्याची उपयुक्तताही नाकारता येणार नाही. शास्त्र विषयाचे शाळेचे दोन शिक्षक बी.टी.वाळवेकर व व्ही.ए.परांजपे या उभयतांना संस्थेने खादी ग्रामोद्योग केंद्रामधून प्रशिक्षित करवून आणले, आणि त्यांच्या हाती त्या छंदशिक्षणाची सूत्रे दिली.

●●●

## सांगलीचे राजेसाहेब व संस्था

संस्थानी अंमलात श्रीमंत राजेसाहेबांची आमच्या संस्थेकडे पाहण्याची दृष्टी फारशी सहानुभूतीची नव्हती. मुख्य कारण म्हणजे आमच्या संस्थेतील काही मंडळींचा राष्ट्रीय चळवळीशी येणारा संपर्क हे असावे. दुसरी गोष्ट म्हणजे नृपांगणामध्ये जे खलपुरुष असत ते स्वार्थाने संस्थेबाबत गैरसमज निर्माण होईल अशा गोष्टी श्रीमंतांचे कानावर जाणीवपूर्वक घालीत असावेत; अशीही एक रास्त शंका आम्हास येत होती. त्यावेळच्या राजदरबारी प्रवेश मिळविण्यासाठी जी उसनी शालीनता आणावी लागे तीही आपल्या उसळत्या वयोमानाप्रमाणे आमच्या कोणात नसल्याने राजेसाहेबांचा आमच्याबद्दलचा दृष्टिकोण स्वाभाविकपणे फारसा सहानुभूतीचा नव्हता.

संस्थानच्या विलीनीकरणानंतर मात्र परिस्थितीत बदल घडू लागला. स्वतंत्र भारताच्या सरकारातील बडी बडी माणसे संस्थेकडे येऊ जाऊ लागली. राजकीय धुरीणांबरोबरच धार्मिक व सामाजिक क्षेत्रांतील ठळक माणसेही संस्थेला गाठीभेटी देऊ लागली. अशा प्रसंगी राजेसाहेबांना संस्था आमंत्रण देई. अशा प्रसंगाच्या निमित्ताने राजेसाहेब संस्थेला भेट देऊ लागल्याने, संस्थेबद्दलचा त्यांचा जुना दृष्टिकोण पालटू लागला. त्यांनी क्रीडांगणाबाबत बहुमोल सहकार्य दिले, ते याआधी नमूद केलेच आहे.

क्रीडांगणाचा मालकी हक्क संस्थेकडे देताना राजेसाहेबांची अशी कल्पना होती की, नगरपालिकेच्या ताब्यात असलेली ती जागा आपण जरी संस्थेला विकली तरी, नगरपालिका जागेचा कब्जा संस्थेला सुखासुखी कधीच देणार नाही. शिवाय सदर जागा विकण्याचा अधिकारही नाकारण्यास कमी करणार नाही! अर्थात श्रीमंतांनी संस्थेला यासंबंधी तशी सूचना दिली होती. तरीही संस्थेने ती जागा तर खरेदी केलीच, पण कब्जाही घेण्यात यश मिळविले. आमच्या यशाची खरी गुरुकिल्ली अशी होती की, सांगली शहरातील सर्व खुल्या जागांवर गणपती संस्थानची मालकी दाखविणारा कायदा स्वातंत्र्यापूर्वी -म्हणजे १९४०साली -संस्थानने सम्मत केला होता; संस्थानच्या विलीनीकरणानंतर तत्कालीन मुंबई सरकारने ठराव करून या कायद्यास संमती दिली होती. सदर ठराव आमच्या प्रकरणाच्या निमित्ताने न्यायालयात सादर केला गेला, व त्या अनुषंगाने, खुली जागा मालकी हक्काने विकण्याचा अधिकार गणपती संस्थानला असल्याचे सिद्ध झाले. संस्थेने या कामी केलेली खटपट व मिळविलेले यश ही बाब राजेसाहेबांना नि:संशय कौतुकाची वाटली. यामुळे शहरातील अनेक खुल्या जागांचा प्रश्न सुटल्यासारखा झाला. राजेसाहेबांनी याबाबत संस्थेला अंत:करणपूर्वक धन्यवाद तर दिलेच, पण संस्थेची आणखी काही अपेक्षा असल्यास तशी विचारणा केली.

●●●

## विकास घरबांधणी सहकारी संस्था

संस्थेतील सेवक व संस्थेला साहाय्यभूत ठरणारे काही कायकर्ते यांच्यासाठी घरबांधणीबाबत काही योजना करावी असा विचार संस्थेच्या मनात घोळत असतानाच राजेसाहेबांच्या या पृच्छेमुळे त्यासंबंधी योजनेला चालना मिळाली.

संस्थेच्या आरंभकाळात इमारतीसाठी म्हणून एस.टी.स्टँड ते सिव्हिल हॉस्पिटल यादरम्यान सुमारे दोन एकर जागा खरेदी केली होती. स्टँडकडून सिव्हिल हॉस्पिटलवरून जाणारा जो नवा प्रशस्त रस्ता आज तयार झाला आहे, त्या रस्त्यालगतच ही जागा आहे. संस्थेने नंतर गावातच आपली इमारत बांधल्याने ही जागा रिकामीच पडून होती. संस्था स्थापन करण्यापासून संस्थेला मूर्त स्वरूप

आणणाऱ्या आजीव सेवा सदस्यांना, ही जागा घरबांधणीसाठी म्हणून धर्मादाय आयुक्त यांच्या परवानगीने, सरकारने ठरविलेल्या किंमतीस विकत देण्यात आलेली होती. या जागेच्या लगत गणपती संस्थानच्या मालकीचीही दोन एकर जमीन होती. गणपतीची ही जागा संस्थेस मिळाल्यास एकूण सुमारे चार एकर जमीन होणार होती; आणि त्यामुळे शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या अनेकांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध होणार होती. वस्तुत: आजीव सदस्यांनी पूर्वी विकत घेतलेली जागा ही त्यांच्या वैयक्तिक मालकीची होती. तीमध्ये आता प्लॉट पाडून विकल्यास नव्या जागेत त्यांची घरे फुकट बांधून होण्याची शक्यता असती. तरीसुद्धा सेवकांच्या सोयीसाठी आपली जमीन गणपती संस्थानच्या जमिनीत मिसळून देण्यास व अन्य सेवकांची आपल्याबरोबर सोय करून देण्यास या मंडळींनी संमती दिली, ही एक महत्त्वाची बाब आहे. अलीकडे निवडणुकीसाठी उपवास करणाऱ्या मोहाडीकर नावाच्या शिक्षकाने, या शिक्षणसंस्थेला त्यागाचे व समाजवादाचे धडे शिकविण्याचे प्रयत्न करावेत, याइतका राजकीय निलाजरेपणा दुसरा असू शकत नाही, तो शिक्षणक्षेत्रात असावा ही त्याहूनही अधिक 'कौतुकाची' बाब आहे.

शहरातील वाढत्या किंमतीच्या काळात, गणपती संस्थानची ही जमीन किमान लाख रुपये मोलाची असताना संस्थेच्या घरबांधणीसाठी राजेसाहेबांनी केवळ आठ हजार रुपयांस दिली. या कामी अन्य कोणाची लुडबूड होऊ नये म्हणून संस्थेचे कार्यवाह म्हणून मलाच मुखत्यारपत्र देऊन टाकले. या कामाची पूर्तता होण्यापूर्वीच श्रीमंतांचे दुर्दैवाने निधन झाले. तथापि त्यांच्या गादीवर नव्याने अधिकारारूढ झालेल्या श्रीमंत राजेसाहेबांनी फिरून मुखत्यारपत्र मलाच दिल्याने हा व्यवहार पुरा करणे शक्य झाले. या कामी नव्या राजेसाहेबांच्या मातोश्री श्रीमंत सौ.पद्मिनीराजे पटवर्धन यांनी आस्था व आपुलकी दाखविली, तीमुळेच ह्या संस्थेची सेवकांसाठी घरबांधणी योजना अस्तित्वात येऊ शकली.

या चार एकर जमिनीत प्लॉटस् पाडणे, त्यांना मान्यता मिळविणे, रस्ते वगैरे करणे... या साऱ्या बाबींची पूर्तता झाल्यानंतर या जागेचे भूमीपूजन श्रीमंत सौ.पद्मिनीराजे पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आले. या सर्व पूर्ततेसह असलेले प्लॉटस्, त्यावेळी दर चौरसफुटास अडीच-तीन रुपये दराने बाहेर विकले जात. संस्थेच्या सेवकांना ते एक रुपयास तीन चौरसफूट ह्या दराने देण्यात आलेले आहेत. शाळेच्या आरंभकालापासून असलेले दोन शिपाई व आर्थिकदृष्ट्या फार कमकुवत असलेले दोन शिक्षक अशा चौघांना प्लॉटस् मोफत देण्यात आले. शिवाय प्राथमिक खर्चासाठी म्हणून त्यांना एक हजार रुपये प्रत्येकी रोख देण्यात आले आहेत.

या शिक्षणसंस्थेला वृत्तपत्रांतून धमक्या व दूषणे देणाऱ्या शिक्षण संघांच्या पदाधिकाऱ्यांचे मूल्यमापन या पार्श्वभूमीवर कसे करावे हा प्रश्न आहे! शिक्षण संस्थेतील सेवकांना याइतके अधिक संरक्षण अन्य कोणत्या संस्थेने दिले असेल असे आम्हाला मुळीच वाटत नाही. याच संस्थेच्या सौजन्याने जन्मास आलेल्या 'राष्ट्रशक्ति' वृत्तपत्राने शिक्षकांच्या खोट्या कैवाराने संस्थेविरुद्ध जे गरळ ओकले ते पाहिल्यानंतर चालू जमान्यातील पुरोगामीत्व म्हणजे काय चीज आहे हे कळणे दुरापास्त होते! महात्माजींच्या व साने गुरुजींच्या पश्चात ढोंगी पुरोगाम्यांची महाराष्ट्रात जी एक लागण झाली, तीमुळे शिक्षणक्षेत्राचे जितके नुकसान झाले आहे तितके अन्य कशाने झाले असेल असे वाटत नाही.

●●●

## तांत्रिक शिक्षणाची मीमांसा

तांत्रिक शिक्षणाच्या व्याप्तीबाबत संस्थेने आपले एक सुस्पष्ट निवेदन महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागाकडे पाठवून दिले होते. तांत्रिक शिक्षणाबाबतची संस्थेची भूमिका या निवेदनामध्ये विस्तृतपणे मांडण्यात आली. स्वतंत्र भारतातील व्यवसायांचे क्षेत्र व्यापक बनत चाललेले आहे. विद्युतीकरणाला चालना मिळालेली आहे. व्यवसायांचे यांत्रिकीकरण झपाट्याने होत आहे. लहान सहान उद्योगधंदे ग्रामीण भागात नेऊन पोचविण्याची खटपट चालू आहे.

सर्वच विद्यार्थी विश्वविद्यालयीन कक्षेपर्यंत जाऊन पोहोचतील, आणि विविध शाखांच्या अत्युच्च पदव्या संपादन करतील ही अपेक्षा सर्वस्वी चुकीची व अवास्तव असते. शालान्त परीक्षेचा उंबरठा ओलांडून बाहेर पडणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने तांत्रिक शिक्षणाची व्याप्ती ठरविली जावी अशी संस्थेची धारणा आहे. त्याचबरोबर जिल्हानिहाय कोणते व्यवसाय उपलब्ध आहेत हे पाहून त्या व्यवसायांना उपयुक्त असा कुशल व्यवसायिक तयार करण्यासाठी, तांत्रिक शिक्षणात योग्य विषयांचा समावेश केला जावा. हे जिल्हा पातळीवर ठरविले गेले पाहिजे, अशी संस्थेची भूमिका आहे. तांत्रिक शिक्षणाबाबत राज्यभर सरसकट एकच एक साचेबंदपणा न ठेवता उपलब्ध स्थानिक व्यवसाय, त्याला लागणारा कुशल कारागीर, या व्यवसायांत गुंतविले जाणारे मनुष्यबळ यांचा सापेक्ष विचार करून तांत्रिक शिक्षणाची आखणी झाली पाहिजे. संस्थेने सादर केलेल्या त्या निवेदनाचा, सरकारी पातळीवर शिक्षणविषयक नव्या धोरणाचा जो पुनरुच्चार झाला आहे त्यामध्ये उपयोग केलेला दिसून येईल.

संस्थेने दाखल केलेले ते निवेदन असे -

श्वेतपत्रिका व तांत्रिक शिक्षण

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण खात्याने व प्रामुख्याने शिक्षणमंत्र्यांनी सादर केलेली श्वेतपत्रिका, तांत्रिक शिक्षणाबाबत फारच त्रोटक मतप्रदर्शन करीत आहे. १७-१पासून १७-६पर्यंत अवघ्या दोन पानांमध्ये, शिक्षणमंत्र्यांनी तांत्रिक शिक्षणाबाबत आपले विचार मांडले आहेत. त्या सहा मुद्यांचा संपूर्ण विस्तार केल्यानंतर जो आशय प्रगट होण्याची शक्यता आहे, त्या अनुरोधानेच मतप्रदर्शन करणे आवश्यक ठरणार आहे.

याबाबतचा ध्येयवाद उच्चारताना शिक्षणमंत्र्यांनी असे गृहीत धरले आहे की, सामान्य शिक्षणाच्या सर्व शाळांमधून कामाचा अनुभव येण्याच्या दृष्टीने तांत्रिक शिक्षणाची काही जोड क्रमशः देण्यात येईल. याचा अर्थ असा करता येईल की, पुढील २० वर्षांच्या काळात सामान्य व तांत्रिक अशी शिक्षणाची विभागणी न राहता सर्व शाळांमध्ये सामान्य शिक्षणाबरोबरच तांत्रिक शिक्षण उपलब्ध करण्याचा सरकारचा मानस आहे. ८ ते १० या इयत्तांमधून संकलित अभ्यासक्रम देण्यात येणार आहे. या इयत्तांअखेर शिक्षणक्रम पुरा करून थांबणाऱ्या विद्यार्थ्यांना, व्यावसायिक उमेदवारी पूर्ण करण्याची संधी मिळण्यासाठी त्याचा उपयोग आहे. हे ग्राह्य मानता यावे, व व्यावसायिक क्षेत्रांत पदार्पण करून चरितार्थाचे साधन उपलब्ध करून घेण्याचा मार्ग खुला झाला असा विश्वास त्यांना वाटावा, असेही असेल.

उच्च माध्यमिक शाळेच्या क्षेत्राचा विचार करताना शासकीय श्वेतपत्रिकेने असे ग्राह्य धरले आहे की, अशा शाळांतील तांत्रिक विभागांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राच्या सहकार्याने जावे लागेल. व्यवसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांची उभारणी केली जात असताना, या शिक्षणक्रमांतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी, चरितार्थ चालविण्यासाठी समर्थ असला पाहिजे हे गृहीत सत्य आहे. हा ध्येयवाद चुकीचा नसला तरी आज तो प्रत्यक्षात आणत असताना ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्यांचे निराकरण करण्याचा मार्गही उपलब्ध झाला पाहिजे. यासाठी आवश्यक ती खंबीरता या ध्येयवादाच्या पाठीशी पाहिजे हे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने तांत्रिक शिक्षणातून तयार झालेल्या विद्यार्थ्यांची आज जी नवीन समस्या निर्माण झाली आहे, तिचा विचार होणे आवश्यक आहे.

पंचवार्षिक योजनांनी जो विकास कार्यक्रम आखला, त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या शिक्षित माणसांची गरज निर्माण झाली. ही गरज किती काळ टिकेल, व योजनांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्या प्रकल्पांमधून किती माणसे कामात राहू शकतील, याचा विचार करायला हवा. त्या अनुरोधाने तांत्रिक शिक्षणाच्या विकासावर भर दिला गेला असता तर, आज तांत्रिकदृष्ट्या शिक्षित झालेल्या तरुणांवर बेकारीची आपत्ती आली नसती; आणि तांत्रिक शिक्षणावरील जनतेचा विश्वासही ढासळला नसता.

यातील दुसरा एक महत्त्वाचा भाग म्हणजे, तांत्रिकदृष्ट्या शिक्षित होऊ इच्छिणाऱ्या युवकांचे मत-परिवर्तन हा होय. या विभागांत शिक्षण घेणारा विद्यार्थी सामान्यपणे शिक्षणक्रमाच्या उच्च श्रेणीतील असतो. त्याचा एकूण अभिनिवेश असा असतो की, शिक्षणक्रमातून बाहेर पडल्यानंतर आपल्याकडे हुकमत गाजविण्याचा -अतैव साहेब बनण्याचा -प्रसंग येणार आहे! हात काळे करून अगर अंगावर निळे कपडे घालून यंत्राशी झुंज घेणारा, दगडा-मातीशी समरस होणारा असा युवक, या शिक्षणातून बाहेर पडायला हवा. तसे न घडता तो काम असूनही बेकार राहात आला आहे. जीवनविषयक चुकीच्या काही धारणा त्याने आत्मसात केलेल्या असतात. कपडालत्ता, राहण्याची जागा, सुखविलासांची अन्य साधने यांखेरीज निराळे असे काही जीवन आहे हे तो मानण्यास तयार नाही. गरज आणि चैन यांमधील अंतर पुसून गेल्याने काही विशिष्ट प्रतीचे जीवन साध्य झाले तरच पाहू; अन्यथा बेकार राहावयाचे! अशी मानसिक धारणा असल्याने तांत्रिक शिक्षणाचा उपयोग होईनासा झाला आहे.

मानवी सामर्थ्य अमर्याद आहे. त्यास किंचित तांत्रिक जोड देऊन, संपूर्ण भारताची उभारणी करणारे तांत्रिक शिक्षण निर्माण व्हायला हवे. त्यासाठी गांधीवाद व यंत्रवाद यांचा मेळ घालणारे तांत्रिक शिक्षण उपलब्ध होणे आवश्यक आहे. सामान्य दुय्यम शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांचा मेळ घालण्याची शिक्षणमंत्र्यांची कल्पना नि:संशय सयुक्तिक आहे; पण हा मेळ घालीत असताना जे क्षेत्र विचारात घेतले जावयाचे ते अगदी मर्यादित असले पाहिजे हे उघड आहे.

वानगीदाखल सांगली जिल्ह्याचा विचार केला तर असे दिसून येईल की, या विभागात जे उद्योगधंदे आज कार्यक्षमपणे काम करीत आहेत, व त्या उद्योगधंद्यांमध्ये जी रोजगार शक्यता (एम्प्लॉयमेंट पोटेन्शिअल) आहे, तिच्या अनुरोधाने या विभागांतील तांत्रिक शाळांकडे पाहण्यात यावे. दुसरा विचार म्हणजे तंत्रशास्त्र शिकणारा विद्यार्थी 'साहेब' या सदरात न पडता 'कसबी कर्मचारी' या सदरात पडू इच्छिणारा पाहिजे. आज सरकारनिर्मित जी उद्योगशिक्षण केंद्रे स्थापन झाली आहेत, त्यांमधून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी शिक्षक बनण्याच्या मनोवृत्तीत आहे. आणि उलट ज्यांनी स्वतंत्रपणाने छोटे छोटे व्यवसाय चालू केले आहेत ती माणसे, औद्योगिक शिक्षणक्रमाचा कोणताही शिक्का न घेतलेली आहेत! हे असे का घडते आहे याचा विचार शैक्षणिक पातळीवर झाला पाहिजे. मनोवृत्तीचा बदल हा जो त्यावरचा एक उपाय आहे, तो ग्राह्य मानला पाहिजे. बाहेरच्या जगात सुतारासाठी दैनिक दहा रुपये हजेरी (रोजगार) उपलब्ध असता, सुतारकाम शिक्षणाचे सरकारी प्रशस्तीपत्रक हाती असणारा विद्यार्थी बाहेरील संधीचा लाभ उठवू शकत नाही हे सत्य आहे. त्याचे कारण त्याच्या मनोवृत्तीमध्ये आहे. पाश्चात्य राष्ट्रांत तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत ही मनोवृत्ती दिसत नाही. त्याचा परिणाम म्हणजे तरुण पिढीस तिथे कामाची उणीव दिसत नाही. आपल्याकडे कामाला वाव आहे पण माणसे मिळत नाहीत. ती माणसे आहेत, पण कामसू मनोवृत्तीच्या अभावी इच्छुक माणूस व काम यांची गाठ पडत नाही अशी अवस्था आहे.

मनोवृत्तीचा बदल आणि स्थानिक क्षेत्रांतील औद्योगिक गरजा या दोहोंचा साक्षेपाने विचार होऊन, शैक्षणिक कार्यक्रमांची फेरजुळणी झाली पाहिजे. याबाबत काही खंबीर भूमिकाही घेतल्या गेल्या पाहिजेत.

आमच्या संस्थेचा अनुभव या ठिकाणी नमूद करणे अत्यावश्यक वाटते. कोयना विद्युत् प्रकल्प कार्यवाहीत आल्यानंतर शेतीला पाणीपुरवठा, गावची दिवाबत्ती वा अन्य विद्युत उपकरणे या संदर्भात विद्युत-शास्त्रातील कसबी कामगारांना मोठाच वाव निर्माण झाला. यामुळे आमच्या तांत्रिक शिक्षण विभागाला विद्युतशास्त्र शिक्षणाची जोड

देण्याचा निर्णय संस्थेने घेतला. शैक्षणिक पातळीवर विद्यार्थ्यांना विद्युतशास्त्र व विद्युत्‌तंत्र याची जोड देण्यात आल्यानंतर, व आवश्यक त्या कसोट्यांमधून त्यांना पात्र ठरविण्यात आल्यानंतर, या मंडळींना ग्रामीण भागाची गरज भागविता आली असती; पण तो अभ्यासक्रम फोल ठरविण्याची कामगिरी सरकारी बांधकाम खात्याने पार पाडली! शहरी विभागात वावरणाऱ्या विद्युत कंत्राटदारांना जे एक संरक्षण प्राप्त झाले आहे त्यामुळे ही अडचण निर्माण झाली. त्यांच्या हाताखाली उमेदवारी करण्याचे बंधन असल्याने या शिक्षणक्रमाचा तादृश उपयोग झाला नाही. कंत्राटदारांना विनावेतन काम करणारे मजूर मिळावे, व शिवाय त्यांनी त्यांचे प्रशस्तीपत्र मिळविण्यासाठी बिदागी द्यावी असा प्रघात रूढ झाला आहे. स्वाभाविकपणे तांत्रिक शिक्षण विभागात विद्युतशास्त्रातील कसबी कामगार निर्माण करण्याचा आम्हाला अधिकार असून नसल्यासारखा झाला; आणि अप्रत्यक्षपणे ग्रामीण भागातील विद्युतविषयक गरजांची नाडी शहरी कंत्राटदारांच्याच हाती राहिली! सुस्थितीत असलेल्या कंत्राटदारांना अधिक सुस्थिती प्राप्त व्हावी व ग्रामीण भागातील तरुणांनी इच्छा असूनही अपात्र ठरावे अशी ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संस्थेला ही शाखा बंद करावी लागली.

विद्युतशास्त्र, विणकाम, यंत्राने उत्पादन करणारे व्यवसाय, साखर कारखाने, शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे, कापडावरील रंगकाम, छपाई असे अनेक व्यवसाय या भौगोलिक विभागात उपलब्ध असून त्यांमध्ये शिक्षित ग्रामीण भागातील मुलांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. अनेक बांधकामे चालू आहेत. त्यामध्ये गवंडी, सुतार यांची उणीव आहे; किंबहुना यातील कसबी कामगारही दुर्मीळ झाले आहेत! या संदर्भात विभागीय तांत्रिक शाळा विशिष्ट अभ्यासक्रमाने चालविल्या गेल्यास त्यांची उपयुक्तता वाढणार आहे. वृत्तीबदल व रोजगारी शक्यता यांच्या अनुरोधाने कार्यवाही करण्याचे स्वातंत्र्य तांत्रिक शिक्षणसंस्था चालविणाऱ्या संस्थांना दिले गेले पाहिजे. सध्याची स्थिती क्लाईव्हच्या दुहेरी राज्य व्यवस्थेप्रमाणे झाली आहे. संस्थांना स्वातंत्र्य नाही आणि सरकार जबाबदारी पत्करण्यास तयार नाही! शिक्षणक्रमात रस असल्याशिवाय शिक्षणसंस्था चालवण्याचा उपक्रम केला जातो, हा ग्रह प्रथम दूर झाला पाहिजे.

शिक्षणक्रमाच्या संकल्पित चार कक्षांमधून क्रमश: गळत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा जो उल्लेख श्वेतपत्रिकेत आहे तो अचूक असून, या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेण्याजोगे आहे. पहिल्या दोन कक्षांमधील मुलांचा वर्ग क्रमश: नष्ट होत जाईल ही अपेक्षा रास्त असली तरी ती वस्तुस्थिती मात्र नाही. मुंबईसारखे एखादे शहर सोडल्यास अन्य शहरांतून व ग्रामीण भागांतूनही उपाहारगृहे, किराणा मालाची दुकाने, बूटपॉलीश, एस.टी.स्टँडवरील किरकोळ हमाली, पिठाच्या चक्क्या, वृत्तपत्रे वितरण, गारेगार विक्री -फार काय कॉटन बेटिंग - 'अशा व्यवसायांत मुलांची झालेली भरती आता सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने कमी झाली आहे' -असे जर कोणी सांगत असेल तर ते खोटे बोलत आहेत, अगर समाजाकडे डोळे उघडून पाहात नाहीत असे म्हणणे भाग आहे! डिकन्सने आपल्या कादंबऱ्यांत रंगविलेली मुलांची चित्रे अठराव्या व एकोणिसाव्या शतकातही इंग्लंडमध्ये दिसत होती. विसाव्या शतकात ती हिंदुस्थानात दिसत आहेत. याचे कारण या बालकांची व्यवसायिक हौस ही नसून, पालकांची आर्थिक दुर्बलता याला जबाबदार आहे. मुलामुलींचे तुटपुंजे वेतन हा एक प्रापंचिक हातभार मानण्याची पालकांची वृत्ती, व त्यांची आर्थिक दुर्बलता हे दोन्ही नष्ट झाल्याखेरीज या वर्गातील मुले शाळेत आलेली दिसणे शक्य नाही. या मुलांची खरी समस्या शैक्षणिक नसून ती आर्थिक स्वरूपाची आहे.

उरलेल्या दोन कक्षांतील युवकांबाबत जी विधाने श्वेतपत्रिकेत आहेत, त्यांचाही थोडा विचार झाला पाहिजे. याला मार्गदर्शक तत्व म्हणून दिवाण चिमणलाल यांनी जपान दौऱ्याहून परत आल्यानंतर जो अहवाल सादर केला, त्याकडे चिकित्सेने पाहिले पाहिजे. जपानमधील तांत्रिक पण विकेंद्रित उद्योगधंद्यांचा आदर्श भारतीय अर्थव्यवस्थेला पूरक ठरेल असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे. आता विद्युतशक्ती उपलब्ध झाल्याने विकेंद्रित उद्योगधंदे ग्रामीण भागांतूनही चालू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही धंद्यांच्याबाबत ही गोष्ट प्रत्यक्षातही आली आहे.

कापडधंदा हा विकेंद्रित धंदा म्हणून उल्लेखण्याइतपत पसरला आहे. या स्वरूपात औद्योगिक विकेंद्रीकरणाचा कार्यक्रम अस्तित्वात आला तर, सामान्य व तांत्रिक अशा दुहेरी शिक्षणक्रमांतून बाहेर पडणाऱ्या युवकाला व्यवसायिक क्षेत्र अनुकूल झाल्यावाचून राहणार नाही. पण उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण ही बाब काही शिक्षणाच्या कक्षेत येऊ शकत नाही. म्हणूनच सरकारची आर्थिक व औद्योगिक धोरणे निश्चित झाल्यानंतर त्याला अनुसरून शैक्षणिक कार्याची योग्य आखणी करणे शक्य आहे.

शिक्षणाच्या तात्विक आणि आर्थिक अशा दोन बाजू आहेत. शिक्षणाच्या तात्विक बाजूबद्दल मतभेदाला जागा असत नाही, पण शिक्षणाच्या आर्थिक बाजूचा विचार एका ठराविक पद्धतीनेच होईल अशी शक्यता नाही. माणसाला शिक्षणाने स्वत:चा चरितार्थ चालविण्यास समर्थ बनविले पाहिजे, ही आज शिक्षणाची आर्थिक बाजू आहे. भारतीय नागरिकाला चरितार्थाची कोणती साधने उपलब्ध आहेत, व पुढे होऊ शकतील याबद्दलचा विचार हा सरकारच्या आर्थिक धोरणांवर अवलंबून राहणार आहे. यामुळे आर्थिक धोरणाने निश्चित स्वरूप प्राप्त करून घेतल्याखेरीज व्यवसायिक शिक्षणाचा कार्यक्रम आखणे अवघड होणार आहे.

धोरणांची अनिश्चितता आपल्यास कशी भोवते हे पाहणे फारसे अवघड काम नाही. गांधीजी व त्यांचे खास अनुयायी आर्यनायकम् व आशादेवी यांनी व्यवसायिक शिक्षणाचा जो प्रकल्प तयार केला, त्या प्रकल्पातील बेसिक एज्युकेशन 'वर्धा योजना' या नावाखाली राष्ट्रीय शिक्षण योजनेत समाविष्ट झाले. गांधीजींच्या आर्थिक ध्येयवादाचा परिपाक, म्हणून हा शैक्षणिक ध्येयवाद होता. स्वातंत्र्योत्तर काळात गांधीजीप्रणित आर्थिक ध्येयवाद मागे पडून औद्योगिकीकरणाची प्रचंड लाट गांधीजींच्या अनुयायांच्याकडूनच उठविली गेली. शिक्षण क्षेत्रात अवतरलेले गांधीयुग नाममात्र टिकून राहिले, आणि त्यामुळे शिकणारे व शिकवणारे दोघेही त्या विसंगतीने अकार्यक्षम बनून, ध्येयासाठी म्हणून नव्हे तर पोटासाठी काम करीत राहिले. तलम साड्या नेसून काखेत मात्र चरखापेटी वागवणाऱ्या शिक्षिका, हा या विसंगतीचा अस्सल नमुना! वस्तुस्थिती आणि शिक्षणविषयक ध्येयवाद यांच्यामध्ये विसंगती निर्माण न होईल याची काटेकोर दक्षता घेतल्याशिवाय व्यवसायिक-शिक्षणाचे प्रकल्प हाताळणे कठीण आहे.

सामान्य शिक्षण आणि व्यवसायिक शिक्षण असा भेदाभेद न ठेवण्याची व त्याचे शक्यतो एकत्रीकरण करण्याची श्वेत पत्रिकेतील कल्पना नि:संशय अभिनंदनीय आहे. सामान्य शिक्षणाने युवक भिन्नभिन्न ज्ञानशाखांत रस घेऊ लागेल. अज्ञाताची कवाडे उघडून त्यातील भांडार ज्ञात करून घेण्याच्या ईर्षेने भारावून जाईल. व्यवसायिक शिक्षणाने चरितार्थ चालविण्यास तो समर्थ बनेल व सामान्य शिक्षणाने आजन्म विद्यार्थी राहण्याचा प्रयत्न करेल! प्रश्न श्वेत पत्रिकेतील उदात्त ध्येयवादाचा नाही, तो ध्येयवाद प्रत्यक्षात कोण व कसा आणणार याचा आहे! जे कागदावर आहे ते प्रत्यक्षात घडलेले नाही, असा बऱ्याच क्षेत्रांचा आजवर अनुभव आहे.

आतापर्यंतच्या शैक्षणिक अनुभवांत मला एकच पालक खऱ्या अर्थाने पालक म्हणून भेटलेला दिसला. अकरावीमधील माझ्या एका विद्यार्थ्याचा पिता माझ्या भेटीस येऊन म्हणाला, ''माझ्या मुलाचे नाव शाळेतून काढावयाचे आहे.'' मी त्याला उपदेश करण्याचा आव आणून म्हटले, ''मुलगा आता शेवटच्या वर्गात आहे. पास होण्याजोगा आहे, मग त्याचे नाव आताच काढण्यात काय अर्थ?'' ''तो पास झाला म्हणजे 'कॉलेजात जातो' म्हणणार आहे. त्याचा ढंग आताच वाढला आहे. मला तो खर्चात तर पाडेलच पण माझी शेती कूळकायद्यात घालवेल.'' त्या पालकाने अकरावीतून मुलाचे नाव काढले, त्याला पिढीजात व्यवसायात घातले; आज हा मुलगा सामान्य शिक्षण घेऊन शेती व्यवसायात पडल्याने एक सधन शेतकरी म्हणून वावरतो आहे. मला भेटताच तो हसून म्हणतो, ''सर, बाबानी तुमचा सल्ला मानला नाही हे ठीक झालं बरं का!''

आजच्या महाराष्ट्रात सामान्य शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या जास्त असून व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या त्यामानाने खूपच कमी आहे. ज्या ठिकाणी या दोन्ही विभागांची सोय आहे त्यांचे एकत्रीकरण केल्यास

काही समस्या निर्माण होणार आहेत. त्यापैकी पहिली समस्या शिक्षकवर्गाची जुळणी करीत असताना, सध्याच्या पटावरील काहींना कमी करावे लागून नव्यांची भरती करावी लागणार आहे. हे केले जात असताना त्यातून होणाऱ्या तक्रारी हा एक महत्त्वाचा भाग आहे. दुसरी गोष्ट म्हणजे अशा तऱ्हेच्या एकाच शिक्षणसंस्थेत किती भिन्न भिन्न व्यवसायांच्या शिक्षणांची जुळणी करणे शक्य आहे हेही पाहावे लागेल. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना, सामान्य शिक्षणाबरोबरच कोणत्या व्यवसायाचे शिक्षण या संस्थेत मिळू शकेल याबद्दलची संपूर्ण कल्पना पालकांना द्यावी लागेल. पालकांची आवड ही प्रधान ठरेल, पण अनुभवांती विद्यार्थ्यांची आवड विचारात घ्यावीच लागून त्यानुसार पुढे फेरबदल करावा लागेल. आज तांत्रिक विभागांत शिकणारे कित्येक विद्यार्थी तेथून पाय काढून सामान्य शिक्षण विभागाकडे येण्याची धडपड करताना आढळतात.

सर्वात शेवटचा व महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हा कार्यक्रम कार्यवाहीत आणण्यासाठी लागणारा दर्जेदार व ईर्ष्याबाज शिक्षक होय. 'प्रशिक्षणाने हा शिक्षक उपलब्ध होतो' ही कल्पना टाकून देऊन सरकारने शिक्षक हा एक उपजत पिंड असतो हे ओळखले पाहिजे. स्वत:ला शिक्षणकार्याला वाहून घेणारा, आणि चरितार्थाचे साधन म्हणून त्यात येणारा या दोन गटांतील सीमारेषा सरकारने पुसून काढली आहे. स्वत:ला वाहून घेणारे वा घेऊ इच्छिणारे शिक्षक हतबल होऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील शिक्षण विकास गेल्या ८० वर्षांतील परकीय अंमलात द्रुतगतीने घडून आला; याचे एकमेव कारण म्हणजे त्या काळातील शिक्षणसंस्थांची घडण, आणि शिक्षणकार्याला वाहून घेणारी मंडळी हेच आहे. शिक्षणक्षेत्रातील सोवळे हरविले आहे आणि ओवळे सापडत नाही अशी आज अवस्था आहे. श्वेतपत्रिकेतील ध्येयवाद प्रत्यक्षात आणताना शिक्षणमंत्र्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. 'श्वेतपत्रिका मुळासकट उपटून टाका' असे म्हणणारेही आहेत; 'श्वेतपत्रिका बहुजन समाजावर अन्याय करणारी आहे' असे म्हणणारे आहेत, आणि 'विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पातळीचा श्वेतपत्रिकेमधील उल्लेख बहुजन समाजावर अन्याय करणारा आहे' असेही म्हटले जाते. डॉ.कोठारींच्या निवेदनानंतर महाराष्ट्रातील शिक्षणमंत्र्यांनी श्वेतपत्रिका प्रकाशित केली, व भारतीय शिक्षणपद्धतीची वाटचाल निदान महाराष्ट्र राज्यात तरी चालू केली. महाराष्ट्रातील पुरोगामी शिक्षणसंस्था या कामी त्यांना जरूर सहकार्य देतील.

या साऱ्या निवेदनाच्या अनुरोधाने आमच्या शिक्षणसंस्थेने आणखी काही विशेष गोष्टी साध्य केल्या आहेत. संस्थेने विविध कारखानदारीशी घनिष्ठ संबंध जोडले आहेत. ह्या संबंधांमुळे तांत्रिक शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या संस्थेच्या विद्यार्थ्यांना उपजीविकेचे साधन त्वरित प्राप्त होण्याची संधी निर्माण झाली आहे. तांत्रिक शिक्षण विभाग शक्यतो औद्योगिक क्षेत्राशी निगडीत ठेवण्याचा संस्थेचा प्रयत्न म्हणजे ध्येयवाद व परिस्थिती यांची सांगड घालण्याचा प्रयत्न आहे.

●●●

## संस्थेची संस्कारक्षमता

शिक्षणसंस्था संचलनाबाबत संस्थेने शासनाकडे दाखल केलेल्या निवेदनाबाबत विवेचन केले आहे; पण शिक्षणसंस्थांबाबत जो सर्वसाधारण गैरसमज तयार झाला आहे त्याची पार्श्वभूमी विचारात घेणेही अत्यावश्यक आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा विकास ग्रामीण भागांतून विशेषत्वाने झाला पाहिजे हे विचारात घेऊन सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात काही शिक्षणसंस्थांना भरघोस उत्तेजन दिले. शिक्षणसंस्थांनी त्यांच्या हाती दिलेल्या पैशाचा योग्य विनियोग केला अगर नाही ह्याबाबत तक्रारी सुरू झाल्या. विशेषत: ग्रामीण भागात काम करणाऱ्या संस्था शिक्षकांबाबत अन्याय करीत आहेत असा बराचसा गवगवा झाल्याने, ह्या शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी म्हणून सरकारने सूचनावजा काही नियमावली रूढ केल्या. त्यांचा समावेश नव्या अनुदान-संहितेत केला. त्यातून दुय्यम शाळांत शिक्षक-संघटना निर्माण झाल्या. शिक्षक-संघटना आणि संस्था असा संघर्ष न कळत सरकारकडून निर्माण केला गेला.

प्रत्येक स्वायत्त लोकशाही संस्थेवर आपली हुकुमत असावी अशी चटक लागलेल्या नोकरशाहीने शिक्षण क्षेत्रातही याचा पुरेपूर फायदा घेतला. 'शिक्षकांचे एकमेव कैवारी आपण आहोत, शिक्षकांबद्दल आपणास पोटतिडीक आहे, शिक्षणसंस्था जुलमी संस्थानिकांप्रमाणे वागतात' असे प्रवाद प्रसृत करण्याचे कामी शिक्षक-संघटना व अशी नोकरशाही यांचे एकमत झाले. यांमुळे शिक्षणसंस्था शिक्षणकार्यासाठी नसून शिक्षकांचे कोडकौतुक करण्यासाठी आहेत, असा दृढ समज निर्माण होऊ लागला. ध्येयवादशून्य, नफेबाज कारखानदारीच्या सदरात शिक्षणसंस्था येऊन पडल्या. कोणाला मुख्याध्यापक करावे, कोणाची कुवत किती ठरवावी, कोणाला रजा किती द्यावी, या साऱ्या बाबी जणू काही आपल्या अखत्यारीतील आहेत असा आविर्भाव सरकारी यंत्रणेने निर्माण केला. स्वाभाविकच शिक्षणाधिकाऱ्यांच्या कचेरीकडे बेजबाबदार शिक्षकांची वर्दळ वाढली. या वर्दळीमुळे गैरसमज करून घेऊन, ठिकठिकाणी स्वत:ला लोकप्रिय समजून शिक्षणाधिकारी शिक्षणसंस्थांवर दडपण आणू लागले. ज्या शिक्षणसंस्थांच्या व्यवहारात थोडाफार गैरमेळ असण्याची शक्यता होती, त्यांनी स्वसंरक्षणासाठी या प्रथेला उत्तेजन दिल्यामुळे शिक्षणक्षेत्रात आपोआपच विलक्षण अपप्रवृत्ती निर्माण झाली. शिक्षकी पेशालाही धंदेवाईक रूप आले.

ह्या अपप्रवृत्तींशी झगडा देऊन त्यांस नामोहरम करण्याचा प्रयत्न या शिक्षणसंस्थेने एका निवेदनाच्या रूपाने केला. या निवेदनावर अभिप्राय देताना शिक्षणतज्ज्ञ जे.पी.नाईक म्हणतात, ''आपण निर्माण केलेला मुद्दा इतका महत्त्वाचा आहे की त्याच्यावर मी काळजीपूर्वक विचार करत आहे.'' शिक्षणसंस्था ही शिक्षण क्षेत्राचे अनेक विभाग हाताळीत असते. त्यामध्ये दुय्यम शिक्षण हा एक विभक्त घटक मानून सरकारने त्यात हस्तक्षेप करण्याचा जो प्रयत्न केला, त्यामुळे संस्थांच्या घटनांचा वाद पुढे येऊ लागला. शिक्षणक्षेत्रात एक वर्गकलह निर्माण करून शिक्षणसंस्थांना व त्यांच्या कार्याला धंदेवाईक स्वरूप आणण्याला सरकारचा हस्तक्षेप हेच खरे कारण आहे, असाही त्यांतून निष्कर्ष काढता येईल.

कोणत्याही स्वतंत्र देशात लोकशाहीच्या दृष्टीने शिक्षणाने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवावे अशी अपेक्षा असते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भारतीय जनतेला किमान शिक्षित करावयाचे म्हटले तरीसुद्धा, केवळ सरकारला ती गोष्ट करणे अशक्य आहे. शिक्षणकार्याची हौस असणारे समाजसेवक, आणि दातृत्वाच्या भूमिकेतून शिक्षणाला आर्थिक साहाय्य देणारे धनिक अशा संयोगामधूनच शिक्षणकार्य पुढे रेटले जाणार हे उघड आहे. पूर्वकाळात महाराष्ट्रातील शिक्षणसंस्थांची निर्मिती आणि नंतरचे सुमारे एक शतक त्यांनी केलेले कार्य म्हणजे या विधानांचा स्पष्ट पुरावा आहे. आज निर्माण झालेले अखिल भारतीय नेतृत्व हेच या शिक्षणसंस्थांच्या कार्याचा परिपाक आहे. शिक्षणसंस्थांची जडणघडण मोडून काढण्याचा व ती केवळ दुय्यम शिक्षणापुरतीच सीमित करण्याचा प्रयत्न करणे हे सर्वस्वी चुकीचे, व शिक्षणकार्याला मारक आहे.

●●●

## सांगली स्मरणिका

शिक्षणसंस्थेच्या शिक्षणविषयक ध्येयधोरणांचा प्रचार करण्यासाठी, व सर्वसाधारण समाजाशी संस्थेचा संपर्क जोडण्यासाठी एक प्रयत्न या काळात संस्थेने केला. संस्था कार्य करीत असलेल्या नगरीचा परिचय करून देण्याचे काम संस्थेने आपल्या हाती घेतले व 'सांगली स्मरणिका' ह्या पुस्तिकेचे प्रकाशन केले. १९६८च्या जानेवारीमध्ये राष्ट्रीय सभेचे म्हणजे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन सांगलीत भरणार होते. या प्रसंगी अखिल भारतातून अनेक नेते सांगलीस येणार असल्याने त्यांना राष्ट्रभाषेतून आपल्या नगरीचा परिचय करून देण्यासाठी संस्थेने हा प्रकल्प हाती घेतला. काटेकोरपणाने सर्व माहिती उपलब्ध करून सांगली नगरीच्या उद्‌गम-विकासाचे, सांस्कृतिक शैक्षणिक जीवनाचे एक सुंदर चित्र या स्मरणिकेतून निर्माण केले. हे प्रसिद्धीकरण लोकप्रिय व अभिनंदनीय ठरले. या प्रसिद्धीकरणामुळे संस्थेला थोडाफार आर्थिक लाभही झाला हे आणखी विशेष होय.

ह्याशिवाय शैक्षणिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचा प्रसार करण्यासाठी 'संस्कार' नावाचे एक पाक्षिक चालविण्याचा संस्थेने प्रयत्न केला; पण आर्थिक अडचणीमुळे ह्याबाबत मात्र संस्थेला माघार घ्यावी लागली. अनेक लेखकांनी विनामूल्य लेख देण्याचे मान्य केले तरी केवळ वर्गणीदारांच्या उत्पन्नावर हे पत्रक चालविणे अवघड झाले. अशा तऱ्हेचा कायमस्वरूपी आर्थिक बोजा शिक्षणसंस्थेला परवडणारा नसल्यामुळे संस्थेला हे पत्रक बंद करावे लागले.

ह्या दोन प्रकाशनांच्या खटपटींमुळे समाजजीवनातील विविध चळवळींशी संबंधित असणाऱ्या नागरिकांचा परिचय संस्थेतील शिक्षकवर्गाला झाला. माहिती संकलित करण्यासाठी म्हणून शिक्षकांनी मोहीम काढली. शिक्षक हा कोणी समाजविन्मुख प्राणी नसून तो समाजाभिमुख माणूस आहे याची जाणीव प्रयत्नांतून निर्माण झाली. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर होणारे आंदोलन आणि कोयनानगरला झालेला भीषण भूकंप अशी कारणे होऊन कॉंग्रेसचे ठरलेले अधिवेशन जरी होऊ शकले नाही, तरी ह्या निमित्ताने संकलित झालेली माहिती नागरिकांना उपयुक्तच वाटली.

इतक्या प्रयासांनी तयार झालेली ही स्मरणिका थाटामाटाने प्रसिद्ध होणे नंतरच्या कालावधीत का असेना, आवश्यक होते. यासाठी संस्थेने एक कार्यक्रम आयोजित केला. १९६८च्या एप्रिल महिन्यात केंद्रीय नभोवाणी मंत्री के.के.शहा यांच्या अध्यक्षतेखाली 'स्मरणिका' प्रकाशनाचा भव्य समारंभ साजरा झाला. 'सीमाप्रश्न सुटल्याशिवाय कोणाही केंद्रीय मंत्र्याला सांगलीत येऊ द्यावयाचे नाही' असा निर्णय संयुक्त महाराष्ट्र समितीने घेतला होता. तथापि आमची ही संस्था कोणत्याही राजकीय पक्षाच्या निर्णयाला नेहमीच अपवाद ठरत आलेली आहे. शिक्षणसंस्थेचे एकमेव ध्येय, संपूर्ण लोकशाहीला पूरक व सहकार्याचेच असल्याने आपल्या शैक्षणिक कार्याच्या वाढीला जे पूरक ठरेल तेच नेटाने पार पाडण्याचे संस्थेचे धोरण आहे. सांगलीच्या नागरिकांना ते संपूर्ण परिचयाचे झाले आहे. संस्थेच्या लोकशाही दृष्टिकोणाचे रसग्रहण व मूल्यांकन विद्यार्थी व नागरिकांनी केले असल्याने, संस्थेच्या कार्यक्रमांत कधीच व्यत्यय आलेला नाही. अनेक भिन्न भिन्न विचार विद्यार्थी ऐकतात, पण विद्यार्थीदशेमध्ये राजकीय विचारांच्या आहारी जाऊन काही करावयाचे नाही, याची जाणीव या संस्थेच्या विद्यार्थ्यांना पुरेपूर आहे. ह्याबाबत एक उदाहरण मुद्दाम नमूद करीत आहोत.

●●●

## गोवा मुक्ती आंदोलन

गोवा मुक्ती आंदोलनाचे पर्व चालू होते. सांगलीच्या 'गोवा विमोचन समिती'चा मी अध्यक्ष असल्याने फंड गोळा करणे, सत्याग्रहींच्या पाठवणीची जुळणी करणे वगैरे कार्यांमध्ये स्वाभाविकपणे संस्थेचे विद्यार्थीही रस घेत होते. तरीही त्यांच्या दैनंदिन शालेय कार्यक्रमांत कोणताही व्यत्यय येत नव्हता, येऊ दिला जात नव्हता! पोर्तुगीज अत्याचारांच्या व त्यात बळी पडणाऱ्या स्वयंसेवकांच्या वार्ता कानी येत. समितीतील बहुसंख्य लोक हरताळ, निषेध, मोर्चे ह्या ठराविक साच्यांतील आंदोलनकृतींचा अवलंब करून विद्यार्थ्यांना शाळा बंद पाडण्याबाबत व मोर्चात सामील होण्याबाबत आग्रह धरीत. माझा या गोष्टीला पूर्ण विरोध असे. एकदा झगड्यात पदार्पण केल्यानंतर त्या संघर्षाला आणि परिणामांना तोंड दिले पाहिजे,-त्यासाठी दैनंदिन व्यवहार खंडित करण्याचे कारण नाही, अशी माझी धारणा होती. ब्रिटनने युद्धकाळात अशा गोष्टींना वाव दिला असता तर युद्ध जिंकता आले नसते. या संग्रामाबाबत आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी हरताळ मोर्चाची गरज नाही, हे माझे म्हणणे अनेकांना अमान्य होते.

संस्थेचे शैक्षणिक कार्य चालू असताना एके दिवशी निदर्शकांचा एक मोर्चा शाळेपुढे येऊन दाखल झाला व हरताळ पाळण्याबाबत घोषणा देऊ लागला. मोर्चाच्या पुढाऱ्यांना मी एवढेच सांगितले की, ''मी विद्यार्थ्यांना एकत्र बोलावतो. आपण त्यांना जे काही सांगावयाचे आहे ते सांगा. आपल्या भाषणानंतर ते मोर्चात सामील झाले तर मी त्यांना प्रतिबंध करणार नाही. पण दंगल माजवून शाळा बंद पाडण्याचा प्रयत्न तुम्ही न केल्यास बरे!'' ही गोष्ट त्यांनी मान्य केली. यानंतर शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांना एकत्र करण्यात आले. पुढाऱ्यांनी भाषणे केली, पण आमचे विद्यार्थी हरताळ न पाळता फिरून आपापल्या वर्गात शांतपणाने जाऊन बसले. शाळेचा दैनंदिन कार्यक्रम सुरळीतपणे चालू राहिला. या घटनेचा विद्यार्थी जीवनावर पुढे असा परिणाम झाला की, सांगलीतील कोणतीच शाळा अशा हुलुडबाजी निमित्ताने बंद पडण्याचे कायमचे थांबले.

या घटनेवरून एक गोष्ट स्पष्टपणे प्रत्ययास आली की, विद्यार्थीवर्गामध्ये अराजकी प्रवृत्ती निर्माण होऊ नये म्हणून शिक्षणसंस्था कार्यक्षम व दृढ राहिल्यास त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहात नाही. शालेय वातावरणाच्या पाच-सहा तासांमध्ये जे संस्कार घडविले जातात, ते समाज-जीवनातील बाह्य संस्कारांमुळे सहजासहजी पुसले जातात असे नाही! पण यासाठी शिक्षणसंस्था व शिक्षकी पेशातील माणसे यांनी विशाल मनोवृत्तीने व खिलाडू वृत्तीने समाजजीवनातील क्रिया-प्रतिक्रिया कशा स्वीकाराव्यात याबद्दलचे आदर्श स्वत:च्या वर्तणुकीतून प्रस्थापित केले पाहिजेत; म्हणजेच विद्यार्थीमनावर आवश्यक ते संस्कार बिंबल्याशिवाय राहणार नाहीत!

●●●

## अनाधिकार आक्रमणे

शिक्षणसंस्थेवरील अनाधिकार आक्रमणे परतवून लावण्याची संस्थेची धारणा शिक्षणक्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व प्रभावी आहेत. स्वतंत्र लोकशाही देशातील सरकारी यंत्रणा जर आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून, शिक्षणसंस्थांच्या संचालनात अनाठायी हस्तक्षेप करीत असेल तर तो सहन करणे म्हणजे शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्याने मानसिक गुलामगिरी पत्करणे होय, असे आम्ही मानतो. अशा अनाठायी हस्तक्षेपाला आम्ही नेहमीच विरोध केला आहे.

अशा हस्तक्षेपाचे आणखी एक उदाहरण येथे विचारात

घेण्याजोगे आहे. एके दिवशी सांगलीच्या जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून 'अमुक अमुक शिक्षकांना कोणतेही कारण न दाखविता कमी करा' असा तोंडी आदेश अनपेक्षितपणे संस्थेकडे आला. अर्थात् ह्याबाबत संस्थेने कोणतीच हालचाल केली नाही. संस्थेच्या वतीने असे सांगण्यात आले की, जनतेच्या सर्व थरांतून शिक्षणकार्यासाठी आम्ही पैसा गोळा करत असल्याने, कोणताही अपराध न दाखविता एखाद्या शिक्षकाविरुद्ध संस्थेने अशी कारवाई केल्यास संस्थेला जनतेपुढे त्याचा जबाब द्यावा लागेल; तेव्हा कारणमीमांसा मिळाल्याशिवाय संस्थेला अशी हालचाल करणे शक्य होणार नाही. यावर शिक्षणाधिकाऱ्यांचे असे म्हणणे पडले की, संस्थेने निदान तोंडी निरोप कळाल्याचे तरी कळवावे. संस्थेने ही गोष्ट मान्य केली व लिहिले, ''केवळ आपला तोंडी निरोप कळला, तोंडी निरोपावर विसंबून एखादी कृती करणे संस्थेला शक्य होणार नाही.''

या संदर्भात पुढे झालेला पत्रव्यवहार या ठिकाणी उद्धृत करण्याची इच्छा नाही. पण शिक्षणखात्यातील काही अधिकाऱ्यांनी खाजगी आकसातून ही घटना घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता हे स्पष्ट होते. नागपूरच्या वरिष्ठ न्यायालयाने दिलेला एक निर्णय संस्थेने खात्याच्या निदर्शनास आणला व कळविले की, 'याबाबतही असे काही घडल्यास संस्था ह्याला जबाबदार राहणार नाही.' अर्थात् शिक्षणखात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात मुद्दा आल्याने, शिक्षणखात्याने ही गोष्ट फारशी लावून ओढून धरली नाही व संस्थेवरच ही बाब सोपवून टाकली.

'सरकार' म्हणून मानली जाणारी संस्था -जी अशी कार्यवाही करते, तिचे उगमस्थान कोठे आहे हे हुडकण्याचा कसून प्रयत्न ह्या प्रकरणी संस्थेने केला. हे उगमस्थान पुण्यात असून वैयक्तिक आकसामधून हे प्रकरण निर्माण झाले होते, याचा छडा लावला. संस्थेने ह्या प्रकरणी केलेली हालचाल इतकी प्रभावी ठरली की कायदा, न्याय, शिक्षणविषयक मूल्ये, शिक्षकांचे हक्क, संरक्षण, सेवकांना समान वागणूक इत्यादी सर्व कसोट्यांवर घासून निघालेली ही हालचाल लोकप्रिय ठरली आणि लोकादरासही पात्र झाली.

विशेषत: पुढील काळात, शिक्षकांचे कैवारी म्हणून हालचाल करणाऱ्या माणसांची ह्या संस्थेबाबत मूल्यमापन करण्याची कुवत व बुद्धिमत्ता पाहून अचंबा वाटल्याशिवाय राहात नाही. वेंधळ्या लोकमताला बुजून अगर स्वार्थपूर्वक पत्करलेले अज्ञान दाखवून नोकरशाही कसा खेळखंडोबा करते, ह्याचे उत्तम उदाहरण अनेकजण देऊ शकतील. या ठिकाणी आम्ही एवढेच नमूद करतो की, स्वत:च्या निवडणूक प्रचारासाठी खऱ्याखोट्याचा विधिनिषेध न बाळगता आततायी धाकदपटशा दाखविणारे व दडपण आणू पाहणारे शिक्षक, महात्मा गांधी अगर साने गुरुजी यांचा वारसा सांगतात. अशा वेळी त्यांच्या 'साधन शुचित्वाची' किळस आल्यावाचून राहात नाही. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारी यंत्रणेच्या वरिष्ठ पातळीवरील मंडळी त्या माणसांचे कोडकौतुक करतात; व शिक्षणक्षेत्रात अराजक माजविणाऱ्या घटनांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वत: उत्तेजन देऊन फिरून वर आपणच, शिक्षणक्षेत्रात अराजक माजत असल्याबद्दल खेद व्यक्त करतात!! लोकप्रियतेच्या आहारी जाताना, आपण अप्रस्तुत गोष्टींना वाव करून देत आहोत याचा विचार गेली सतत पंचवीस वर्षे डावलण्यात आल्याने या मंडळींना, आता त्यांनीच निर्माण केलेल्या दुष्टचक्रातून सुटण्यास मार्ग राहिलेला नाही. त्यांनी निर्माण केलेली विकृती दुरुस्त करणे आता त्यांच्या हाती राहिलेले नाही. सर्व माणसे काही काळ फसतात पण सर्वांनाच सर्व काळ फसविणे अवघड असते, हे कदाचित काळ त्यांच्या नजरेस आणून देईल!

●●●

## रौप्य महोत्सव

यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीची सुरुवात दोन संस्थांच्या विलीनीकरणापासून -म्हणजे १९३९ सालापासून -झाली असे गृहीत धरले तर संस्थेच्या जीवनाला १९६४ साली पंचवीस वर्षे पूर्ण होतात. स्वाभाविकपणे मनात असा विचार आला की, संस्थेचा रौप्य महोत्सव आयोजित करावा. १९४७ पासून श्री.मोरारजीभाई देसाई यांचा निकट सहवास व मार्गदर्शन संस्थेला लाभलेले असल्याने या समारंभाचे पाहुणे म्हणून त्यांनाच पाचारण करावे असे ठरले. त्यांनीही अगत्यपूर्वक आमच्या आमंत्रणाचा स्वीकार केला. आम्ही रौप्यमहोत्सवाच्या तयारीस लागलो.

संस्थेचा त्रोटक अहवाल छापून तयार करण्यात आला. संस्थेच्या तांत्रिक शिक्षण विभागासाठी लागणाऱ्या उद्योगशाळेची आखणी पूर्ण झालेली असल्याने, मोरारजीभाईंच्या हस्तेच त्या कामाला सुरुवात करण्यात औचित्य होते. केंद्र वा राज्य सरकारमध्ये कोणतेही महत्त्वाचे स्थान नसताना मोरारजीभाई देसाई यांचे भाषण ऐकण्यासाठी सांगलीकर नागरिकांनी तुफान गर्दी केली. मोरारजीभाईंबद्दल जनतेमध्ये आदराची भावना आहे, हे याप्रसंगी स्पष्ट दिसून आले. 'अप्रिय पण पथ्यकर सांगणारा वक्ता व तसे ऐकणारा श्रोता दुर्लभ असतो' असे म्हटले जाते; पण या ठिकाणी हे सुभाषित खोटे ठरले! संस्थेला मोरारजीभाईंबद्दल आस्था वाटण्याचे खरे कारण म्हणजे ते तत्वविचाराला चिकटून राहातात हेच होय. तत्वासाठी वेळ पडल्यास अप्रियता पत्करण्यास त्यांची तयारी असते. भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी शिक्षणक्षेत्राला ही तत्वनिष्ठा पत्करणे आवश्यक असल्याने संस्था नेहमीच त्यांच्याबद्दल आदरभाव बाळगीत आलेली आहे.

याच सुमारास संस्थेच्या आम्हां आजीव सदस्यांचे पिंड घडविण्यासाठी ज्या गुरुवर्यांची जीवने कारणीभूत झाली, त्यांचा जाहीर सत्कार आमच्या संस्थेमार्फत केला जावा असा निर्णय आम्ही घेतला. त्यासाठी एस.एम.जोशी यांना पाचारण करण्यात आले. संस्था संचलनात असलेली माणसे तत्त्वत: भिन्न भिन्न विचारसरणींची असली तरी, राजकीय वा सामाजिक क्षेत्रांत वावरणाऱ्या सर्वपक्षीय नेतृत्वाचे मार्गदर्शन संस्थेला व संस्थेतील विद्यार्थ्यांना लाभावे हा लोकशाही दृष्टिकोण आम्ही कधीच नजरेआड होऊ दिलेला नाही.

पांडुरंग विठ्ठल रास्ते, पांडुरंग विष्णू कुलकर्णी व तीरमारे गुरुजी ही शिक्षकत्रयी आम्ही नेहमीच आदरणीय मानीत आलो. दैनंदिन शालेय शिक्षणक्रम चालविण्यापलीकडे जाऊन, समाजसेवेला उपयुक्त ठरतील अशा अन्य संस्था निर्माण करण्यात या मंडळींनी आपली उभी हयात खर्च केली आहे. आपण निर्माण केलेल्या संस्थांमधून आदर्श विद्यार्थीवर्ग तयार व्हावा यासाठी त्यांनी अपरंपार कष्ट केले आहेत. अर्थात चालू जमान्यात अशा शिक्षकांच्या गुणाची कदर केली जाणार नाही हे उघडच आहे. या मंडळींनी संस्था उभ्या करताना जो ध्येयवाद उराशी बाळगला, व तो साध्य करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याचे योग्य मूल्यमापन सध्याच्या लाचार युगात अशक्य! तरी त्यांच्याकडून याबाबत काही शिदोरी मिळविलेले आम्ही त्यांचे विद्यार्थी उदासीन होऊ शकत नव्हतो. आपल्या जीवनात सत्काररूपी काही घडावे अशी या मंडळींची अपेक्षा नव्हती; पण सामाजिक जीवनात अद्यापि जी थोडीफार कृतज्ञताबुद्धी आहे, तिचे निदर्शक म्हणून आम्ही हा सत्काराचा कार्यक्रम आखला. वस्तुत: आमच्या संस्थेमध्ये ह्या मंडळींची काही सेवा घडलेली नाही. पण आम्ही विद्यार्थी असताना आम्हाला घडविण्याचे काम त्यांनी केलेले असल्यामुळे, एस.एम.जोशी यांच्यासारख्या तत्वनिष्ठ त्यागी नेत्याकडून त्यांचा सत्कार केला जावा व आपली कृतज्ञता व्यक्त केली जावी एवढाच मर्यादित हेतू या सत्कारापोटी होता.

●●●

## संस्थेचे दाते व चाहते

संस्थेवर अकृत्रिम प्रेम करणारे अनेक दाते व चाहते या संस्थेला लाभले आहेत. केंद्रीय व राज्य मंत्रीमंडळातील बहुतेक सर्व मंत्र्यांनी व लोकनेत्यांनी वेळोवेळी या संस्थेच्या कार्यक्रमांत सहभागी होऊन संस्थेबाबतची आपली आपुलकी स्पष्ट केलेली आहे. सर्वपक्षीय नेतृत्वाचा पाठिंबा आणि धनिक मंडळींचे प्रलोभनीय साहाय्य यांमुळे संस्था अनेक अडचणींवर मात करून मार्गक्रमण करीत पुढे चालली आहे. नामुष्की व लाचारी न पत्करता संस्थेने केलेली प्रगती, 'सामान्य जनमानसात अद्यापि तात्विकतेला मान आहे' याची निदर्शकच मानली जाईल.

संस्थेचा आरंभकाल अगदी मर्यादित शक्तीचा होता. संस्थेच्या कार्यकर्त्यांची क्षमता अद्यापि प्रगट व्हावयाची होती. अशा बाल्यावस्थेत गणपतराव आरवाडे यानी जे दातृत्व प्रगट केले, त्यामुळे संस्था उभी राहण्यासाठी मजबूत पाया उपलब्ध झाला. संस्थेच्या प्रगतीत श्री.गणपतरावजी आरवाडे यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांच्याच अध्यक्षतेखाली संस्था प्रगतीपथावर आहे; अडीअडचणीतून संस्था यशस्वीपणे मार्ग काढीत आहे.

रघुनाथराव भिडे(मामा) हे सांगलीतील तरुण साहसी यंत्रकारखानदार, संस्थेच्या तांत्रिक विभागाच्या विकासाचे कामात बहुमोल सहकार्य देत आहेत. संस्थेला क्रीडांगण उपलब्ध झाले पण ते दैन्यावस्थेत होते, त्याचा क्रमश: कायापालट होत गेला. अल्पावधीतच बंदिस्त व अद्ययावत क्रीडांगणात त्याचे रूपांतर होणार! सांगलीचे यंत्रकला-विशारद व क्रीडाशौकीन कै.रामभाऊ भिडे यांच्या नावारूपाला साजेल असे हे क्रीडांगण व्हावे म्हणून, नियामक मंडळाचे एक सदस्य व कै.रामभाऊंचे सुपुत्र रघुनाथ रामचंद्र भिडे आपले दातृत्व घेऊन संस्थेच्या सहकार्यास पुढे आले.

संस्थेला महत्वाचे आर्थिक साहाय्य देणाऱ्या मंडळींमध्ये गणपतरावांच्या सोबतीला त्यांचे बंधू रामभाऊ असत. त्याचबरोबर आणखी काही व्यक्तींचा नामनिर्देश करणे अत्यावश्यक आहे. रतिलाल विठ्ठलदास गोसलिया हे माधवनगरचे धनिक व्यापारी संस्थेच्या चाहत्यांपैकी एक महत्वाचे देणगीदार आहेत. दक्षिण सातारा तांत्रिक संस्थेचे आमच्या संस्थेत विलीनीकरण झाल्यानंतर, या विभागातील महत्वाच्या उणीवा भरून काढण्यासाठी मोठ्या देणगीची आवश्यकता होती. अशी देणगी देण्यासाठी शेठ रतिलाल गोसलिया आपण होऊन पुढे आले, ही महत्वाची बाब आहे. देणगी मागण्यासाठी गेल्यानंतर देणगी देणारे असंख्य चाहते-दाते आम्हांस भेटले आहेत, पण काही प्रसंगानिमित्त संस्थेस भेट देण्यासाठी आलेले गोसलिया हे असे दाते भेटले की, त्यांनी आपण होऊन संस्थेच्या गरजांची विचारणा केली आणि त्या समजून घेतल्यानंतर तांत्रिक विभागाच्या विकासासाठी बारा हजार पाचशे रुपयांची देणगी देऊ केली. महाराष्ट्र सरकारने वेगळे तांत्रिक शिक्षण केंद्र (आयटीआय) चालू केल्यावर संस्थेतील या विभागाचे काही अभ्यासक्रम बंद करावे लागले; पण विद्युतीकरण, शिवण, रेडिओ असे काही अभ्यासक्रम चालू ठेवले. शिक्षण व अर्थार्जन या उभय हेतूंनी हा उपक्रम आयोजित केला असून, शिवण विभागाला अखिल भारतीय नभोवाणी केंद्राने त्यांच्यासाठी लागणाऱ्या गणवेशाचे काम मिळाले व त्या विभागाने ते चोखपणे पार पाडले. संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीची गरज विचारात घेऊन या विभागासाठीही गोसलिया शेठजीनी बारा हजार पाचशे रुपयांची देणगी दिली. श्री.गोसलिया शेठजींनी दाखविलेली शिक्षणविषयक आस्था संस्थेच्या इतिहासात नमूद करण्याजोगी आहे.

संस्थेच्या अडीअडचणी दूर करताना अनेक वेळा नोकरशाहीतील समजूतदार मंडळींचेही सहकार्य मिळत गेले. तसे ते सातत्याने मिळत जाणे वास्तविक आवश्यक आहे, पण गेल्या तीन चार वर्षांमध्ये सरकारी यंत्रणेत झालेल्या काही फेरबदलामुळे म्हणा, अगर अन्य काही कारणांमुळे म्हणा संस्थेच्या कार्यात सरकारी यंत्रणेकडून विचित्र अडथळे येत गेले. त्यामुळे संस्थेच्या शिक्षणकार्याच्या प्रगतीला अकारण खीळ बसत गेली.

भारतीय विकासकार्यात नोकरशाही कसे अडथळे आणते व विकासकार्य कसे अडवून पाडते यांची ठळक उदाहरणे देण्याजोगी आहेत. त्याचा मुख्य उद्देश असा आहे की, आपल्याला मिळालेल्या विशेष संरक्षणाचा उपयोग करून काही विशिष्ट उद्देशाने जाणून बुजून सरकारी यंत्रणा अडथळे निर्माण करते हे लक्षात यावे. असे झाल्यास अशी नोकरशाही कठोरपणे हाताळली गेली पाहिजे; आणि यासाठी परिस्थितीजन्य पुरावा ग्राह्य मानला गेला पाहिजे. नोकरशाहीत माजलेल्या या प्रवृत्तींचा नि:पात करण्यासाठी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी कारभार सुधार समितीच्या शिफारशींप्रमाणे खरोखरच काही नेमणूका केल्या तर, अशा संबंधी अधिकाऱ्यांपुढे तशी प्रकरणे संस्था जरूर मांडणार आहे. ही प्रकरणे अशी आहेत की, ती निर्माण करणारे अधिकारी भ्रष्ट आहेत का मूर्ख आहेत याचाच निर्णय लावणारी आहेत. पण त्याखेरीज अन्य पर्यायच दिसत नाही.

संस्थेच्या हायस्कूलच्या पिछाडीस संस्थेचे विस्तृत क्रीडांगण व संस्थेची प्रचंड उद्योगशाळा आहे. माध्यमिक शाळेची इमारत व क्रीडांगण यांच्यामध्ये एक चिंचोळी पट्टी असून तीवर खाजगी मालकीची जुनाट झोपडपट्टीवजा चाळ आहे. या चाळीतील बिऱ्हाडकरूंचा संस्थेला -विशेषत: स्वच्छतेच्या दृष्टीने -अतिशय उपद्रव होतो. क्रीडांगणावर लावलेली झाडे नष्ट करणे, सांडपाणी संस्थेच्या जागेत सोडणे, उद्योगशाळेची इमारत खराब करणे... असे एक ना दोन -अनेक उपद्रव या लोकांकडून सतत होत असल्याने, सदरची चिंचोळी पट्टी सरकारमार्फत संपादन करावी म्हणून संस्थेने भूमीसंपादन अधिकाऱ्याकडे अर्ज केला. प्रथमत: आम्हाला कळविण्यात आले की परस्पर समजुतीतून हा व्यवहार होत असल्यास पाहावे, व तसे न जमल्यास संपादनाचे कामी हालचाल करावी. या खात्याच्या सल्ल्याप्रमाणे मालकांचेकडे संस्थेने विचारणा केली. पण मालकाने सांगितलेली वीस हजार रुपये किंमत न पटल्याने फिरून भूमीसंपादनाच्या कामी हालचाल सुरू केली. भूमीसंपादन अधिकाऱ्यांनी नंतर सरकारच्या बांधकाम खात्याकडे या जागेचे मूल्यमापन करण्याचे काम सोपविले. संबंधी खात्याच्या अधिकाऱ्यांनी समक्ष येऊन, संपादन करावयाच्या जागेची मोजमापे घेऊन संबंधी सर्व मालमत्तेची किंमत रु.सात हजार असल्याचे कळविले. यावर भूमी-संपादन अधिकाऱ्यांनी ही किंमत मान्य आहे का अशी आमच्याकडे विचारणा केली. ही किंमत थोडीफार जास्त असली तरी -भूमीसंपादनाचे काम लांबणीवर पडू नये म्हणून -संस्थेने आपला होकार कळविला. पण पुढे याच अधिकाऱ्यांनी सदर जागेची किंमत वीस हजार रुपये करून संस्थेकडे फेर विचारणा केली. मधला सर्व पत्रव्यवहार डावलून मालकाने सांगितलेली किंमत भूमीसंपादन अधिकाऱ्यांनी एकतर्फी मान्य करून संस्थेवर लादण्याचा प्रयत्न केला. यात पुढील ठळक गोष्टींचा उल्लेख लक्षात घेण्याजोगा आहे.

संस्थेच्या क्रीडांगणाची किंमत याच खात्याने दर चौरस फुटाला १ रु. केली; एकेकाळी या क्रीडांगणाचाच भाग असलेल्या या जागेची किंमत मात्र याच खात्याने आता चौरस फुटास ५ रु. केली आहे. झोपडपट्टीवजा असलेली ही चाळ १९५६ साली बांधण्यात आलेली असून तिचा खर्च (३८००) अडतीसशे रुपये आहे, व ही चाळ संबंधी मालकाने सत्तावीसशे रुपयांस विकत घेतलेली आहे. या इमल्यापासून पंचवीस फुटांवरच नव्याने बांधलेली आमच्या उद्योगशाळेची इमारत आहे. ही सिमेंट काँक्रीटची पक्की इमारत असून ती अद्ययावत आहे. तिचे एकूण क्षेत्र ६००० चौ.फूट असून तिच्या बांधकामास द.चौ.फुटास सरासरी पंधरा रुपये खर्च आला आहे. संबंधी शासकीय अधिकाऱ्याने या चाळीच्या इमारतीची किंमत द.चौ.फुटास सुमारे तीस रुपये धरून ती चौदा हजार रुपये केली आहे.

स्वाभाविकपणे हा सर्व बनाव संस्थेला सर्वस्वी कृत्रिम वाटल्याने संस्थेने सदर किंमतीबाबतचा आपला नकार सप्रमाण कळविला व सरकारी बांधकाम खात्याने केलेली किंमत हीच रास्त किंमत असल्याबद्दल फिरून कळविले. संस्थेकडून हे पत्र गेल्यानंतर काही दिवसांनी संस्थेला कळविण्यात आले की, आपणास किंमत मान्य नसल्याने आपला अर्ज निकालात काढण्यात आलेला आहे!!

अशी यंत्रणा पदरी बाळगून शैक्षणिक विकासाच्या अगर अन्य विकासाच्या कोणी बढाया मारीत असेल तर, अशा

बढाया मारणारे नेतृत्व -इंग्रजीचे मराठीत भाषांतर करून बोलावयाचे झाल्यास -'लबाडाचे तरी असले पाहिजे, अगर मूर्खाचे तरी असले पाहिजे!' हे सारे प्रकरण निकालात निघण्यात दोन-तीन वर्षे लिखापढी करावी लागली व शेवटी शून्य पदरात पडून संस्थेची कुचंबणा कायम राहिली.

ह्याच तऱ्हेचा आणखी एक अनुभव नमूद करण्याजोगा आहे. तो म्हणजे संस्थेच्या क्रीडांगणाला सुरक्षितता लाभण्यासाठी करावयाची तरतूद व प्राथमिक शाळेसाठी बांधण्यात यावयाची इमारत, यांच्या संदर्भात संबंधी खात्याने चालविलेली खळखळ होय! ह्या क्रीडांगणाचे सभोवार मदिरा व मदिराक्षी यांचे अड्डे असल्याने या क्रीडांगणावर स्वच्छता ठेवणे व त्याला सुरक्षितता प्राप्त करून देणे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. ह्यासाठी संस्थेने क्रीडांगणाच्या काही भागावर भिंत उभी करण्याची व काही भागावर सभोवती प्राथमिक शाळेची इमारत बांधण्याची कल्पना काढली. या पद्धतीने क्रीडांगण तर सुरक्षित होईलच; पण प्राथमिक शाळेत येणाऱ्या लहान मुलांसाठी स्वतंत्र इमारत उपलब्ध झाल्याने त्यांच्या शिक्षणाची सोय होऊन मोकळ्या जागेचा क्रीडांगण म्हणून खऱ्या अर्थाने उपयोग होऊ शकेल. पण संबंधी खात्याचा चमत्कार असा की, ''नगरविकास खात्याने ही जागा आपल्या नकाशात खुले मैदान म्हणून धरली असल्याने, ह्या मैदानाच्या कोणत्याही भागावर इमारत कशी बांधता येईल?'' असे आम्हालाच दटावले. विख्यात इंग्रज टीकालेखक व लघुनिबंधकार गार्डिनर याच्या एका वाक्याची आठवण या ठिकाणी झाल्यावाचून राहात नाही. तो म्हणतो, ''नियम व कायदा लोकांची सोय करण्यासाठी असतो, पण त्याचा अंमल करणारा अधिकारी जर बिनडोक असेल तर मात्र अशा नियमांमुळे गैरसोयच होणार.'' या कामासाठी गेली दोन वर्षे संस्थेची धावपळ चालू आहे; आणि तरीही संस्थेचा हेतू साध्य होतो अगर नाही याबद्दल साशंकता आहे.

विकसनशील देशामध्ये सरकारच्या अनेकविध खात्यांमध्ये सुसंवाद नसेल तर कोणत्याही विकासकार्याची गती कुंठित झाल्याशिवाय राहणार नाही. संस्थेच्या तीन तपांच्या प्रदीर्घ अनुभवांवरून आम्ही असे विधान करू शकतो की, भारतीय नोकरशाहीतील बरीचशी माणसे विकासकार्याला गती आणण्यापेक्षा ती गती कुंठित करण्याच्या दृष्टीने काम करणारी असून, कामापेक्षा व्यक्तिगत लभ्यांशाकडे लक्ष देणारी आहेत.

दीर्घकाळच्या पत्रव्यवहारांनंतर व पुण्यामुंबईचे अनेक हेलपाटे झाल्यानंतर शेवटी एकदा क्रीडांगणाच्या पश्चिम सरहद्दीवर प्राथमिक शाळेची इमारत बांधण्यास संबंधी खात्याने अनुज्ञा दिली. तथापि जणू काही आमच्या ह्या झगड्याबद्दल प्रायश्चित देणे आवश्यक वाटल्याने, संस्थेच्या क्रीडांगणामधून पंचवीस फूट रुंदीचा एक नवा रस्ता नगरविकास-रचना नकाशात दाखविण्यात आलेला आहे. सुमारे तीनशे फूट लांबीच्या ह्या क्रीडांगणाच्या पूर्व व पश्चिम सरहद्दीवर दोन रस्ते अस्तित्वात आहेत. पैकी पूर्व सरहद्दीवरील रस्त्याची जागा संस्थेच्या क्रीडांगणातीलच असून आता आणखी हा नवा अप्रयोजक रस्ता दाखविण्याचा उद्देश न समजणारा आहे.

अर्थात संस्थेने ह्या कामीही आपला विरोध नोंदविला आहे. पण शैक्षणिक कार्याच्या गरजा न ओळखता, काही ना काही उपद्रव करत राहणे ही कसली काय नगररचना आहे? दीर्घकाळ चालणारी कागदांची उलथापालथ, तत्वशून्य खुसपटे, व विधायक कार्याची अडवणूक.... या साऱ्या गोष्टी का व कशासाठी केल्या जातात हे कळणे तसे सोपे आहे! पण ही सोपी गोष्ट कळूनसुद्धा त्याबाबत उपाययोजना करता येत नाही अशी चमत्कारिक परिस्थिती आहे. नियोजनमंत्री श्री.सुब्रम्हण्यम् हे आपली हतबलता व्यक्त करतात असे वाचनात आले, तर मग आमच्यासारखी एखादी तत्वनिष्ठ शिक्षणसंस्था त्या परिस्थितीपुढे काय करू शकेल?

●●●

## उचित गौरव; अनुचित उपद्रव

या शिक्षणसंस्थेच्या एकूण विकासामध्ये भरीव स्वरूपाची कामगिरी ज्या व्यक्तींनी केली आहे, त्यांच्या कार्यपद्धतीचा व कार्याचा उल्लेख करणे अत्यावश्यक आहेच, पर काही घटनांच्या संदर्भात त्याचे आगळे महत्त्व आहे; म्हणून त्या नमूद केल्या पाहिजेत.

दोन संस्थांच्या एकत्रीकरणानंतर आठ आजीव सदस्यांच्या सामुदायिक तपस्येमधून हा विकास झाला असला तरी, मूल्यमापनात काही डावे-उजवे करणे भाग आहे. थोडाफार पक्षपातीपणाचा आरोपही येण्याची शक्यता आहे. प्रगतीच्या श्रेयाचा सिंहवाटा यंग मेन्स सोसायटीच्या लोकांना देणे भाग आहे, आणि ही वस्तुस्थिती परिचितांना नाकारता न येणारी अशीच आहे.

आरंभकालात कार्यवाह या नात्याने वि.ना.आपटे यांनी केलेली कामगिरी, व मुख्याध्यापक म्हणून बा.गो.नाईक यांनी बजावलेली कामगिरी संस्थेच्या इतिहासात उल्लेखनीय आहे. बा.गो.नाईक यांच्याबाबत प्रसंगोपात उल्लेख यापूर्वी आलेलाच आहे. ते स्वत: एम.ए.बी.टी. असल्याने व उत्तम शिक्षक म्हणून नाणावले गेले असल्यामुळे, कोल्हापूरच्या काही प्रतिष्ठित संस्थांनी त्यांना आपल्याकडे येण्यासाठी गळ घातली. त्यावेळी आमच्या माध्यमिक शाळेचे स्वरूप असे होते की, प्रत्येकास तिच्या भवितव्याबाबत शंका वाटत होती. बरीचशी पदवीधर मंडळी केवळ 'टेकावयास आधार' म्हणून या संस्थेत येत; व अन्यत्र संधी मिळताच संस्था सोडून जात. पण बा.गो.नाईक यांची संस्थेप्रति भूमिका ठाम होती. प्रतिज्ञापूर्वक आजीव सदस्यत्व पत्करले असल्याने संस्था सोडून अन्यत्र जाण्यास त्यांनी नकार दिला. अर्थात त्यांची ही भूमिका नि:संशय गौरवास्पद होती; आणि म्हणूनच संकटकाली संस्थेने त्यांच्याबाबत कमालीची आस्था दाखविली. ते नगरपालिका सदस्य असल्याने व नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले असल्याने, संस्थेच्या अनेक योजना पुढे रेटण्यास त्यांचे बहुमूल्य साहाय्य होई. संस्थेच्या आजच्या प्रगतीचा पाया घालताना बा.गो.नाईकांचे कष्ट कारणीभूत झालेले आहेत, हे नाकारता येणार नाही.

दोन संस्थांच्या एकत्रीकरणानंतर संस्थेचे कार्यवाह ह्या नात्याने वि.ना.आपटे ह्यांनी बजावलेली कामगिरीही अशीच अविस्मरणीय आहे. संस्थेच्या इमारतीसाठी जागा संपादन करण्यापासून, आजची भव्य इमारत उभी राहीपर्यंत अनेक खटपटी झाल्या. इमारत कामाच्या दुर्मीळ वस्तू संपादन करून त्यांचा संग्रह करणे, त्यांचा हिशेब ठेवणे, बांधकामातील सर्व बारकाव्यांवर लक्ष ठेवणे, देणग्यांच्या रूपाने येणारा पैसा व इमारतसामान यांचा काटेकोर हिशेब ठेवणे अशी अत्यंत जिकीरीची व कष्टाची कामे त्यांनी - नित्य शालेय काम सांभाळून -पार पाडली आहेत. विशेषत: इमारत बांधकामात त्यांची दृष्टी विचक्षण व चोखंदळ होती. बांधकाम चालू असताना त्यात कोणत्याही तऱ्हेची उणीव राहणार नाही, याबाबत त्यांनी घेतलेल्या दक्षतेचा पुरावाच आज आरवाडे हायस्कूलच्या इमारतीच्या रूपाने उभा आहे. स्वत:च्या शिक्षणसंस्थेने अभिमानास्पद प्रगती करावी म्हणून, अक्षरश: रक्ताचे पाणी करणाऱ्या आजीव सेवकांमध्ये विनायकराव आपटे यांना अग्रपूजेचा मान देणे भाग आहे.

वि.ना.आपटे यांच्या पाठोपाठ त्यांची अधिकारपदे तितक्याच कार्यक्षमतेने जर कोणी सांभाळली असतील तर ते आजीव सदस्य का.द.साने हे होत. साने हे वृत्तीने अबोल असले तरी त्यांची टापटीप व कार्यक्षमता अतुलनीय अशीच आहे. संस्थेचे आजीव सदस्य म्हणून आरंभ कालापासून ते काम करीत असताना त्यांनी तत्कालीन बार कौन्सिलच्या वकीली परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यामुळे वस्तुत: वकीलीच्या व्यवसायाकडे वळणे त्यांना शक्य होते, कारण त्यांचे वडील वकीली व्यवसायातच होते. संस्थेमध्ये आरंभकालात मिळणारे वेतन विचारात घेतल्यास आर्थिक लाभाच्या दृष्टीने वकीली व्यवसायात त्यांनी मन घातले असते तर दोषास्पद असे काहीच नव्हते. पण प्रतिज्ञापूर्वक एखादी गोष्ट पत्करल्यानंतर तिच्याशी प्रतारणा करणे रास्त नाही, ह्या एकमेव भूमिकेमधूनच त्यांनी संस्थेत आपला शिक्षकी पेशा चालू ठेवला. आजच्याप्रमाणे त्याकाळी एकात्मतेची 'प्रतिज्ञा करण्याचे काम' दरसाल चालत नसे.

एकात्मतेची प्रतिज्ञा एकदाच घ्यावी लागते आणि तिच्याशी अखेरपर्यंत एकनिष्ठा पाळावी लागते, हे श्री.साने यांच्या उदाहरणावरून सहज कळण्यासारखे आहे.

वरील उभयतांच्या शिक्षणविषयक निष्ठांचे मूल्यमापन करणे कठीण आहे. त्यांच्या दिवसाचे किती तास ह्या कार्यासाठी खर्च करण्यात आले ह्याच्या हिशेबाची कल्पनाही करणे शक्य नाही. आणि म्हणूनच संस्थेने त्यांची कार्यक्षमता विचारात घेऊन त्यांच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही शिक्षणकार्याचा दर्जा कायम राखण्यासाठी ह्या उभयतांना दरसाल मुदतवाढ दिली आहे. तथापि सांगलीमध्ये आलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचे जे मूल्यमापन केले, त्यामुळे वि.ना.आपटे यांनी न्यायालयात दाद मागितली आहे. या संस्थेच्या विकासाबाबत एक गोष्ट स्पष्ट दिसून येईल की, या कार्यालाच वाहून घेणारी माणसे भेटल्यामुळे केवळ ते घडले आहे.

●●●

## प्रकट चिंतन

स्वतंत्र भारतातील शिक्षणविषयक अस्मिता आता लुप्तप्राय होत चालली आहे, असे आमचे मत बनण्यास काही कारणे घडली आहेत. 'शिक्षणक्षेत्रामध्ये प्रविष्ट झालेली माणसे केवळ धंदेवाईक दृष्टीने आलेली आहेत' असा जो समज निर्माण करण्यात आलेला आहे, तोच प्रामुख्याने ह्याच्या बुडाशी आहे. 'शिक्षणप्रसार व गुणवत्ता ह्यांचा मेळ घालण्यासाठी धडपडणारी माणसे नाहीत' असे कोणी म्हणू शकणार नाही. त्याचप्रमाणे 'शिक्षकवृत्ती पत्करणारी माणसे शंभर टक्के निर्दोष आहेत' असेही मानणे बरोबर नाही. अशा परिस्थितीतून सदोष-निर्दोष ह्यांबाबत ठाम भूमिका पत्करणे हे मोठे अवघड काम आहे. यासाठी न्यायालयाचा आश्रय करण्याची पाळी आता अनेक शिक्षणसंस्थांवर येऊ लागली आहे. त्याला आमची संस्थाही अपवाद नाही. हे प्रकरण थोडक्यात असे -

शिक्षणसंस्थेच्या आरवाडे हायस्कूल या माध्यमिक शाळेचे तांत्रिक प्रशाळेत रूपांतर झाल्यानंतर जी शिक्षकवर्गाची व अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी लागली, तीमध्ये जादा होणाऱ्या एका शिक्षिकेला, अनुदान संहितेच्या ७७/४ कलमाखाली सुमारे सहा महिन्यांची समज देऊन सेवामुक्त केल्याचे संस्थेने कळविले. कामगार-संघटनासदृश तंत्रांचा अवलंब करून शिक्षक संघटनांनी या घटनेचा महाराष्ट्रभर विकृत प्रचार करत राळ उडविली. आम्ही आश्चर्यचकीत झालो. जोपर्यंत फीचे उत्पन्न संस्थेच्या हाती होते तोपर्यंत शिक्षणसंस्था एखादा जादा शिक्षक खपवून घेई. पण नवीन अनुदानसूत्रामुळे फीचे उत्पन्न सरकारजमा झाल्यामुळे जादा शिक्षकाचा संपूर्ण आर्थिक बोजा संस्थेवर पडणार! अशा स्थितीतही या प्रश्नाला शिक्षण खात्याने अधिकृत गंभीर स्वरूप दिले. संस्थेला न्यायालयात दाद मागण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. ती तशी मागण्यातही आलेली आहे. ही गोष्ट न्यायप्रविष्ट असूनही व ती निर्णायक अवस्थेपर्यंत यावयाची असूनही 'संस्थेने अन्याय केला' असे गृहीत धरून जे उपासतापास करण्यात आले, जी आर्थिक स्वरूपाची दडपणे आणण्यात आली, त्यामुळे संस्थेला बऱ्याच कंटकमय मार्गांतून जावे लागले. परंतु या शिक्षणसंस्थेला वाहून घेतलेल्या माणसांची आस्था व निष्ठा इतकी जबरदस्त की, या अवास्तव दडपणांना मान न तुकविता संस्थेने आपला कारभार नेटाने चालू ठेवला आहे.

जुन्यांनी दिलेली परंपरा त्याच नेटाने व दमाने पुढे रेटण्यासाठी आजीव सेवकांची जी नवी पिढी तयार झाली आहे, तीही लोकशाही परंपरा व शिक्षणविषयक आस्था याबाबत खंबीर अशीच आहे. संकटकालात संस्थेमध्ये जो वैचारिक गोंधळ तयार होतो, तो या संस्थेत होऊ शकला नाही. याचे एकमेव कारण म्हणजे शिक्षणविषयक कार्याची

शिक्षकांमधील आस्था हेच होय!

या तारखेपर्यंत न्यायप्रविष्ट बाबींचा अंतीम निर्णय झाला नसला तरी, 'संस्थेने शिक्षकांची विषयवार केलेली वर्गवारी चुकीची नाही, अनुदानसंहितेच्या ७७/४ खाली येणारी ही घटना आहे. संस्थेने आकसाने अगर दुष्ट बुद्धीने नोकरकपातीची ही कारवाई केलेली दिसत नाही', एवढ्या गोष्टी तरी चालू घटकेला मान्य झालेल्या आहेत.

या वस्तुस्थितीचा विचार न करता अनुदान स्थगित करून आर्थिक दडपण आणणे, अगर नोकरांना मुदतवाढ देण्याचा संस्थेला हक्क नाकारणे, हे प्रकार 'केवळ आम्ही म्हणतो ते खरे माना' असा आग्रह लादण्याचा प्रयत्न करण्यासारखेच आहे. हा प्रश्न वाजवी वा रास्त आहे किंवा नाही हे काळ ठरवू शकेल. भारतीय लोकशाहीचे भवितव्य ह्या एकाच कसोटीवर ठरणार आहे.

●●●

## शिक्षणसंस्थांचे कार्यक्षेत्र व त्यांची स्वायत्तता

काही प्रकरणांत या शिक्षणसंस्थेने न्यायालयात दाद मागण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न म्हणजे हटवादीपणाचा भाग नाही. सरकारी धोरणानुरूप शिक्षणविषयक कार्यक्रमांमध्ये जे अदलाबदल आपल्या नियंत्रणाखाली करावे लागतात, त्यांच्या अनुरोधाने जी पुनर्रचना करावयाची असते, ती करण्याचा अधिकार संस्थांना आहे अगर नाही; या मूलभूत प्रश्नांचा निर्णय या प्रकरणी न्यायालयाकडून लागावयाचा आहे.

शिक्षणसंस्था स्वायत्त असून त्यांना स्वत:ची घटना व कार्यपद्धती असते. अर्थात नियुक्त अभ्यासक्रमाशी तिची कार्यवाही सुसंगत आहे अगर नाही हे पाहावे लागेल. पण या पलीकडे जाऊन, संस्थांच्या कारभारात वारंवार हस्तक्षेप चालू झाला तर, शिक्षणसंस्थांमध्ये अराजक माजण्याची शक्यता असते. आजच्या काळात शिक्षणक्षेत्रात माजणारी अस्वस्थता 'आई जेवू घालेना, बाप भीक मागू देईना' अशा एका विचित्र परिस्थितीतून निर्माण झाली आहे. महाराष्ट्र विधानसभेचे एकवेळचे सभापती त्र्यं.शि.भारदे हे एका शिक्षणसंस्थेचे अध्वर्यु आहेत. त्यांच्याशी नुकत्याच झालेल्या एका चर्चेत आमच्या शिक्षणसंस्थेचा दृष्टिकोण तर त्यांनी मान्य केलाच, पण बिहारमधील एका संस्थेचा उल्लेख करताना ते म्हणाले, ''बिहारमधील ती दुय्यम शाळा माझ्या खास माहितीची आहे. ती शाळा, शालांत परीक्षेची तयारी पाचवी ते अकरावी अशा सात वर्षांत न करता केवळ चार वर्षांत करून घेते आणि 'खास शाळा' म्हणून या शाळेला बिहार सरकारने मान्यता दिली आहे. आपल्या राज्यात जिल्हागणिक शिक्षणखात्यातील अधिकाऱ्यांची संख्या किमान ७६ आहे. हा शासनाचा खर्चच अकारण आहे. अंतीम परीक्षेचा निकष सरकारने ठरवून दिल्यानंतर, बाकी सर्व बाबी शिक्षणसंस्थांच्या हाती सुपूर्द केल्या गेल्या पाहिजेत.''

शिक्षणाबाबत एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, शिक्षणकार्य हे सर्वथैव अलिप्त असे कार्य आहे. त्यावर राजकीय, धार्मिक अगर अशा कोणत्याही विचारसरणींचा पगडा बसविण्याचा प्रयत्न करणे हे सर्वथैव अश्लाघ्य असून खऱ्या शिक्षणाला ते मारक आहे. शिक्षण हे ज्ञातापासून अज्ञाताकडे जाण्याचे एक माध्यम आहे. मानवी मनोव्यापार विकसित करण्याचे ते एक साधन आहे. मनोव्यापारांची झेप सर्वंकष करणे हे मुक्त शिक्षण-व्यापाचे धोरण आहे. माणसाचे मनोव्यापार एका ठराविक साच्यात अगर चाकोरीत बसविणारे शिक्षण, हे लोकशाही शिक्षण होऊ शकत नाही. शिक्षणसंस्था संचलन करणारी अगर तीत काम करणारी माणसे कोणत्याही मतप्रणालीची असली तरी, ती मते शिक्षण कार्यक्रमात आणण्याचा अगर लादण्याचा प्रयत्न त्यांना करता येणार नाही, अगर

शिक्षणसंस्था राजकीय हेतूसाठी संघटित करता येणार नाही. याच भूमिकेतून सरकारनेही शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. नाहीतर शिक्षण हे कोणाची तरी बटीक बनल्याशिवाय राहणार नाही.

काही प्रकरणी शिक्षणसंस्थेवर शिक्षण संघटनांकडून आलेली दडपणे यादृष्टीने विचार करण्याजोगी आहेत. या शिक्षक-संघटना 'पुरोगामी' वा 'प्रतिगामी' नावाखाली वावरत असल्या तरी त्यांचे राजकीय लागेबांधे कोठे आहेत हे स्पष्ट दिसण्याजोगे आहे. शिक्षक प्रतिनिधींच्या निवडणुकीची घटिका जवळ येताच या उभय संघटनांनी आमच्या संस्थेतील घटनेचे जे भांडवल करण्याचा प्रयत्न केला, त्याचा मूलभूत उद्देश कोणत्या राजकीय विचारसरणीचे वर्चस्व शिक्षक-संघटनेत आहे, हे प्रस्थापित करण्याचा होता. शैक्षणिक कार्यापेक्षा राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जी चळवळ केली जाते, तिला किमान शिक्षणक्षेत्रात तरी प्रतिकार झाला पाहिजे; हे विचारात घेऊनच आम्ही ह्या प्रकरणी आमचा कस लावला आहे.

महाराष्ट्राच्या शिक्षण परंपरेत आजीव सेवक सदस्य हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. हा घटक स्वत: शिक्षणकार्य तर करीत असतोच पण आपल्या शिक्षणकार्याची अंगोपांगे विकसित करण्यासाठी आवश्यक ती सर्व धडपडही करीत असतो. स्वत:च्या शिक्षकी पेशाला धरून करावे लागणारे शिक्षणकार्य चालू ठेवून, फावल्या वेळात ह्या कार्याला आवश्यक व पूरक ती सर्व जुळणी करण्यासाठी त्याला आपला काळ खर्ची घालावा लागतो. स्वाभाविकपणे शिक्षणकार्यातील हा महत्त्वपूर्ण घटक असल्याने, संचलनाबाबतचे त्याचे अधिकारही मोठेच असणे भाग आहे.

आजीव-सेवकवर्ग यांची जी एक थोर परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली आहे त्यासंबंधी, जे आजीव सेवक सदस्य होऊ शकले नाहीत त्यांनी, फार मोठ्या प्रमाणात आजीव सेवक सदस्य वर्गाविरुद्ध प्रचाराचे मोठे रान उठविले आहे. त्यांच्या आक्षेपाचा एकूण सारांश असा असतो की, पूर्वीच्या मंडळींच्या तपश्चर्येची आयती फळे खाऊन नवा फुकट अधिकार गाजवू पाहणाऱ्या मंडळींचा हा एक नवा वर्ग तयार झाला आहे. अर्थात तक्रार करणाऱ्या शिक्षकाला ह्या वर्गात वाव दिला तर मात्र, तो तक्रारीऐवजी तरफदारी करू लागतो, हेही तितकेच खरे आहे! या असंतुष्ट शिक्षकांचा असाही एक आक्षेप असतो की, नव्याने नियुक्त केले जाणारे आजीव सेवक सदस्य हे वशिल्याने अगर अन्य हितसंबंधी गटांकडून तयार केले जातात. त्यामुळे संचलनात्मक अधिकाराला पात्र असलेल्या अन्य माणसांचे हितसंबंध डावलले जातात.

या विधानांना अपवादात्मक काही अर्थ असेल. त्याचबरोबर असेही म्हणणे भाग आहे की, शिक्षणसंस्था चालविणारी माणसे, आपणच निर्माण केलेल्या कार्याची इमारत ढासळून टाकणारी अपात्र माणसे आजीव सेवक सदस्य पदासाठी निवडीत असतात! वरील आक्षेपाचा असा गर्भित अर्थ होऊ शकेल; पण स्वत: निर्माण केलेल्या कार्याचा नाश व्हावा असे कोणालाही वाटणे शक्य नाही. वरील आक्षेप सर्वथैव चुकीचे असतात. आमच्या शिक्षणसंस्थेने ह्याबाबत घेतलेली दक्षता याआधी नमूद केली आहे. शैक्षणिक पात्रता, संस्थेला सर्वकाळ वाहून घेण्याची कुवत, त्यांच्या आर्थिक व्यवहारांबाबत असलेली संशयातीत वागणूक, व संस्थेतील एकूण सर्वसाधारण सेवकांचे मत हे सर्व विचारात घेतल्यानंतरच संस्थेने आजीव सेवकांबाबतचा निर्णय घेतलेला आहे. संस्थेतील सर्व सेवकांना गुप्तपणे असे विचारण्यात आले होते की, 'आम्ही अधिकारसूत्रे खाली ठेवणार आहोत, यापुढे आपल्या संस्थेतील सेवकवर्गापैकी कोणाचे वर्चस्वाखाली नांदणे तुम्हास सोयीचे वाटेल?' या व अशा प्रश्नोत्तरांतून जी नावे उपलब्ध झाली व संस्था संचलनाचे दृष्टीने जी ग्राह्य वाटली, त्यांना आजीव सेवक सदस्यत्व बहाल करण्यात आलेले आहे. अर्थात ही जबाबदारी पत्करण्यास अन्य कारणांमुळे काही व्यक्तींनी नकारही दिलेला आहे. संस्थापक आजीव सेवक सदस्यांनी आपल्या निवृत्ती-कालमर्यादेपूर्वीच नवे आजीव सदस्य तर तयार केलेच, पण त्यांच्याकडे अधिकारपदेही सोपविली, ही गोष्ट उचित आहे.

तथापि शिक्षणसंस्था संचलनाबाबत केवळ शैक्षणिक पात्रता बघून चालत नाही. शैक्षणिक पात्रतेबरोबरच संघटना कौशल्य, नेतृत्व करण्याची कुवत, विश्वासपात्रता, व्यावहारिक चोखपणा या साऱ्या गोष्टींची आवश्यकता

असते. दुय्यम शिक्षणाबाबत विविध समित्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. त्या सर्व समित्यांनी, दुय्यम शाळांचे नेतृत्व देण्याबद्दल ठोकळेबाज सिद्धांत न अनुसरण्याची शिफारस यासाठीच केलेली आहे! संस्थेमधील सेवकांचे मूल्यमापन करताना, संस्थेतील माणसे जो अभिप्राय व्यक्त करू शकतील तो अन्यत्रांकडून नेमकेपणी येणे कधीच वाजवी व शक्य होणार नाही. नेतृत्वाच्या गुणांचे मूल्यमापन विश्वविद्यालयीन पदवीवरून करावयाचे कोणी ठरविल्यास त्याच्याइतकी दुसरी कोणतीच फसवणूक होणार नाही. पदवी हे अनेकांपैकी एक गमक फारतर मानता येईल, पण ते सर्वस्व मात्र मुळीच नाही!

संस्थेतील सेवकांचे शिक्षण-संचलन वा अन्य बाबी यांचे रास्त मूल्यमापन करून अधिकारपदे सुपूर्द करण्याची जबाबदारी संस्थेलाच पार पाडणे शक्य आहे. अन्यथा सरकारी ठोकळेबाज सिद्धांत ग्राह्य मानून जर कोणी याबाबत अधिकार सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला तर, शिक्षणक्षेत्रांत अनागोंदी माजल्याशिवाय मुळीत राहणार नाही. हीच गोष्ट प्रामुख्याने विचारात घेऊन संस्थेने नवे आजीव-सेवक सदस्य मंडळ तयार केले. त्यांच्याकडे अधिकारपदेही सुपूर्त केली. सुदैवाने संस्थेचे हा दृष्टिकोण समजून घेऊन सरकारनेही आपल्या ठोकळेबाज सिद्धांताच्या आहारी न जाता संस्थेने केलेल्या ह्या कार्यवाहीला मान्यता देऊन टाकली. संस्थेने चालविलेल्या झगड्याची यशस्विता सिद्ध करणारी अशीच ही गोष्ट आहे.

दुय्यम शिक्षक संघटनांनी, संघटित जोरावर कामगार-संघटनासदृश ज्या हालचाली केल्या, त्याबाबत सरकारने या संघटनांच्या संदर्भात काही धोरण विषयक फेरबदल करण्याच्या दृष्टीने काही सूचनापत्रे रवाना केली. अशा एका पत्रकास संस्थेने दिलेले उत्तर या ठिकाणी मुद्दाम उद्घृत करीत आहे -

''असे दिसून येत आहे की, संघटनेमार्फत शिक्षकांच्या वैयक्तिक तक्रारी ऐकून न घेण्याबाबत सरकारने जो आदेश काढला आहे, त्याचा फेरविचार करण्याच्या मन:स्थितीत सरकार आहे. कामगार संघटनासदृश शिक्षक-संघटनांना वाव देण्यापूर्वी सरकारने पुढील मुद्यांचा विचार केला पाहिजे.

१) शिक्षणसंस्थांच्या सेवेत असलेला शिक्षकवर्ग हा शिक्षणसंस्थांचा सेवकवर्ग असून, सोसायटींच्या कायद्याखाली व सार्वजनिक विश्वस्तनिधी कायद्याखाली या संस्था नोंदल्या गेलेल्या आहेत; त्यांना त्यांची स्वत:ची अशी घटना आहे. या संस्था म्हणजे व्यापार अगर उद्योगधंदा नसून, समाजाची लुबाडणूक करून अगर सेवकांची लुबाडणूक करून नफेबाजी करण्याचा त्यांचा उद्देश असत नाही. यामुळे कामगार-संघटनासदृश संघटनांचे अधिकार शिक्षक संघटनांना देणे वाजवी होणार नाही. औद्योगिक कामगार संघटना आणि शिक्षक-संघटना यांना समान पायावर लेखणे हेच मूलत: चुकीचे आहे.

२) शिक्षणसंस्थेचे सेवक शिक्षणसंस्थेच्या मंडळाकडे दाद मागू शकतात. त्यांच्यावर जर अन्याय झाला असे वाटले तर त्याविरुद्ध दाद मागण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे. 'संस्थेच्या नियामक अगर नियंत्रण मंडळाचे सर्वच सभासद एखाद्या सेवकावर अन्याय करण्यास सज्ज झाले आहेत' असे मानणे पायाशुद्ध नाही. तशीच एखादी महत्वाची बाब असल्याखेरीज 'एखाद्या सेवकाविरुद्ध सर्व संस्था अन्याय करण्यास सज्ज झाली आहे' असे मानणे सर्वथैव चुकीचे आहे.

३) शिक्षक संघटनेला कामगार संघटनांप्रमाणे महत्त्व दिल्यास, कामगार संघटनेची सर्व तंत्रे वापरून खोटा प्रचार, जनतेची दिशाभूल या गोष्टी करूनही शिक्षणविषयक कार्याला त्या अडथळा आणतात हे स्पष्ट झाले आहे. अनुदान-संहितेमध्ये शिक्षणसंस्थेतील सेवकाला आवश्यक ते संरक्षण मिळवून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याच्या पलीकडे जाऊन, शिक्षण क्षेत्रात कामगार चळवळीचे तंत्र आणण्यामध्ये काहीच हशील नाही.

४) शिक्षण व लोकशाही-संवर्धनाच्या दृष्टीने, सरकार व सरकारी अधिकारी यांनी त्या खोडसाळ प्रकारापासून दूर राहण्याची दक्षता घेतली पाहिजे. शिक्षक संघटनांची मागणी, आपली राजकीय उद्दिष्टे पुढे ढकलण्यासाठी असू शकते, त्याचा शिक्षणाशी सुतराम संबंध नाही. शिक्षणक्षेत्रात कामगार संघटनात्मक तंत्र आणण्याच्या या उद्योगाला जर वेळीच आळा घातला नाही तर शिक्षणविषयक कार्य करण्यास कोणीच पुढे येणार नाही.

५) शिक्षणसंस्था हे कारखानासदृश उद्योगधंदे आहेत, व

शिक्षक हे या उद्योगधंद्यात राबणारे मजूर आहेत, अशी कल्पना करून घेणे हा शुद्ध अपप्रचार आहे. सरकारने पुढे येऊन सर्व स्तरांवर शिक्षण ताब्यात घ्यावे! पण तसे होणार नसेल तर कामगार-संघटनासदृश खोट्या प्रचाराला बळी पडून काही महत्त्वाकांक्षी लोकांच्या राजकीय उद्दिष्टांना महत्व देण्याच्या चाळ्यांना सरकारने बळी पडू नये.

●●●

## योगायोगाच्या देणग्या

या संस्थेने विद्यार्थी मनाची जडणघडण करण्यात विशेष काहीतरी केले आहे, असा सार्थ अभिमान संस्थेला आहे. ठराविक वर्गातले विद्यार्थी, विशेष गुणवत्तेने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी, ह्यांनाच फक्त प्रवेश देण्याचे धोरण ह्या संस्थेने कधीच ठेवलेले नाही. विद्यादान व संस्कार करण्याचे काम संस्था सर्वांनाच समानतेने करीत आल्यामुळे, संस्थेकडे ग्रामीण भागातील जनतेचा विलक्षण ओढा आहे. सांगलीच्या पंचक्रोशीतील बहुतेक सर्व खेड्यांतील आमचे विद्यार्थी सामाजिक जीवनात विशेषत्वाने वावरताना आढळतात. संस्थेने विद्यार्थी-मनांत जी दानत व प्रेरणा निर्माण केली, तिचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने फारच मोठा उपयोग झालेला आहे. छोट्या ग्रामांपासून परदेशांपर्यंत विखुरलेल्या ह्या विद्यार्थ्यांनी संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी आर्थिक हातभारही लावला आहे. योगायोगाने संस्थेला मिळालेल्या अशा काही देणग्या उल्लेखनीय आहेत.

१९४८चा काल! फेब्रुवारी महिना. गांधी हत्येनंतर जो उद्रेक झाला, त्या उद्रेकामध्ये १९४२च्या चळवळीत हिरीरीने भाग घेणारे संस्थेचे काही माजी विद्यार्थी आघाडीवर होते. गांधी हत्येला जबाबदार असणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध जे काही वावटळ उठले ते अनेकांना त्रासदायक ठरले. गांधीहत्येचे कृत्य जितके अविवेकी, तितकेच हिंदुमहासभा व संघ ह्यांच्याविरुद्ध उठलेले वावटळही अविवेकीच होते. आमच्या सांगली शहरात ह्या अविवेकी आगीचा डोंब फार मोठ्या प्रमाणात उसळला.

या दंगलीला हत्येचे लांच्छन लागले नाही, तरीही तीमध्ये झालेल्या सांपत्तिक विनाशाचे स्वरूप भयंकर होते. नव्यानेच स्वतंत्र झालेल्या ह्या देशात अप्रत्यक्षरित्या गुंडगिरीला पोषण मिळते की काय, अशी भीती निर्माण झाली होती. आमच्या शिक्षणसंस्थेचे एके वेळचे अध्यक्ष व सांगलीचे ख्यातनाम वकील गणेश कोंडो गोडबोले ह्यांचा चौसोपी वाडा या आगीत भस्मसात झाला. गोडबोले स्वत: मनाचे खंबीर असल्याने त्यांनी ह्या प्रकरणी विशेष हाय खाल्ली नाही. एवढेच नव्हे तर, ज्यांनी त्यांच्या घरास आग लावली त्यांच्यावर फौजदारी फिर्याद त्यांनी दाखल केली. तत्कालीन मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी खंबीरपणे शांतता प्रस्थापित केली. पण ज्ञातिसंघर्ष वाढू नये म्हणून अंतस्थरित्या असा एक फतवा काढला होता की, झाल्या घटनेबाबत खेद व्यक्त करून संबंधितांना नुकसान भरपाई देण्यास जे तयार होतील त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई केली जाणार नाही.

गोडबोले ह्यांच्या घरजळीत प्रकरणी आमच्या संस्थेचे माजी विद्यार्थी नेताजी पाटील हे व आणखी काही आरोपी होते. नेताजी पाटील ह्यांना हद्दपार करण्यात आले होते. तथापि गोडबोले ह्यांची अशी शोचनीय अवस्था झाली होती की, त्यांच्या घराची जळीतावस्था पाहणारा कोणीही माणूस त्यांच्या बाजूने व त्यांनी केलेल्या आरोपांबद्दल साक्ष देण्यास पुढे येण्यास धजावत नव्हता. त्यामुळे फिर्याद दाखल होऊनही ती निरुपयोगी होणार अशी परिस्थिती होती.

याच सुमारास काही कारणांमुळे मला कोल्हापुरास जावे लागले. तिथे आमचा हा माजी विद्यार्थी नेताजी पाटील रडवेल्या अवस्थेत मला अचानक भेटला. तो सांगलीतून हद्दपार झाल्याने आश्रयासाठी कोल्हापुरात आलेला होता.

गरीबीतून कसेबसे वर येऊन त्याने उभारलेला त्याचा उपाहारगृहाचा व्यवसाय त्याच्या हद्दपारीमुळे संपूर्ण उध्वस्त झाल्याने मोठ्या हलाखीच्या स्थितीत तो वावरत होता. मला त्याने ह्याबाबत सल्ला विचारताच मी त्याला म्हणालो, ''तू जर सत्य सांगणार असशील आणि मी सांगेन त्याप्रमाणे वागणार असशील तर, तुझ्याभोवती झालेली कोंडी फोडून काढून तुला बाहेर काढण्याचा प्रयत्न मी करीन. पण तो प्रयत्न जर का अयशस्वी झाला तर मात्र तू मला दोष देता उपयोगी नाही.''

या माझ्या बोलण्याला नेताजीने रुद्ध कंठाने उत्तर दिले, ''सर, मी तुमच्या आज्ञेबाहेर कधीच गेलेलो नाही व कधी जाणारही नाही. माझ्या हातून जे काही घडलेले आहे, हे चिथावणीमुळे व भावनांच्या आहारी गेल्यामुळे झाले आहे. तुम्ही मला यातून बाहेर काढले नाहीत तर माझ्या आयुष्याचा सत्यानाश होणार आहे. या प्रकरणातील बडी माणसे सहज निभावून जातील, पण माझे गरीबाचे मात्र अतोनात नुकसान होईल...''

मग नेताजीवरील हद्दपारीच्या हुकुमाची कदर न करता मी त्याला सांगलीस घेऊन आलो. स्वाभाविकपणे त्याला अटक झाली. अटक होण्यापूर्वी जळीताबाबतची वस्तुस्थिती निवेदन करणारे त्याचे पत्रक तयार करून मी ते वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी देऊनही टाकले होते. ते पत्र प्रसिद्ध होताच सांगलीतच काय पण सर्व महाराष्ट्रभर सर्वांनाच विस्मयाचा धक्का बसला. यानंतर दोन दिवसांनी मी जामीन राहून त्याची मुक्तता करून घेतली आणि सर्व जळीत प्रकरणांना एक निराळाच रंग भरू लागला.

सांगली संस्थानचे एक ज्येष्ठ मंत्री एके दिवशी पहाटे माझ्याकडे आले आणि म्हणाले, ''गोडबोले ह्यांचे सारे प्रकरण मोरारजीभाईंना सांगून सामोपचाराने मिटविले गेले पाहिजे; पण गणपतराव गोडबोले व मोरारजीभाई देसाई ही दोन माणसे अशी आहेत की, त्यांचे मन कोणीही वळवू शकत नाही! याबाबत आमचे सर्व प्रयत्न थकले आहेत. या प्रकरणी आता तुम्हीच काही हालचाल केलीत तर मार्ग निघण्याची शक्यता आहे. सरकारने जाहीर केलेल्या धोरणांप्रमाणे आरोपीने दिलगिरी व्यक्त करणे व नुकसान भरपाई देणे ह्या पद्धतीने हा प्रश्न सुटावा अशी आमची तीव्र इच्छा आहे.''

त्यांच्या ह्या विनंतीला मान देऊन ह्या प्रकरणाची सोडवणूक करण्यासाठी मी हालचालींना सुरुवात केली. आमच्या विनंतीप्रमाणे गोडबोले यांनी नुकसान भरपाईबाबत आण्णा बाबाजी लड्डे यांचा लवाद मान्य केला. यानंतर मी व संबंधी मंत्रीमहाशय मुंबईस गेलो. आमच्या विनंतीला होकार देऊन मोरारजीभाई म्हणाले, ''सरकारी आदेशाप्रमाणे प्रकरण मिटविले जात असेल, तर सरकार अशा बाबीत आपण होऊन कायदेशीर कारवाई करणार नाही.'' या कालावधीत पां.ज.चिन्मुलगुंद हे जिल्हाधिकारी म्हणून सांगलीत दाखल झाले होते. त्यांच्यासमोर तडजोडीच्या मसुद्यावर सह्या होऊन नुकसान भरपाईच्या रकमा दिल्या गेल्या. नेताजी पाटील आर्थिक दृष्ट्या असमर्थ असल्यामुळे त्यांना या कामी सूट मिळाली.

सर्व सामोपचाराने मिटून गोडबोले यांना धनिक-आरोपितांकडून लवाद निर्णयाप्रमाणे पुरेशी नुकसान-भरपाई मिळाली होती. जिल्हाधिकारी कचेरीतून बाहेर पडताना गोडबोले मला म्हणाले, ''तुमच्या विद्यार्थ्यांच्या शुद्ध व स्पष्ट भूमिकेमुळे माझे घर फिरून उभारले जात आहे. तुझ्या या संस्थेला आर्थिक साहाय्य देणे हे माझे कर्तव्य आहे.'' आणि त्या तसल्या अवस्थेतही त्यांनी आग्रहपूर्वक माझ्या हाती एक हजार रुपयांच्या नोटा ठेवल्या. आमच्या संस्थेच्याही विपन्न अवस्थेत मिळालेली ही देणगी सर्वच दृष्टींनी कौतुकास्पद होती.

सांगलीतील एक सधन व्यापारी सोमचंद मानचंद शहा हे खरे म्हणजे व्यक्तिश: आमचे बालपणाचे स्नेही. आम्ही बालपणातून सारख्याच विपन्नावस्थेत वाढलो. पण मध्यंतरीच्या पंचवीस-तीस वर्षांच्या काळात सोमचंदभाईंनी केलेल्या अनेक व्यवसायांमुळे ते आता सांगलीतील एक सधन व्यापारी होऊन बसले होते. त्यामुळे संस्थेच्या इमारतीसाठी ज्यांच्याकडे याचना करावयाची, अशांच्या यादीत सोमचंदभाईंचे नाव समाविष्ट असणे अगदीच स्वाभाविक होते. पण प्रथमत: आम्हाला त्यांनी अजिबात दाद दिली नाही. यांत आम्हाला काही देणगी न देण्यापेक्षा दीर्घकाळ त्यांच्या निकट न आल्याबद्दलचा राग जाणवत असल्याने, मी सरळ त्यांच्या मातोश्रींकडे धाव

घेतली. कारण मला पूर्ण माहीत होते की, ही मुले लाख मोठी झाली तरी, आईच्या शब्दाबाहेर नाहीत. आईने मुलाला हाक मारून सांगितले, ''भाई, याला पाचशेएक रुपये दे.'' पैसे माझ्या हाती पडले; पण एवढ्यावरच मी थांबणार नव्हतो. सोमचंदभाईंच्या तिजोरीचा दरवाजा मला आणखीही उघडावयाचा होता; आणि तसा योगायोग लवकरच आला.

महाराष्ट्रात पूर्वी चालणारी प्रवासी मोटर सर्विस बंद होऊन स्टेट ट्रान्सपोर्ट (एस.टी.) चालू झाल्याने सोमचंदभाईंची उतारू वाहतूक संपली. एस.टी.ने अद्यापि ताब्यात न घेतलेल्या ग्रामीण मार्गावरच फक्त आता त्यांना वाहतूक करता येत होती. बंद झालेल्या गाड्यांवरील ड्रायव्हर्स एकत्र येऊन एक दिवस मला म्हणाले, ''सांगली-वायफळे रस्त्यावर सोमचंदभाईंची असलेली वाहतूक बंद करून सरकारने तो मार्ग आमच्या सहकारी संस्थेला द्यावा. सोमचंदभाईंची बस आम्ही विकत घेऊ.''

त्यानुसार त्या ड्रायव्हर लोकांच्या सहकारी संस्थेचा अर्ज रवाना झाला. मुंबईस चौकशी तारीख नेमली गेली. ड्रायव्हरांच्या बाजूने मी उपस्थित झालो, व सोमचंदभाईंच्या वतीने बॅरिस्टर नारायणस्वामी हे उपस्थित राहिले. उतारू वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यात मोरारजीभाईंचा हात असल्याने, ज्या मार्गावर एस.टी.धावणार नाही असे ग्रामीण भागांतील मार्ग, ड्रायव्हरांच्या सहकारी संघटनेला प्राधान्याने मिळणार यात मला शंका नव्हती; आणि झालेही तसेच! पण ह्या प्रकरणी मुंबईत असलेल्या सोमचंदभाईंनी काही गोष्टी चाणाक्षपणाने हेरल्या व मला ते म्हणाले, ''माझा हा मार्ग काढून घेऊन माझे तू नुकसान केले आहेस.''

''पण आज ना उद्या ते होणारच होते.''

''पण माझे एक काम आहे ते जर तू करून दिलेस तर तुझ्या संस्थेला मी दोन हजार रुपयांची देणगी देईन.''

त्यांचे हे काम मी नीट समजावून घेतले. काम तसे रीतसर व अगदी सरळ होते. सरकारी यंत्रणेतील काही तांत्रिक अडचणींमुळे, प्रवृत्तींमुळे ते अडखळले होते एवढेच! हे काम करणे फारसे कठीण नसल्यामुळे मी हा सौदा पत्करला. त्यांचे काम पूर्ण करून दिले आणि संस्थेसाठी दोन हजारांची देणगी मिळविली. हा दाता असा भेटला की, आमच्या कार्यपद्धतीवर श्रद्धा बसताच त्याने आपला हात अगदी सढळ केला. आमच्या दुय्यम शाळेच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम चालू असता सोमचंदभाई आपण होऊन मला म्हणाले, ''माझ्या आईच्या नावाने दुसऱ्या मजल्यावर तुला एक झकास वर्ग बांधून देतो.'' बांधकामावर स्वत: जातीने उभे राहून आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ बांधला जाणारा वर्ग त्यांनी संपूर्ण कसोशीने सुंदर बांधून घेतला. अशा रीतीने सोमचंदभाईंच्या दातृत्वाची मजल पाचशेपासून आठ हजारांपर्यंत जाऊन भिडली.

याच दुसऱ्या मजल्याचे बांधकामी असाच एक चमत्कारिक अनुभव आला. सदर बांधकाम सांगलीचे माजी नगराध्यक्ष व ख्यातनाम कॉन्ट्रॅक्टर अंबाजी नरसिंगा माळी यांच्याकडे होते. आमच्या संस्थेकडे येणाऱ्या बड्या पाहुण्यांची सतत वर्दळ पाहून त्यांना असे वाटले की, आपले अडलेले काम संस्थेने मनावर घेतल्यास ते पुरे होऊ शकेल. वस्तुत: सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे माळी यांचे काम होण्यास कायदेशीर अशी काहीच आडकाठी नव्हती. पण काही तांत्रिक अडचणींमुळे अगदी रीतसर व कायदेशीर कामाला अडथळा येऊन राहिला होता. माळी यांनी संस्थेला पाच हजार रुपयांची देणगी देण्याचे अभिवचन दिल्याने, संस्थेने या कामी लक्ष घालण्याचे ठरविले. या कामात यश येणे अगदीच स्वाभाविक असल्याने तसे ते आले, व ठरल्याप्रमाणे माळी यांनी संस्थेला पाच हजार रुपयांची देणगी दिली!

आरंभी संस्थेने आपल्या कामास सुरुवात केली ती वाडेकरांच्या इमारतीत! तिथून उठून आम्ही गोवर्धन संस्थेच्या इमारतीत आलो होतो. जागा सोडून जाताना वाडेकर यांच्याबरोबर आम्ही थोडीफार हुज्जतही घातली होती. पण कालांतराने हेच वाडेकर खूप वयोवृद्ध झाले. सुमारे पंचवीस वर्षांनी एके सकाळी संस्थेत येऊन दाखल झाले. त्यांच्याबरोबर नाटककार देवलांचे चिरंजीव व गोविंद मुद्रणालयाचे मालक हेही होते. देवलांना आमच्या संस्थेबद्दल आस्था व आपुलकी आहे, याची मला संपूर्ण जाणीव होती, त्यामुळे त्यांचे आगमन मला विशेष आश्चर्यजनक वाटले नाही. मी उभयता वृद्धांचे स्वागत केले आणि त्यांच्या आगमनाचा हेतू विचारला.

सांगलीतील दुसऱ्या एका शिक्षणसंस्थेकडे वाडेकरांचा विशेष कल असून त्या संस्थेशी व तीमधील व्यक्तींशी त्यांचा निकटचा संबंध आहे हेही मला माहीत होते, त्यामुळे देवलांचे उद्गार ऐकून मी थक्क झालो. ते म्हणाले, ''वाडेकर तुमच्या संस्थेला काही देणगी देण्यासाठी आलेले आहेत....''

मी म्हणालो, ''आणखी एका शिक्षणसंस्थेत त्यांनी बरेच लक्ष घातले असल्याने मी आमच्या संस्थेसाठी त्यांना भीड घालण्यास आजवर गेलो नाही. पण आता ते आपण होऊन देणगी देण्यास आले असल्याने त्यांचे आभार कसे मानावेत हेच मला कळत नाही.'' एवढ्यात वाडेकरच मला म्हणाले, ''खरे म्हणजे ही उणाक देणगी आहे. ती देणे वाजवीही म्हणावी अशी नव्हे, पण देवलांनी आग्रह धरल्यामुळे मी ती देण्यास आलो आहे.''

ही देणगी म्हणजे एका बुडालेल्या वाहतूक कंपनीची हजार रुपयांची ठेवीची पावती होती. या कंपनीच्या संचालक मंडळीतील काही व्यक्ती वाडेकरांच्या खास परिचयाच्या असल्यामुळे त्यांनी अगदी घरगुती संबंधातून ती ठेव वाडेकरांकडून हक्काने मागून घेतली होती. नंतर वाडेकरांनी तीर्थयात्रेस जाण्याचा संकल्प केल्यानंतर ठेवीचे पैसे परत मागणी केली. त्यांना पैसे तर परत मिळाले नाहीतच, पण संबंधितांच्या जाणत्या मुलाबाळांनी थोड्याफार हेटाळणीच्या सुरात त्यांची बोळवण चालू केली. हे पैसे वसूल करून ते धर्मादाय म्हणून खर्च करावेत ह्या ईर्ष्येने वाडेकर प्रेरित झाले होते.

सदर ठेव पावती स्वीकारावी की नाही ह्या विचारात मी असतानाच देवल मला म्हणाले, ''ही देणगी वसूल करून तिचे योग्य चीज आपणच करू शकाल अशी हमी देऊन मी वाडेकरांना आपणाकडे आणले आहे. तेव्हा ही देणगी आपण अव्हेरू नये अशी माझीही इच्छा आहे.''

अर्थात या देणगीचे मी सुहास्य मुद्रेने स्वागत केले, वाडेकरांचेकडून ठेव पावती संस्थेकडे देणगीदाखल दिल्याचा कायदेशीर कागद तत्काळ करून घेतला व बुडित संस्थेच्या संचालक मंडळाकडे पैशाची मागणी केली. या प्रतिष्ठितांनी कंपनी बुडाली असल्याचे सांगितले, शिवाय अशी बुडीत देणगी दिल्याबद्दल वाडेकरांना दोष देण्यासही कमी केले नाही. संस्थेच्या ऑफीसमध्ये चहापान करून या प्रतिष्ठित मंडळींनी काढता पाय घेता घेता फिरून, 'वाडेकरांनी अशी ही बुडीत देणगी द्यावयास नको होती' असा फेरअभिप्राय व्यक्त केला.

त्यांना निरोप देता देता मी म्हटले, ''कंपनी बुडाली असली तरी कंपनीचे सर्व व्यवहार कोर्टात दाखल करून 'रुपयास एक आणा जरी वसूल झाला तरी तो देणगी म्हणून घ्यावा' अशीच वाडेकरांची इच्छा असल्याने तशा नोटीसा रवाना झाल्या आहेत. आपणास एकदोन दिवसांत मिळतीलच.''

अर्थात कोर्टात जाण्याची पाळी संस्थेवर आली नाही. नोटीस मिळताच संबंधितांनी काही थोडी सवलत मागून संस्थेकडे पैसे आणून भरले. अशा रीतीने वाडेकरांची अशी ही उणाक देणगी संस्थेच्या पदरात पडली!! रामभाऊ देवल हे संस्थेवर अबोल प्रेम करणारे गृहस्थ आहेत याची जाणीव आम्हांस ह्या घटनेमुळे झाली. परंतु ह्या देणगीचा परिणाम असा झाला की, बुडीत ठेवीदारांच्या देणग्या संपादन करण्याचा आम्हांस छंद लागल्याप्रमाणे झाले!

आमच्या ह्या देणगीची वार्ता आप्पासाहेब जोग यांना लागताच त्यांनी आम्हाला ह्या कामी उत्तेजित करून आणखी एका बड्या बुडीत ठेवीदाराचे नाव सांगितले. अर्थात सदर गृहस्थ आमच्या परिचयाचे असल्यामुळे एके सकाळी आम्ही त्यांच्याही दारात जाऊन हजर झालो. पण त्यांनी आम्हांस जे उत्तर दिले ते अगदी नमुनेबाज असल्याने त्याचाही उल्लेख करण्यास हरकत नाही. ते म्हणाले, ''आयुष्यात मी खूप मिळविले व दिलेही आहे. आता वृद्धापकाळी माझ्याजवळ देण्यास काही नाही. पण तुला विन्मुख पाठविण्यासही मी तयार नाही. तुझ्या संस्थेचा सभासद मी होत आहे, पण ही बुडीत ठेव वसूल करण्याची मात्र मला इच्छा नाही. हे पैसे तू वसूल करशील, पण समाजात प्रतिष्ठेने वावरणाऱ्या चार लोकांना अंतकाळी दुखविण्याची मलाही इच्छा नाही. तेव्हा ह्या बुडीत ठेवीचा नाद सोडून दे; हे एकशे एक रुपये घेऊन तू जा कसा!''

### विद्यार्थ्यांच्या देणग्या

संस्थानी काळात आमच्या शिक्षणसंस्थेला अनुदान

मिळत नसतानासुद्धा गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यात आम्ही कधी कुचराई केलेली नव्हती. असे मोफत शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी भविष्यकाळात उच्चशिक्षण संपादन करून अनेक चांगल्या हुद्द्यांवर काम करीत असल्याने व त्यांची संस्थेबद्दलची कृतज्ञताबुद्धी शाबूत असल्याने, अनेकविध देणग्या अनपेक्षितपणे संस्थेकडे आल्या. एका माजी विद्यार्थ्याने संस्थेकडे रुपये पाचशेएक पाठविताना लिहिले, ''अगदी इंग्रजी पहिलीपासून मॅट्रिकअखेर आपण मला मोफत शिक्षण दिलेत. आज मी रेल्वे इंजिनियर असून सुस्थितीत आहे. संस्थेकडे माझ्या मोफत शिक्षणाची फी म्हणून अंदाजाने हिशोब करून रुपये पाचशे पाठविले आहेत. यानंतर सवडीने देणगी म्हणून स्वतंत्र रक्कम पाठविणार आहे.''

याच पद्धतीने अमेरिकन विद्यापीठात असलेल्या एका विद्यार्थ्याने -पाटील एस.ए. याने -दोन वर्षाखाली शंभर डॉलर्सची देणगी संस्थेकडे पाठवून दिली आहे. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, कित्येक कामगारांनी आम्हाला सडकेत थांबवून संस्थेसाठी रुपाया, दोन रुपये देणग्या दिलेल्या आहेत. गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व वर्गांत व जातीजमातीत संस्थेबद्दल असलेली ही श्रद्धा, हेच संस्थेचे मोठे भांडवल आहे. समाजात आमच्या संस्थेच्या शिक्षणकार्याबद्दल आस्था वाटते, याचाच अर्थ असा आहे की, शिक्षणकार्य हे समाजकार्य आहे. संस्थेने याची प्रचीती आणून दिली आहे.

●●●

## संस्था एक कुटुंब

संस्थेने आता आपली तीन तपे पूर्ण केली असून, जुने दिवस पालटून आता नवा जमाना आला आहे. जुन्यांनी निर्माण केलेली परंपरा टिकविण्यासाठी अधिक प्रभावी होण्यासाठी नवी पिढी पुढे येत आहे. अशा वेळी गतकाळाचा आढावा घेण्याची बुद्धी होणे स्वाभाविक आहे.

संस्थेने आत्तापर्यंत अनेक शैक्षणिक प्रयोग केले, अनेक योजना हाताळल्या. कालानुकूल बदल केले जात असताना संस्थेने निग्रहीपणाने काही पथ्ये पाळली आहेत. विद्यार्थ्यांना पाल्य समजून जोपासणे, आणि संस्थेच्या सेवकांना रास्त संरक्षण देऊन त्यांना सदैव कार्यप्रवण ठेवणे ह्यांबाबत संस्थेने कधीच हयगय केलेली नाही. संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांत सेवक व मालक हा भाव कधीच निर्माण केलेला नसल्याने तेथे सदैव खेळीमेळीचे व सहृदयतेचे वातावरण नांदत आलेले आहे. शिक्षणकार्यामध्ये ही अत्यावश्यक बाब आहे. संस्थेमधील शैक्षणिक कार्यक्रम अगर अन्य कोणतेही सामाजिक वा अन्य कार्यक्रम, अगदी आटोपशीर व अद्ययावत स्वरूपात पार पडत आलेले आहेत. 'शिक्षणसंस्थेचा कार्यक्रम हा सांगलीच्या नागरिकांचा कार्यक्रम' असेच गमक असल्याने सर्व थरांतील नागरिकांची अफाट सहानुभूती, हे संस्थेचे आजपर्यंतचे वैशिष्ट्य आहे. यामुळे काही 'हितसंबंधी' व्यक्तींनी संस्थाविरोधी अपप्रचाराची राळ उडविली तरीसुद्धा संस्थेच्या प्रतिष्ठेला काडीमात्र धक्का लागलेला नाही. संस्थेचे विद्यार्थीवर्ग व सेवक यांच्या मनाला जातीयवाद, प्रांतीयवाद अशा संकुचित वादांची कीड लागू नये, यासाठी संस्थेने नेहमीच मानसिक आरोग्य जपण्याचा प्रयत्न केला आहे. आजीव सेवक, नियामक मंडळ, विद्यार्थी यांच्यामध्ये संस्थेने निर्माण केलेले भावनिक ऐक्य ही आम्ही एक अभिमानास्पद बाब मानतो.

संस्थेच्या व्यापाचा हा सर्वांगीण आढावा घेतला जात असताना काही व्यक्तींचा खास उल्लेख करणे आवश्यक आहे. संस्थेत शिकून तयार झालेले संस्थेचे विद्यार्थीच आज नवीन आजीव सेवक झाले असून संस्था संचलनाची जबाबदारी त्याच तोलामोलाने सांभाळण्यासाठी पुढे आलेले आहेत. पण त्याखेरीज संस्थेतील अन्य व्यक्तींचाही गौरवपूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे. संस्थेमध्ये गेली

काही वर्षे एकात्मतेने काम करणारे अनेक शिक्षक आहेत. त्या सर्वांचा नामनिर्देश करावयाचा म्हटल्यास नव्याने येणाऱ्या काहींना कदाचित 'आपणाला का वगळले' असे वाटण्याचा संभव आहे. शाळा गोवर्धन संस्थेत नांदत असल्यापासून, बाहेर अन्यत्र संधी मिळण्याची शक्यता असतानाही जी माणसे संस्थेबरोबरच राहिली त्यांचा उल्लेख करणे आम्ही आवश्यक मानतो.

संस्कृतचे तज्ज्ञ शिक्षक ज.पु.जोशी, मराठीचे अध्यापक बिंदुमाधव आत्माराम कुलकर्णी, हिंदी शिक्षक माधवराव धोपाडे, शास्त्रशिक्षक माणगांवकर, चित्रकलाशिक्षक शिदोरे अशा काहींनी संस्थेमध्ये शिक्षणविषयक सेवा दीर्घकाळ केली आहे. संस्थेशी संपूर्ण एकात्म झालेली व संस्थेच्या जीवनविषयक हालचालींत आमच्या बरोबरीने धडपडणारी दोन माणसे म्हणजे संस्थेचे कर्मचारी गणपतराव पवार व मारुतराव कांबळे ही होत. संस्थेच्या आवारात तुम्ही केव्हाही या, त्यांची उपस्थिती असणारच! 'आपल्याला सुट्ट्या असतात' हे माहीत नाही; सेवेच्या कामाचे तास ठरलेले असतात हेही ह्यांना माहीत नाही. संस्थेच्या बरोबरीनेच आमच्या वैयक्तिक जीवनातही त्यांचा राबता मोठा आहे. संस्था व तिचे आजीव सदस्य ह्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक सर्व जीवनांत ही दोन माणसे इतकी समरस झालेली आहेत की, त्यांना वेगळे अस्तित्वच संभवत नाही. त्यांच्या हस्ते संस्थेचे लाखो रुपयांचे व्यवहार घडत आलेले आहेत. संस्थेची अफाट मालमत्ता गेली कित्येक वर्षे ते हाताळीत आलेले आहेत; परंतु त्यांनी त्यातल्या कशालाच स्वार्थाने स्पर्श केलेला नाही. आम्ही एवढेच म्हणू की, आजच्या जमान्यात ह्या एकात्मतेला, प्रामाणिकपणाला तोड नाही! संस्थेच्या प्रगतीत त्यांचा अबोल वाटा तितकाच असेल.

संस्थेत नव्याने आलेल्या पण संस्थेची परंपरा ज्ञात असलेल्या, संस्थेमध्येच प्राथमिक वा दुय्यम शिक्षण पुऱ्या केलेल्या अशा काही व्यक्तींचा उल्लेख अशाच रीतीने अपरिहार्य आहे. संस्थेच्या बहुतेक प्राथमिक शिक्षिका संस्थेच्या माजी विद्यार्थिनी असून आपल्या शिक्षणक्रमाच्या पूर्ततेनंतर त्यांनी प्राथमिक शाळेचे काम आत्मीयतेने सांभाळण्यास मदत केली आहे. प्रापंचिक जीवनात पदार्पण केल्यानंतर स्वाभाविकपणे काहींनी या पेशातून निवृत्ती पत्करली, तरी त्यांच्या जागी नव्या माजी विद्यार्थिनी तितक्याच तन्मयतेने हजर होत आहेत! काहीजणी पदवीधर होऊनही, केवळ हौस म्हणून प्राथमिक विभागात काम करीत आहेत. शिक्षकी पेशा हा हौसेने पत्करण्याचाच पेशा आहे. केवळ चरितार्थाचे अन्य साधन उपलब्ध नाही म्हणून शिक्षक होऊ पाहणारी माणसे, भारतीय शिक्षण पद्धतीत काही चांगले काम करू शकतील असे मानण्यास मुळीच जागा नाही.

प्राथमिक शिक्षक म्हणून आपली जबाबदारी पार पाडत असताना उच्च अभ्यासक्रम पुरा करून, संस्थेच्या माध्यमिक शाळेत शिक्षणकार्य करणाऱ्या संस्थेच्या सेवकांत म.प्र.पाटणकर व सुशीला करंदीकर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पाटणकर हे येथे येण्यापूर्वी ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत असताना केवळ एक ट्रेन्ड शिक्षक होते, पण संस्थेच्या सेवेत आल्यानंतर त्यांनी क्रमश: एम.ए.बी.एड्.पर्यंतचा आपला अभ्यासक्रम पुरा करून आज ते दुय्यम शाळेत अध्यापक म्हणून काम करताहेत. सुशीला करंदीकर ही संस्थेची माजी विद्यार्थिनी, शालांत परीक्षेनंतर प्राथमिक शिक्षिका म्हणून कामावर आली. पुढे सतत चिकाटीने क्रमश: एस.टी.सी., बी.ए.बी.एड्. अशा पदव्या संपादन करून ती आता संस्थेच्या दुय्यम शाळेत शिक्षिका म्हणून काम करीत आहे. संस्थेचे हे इतिवृत्त तयार करण्याचे कामी या माजी विद्यार्थिनीनेच बहुमोल सहकार्य दिले आहे. आज संस्थेत असलेल्या प्रत्येक पदवीधर शिक्षकाबाबत संस्था असे म्हणू शकते की, आपल्या सेवकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी या संस्थेने जितक्या सोयी-सवलती निर्माण करून दिल्या आहेत, तितक्या अन्य कोणी निर्माण करून दिल्या असल्याची शक्यता कमी आहे!

संस्थेच्या हिशोबी खात्यात लेखनिक म्हणून काम करणारे साठे, अन्यापनावर व गवंडी हे त्रिकूट अत्यंत कार्यक्षम व प्रामाणिक आहे. या विभागात काम करणारी जुनी माणसे पदवीधर होऊन पुढे गेली, व त्यांची जागा ह्या नव्या तिघांनी घेतलेली आहे. त्यांची ह्या विभागातील कार्यक्षमता पाहिल्यानंतर संस्थेलाच असे वाटू लागले आहे

की, या त्रयींना आता पदवीधर होण्याची संधी देण्यात अर्थ नाही; कारण शाळेचे हिशेबी खाते हा त्यांचा छंद आहे! शाळेसंबंधी सर्व उलाढाली चाणाक्षपणे करणारा साठे हा शाळेचा माजी विद्यार्थी आहे. संस्थेचा तंत्रमंत्र सर्व त्याला माहीत आहे, आणि त्यामुळे तो संस्थेच्या कौतुकाचा विषय झाला आहे.

संस्थेचा हा त्रोटक इतिहास लिहीत असताना सत्यापासून दूर जाण्याचा मी किंचितही प्रयत्न केला नाही. कोणाला अकारण श्रेय दिले नाही, अगर कोणाचे श्रेय हिरावून घेण्याचाही प्रयत्न केलेला नाही. गेल्या तीन तपांच्या प्रदीर्घ काळात जे जसजसे घडत गेले व ज्यांनी घडविले तेवढेच इथे नमूद केले आहे.

एका शिक्षणसंस्थेचा हा आढावा असल्याने त्याला वाङ्मयीन वा ऐतिहासिक ग्रंथ म्हणून काही मूल्य अपेक्षित नाही. पण शिक्षणसंस्थांत सध्या काम करणारी अगर भविष्यकाळात काम करू इच्छिणारी अशी जी माणसे असतील, त्यांना आमच्या शिक्षणविषयक कार्याचा हा अनुभव उपयुक्त वाटण्याची शक्यता आहे.

अगदी अलीकडेच सांगलीच्या माधवदास शेडजी या धनिक गृहस्थांच्या उदार आश्रयामुळे बबूताई गोडबोले यांनी सुरू केलेल्या आमच्या संस्थेच्या बालक मंदिराला 'हेमलता बालक मंदिर' असे नाव दिले आहे. या पूर्वप्राथमिक छोट्या शाखेमुळे बालकांपासून तो तहत शालांत परीक्षेपर्यंत सर्व शिक्षणक्रमांचे एकसूत्रीकरण करण्याचा संस्थेचा प्रयत्न, दीर्घ कालावधीनंतर का होईना पण यशस्वी झाला आहे! ह्या बालक मंदिराची उभारणी करण्याचे कामी संस्थेचे माजी अध्यक्ष ग.कों.गोडबोले यांच्या सुविद्य कन्या बबूताई गोडबोले यांचे बहुमोल प्रयत्न कारणीभूत झाले.

भारत सेवक समाजामार्फत लहान बालकांना खाद्य पुरवठा करण्याचे काम सुमारे तीन चार वर्षेपर्यंत या संस्थेने कसोशीने पार पाडले. सकाळी ९-१५ला प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या सुमारे पाचशे मुलांना या योजनेखाली सकस अल्पोपहार पुरविण्याचे कामही या संस्थेने पार पाडले आहे.

**प्रकल्प**

शिक्षण, शिक्षणपूरक व संस्थाविषयक अनेक उलाढाली चालू असताना शिक्षणसंस्थेने अनेक शैक्षणिक प्रकल्पांची मांडणी केली. त्यांना भारत सरकारकडून आर्थिक मदतही मिळाली. या प्रकल्पांमध्ये दोन ठळक प्रकल्प म्हणजे, 'एक जग प्रकल्प' व 'शास्त्रसंघ' यांचा उल्लेख करावा लागेल.

**एक जग प्रकल्प**

दुसऱ्या महायुद्धानंतर वेंडेन विल्कीने 'एक जग'ची कल्पना मांडली. दळणवळणाच्या साधनांची वाढ, व्यापारी संबंध यांमुळे जागतिक मानव आता पूर्वीप्रमाणे विभक्त राहिलेला नाही. समाजशास्त्रे हा विषय शिकविताना, त्या विषयाची मांडणी करताना इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र यांचा संकलित अभ्यासक्रम तयार करण्यात यावा; जागतिक मानवाची ऐतिहासिक परंपरा व भविष्यकालीन वाटचाल यांचे सूत्र कसे समान आहे हे समजावून द्यावे, तसेच भविष्यकाळात एक जागतिक मानव कसा तयार होणार आहे याची कल्पना देता यावी; या सूत्राने प्रकल्पात मांडणी करण्यात आली. हा प्रकल्प राज्य व केंद्र पातळीवर मंजूर होऊन याच्या कार्यवाहीसाठी अनुदानही मिळाले आहे.

**शास्त्र संघ**

विज्ञानाची होणारी प्रगती विचारात घेता भारतीय विद्यार्थी स्पर्धेत मागे राहता कामा नयेत हे विचारात घेऊन, विद्यार्थ्यांमध्ये शास्त्र विषयाच्या अभ्यासासाठी जिज्ञासा वाढावी म्हणून 'शास्त्र संघ' ही कल्पना काढण्यात आली. जिज्ञासा वृत्ती जागृत करणे, शास्त्रीय प्रमेये समजून घेणे, प्रयोगांद्वारे पडताळा पाहणे, विद्यार्थ्यांच्या चिकित्सा बुद्धीला चालना देणे ह्यांसाठी शालेय कार्यक्रमांखेरीज खास वेळ काढण्यात येऊन, या विषयांची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा संघ निर्माण करण्यात आला. त्याला पुस्तके, उपकरणे, मार्गदर्शक ह्यांची जोड देण्यात आली. या प्रकल्पालाही भारत सरकारकडून अनुदान देण्यात आले. ह्या प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शास्त्रीय वस्तूंची अनेकदा प्रदर्शनेही भरविण्यात आली.

नव्या काळातील सामाजिक व राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. बदलत्या परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याबद्दल शिक्षणक्षेत्राला आवाहन केले जात आहे. आता या संस्थेची धुरा वाहण्यास पुढे आलेल्या तरुण मंडळींनी याबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. परंपरा निर्माण झाली आहे, साधनसामग्री तयार आहे. भविष्यकाळ अधिक उज्ज्वल करण्याची जबाबदारी तरुण वर्गाने पत्करली आहे.

आमच्या शुभेच्छा आहेतच.

●●●

# परिशिष्ट

**आमचे निवेदन व सरकारी प्रतिक्रिया!**

आम्हां आजीव सदस्यांची ही शिक्षणगाथा पूर्ण होण्यापूर्वी आम्ही एकमताने संमत केलेले एक निवेदन यापुढे देत आहोत. या निवेदनाबाबत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिक्षणतज्ज्ञ जे.पी.नाईक यांनी व महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्याने पत्ररूपाने ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या, त्या मुद्दाम प्रारंभी देत आहोत.

(Seal of Govt. of India)

MINISTRY OF EDUCATION
INDIA

Adviser
No. Adv/(PA)/68

New Delhi
October 4, 1968

*Dear Shri. Apte*

*Thank you for your letter of 18th September 1968.*
*You have raised a very important issue which I will carefully consider.*
*With best regards.*

Shri.D.N.Apte
Secretary
Young Mens' Model
Education Society
Sangli (Maharashtra)

Your sincerely
Sd/xxxx
(J.P.Naik)

---

## महाराष्ट्र शासन

क्रमांक एस.एम.एम.३४६८-१०५७०-इ
शिक्षण समाजकल्याण विभाग
सचिवालय विस्तार भवन, मुंबई ३२
दि. १९ ऑक्टोबर ६८

कार्यवाह, यंग मेन्स एज्यु.सोसायटी, सांगली
द्वारा - जी.ए.हायस्कूल सांगली

विषय - शिक्षणसंस्थांचे कार्य अबाधित राहण्याबाबतचे निवेदन

*महाशय,*

*वरील विषयावर दि.१९-९-६८ च्या आपल्या पत्र क्रमांक २४/६८-६९ मधील निवेदनाचा या विभागात विचार चालू आहे.*

आपला विश्वासू
स्वाक्षरी
(पां.तु.महाजन)
अवर सचिव
शिक्षण व समाजकल्याण विभाग

## घटना, कार्यपद्धती, स्वायत्तता व तीवर होणारे सरकारी आक्रमण

३६ वर्षांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवानंतर, व संस्था स्थापन करून तिचे आजच्या विशाल क्षेत्रांत रूपांतर करू शकल्यानंतर त्या पायावर उभे राहून मी व माझे सहकारी एकमताने सदर निवेदन, संस्थेच्या संचलनात जबाबदार असलेल्या सर्व मंडळींना व त्याचबरोबर महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण खात्याला सादर करीत आहोत.

### निवेदन

आमच्या संस्थेची प्रथम स्थापना संस्थानी अमदानीत झाली. बाहेर त्यावेळी ब्रिटिश राजवट होती, पण सामान्यपणे शिक्षण संचलनाबाबत ब्रिटिश राजवटीचे जे धोरण होते, तेच संस्थानी मुलुखात चालू होते. शिक्षणकार्य सुरळीत चालू आहे किंवा नाही हे पाहणे, शिक्षणाच्या विकासासाठी शिफारस करणे व त्यानुरोधाने शक्यतेनुरूप आर्थिक साहाय्य देणे या पलीकडे शिक्षणसंस्थांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याची प्रवृत्ती अजिबात नव्हती. त्याचबरोबर शिक्षणसंस्था काढणारी माणसे त्रयस्थ कोणी नसून, शिक्षण विकासाला वाहून घेऊ इच्छिणारी शिक्षक मंडळीच प्रामुख्याने असत. नव्याने उदयास येणाऱ्या पिढीचा मनोविकास करून तिच्यामध्ये राष्ट्रप्रेम, विधायक कार्याची आवड, ज्ञानलालसा इ. गोष्टी निर्माण करण्याची ईर्षा बाळगणारी माणसे प्रसंगी उपासमार पत्करूनही या कार्यांत रममाण होऊन जात.

या मंडळींचे हे कार्यकर्तृत्व स्थानिक समाजामध्ये त्यांच्याबद्दलचा प्रेमभाव जागृत करीत असे, लोकांच्या मनांत कार्याला हातभार लावण्याची सदिच्छाही बळावत असे. शिक्षणात रस घेणाऱ्या व्यक्तींना सामाजिक प्रतिष्ठा पैदा करून आपल्या कार्याला सहानुभूती मिळवून घ्यावी लागत असल्याने, शिक्षणक्षेत्रात वावरणारा प्रत्येक माणूस आपल्या संस्थेच्या भरभराटीसाठी काटेकोरपणाने वागत असे. आपण किती तास काम करतो आहोत याचे भान न बाळगता कार्यांमध्ये तो मग्न राही. या साऱ्याचा परिपाक म्हणून आमच्या संस्थेच्या शिक्षणकार्याचा आज भव्य विकास झालेला आढळेल. शिक्षणाच्या विकासाला संस्थेची कोणती संरचनात्मक जडण-घडण उपयुक्त ठरते याचा सम्यक खोल विचार करूनच संस्थेने आपली घटना अस्तित्वात आणली आहे. या घटनेनुसार संस्थेतील संचलनात्मक सर्व अधिकारांचे केंद्रीकरण करून 'आजीव सदस्य मंडळ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिक्षक मंडळींच्या प्रभावी गटाच्या हाती ते सुपूर्त केले आहेत. आज आमच्या संस्थेचा दिसणारा विकास हा आजीव सदस्य मंडळाच्या प्रदीर्घ परिश्रमांचा परिपाक आहे, हे कोणासही नाकारता येणार नाही.

गावातील धनिकवर्ग व सरकार यांचे सहकार्य ह्या प्रगतीला पोषक ठरले असले तरी, प्रगतीची दिशा ठरविणे, संस्थेचे संचलन पद्धतशीर व कार्यक्षम राहील याची दक्षता घेणे, संस्थेतील सेवकांचे हितसंबंध रक्षण करून त्यांना सुरक्षितता प्राप्त करून देणे, धनिकांचे व सरकारचे सहकार्य मिळवण्यासाठी सदैव जागृत राहून प्रयत्नशील राहणे या सर्व गोष्टींची जबाबदारी आजीव सदस्य मंडळाने पार पाडली. त्यासाठी दिवसांतील कितीतरी तास खर्च केले, याचा विचारही कधी केलेला नाही.

या निवेदनात आत्मस्तुतीचा भाग येत असला तरी तो दोष पत्करूनही शिक्षण विषयाला पूरक ठरलेल्या घटना आम्ही नमूद करत आहोत. शिक्षण विकासाला पूरक ठरणाऱ्या अशा बाबींवर सरकारकडून जाणता-अजाणता जे आक्रमण होत आहे, त्यामुळे शिक्षणक्षेत्रात अराजकता निर्माण होत आहे. ती थोपविण्याच्या दृष्टीने काय झाले पाहिजे याबद्दल स्पष्ट मतप्रदर्शन करणे भाग आहे. आता सेवानिवृत्ती पत्करीत असताना जीवनरस ओतून आम्हा शिक्षकांनी जे घडविले, ते सुरक्षित राहावे अशी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. ही अपेक्षा बाळगीत असताना संस्थेच्या घटनेशी विसंगत राहून जी विघातक आक्रमणे होत आहेत, ती थोपविण्यासाठी व शिक्षणाच्या हितासाठी ठाम भूमिकेने झगडा देणे आवश्यक आहे; आणि म्हणूनच हे निवेदन करावे लागत आहे!

मर्यादित स्वार्थी हेतूंनी प्रेरित झालेल्या काही मंडळींनी शिक्षण क्षेत्रात जे अनुचित घडविले, व ज्याला सरकारने हातभार लावला त्याचे दुष्परिणाम दिसून आले. सरकार त्याच्या दुरुस्तीसाठी ज्या धडपडी करीत आहे, त्यामुळे वाळल्याबरोबर ओले जळत आहे. वस्तुत: शिक्षणसंस्थेचे स्वातंत्र्य व स्वायत्तता यांना धक्का लावण्याचा प्रयत्न खुद्द ब्रिटिश अमदानीतही झाला नाही. पण स्वातंत्र्यकाळात तो इतक्या झपाट्याने होत आहे की, स्वतंत्र शिक्षण परतंत्र होऊ पाहात आहे. ही अवस्था लोकशाही मानणारे सरकार आणत आहे, हे विशेष आहे! सरकारी नोकरशाही शिपायापासून वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत -नव्याने प्राप्त झालेल्या अधिकारांचा सर्रास दुरुपयोग करीत असून शिक्षण संस्थांनी लाचारी पत्करण्याचा प्रसंग आणीत आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून शिक्षणसंस्थांना लाभत असलेली प्रतिष्ठा व आत्मतेज नष्ट होत आले असून, शिक्षणसंस्था गुलामगिरीच्या व पर्यायाने मानसिक दौर्बल्याच्या आहारी जात आहेत. स्वाभाविकच शिक्षणही लुळेपांगळे होत चालले आहे.

'शिक्षणसंस्थांमध्ये धंदेवाईक दृष्टी आल्याने सरकारला आक्रमक पवित्रा घ्यावा लागला' असा सरकारचा दावा आहे. पण 'ही धंदेवाईक दृष्टी निर्माण होण्यास सरकारच कारणीभूत आहे' असा आक्षेप घेण्यास भरपूर जागा आहे. गेल्या वीस वर्षांत शिक्षण-प्रसाराच्या नावाखाली जे घडले व ज्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सरकारने हातभार लावला, त्या साऱ्या घटनांचा समग्र अभ्यास करून नि:पक्षपातीपणे निर्णय घ्यावयाचा ठरल्यास, सरकारला ह्या दोषारोपातून मुक्त होता येणार नाही. या आपत्तींना आवर घालण्याचा प्रयत्न करीत असताना सरकारने आपल्या धोरणांचा फेरविचार करणे अपरिहार्य झाले आहे. पण हा फेरविचारही बराचसा एकांगी घडत आहे. केवळ शिक्षणसंस्थाच त्याला जबाबदार आहेत, असे धरून सरकारने जे चालविले आहे त्यामुळे विघातकांबरोबर विधायक प्रवृत्तींवरही आघात होत आहेत असे म्हणणे भाग आहे. सरकारच्या ध्यानी ही गोष्ट आली नाही असे नाही. पण सरकारी धोरणांमध्ये सुसंगती राहाण्यासाठी सरकारला विधायक-विघातक यांना एकाच मापाने मोजावे लागत आहे. त्यामुळे खऱ्या शिक्षण कार्याला अडथळे निर्माण होत आहेत, हे सत्य आहे!

यासाठी सरकारी धोरणाचे दोन भाग होणे आवश्यक आहे. खरोखरीच विधायक प्रवृत्तीने जे अखंड कार्य करीत राहिले आहेत, त्यांचेसाठी धोरणात्मक सूत्र बदलावे लागेल. पण ह्यामध्येही एक दोष असा आहे की, विधायक व विघातक यांचेबद्दल मतप्रदर्शन करणे झाल्यास ते सध्याच्या चाकोरीतून नि:पक्षपातीपणाने होणे अशक्य आहे. यासाठी सरकारने स्वतंत्र अशी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. सरकार या नात्याने ही दुहेरी वाटचाल अवघड वाटत असल्यास, खाजगी शिक्षणसंस्थांबाबत एकच एक धोरणात्मक सूत्र ग्राह्य ठरेल; ते म्हणजे सर्व संस्थांचे सरकारीकरण हे होय. सध्या अस्तित्वात असलेल्या अनुदान-संहितेमुळे सरकारने वेळी अवेळी दिलेल्या धोरणात्मक आदेशांमुळे संस्थांचे स्वातंत्र्य नष्टप्राय झाले असल्याने, त्यांचा संचलनात्मक आत्मा जवळजवळ अदृश्य झाला आहे. ह्याचा परिणाम संस्थांच्या कार्यक्षमतेवर होऊन शिक्षणक्षेत्रात औदासिन्याचे व पोटभरूपणाचे वातावरण निर्माण होऊ पाहात आहे. हे वातावरण शिक्षणकार्याला पोषक आहे, असे आम्हास वाटत नसल्याने संस्थेच्या भवितव्याबाबत निर्णायक भूमिका घेणे आवश्यक आहे. ह्या दृष्टीने केवळ आमच्या संस्थेपुरता मर्यादित विचार नमूद करणे अत्यावश्यक आहे.

आमची शिक्षणसंस्था केवळ 'आजीव सदस्य' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिक्षकांच्या नियंत्रणाखाली वाढत होती व आहे. कालांतराने आजीव सदस्य मंडळातील सदस्य निवृत्त होत असल्याने संस्थेच्या शिक्षकांतून नव्या आजीव सदस्य मंडळींची निर्मिती, ही अत्यावश्यक बाब होऊन बसली. संस्थेत काम करीत असलेल्या शिक्षकांमधून हे मंडळ तयार करण्याचा प्रयत्न शिक्षणखात्याकडे सातत्याने करणे अपरिहार्य होते. या संस्थेमधून शिकून तयार झालेला विद्यार्थीवर्गच आज शिक्षणसंस्थेमध्ये शिक्षक म्हणून काम करीत आहे. आरंभकाळात केवळ मॅट्रिक पास झालेले विद्यार्थी कामास आले, शिक्षणसंस्थेने त्यांच्या प्रगतीचा मार्ग न रोखता सतत सवलती देऊन तो मार्ग खुला ठेवल्याने, त्यांची शैक्षणिक पात्रता वाढवून घेऊन, उच्च पदवी घेऊन आज ते संस्थेत काम करीत आहेत.

त्याचबरोबर शिक्षणसंस्थेच्या शिक्षकांना संरक्षण देण्याच्या धोरणामुळे, संस्थेत कायम नोकरी करीत असलेले अनेक शिक्षक आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता, काम करण्याची कुवत, शिक्षणकार्याला वाहून घेण्याची जिद्द यांचा समग्र इतिहास संस्थेच्या डोळ्यापुढे आहे. संस्थेने आजीव सदस्य मंडळ तयार करताना या सर्व गोष्टींचा विचार करून नव्या आजीव सदस्य मंडळाची घडण करण्यासाठी शिक्षकांस जी विचारणा केली, तीमधून प्रगट झालेले सत्य पुढीलप्रमाणे आहे.

१) दीर्घकाळ सेवा केलेल्या व शैक्षणिक पात्रता असलेल्या काही शिक्षकांनी आजीव सदस्यत्व पत्करण्यास नकार दिला.

२) ज्यांची दीर्घकाळ सेवा आहे, शैक्षणिक पात्रता आहे, परंतु ज्यांच्या वर्तनामुळे शिक्षणसंस्थेला नामुष्की पत्करण्याचा प्रसंग आला अगर ज्यांना अधिकाराचा वापर कसा करावा, सामाजिक प्रतिष्ठा कशी टिकवावी, संस्थेचे आर्थिक व्यवहार सांभाळण्यासाठी प्रामाणिकपणाची जी कसोटी लागते, यासंबंधी बेपर्वाई दिसून आली अशांना संस्थेने अधिकारसूत्रे दिली नाहीत.

३) संस्थेची अधिकारसूत्रे घेण्यास शैक्षणिक दृष्ट्या अगर अन्य दृष्टीने संचलनात्मक कार्यासाठी या प्रकारचे शिक्षक थिटे पडतील असेच आहेत. केवळ 'शिक्षक' एवढेच त्यांचे कार्य आहे. या वर्गीकरणानंतर संस्थेला त्यातल्या त्यात जे पात्र वाटले, व ज्यांनी शिक्षणकार्याला वाहून घेण्याची शपथ घेतली, अशांना आजीव सदस्यपद देऊन घटनेतील संचलनात्मक सर्व अधिकार त्यांचे हाती सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच सरकारी धोरणांमुळे झालेला पेचप्रसंग उद्‌भवला.

संस्थेच्या घटनेप्रमाणे संस्थेच्या संचलनातील अधिकारपदे केवळ आजीव सदस्यांकडेच जातात. त्यामुळे सरकारचा केवळ ज्येष्ठतेचा आदेश संस्थेच्या घटनेशी विसंगत ठरतो. त्या आदेशापुढे मान तुकवली तर ज्यांना अधिकारपदे पाहिजे आहेत पण संचलनात्मक जबाबदारी नको आहे अशांना, अगर संस्थेने दोषारोपामुळे ज्यांना अपात्र ठरविले आहे अशांना, अधिकारपदे द्यावी लागतील. स्वाभाविकच संचलनात्मक जबाबदारी एकावर व अधिकारपदाचा उपभोग दुसऱ्याकडे अशी अवस्था निर्माण होईल. त्यातून संस्थेच्या कार्याचा खेळखंडोबा झाल्यावाचून राहणार नाही.

त्या आदेशानुसार कार्यवाही करण्यामध्ये दुसरा महत्त्वाचा दोष असा आहे की, केवळ पदवी अगर नोकरीचा कालावधी यावर अधिकारपदाचे निर्णय घेतले गेल्यास ते समर्थनीय असू शकणार नाहीत. खुद्द सरकारच्या कारभारामध्ये ते समर्थनीय मानले जात नाहीत. अशा रीतीने संस्थेच्या सेवकांचे मूल्यमापन करण्याचा अधिकार सरकारने आपल्या हाती घेणे, व तो ठोकळेबाज मूल्यमापन पद्धतीने अंमलात आणणे हे सर्वथैव चुकीचे आहे. आपली कार्यक्षमता टिकविण्याचे दृष्टीने कोण पूरक आहे व कोण मारक आहे हे संस्थेने ठरविणे अत्यावश्यक आहे.

सरकारच्या अनुदानसूत्राने निर्माण केलेले पेचप्रसंग गंभीर असतात, त्याचप्रमाणे सध्या पतपेढ्यांचाही शिक्षणसंस्थांवर विश्वास राहिला नसल्याने शिक्षणसंस्थांना कर्जे देण्याची पद्धत पतपेढ्यांनी अमान्य केली आहे. आजीव सदस्य मंडळाने वैयक्तिक पतीवर आपल्या संस्थेचा आर्थिक तोल सांभाळून धरला आहे. अर्थात या मंडळातील लोकांना लाभलेली आर्थिक पत ही त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेने निर्माण झालेली नसून, व्यावहारिक चोखपणा व धनिकांचा त्यांना पाठिंबा यामुळे निर्माण झालेली आहे. ही साहाय्यकारी परंपरा जोपासणारे शिक्षक कोण आहेत हे ठरविणे सरकारला शक्य नाही. दीर्घकाळ सेवा करून निवृत्त होऊ पाहणारे आजीव सदस्य मंडळ, व संचलनात्मक बाबीत भाग घेणारी संस्थेची अन्य मंडळीच याचे रास्त मूल्यमापन करू शकतील.

नव्याने तयार होणाऱ्या आजीव सदस्य मंडळाला काही अधिकारच नसतील तर ही जबाबदारी कोणीच पेलणार नाही, आणि संस्थेच्या संचलनात विलक्षण पोकळी निर्माण होईल. संस्थेच्या कार्याला केवळ आर्थिक हातभार लावणारी माणसे संस्थेत येऊन दैनंदिन कारभार पाहातील, व शिक्षण विकासकार्याचे कार्यक्रम आखतील, ही सरकारची समजूत

शिक्षणाचा घात करणारी आहे. त्याचप्रमाणे शिक्षक म्हणून वावरणारा प्रत्येक माणूस केवळ पदवीने अगर नोकरीने ज्येष्ठ होतो व एवढ्याच भांडवलावर या साऱ्या जबाबदाऱ्या पत्करण्यास तयार होतो ही कल्पना सुतराम चुकीची आहे. उलटपक्षी जबाबदारी न घेता अधिकारपदे मिळत असतील तर जबाबदारीची नसती डोकेदुखी का निर्माण करून घ्यावी? -असाच याबाबतचा सर्वसाधारण दृष्टिकोण आहे. यामुळे संस्थेच्या संचलनाबाबत संस्थेचे घटनात्मक अधिकार डावलून जर सरकार हस्तक्षेप करणार असेल तर, याबाबतची लक्ष्मणरेषा ठरवून घेणे भाग आहे. संस्थेचे घटनात्मक अस्तित्व सरकारी धोरणांमुळे जर नष्ट होत असेल तर, 'संस्था सरकारनेच चालवावी' असे म्हणण्यास मुळीच प्रत्यवाय नाही; आणि सरकार जर ही जबाबदारी पत्करणार नसेल तर सरकारने संस्थेच्या घटनात्मक स्वातंत्र्याला हात लावता उपयोगी नाही, असे सांगण्यासही मुळीच हरकत नाही. सरकारकडून मिळणारे अनुदान हे 'अनुदान' आहे, 'दान' नाही! दाने देणाऱ्याने याचकांकडून पारतंत्र्याची अपेक्षा करावी, तशातला सध्याचा हा प्रकार आहे. पारतंत्र्यकाळात स्वतंत्रपणे त्याग करून 'आपण काही राष्ट्रीय कार्य करीत आहोत' या भावनेच्या उद्रेकातून ज्यांच्या हातून काही शिक्षणकार्य झाले, ते त्यांचे कार्य आता पूर्णत्वाला नेण्याची जबाबदारी सरकारची आहे. या लोकशाही सरकारने शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन, त्यांचे सरकारीकरण करण्यास मुळीच हरकत नाही; पण तसे नसेल तर मात्र शिक्षणकार्यासाठी जे अनुदान शिक्षणसंस्थांना दिले गेले त्याचा रास्त वापर केला गेला किंवा नाही एवढे पाहावे. मात्र याच्या पलीकडे जाऊन संस्थांचे नियंत्रण वा नियमन करण्याचा आविर्भाव आणणे सर्वथैव अक्षम्य आहे व लोकशाहीलाही ते मारक आहे.

अनेकविध हस्तक्षेपांमुळे शिक्षणसंस्थांत आज एक अनिष्ट वातावरण तयार झाले आहे. शिक्षणसंस्था शिक्षकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतात, त्यांना स्थैर्य मिळू देत नाहीत, त्यांना आर्थिक स्वास्थ्य मिळू देत नाहीत..., असे अनेकविध गैरसमज करून घेऊन सरकारने त्यांच्यासाठी काही सोयी सवलती देण्याचे बंधन घातले. रजा, सवलती, शिक्षकांचे हक्क, त्यांच्या नोकरीला संरक्षण हे सर्व निर्माण केले. तथापि त्यांचा सर्रास गैरवापर होऊ लागला असून, शिक्षक पेशाला इतके अनिष्ट वळण लागले आहे की, सर्वसामान्य कारखानदारीमध्ये आज जी अनागोंदी दृष्टीला पडते तीच शिक्षणामध्ये आली आहे! पण कारखानदाराला वैयक्तिक स्वातंत्र्य असल्याने तो ही अराजकता समर्थपणे हाताळू शकतो. शिक्षणसंस्थांना ती स्वतंत्रता नसल्याने, हक्कांचा गैरवापर करणाऱ्या शिक्षकाला मार्गावर आणणे शिक्षणसंस्थांना अवघड पडते. विद्यार्थ्यांना खोटे बोलावयास लावून शिकवण्या करणारे शिक्षक अस्तित्वात आहेत. संपूर्ण रजांचे मनमानी उपभोग घेणारे शिक्षक अस्तित्वात आहेत, पदव्यांची अक्षरे संपादन करताना आर्थिक लाभाचा उद्देश ठेवणारे शिक्षक आहेत, दोन वर्षे पद्धतशीर वागून तेवढ्यावर नोकरीत कायम होताच आपले सत्व आणि कर्तव्य विसरणारे शिक्षक आहेत!! या सर्वांना हाताळताना, शिक्षणसंस्थेचे अधिकार मात्र वशिलेबाजीच्या आहारी जाणाऱ्या सरकारी नोकरशाहीच्या आधाराने वापरण्याची पाळी संस्थांवर आली आहे.

शिक्षणसंस्था एक वर्ष चालवून दाखवण्याचे कार्यकर्तृत्व संबंधित खात्यामधील कोणत्याही सरकारी नोकरात असणार नाही. पण शिक्षणक्षेत्रात ढवळाढवळ करताना मात्र त्यांना अमर्याद उत्साह संचारत असतो! शिक्षणकार्यात रस घेणाऱ्या लोकांना आपला बराचसा काळ या उपद्रवी कागदी घोड्यांना पायबंद घालण्यात खर्च करावा लागतो. ही सारी अवस्था निर्माण होण्यास सरकारचे दुटप्पी धोरण कारणीभूत आहे, त्याचप्रमाणे संस्थांबद्दलची चुकीची भूमिकाही कारणीभूत आहे. यासाठी सरकारने संस्थांचे वर्गीकरण करून त्यांच्या कार्यावरूनच आपले धोरण निश्चित केले पाहिजे. सरसकट शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण होणार नसेल तर, संस्थांना त्यांची स्वायत्तता टिकवून धरण्यास मदत केली पाहिजे. ज्या संस्थांची स्वायत्तता सरकारला शंकास्पद वाटत असेल त्या संस्था बंद केल्या पाहिजेत, व त्यांनी निर्माण केलेल्या शाळा स्थानिक पातळीवर नव्या संस्था निर्माण करून त्यांच्या हवाली केल्या पाहिजेत;अगर अनुभवी संस्थांचे हवाली केल्या पाहिजेत. अन्यथा सरकारजमा तरी केल्या पाहिजेत!

भारत सरकारने आंतरराष्ट्रीय समितीपासून ज्या ज्या म्हणून शिक्षणसमित्या नेमल्या, त्या प्रत्येक समितीने गावातील दुय्यम शिक्षणसंस्थेचे स्थान व तिच्या संचलनात्मक कार्यवाहीबद्दल जबाबदार असणाऱ्या व्यक्ती यांचे अनुरोधाने शिक्षणविषयक शिफारसी केलेल्या आहेत. अनुदानसंहिता तयार करताना वा अधिकारपदांबद्दल आदेश देताना त्या शिफारसी विचारात घेतल्या नाहीत तीच आश्चर्याची व सर्वात दुर्दैवाची गोष्ट आहे. संस्थेच्या सेवकवर्गापैकी कोणाचे कर्तृत्व शिक्षणकार्याला पोषक आहे, हे अजमावण्याचा अधिकार संस्थेला असून, तो अधिकार सरकारला घेऊ देणे सर्वथैव चुकीचे ठरणार आहे. सरकारच्या या आक्रमक पवित्र्याला बळी पडणाऱ्या संस्था आपले स्वत्व गमावून लाचारीचे एक नवे युग सुरू करतील. त्यापेक्षा शिक्षणसंस्थांनी आपला गाशा गुंडाळून त्याचे भवितव्य सरकारकडे सुपूर्त करण्यास मुळीच हरकत नाही. संस्थेने स्वत:चे हिंमतीवर स्वीकारलेल्या आर्थिक व अन्य जबाबदाऱ्या सरकारने पार पाडाव्यात, व खुशाल शिक्षणसंस्थांचे राष्ट्रीयीकरण करावे. मोघम आदेश काढून, शिक्षणसंस्थांना उपद्रव देण्याचे एक साधन कारकुनांचे हाती देण्यात मुळीच हशील नाही.

शिक्षण क्षेत्रात हौसेने पडलेल्या मंडळींची कार्यक्षमता, नेतृत्वाची धमक व शिक्षणाबद्दलची आस्था ही सरकारी नोकरांपेक्षा कमी दर्जाची आहे, असे मान्य करण्याची आमची तयारी नाही. संस्था फुका-पासरी दटावणी देणाऱ्यांच्या हवाली करण्याची तयारी दाखविणे, म्हणजे अराजक व अप्रामाणिक प्रवृत्तींपुढे मान तुकविणे होय! राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आम्ही ही गोष्ट मान्य करू शकत नाही. म्हणून खाजगी शिक्षणसंस्थांचे भवितव्य ठरविण्यामध्ये सरकारचा आडमुठेपणाच चालणार असेल तर, संस्थेचे राष्ट्रीयीकरण तरी झाले पाहिजे, नाहीतर संस्थेची स्वायत्तता तरी अबाधित राहिली पाहिजे. अन्यथा संस्थाच विसर्जित झाली पाहिजे अशी आमची ठाम धारणा आहे.

शिक्षणक्षेत्रातील नोकरशाहीचे वर्चस्व वा तिचे राष्ट्रीयीकरण, हे पर्याय किंवा संभाव्यता आम्हाला लोकशाहीला पोषक वाटत नाहीत. फार काय, त्या मारकच आहेत अशी आमची धारणा आहे. राजकीय ध्येयवाद या दृष्टीने लोकशाहीकडे पाहाणे चूक आहे. शिक्षण हे प्रगत मानवाच्या मनोविकासाचे एक प्रकटीकरण आहे. आधिभौतिक सुखवादाच्या कसोटींवर लोकशाही श्रद्धेचे मूल्यमापन करणे चुकीचे आहे आणि तीच बाब शिक्षणक्षेत्रास लागू आहे असे आम्हांस वाटते. म्हणून आम्ही हे निवेदन लोकशाही सरकारच्या विविध पातळीवर विचारार्थ पाठवीत आहोत.

सांगली **दत्त आपटे**

दि.१७-९-६८ कार्यवाह

यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी, सांगली

●●●

## पालक, विद्यार्थी, नागरिक आणि शिक्षक

गेली सुमारे तीन तपे शिक्षणसंस्थेचे काय करीत असताना मानवी जीवनाचे अनेक पैलू दृष्टोत्पत्तीस आले. त्यामुळे ज्ञान दृष्ट्या वैयक्तिक जीवन समृद्ध होण्यास पुष्कळच मदत झाली. विशीच्या आतील विद्यार्थ्यांच्या सहवासाचा लाभ सातत्याने घडत गेला. आपले वय वाढते आहे, त्या वाढत्या वयाबरोबर येणारे शारीरिक व मानसिक दौर्बल्य वाढते आहे अशी शंकाही मनात कधी डोकावली नाही. शिक्षकी जीवनात किती अमर्याद आनंदाचा ठेवा साठविला आहे, याची कल्पना अन्यत्रांना येणार नाही. स्वातंत्र्यपूर्वकालात मनाची जी जडणघडण झाली होती, तीमुळे शिक्षकी पेशा हा आर्थिक सुबत्ता संपादन करण्याचे एक साधन म्हणून कधीच मानला नाही. ज्ञानार्जन व ज्ञानदान ह्याच्यातच आम्ही सर्वजण गुंतून गेलो होतो. शिक्षण समृद्ध करण्यासाठी आणि आवश्यक ती सर्व साधने निर्माण करून घेण्याचा एक छंदच जडला होता. त्या छंदाचा परिणाम म्हणूनच याआधी समालोचन केलेली शैक्षणिक परिस्थिती निर्माण झाली आहे. आता काही मोजक्या आठवणी ग्रथित करावयाच्या आहेत.

भागानगर(हैद्राबाद) सत्याग्रहाचा कालखंड होता. अनेक तरुण विद्यार्थी या मोहिमेकडे आकर्षित झाले होते. स्वाभाविकपणे आमच्या दुय्यम शाळेतील दोन विद्यार्थी या सत्याग्रहात सामील झाले. काही दिवसांनी हे विद्यार्थी परत आल्यानंतर, त्यांना शाळेतून काढून टाकण्याचा शासकीय आदेश आला. संस्थेने या आदेशाविरुद्ध तक्रार करताना कळविले की, 'हैद्राबाद संस्थानच्या विलिनीकरणाबाबत जी चळवळ चालू झाली आहे, तिचा परिणाम तरुण मनावर होणे स्वाभाविकच आहे. अशा भावनेच्या आहारी गेलेल्या मुलांना शिक्षणाची दारे बंद करून, त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचा मार्ग खुंटवून टाकणे शैक्षणिकदृष्ट्या संस्थेला प्रशस्त वाटत नाही. सरकारचा हा चुकीचा निर्णय संस्थेस ग्राह्य वाटत नाही.' संस्थेचा हा अभिप्राय सरकारला मान्य करावा लागला, आणि या मुलांचा शिक्षणक्रम पुढे पूर्ण होऊन ती मार्गाला लागली.

शिक्षकांनी शालेय विद्यार्थ्यांमध्ये भेदाभेद करून मर्जीतील वा गैरमर्जीतील असे गट करू नयेत, याबद्दल प्रथमपासूनच आमचा कटाक्ष होता व आहे. विशेषत: जुन्या मॅट्रिकच्या व आताच्या अकरावीच्या इयत्तांमधील विद्यार्थ्यांमध्ये असे वातावरण राहू नये यासंबंधी आम्ही नेहमीच दक्ष असू. संस्थेच्या आरंभकाळातील ही एक घटना आहे. मुंबई विद्यापीठाकडे मॅट्रिकची परीक्षा असताना, विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रिका देण्याचा निर्णय पूर्वपरीक्षेच्या निकालावर सर्वस्वी अवलंबून असे. ह्या पूर्वपरीक्षेच्या निकालामध्येही काही अपप्रकार घडविले जात. त्याची कल्पना आयुष्यात प्रथमत: आम्हांस आली, ती एका विचित्र घटनेमुळे.

एके सकाळी एका विद्यार्थ्याने शहराच्या मध्यवस्तीत हम-रहदारीच्या चौकात एका शिक्षकाच्या मस्तकावर राड पाण्याचे डबडे मोकळे केले. संबंधी विद्यार्थ्याला पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले व त्यास कोठडीत कोंडून ठेवले. ह्या प्रकरणी गावात खूप चर्चा व वाच्यता झाली. संस्थेच्या आरंभकाळातच ही घटना घडावी ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होती. त्या विद्यार्थ्याविरुद्ध काय कायदेशीर कारवाई करावी याबाबत पोलीसखाते विचार करून राहिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी पोलीस कचेरीत आम्हाला पाचारण करण्यात आले. त्या नगररक्षकांनी माझ्या हाती एक हस्तलिखित दिले. ह्या हस्तलिखिताचा मथळा होता, 'कोठडीत बसून सुचलेले विचार'. या लिखाणामध्ये असा स्पष्ट आरोप करण्यात आला होता की, ''पूर्वपरीक्षेत प्रवेशपत्रिका मिळविणारे विद्यार्थी धनिक असून ते शिकवणी देणारे विद्यार्थी आहेत. ते पास नसून त्यांना पास करण्यात आलेले आहे.''

नंतर नगररक्षकांनी विचारले, ''ह्या मुलावर खटला भरायचा असल्यास तुमच्या संस्थेतील काही शिक्षकांची नि:संशय बदनामी होणार असून हे 'कोठडीतील विचार' चव्हाट्यावर आल्याशिवाय राहणार नाहीत. तेव्हा काय करावयाचे ते पहा.'' संबंधी शिक्षकांनी आपली काही तक्रार नसल्याचे पोलीत खात्यास कळविले, विद्यार्थ्याची सुटका झाली. त्याला प्रवेश पत्रिकाही देण्यात आली आणि

आश्चर्याची गोष्ट ही की, त्याचे विधान खरे ठरून शिकवणीतील धनिक मुले नापास झाली. 'बिचाऱ्यां'ना कोणत्याही एका विषयात दुहेरी आकड्यात गुण मिळाले नव्हते. हितसंबंधी शिक्षकास एका विद्यार्थ्याने हा धडा शिकविल्यानंतर, मग मात्र असे प्रकार संस्थेच्या परिसरात घडू नयेत याबद्दलची काटेकोर दक्षता आम्हांस घ्यावी लागली.

गरीबीमुळे एखाद्याचे शिक्षण स्थगित होऊ नये याबद्दल संस्थेचा नेहमीच कटाक्ष असे. आणि त्यामुळे तसे अनेक विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पुरा करू शकले. अशा काही विद्यार्थ्यांच्या कृतज्ञतापूर्वक उल्लेखामुळे आम्हाला नेहमीच अभूतपूर्व आनंद वाटत आलेला आहे.

कोयना धरणाचे काम चालू असताना ते पाहण्यासाठी म्हणून आम्ही काही आजीव सदस्य गेलो होतो. पोफळीहून कोयनानगरला आमची बस येऊन उभी राहताच एक तरुण धावत आमच्यापाशी आला आणि आम्हांस घरी चलण्याबद्दल आग्रह करू लागला. सकाळची दहा वाजण्याची वेळ, फिरून बस केव्हा मिळेल याची हमी नाही, चिपळूणहून येणाऱ्या बसेस भरूनच येत असल्यामुळे कोयनानगरला जागा मिळणेही दुरापास्त, अशा स्थितीत आम्ही ह्या आग्रहाला दाद देत नव्हतो. शेवटी आमच्याबरोबर असलेले एक व्यापारी मित्र त्या तरुणाला उद्देशून म्हणाले, ''काय हो, हे मास्तरलोक इतका भाव खाताहेत तर तुम्ही तरी एवढा आग्रह कशाला करताहात?''

एकाएकी गंभीर चेहरा करून तो तरुण म्हणाला, ''ही मंडळी नसती तर मी पळी पंचपात्री घेऊन कोणाचे तरी उपाध्येपण करीत हिंडलो असतो; या मंडळींमुळे आज येथे इंजिनियर म्हणून काम करीत आहे. मी या लोकांना जेवून गेल्याशिवाय सोडणार नाही.'' विद्यार्थीमनांत उचंबळणारा हा कृतज्ञता भाव, हे आमच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे भांडवल आम्ही मानीत आलो आहोत.

पालक, विद्यार्थी, नागरिक या सर्वत्रांना एकत्रित करून खेळीमेळीचे वातावरण निर्माण करावे, खेळ-मनोरंजन इ.कार्यक्रम आयोजित करून सर्वांना आपापली वये विसरावयास लावून निर्भेळ आनंद लुटावयास लावावा, प्रामाणिकपणा-स्वच्छता-टापटीप व शिस्त यांना जीवनात काही महत्त्व आहे याची जाणीव निर्माण करून द्यावी इत्यादी उद्देशांनी म्हणून आम्ही लोकयात्रेचे काही कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रमांमध्ये मंत्री, सरकारी अधिकारी, धनिक व्यापारी, नागरिक, कामगार इ.सर्व क्षेत्रांतील मंडळींनी इतक्या हौसेने व समान भूमिकेतून भाग घेतला की, भारतीय समाजाचा एकजिनसीपणा व सामाजिक समता यांचे एक आगळे दृश्य क्रीडांगणावर दिसू लागले. समाजाच्या विविध थरांतील परस्पर कटुता व शंका नष्ट होऊन, एक मोठे उल्हासदायी वातावरण तयार झाले. शालेय शिक्षणाबरोबरच सामाजिक शिक्षणाचे आदर्श, लोकयात्रेसारखे कार्यक्रम आयोजित करून संस्थेने निर्माण केले आहेत.

आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ज्ञांची एक समिती भारत सरकारने नियुक्त केली होती. या समितीने दुय्यम शिक्षणसंस्थांबाबत जो अभिप्राय व्यक्त केला तो विचारात घेण्याजोगा आहे. ''भारतासारख्या विस्कळीत समाजजीवन असलेल्या देशात, शिक्षणसंस्था समाजजीवन संघटित करण्याचा एक केंद्रबिंदू ठरावा.'' हा ह्या शिफारशींचा मथितार्थ आहे. आणि संस्थेने त्या दृष्टीनेच प्रत्यक्ष शिक्षणकार्याखेरीज अन्य सामाजिक व सांस्कृतिक चळवळींमध्ये महत्त्वाचा कार्यभाग केलेला आहे.

जागा व सोयीस्कर इमारती यांचा अभाव, ही शिक्षणकार्यातील एक मोठीच उणीव असते. भारतासारख्या देशात ही उणीव प्रकर्षाने जाणवते. म्हणून उपलब्ध जागा व इमारत ह्या अन्य कार्यासाठी जास्तीत जास्त काळ कशी वापरता येईल, त्या दृष्टीने शिक्षण-कार्यक्रमांची आखणी कशी करता येईल हे पाहणे महत्त्वाचे असते. आमच्या संस्थेच्या जागा व इमारती ह्या दृष्टीने सदैव वापरल्या जात असतात व संस्थेचा परिसर सदैव जागृत असतो. सांगलीच्या नागरिकांना ही गोष्ट नेहमीच प्रत्ययास आलेली आहे.

संस्थेच्या कार्याचा हा सर्व व्याप सांभाळला जात असताना कोठे ना कोठे राजकीय अथवा सामाजिक स्वरूपाचे संघर्ष निर्माण झाल्यावाचून राहात नाहीत. बा.गो.नाईकांना संरक्षण देत असताना जो संघर्ष निर्माण

झाला, त्यामधून आणखी काही लोकांचे उपद्व्याप चालू झाले. व्यक्तिश: मी साम्यवादी असून शालेय अभ्यासक्रम शिकवीत असताना साम्यवादाचा प्रसार करतो, असा जाहीर आरोपही वार्तापत्र सांगण्याच्या निमित्ताने भर स्टेशन चौकात करण्यात येऊ लागला. साम्यवाद म्हणजे काय? गांधीवाद म्हणजे काय? व ते कशाशी खातात; याची सुतराम जाणीव नसलेल्या माणसाने हे आरोप केल्यानंतर शिक्षण खात्याकडून चौकशी चालू झाली. माझा वैयक्तिक ग्रंथसंग्रह तपासण्यापर्यंतही मजल गेली. खादीचा सदरा-टोपी एवढ्या भांडवलावर पुढाऱ्यांची जी नवीन जमात तयार झाली आहे, त्यांच्या असल्या कृत्यांनी दबून जाणारे आमच्यात कोणी नसल्याने यातून काही निष्पन्न झाले नाही!

तथापि पुढे चीनचा संग्राम चालू झाल्यानंतर ह्या प्रकरणाचा दुसरा अध्याय चालू झाला. सांगली जिल्ह्यात भारत सेवक समाजाचा अध्यक्ष म्हणून माझी नियुक्ती झाली. मी बोलाविलेल्या एका सभेचे भांडवल करून एका 'देशभक्ता'ने कोणालातरी हाताशी धरून, 'साम्यवादी मनुष्य भारत सेवक समाजाचा अध्यक्ष कसा होऊ शकतो' अशी तक्रार थेट गुलझारीलाल नंदा यांच्याकडे केली. पण त्या बिचाऱ्याला अशी कल्पना आली नाही की, ज्या संघटनेने माझी नियुक्ती केली, त्या संघटनेचे अध्यक्ष पंडितजी(नेहरू) व कार्यकारी अध्यक्ष नंदाजी असल्याने ह्या बाष्कळ अर्जाचा काहीही उपयोग होणे शक्य नव्हते आणि झालेही तसेच!

सार्वजनिक कार्य करू इच्छिणाऱ्यांच्या मागे एक दहशतवाद लावून, त्यांना आपल्या कच्छपी लावून घेण्याचे जे एक हीन तंत्र तृतीय व चतुर्थ वर्गाच्या पुढाऱ्यांनी निर्माण केले आहे, त्याला प्रतिकाराची तयारी ठेवल्याशिवाय कोणालाही रास्त भूमिकेवर काम करता येणार नाही. भारतीय लोकशाहीला खराखुरा धोका ह्या तृतीय-चतुर्थ स्तरीय लोकांपासूनच असल्याने कोणतेही विधायक कार्य करू इच्छिणाऱ्या माणसाने प्रथमत: ह्या असल्या विघातक प्रवृत्तींना समर्थपणे तोंड देण्याची तयारी ठेवलीच पाहिजे.

मूळच्या आजीव सेवक सदस्यांना मुदतवाढ नाकारणारे, जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडून आलेले पत्र उपजिल्हाशिक्षणाधिकारी गणेश अंबाजी दप्तरदार यांच्याकडून आलेले होते. या शिक्षणसंस्थेचा ध्येयवाद न मानवल्यामुळे आजीव सदस्यत्व सोडून बाहेर पडलेले व नंतर हे अधिकारी झालेले होते, एवढा अभिप्राय ह्या ठिकाणी पुरेसा वाटतो.

मुलींतील वाढत्या शिक्षण प्रसाराचा विचार करून, मुलींच्यासाठी एक खास माध्यमिक शाळा निर्माण करण्याचा विचार गेले काही दिवस संस्थेच्या मनात घोळत आहे. मध्यंतरीच्या काळात 'लोकशाही सरकार'कडून आणले गेलेले हे अडथळे जर आले नसते तर कदाचित, या वेळपर्यंत ही कल्पना मूर्त स्वरूपातही आली असती. अर्थात नजीकच्या भविष्यकाळात संस्था हा आपला संकल्प पुरा केल्याशिवाय राहणार नाही हे तितकेच खरे! संस्थेचे कार्यक्षेत्र एका विशिष्ट मर्यादेत ठेवून, ते जास्तीत जास्त प्रभावी करण्याकडे आमच्या शिक्षणसंस्थेचा प्रथमपासूनच कल आहे.

किमान ह्या जिल्ह्यात शैक्षणिक साम्राज्य निर्माण करावे, असा आग्रह ग्रामीण भागांतील आमच्या विद्यार्थ्यांनी व चाहत्यांनी केला. पण या आग्रहास आम्ही कधीच संमती दिली नाही. पसारा वाढवून कार्यक्षमता कमी करून घेण्याची आमची इच्छा नाही. सर्व थरांतील शिक्षणाचे एकसूत्रीकरण करून, संस्थेच्या परिसरातील बालवर्गात पदार्पण करणाऱ्या मुलाला, वयाच्या १६-१७ व्या वर्षी कार्यक्षम युवक म्हणून संस्थेच्या परिसरातून बाहेर पडता यावे या दृष्टीने जेवढे काही करता येईल तेवढे करण्याचा हेतू डोळ्यापुढे ठेवला. त्या दृष्टीने आम्ही आपल्या सर्व कार्याला मर्यादा घालून घेतल्या आहेत, आणि परिणामी एक स्वयंपूर्ण, स्वागतार्ह असे शिक्षणक्षेत्र निर्माण करण्यात आम्ही थोडेफार यश मिळविले आहे अशी आमची श्रद्धा आहे.

गेल्या सुमारे ३६ वर्षांत जे घडले ते जसेच्या तसे निवेदन केले आहे. चालू जमान्यात तोंडदेखले बोलण्याची प्रथा रूढ झाली आहे. पण तसे काही करण्याचा प्रयत्न

करण्याची आम्हाला गरज पडली नाही. 'काही वेळा काल्पनिक कथेपेक्षाही सत्य चमत्कारिक असते' असे म्हटले जाते. त्याचाच प्रत्यय या लेखनात कोणाला आल्यास आश्चर्य नाही.

एकाच कार्यामध्ये सातत्याने रस घेत गेल्यास व आपल्या प्रत्येक हालचालींचा केंद्रबिंदू म्हणून हे कार्य आपल्या डोळ्यासमोर ठेवल्यास काही ना काही यश पदरी पडल्याशिवाय राहात नाही, हा आमचा सर्वांचाच सामुदायिक अनुभव आहे.

ह्या प्रसंगी एका चित्रपटाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. 'उफा' ह्या जर्मन कंपनीचा 'ब्ल्यू एंजल' हा तो चित्रपट होय. शिक्षकाचे काम करणारा माणूस काही प्रसंगाने विचलित होऊन शालेय जीवनातून बाहेर पडतो पण अंतकाळी फिरून आपल्या शाळेत येऊन आपला शेवटचा श्वास घेतो.

'गुड बाय मिस्टर चिप्स' हाही शिक्षकी जीवनावरील दुसरा एक चित्रपट आहे. शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या सहवासात व शालेय जीवनातच आयुष्याचा शेवट पाहणे श्रेयस्कर वाटते. म्हणूनच आम्हाला सक्तीने सेवानिवृत्त करू पाहणाऱ्या महाराष्ट्राच्या शिक्षणखात्यामधील अधिकाऱ्यांना आम्ही असे सांगू इच्छितो की, ''आम्ही शिक्षणक्षेत्रात कोणाच्या मोहब्बतीखातर पडलेलो नाही, आणि कोणाच्या मोहब्बतीखातर निवृत्तही होऊ शकत नाही. आमचे शिक्षणकार्य शाळेच्या चार भिंतीत दडलेले नाही. विशाल सामाजिक जीवनाला व्यापून राहण्याची महत्वाकांक्षा ह्या कार्याने बाळगली आहे आणि त्यामुळे आम्हाला कोणाचाही मुलाहिजा ठेवण्याचे कारण नाही.''

●●●

## भारतीय शिक्षण समस्यांचे समालोचन

आमच्या संस्थेच्या इतिहासाचे समालोचन केल्यानंतर भारतातील शिक्षणसमस्येच्या संबंधात काही विचार नमूद करणे अपरिहार्य आहे. हे करीत असताना काही गोष्टींची पुनरुक्ती होणे स्वाभाविक असले तरी, किमान सूत्ररूपाने का होईना तो केल्याशिवाय गत्यंतर नाही. प्रथमत: एक गोष्ट गृहीत सत्य म्हणून मानली पाहिजे, ती म्हणजे भारतातील ८०% समाज निरक्षर असेल, पण तो काही मूल्यांबाबत अज्ञानी आहे असे मात्र म्हणता येणार नाही. पारंपरिक प्रचार-साधनांमधून, त्याची मानवी मूल्यांबाबतची कल्पना प्रगल्भ आहे हे सत्य उघड दिसत आहे. जीवन-व्यवसायासाठी ज्या काही कसबांची जरुरी असते ती परंपरेने त्याने हस्तगतही केलेली असतात. त्यामुळे 'इंग्रजी अमदानी चालू होईपर्यंत भारतीय बहुसंख्य समाजाचे जीवन आर्थिक वा सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न नव्हते' -असे म्हणता येणार नाही.

ब्रिटिश अमदानीत त्यांस आवश्यक तो नोकरवर्ग उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांनी जी काही शिक्षणपद्धती रूढ केली ती बहुतांशाने शहरी विभागातच असल्याने, दहा टक्के लोकसंख्येच्या पलीकडे त्या शिक्षणाचे संस्कार पोचू शकले नाहीत. इंग्रजी अमदानीच्या आरंभकाळात इंग्रजी राज्यसत्तेने आणलेल्या शांततेचा व सुव्यवस्थेचा सामान्य जनमनावर जो परिणाम झाला, त्यामुळे इंग्रजी राजवटीचे आर्थिक व राजकीय दुष्परिणाम कोणाच्या फारसे ध्यानी आले नाहीत.

शहरी विभागात झालेल्या शिक्षणप्रसारामुळे जी बुद्धिवान पिढी तयार झाली, तिने इंग्रजी अमदानीच्या ह्या दुसऱ्या विभागाचे परीक्षण चालू केले; आणि अन्ती राष्ट्रीय चळवळींचा उगम झाला. या चळवळींत बहुसंख्य जनतेने सामील व्हावे म्हणून शिक्षण प्रसाराचे साधन वापरण्याचे त्या काळच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनी निर्णायकपणे ठरविले. आणि यामधूनच खाजगी शिक्षणसंस्थांचा उदय झाला.

समाजाच्या आर्थिक साहाय्याच्या जोरावर व त्यागी

प्रवृत्तीने काम करू इच्छिणाऱ्या सुशिक्षितांच्या बळावर या संस्थांनी शिक्षण प्रसाराची आघाडी उघडली. अर्थात ही गोष्ट ब्रिटिशांनी रूढ केलेल्या शिक्षणपद्धतीला सर्वस्वी डावलून करण्याची आवश्यकता नव्हती. ब्रिटिशांनी रूढ केलेल्या तत्कालीन पद्धतीत एकच उणीव म्हणजे शिक्षणामागील प्रेरणा 'नोकर तयार व्हावा' ही होती. ती उणीव काढून टाकताना 'शिक्षणाचा मूलभूत साचा -म्हणजे विविध विषयांचे ज्ञान; तो बदलण्याची आवश्यकता नव्हती. ज्ञान घेणाऱ्या युवकांमध्ये राष्ट्रप्रेमाची, स्वातंत्र्याची भावना प्रज्वलित करणे एवढाच एक हेतू खाजगी शिक्षणसंस्थांनी ठेवला होता. प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयाच्या अंतिम स्तरापर्यंत सर्व विभागांत खाजगी शिक्षणसंस्था त्याच हेतूने काम करीत होत्या. ब्रिटिश सरकारनेही ह्या कामी विशेषसा अडथळा आणला नाही. मात्र आर्थिक शोषण करीत असताना, 'राज्यकर्ते' ह्या नात्याने भारतीय जनतेला शिक्षित करण्यासाठी पैसा खर्च करण्यास ब्रिटिश सरकारची तयारी नव्हती. त्यामुळे सुशिक्षित मंडळी शिक्षण प्रसाराचे काम लोकांच्या सहकार्यावर हाती घेत असत. ब्रिटिश सरकार अडथळा करत नव्हते, तरी या कार्याकडे पाहताना त्यांचा एवढाच कटाक्ष असे की, शिक्षणप्रसाराच्या नावाखाली आपणाविरुद्ध काही कारवाया चालतात किंवा काय! पुढे स्वातंत्र्य-चळवळ फोफावू लागताच शिक्षणप्रसाराच्या कार्याला विशेष गती आली आणि एक 'राष्ट्रीय कार्य' ह्या दृष्टीने शिक्षणक्षेत्रात काम करण्यासाठी शिक्षित वर्ग हिरीरीने पुढाकार घेऊ लागला. ह्या सर्व शैक्षणिक चळवळींमध्ये त्यांच्या आर्थिक प्रश्नांचा विचार अगर मूलभूत शिक्षणविषयक उद्दिष्टांचा विचार फारसा केला जात नव्हता.

पुढे राष्ट्रीय चळवळीत गांधीयुगाचा उदय झाल्यानंतर, भारतीय शिक्षणपद्धतीमध्ये काहीतरी निराळे करण्याचा विचार पुढे येऊ लागला. रवींद्रनाथ टागोर व महात्मा गांधी यांनी प्राचीन भारतीय परंपरेमधून निर्माण झालेल्या काही शिक्षणविषयक सूत्रांचा अंगीकार केला. भारताच्या आर्थिक, सांस्कृतिक व पारंपरिक मूल्यांशी आपली शिक्षणपद्धती संलग्न करण्याचा विचार पुढे आला. म्हटले तर त्यात एक प्रकारे मध्ययुगीनता होती. पण एकूण विचार करता केवळ आधुनिक शास्त्रांशी सुसंगत असा शिक्षणक्रम रूढ केल्याने भारताच्या समस्या सुटू शकणार नाहीत असाही मुद्दा त्यात होता. कुमारप्पा बंधुद्वय, आर्यनायकम, डॉ.झाकीर हुसेन इ. शिक्षणतज्ज्ञ मंडळीही गांधीजींच्या ह्या विचारसरणीशी समरस होती. कविवर्य रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षणविषयक विचार ह्याहून काही वेगळे नव्हते.

यामुळे, ब्रिटिश राजवट संपुष्टात आल्यानंतर भारतीय शिक्षणपद्धतीचा कोणता साचा रूढ होणार ह्याबद्दल फारशी शंका नव्हती. भारताची ८० टक्के लोकवस्ती असणाऱ्या ग्रामीण भागाची आर्थिक घडी विस्कळीत होऊ न देता, ग्रामांची स्वयंपूर्णता व तेथील परंपरागत लोकशाही पद्धतीची शासनयंत्रणा शाबूत ठेवणारा व ह्या कल्पनेशी सुसंगत, असा शिक्षणक्रम रूढ करण्याचा प्रयत्न केला जाणार हे स्पष्ट होते.

१९३७ सालापासून भारतातील ब्रिटिश राजवटीला समाप्तीचे निश्चित वेध लागू लागले. त्याचबरोबर राष्ट्रीय -म्हणजे काँग्रेसचे -नेतृत्व आज ना उद्या सत्तारूढ होणार हेही निश्चित झाल्याप्रमाणेच होते. त्यामुळे प्रांतिक स्वायत्ततेचा राजकीय काळ चालू होताच गांधीजीप्रणित शिक्षणपद्धती अंमलात येणार हे ठरल्याप्रमाणे होते. ही पद्धती अंमलात आणण्यासाठी नवा शिक्षकवर्ग तयार करण्याचे काम वर्धा शिक्षणकेंद्रात चालू झाले होते. १९३७ साली बहुतेक प्रांतांमधून काँग्रेस मंत्रीमंडळे अस्तित्वात आली आणि वर्धा शिक्षण योजनेचे पडसाद शिक्षणक्षेत्रांत उमटू लागले.

ग्रामीण अर्थव्यवस्था विचारात घेऊन ह्या शिक्षणक्रमाची उभारणी करण्यात आली असल्याने, महात्माजींचे आर्थिक धोरण अमान्य असणाऱ्या बहुतेक शिक्षणतज्ज्ञांना ती शिक्षणपद्धती स्वाभाविकपणे कालबाह्य ठरणारी आहे असे वाटल्यास मुळीच नवल नाही. 'घड्याळाचे काटे मागे फिरविण्याचा हा प्रकार निरुपयोगी ठरणार' अशी टीका तर झालीच, पण ही शिक्षणपद्धती कुचेष्टेचा विषय बनली. सर्व जगात यांत्रिक युगाचा नवा जमाना चालू झाला असता, फक्त भारत मात्र अकेलेपणाने 'ग्रामीण स्वयंपूर्णता' व

तदनुषंगिक अर्थशास्त्र यांचा अवलंब करून टिकाव धरू शकेल, ही गोष्ट त्या काळात कोणालाच मान्य होण्याजोगी नव्हती.

स्वातंत्र्योत्तर काळात असे दिसू लागले की, गांधीजींच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शास्त्र मागे पडून, विज्ञान व तदनुषंगिक यांत्रिकीकरणावर आधारलेले अर्थशास्त्र रूढ करण्यासाठी गांधीजींच्याच शिष्यांनी आटोकाट प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे एक विलक्षण विसंगती निर्माण झाली. शिक्षणक्षेत्रात गांधीयुग वावरत होते, तर राष्ट्रीय क्षेत्रांत यंत्रयुगाचा स्वैर संचार चालू होता. भाषेच्या अभ्यासापासून ते जीवनोपयोगी शिक्षणपद्धतीपर्यंत विसंगतीची एवढी मोठी दरी तयार झाली की, या दरीत कोसळलेली एक पिढी सर्व दृष्टीने कुचकामी ठरली. मग शिक्षणविषयक परिस्थिती सुधारण्यासाठी विज्ञानयुगाला आवश्यक व पोषक असे शिक्षणक्रम तयार करण्याचा नवा अट्टाहास चालू झाला. अभ्यासक्रमांतून घालवून दिलेल्या भाषा व अन्य विषय फिरून शिक्षणक्षेत्रात डोकावू लागले. शिक्षकांसाठी असलेले हस्तव्यवसायासारखे अभ्यासक्रम मागे पडून यांत्रिक व्यवसायांचा नवा अभ्यासक्रम रूढ करण्यात आला.

विचारांची अनिश्चितता, शिक्षणविषयक सिद्धांताबाबत ठाम धोरणाची उणीव, जीवनोपयोगी शिक्षण-पद्धतींबद्दल निश्चयात्मक निर्णयाचा अभाव या साऱ्यांमुळे स्वतंत्र भारतातील शिक्षण मुडदूस रोगाने पछाडलेल्या बालकाच्या अवस्थेत आहे. या अवस्थेतील पोर जिवंत असते, पण काहीच करू शकत नाही. ज्या इंद्रियांची वाढ व्हावयास पाहिजे, ती वाढ होत नाही; आणि ज्यांची वाढ नको असते, त्यांची होते. आजच्या शिक्षणविषयांची छाननी केल्यास हे सहज लक्षात येण्याजोगे आहे. राज्यकर्त्यांच्या या शिक्षणविषयक धरसोडीशी हुज्जत घालताना विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणसंस्था यांची जी तारांबळ होते, ती मोठी चिंतनीय आहे. त्यामुळेच पुढील काळात शिक्षणकार्याला वाहून घेईल असा एखादा वर्ग अस्तित्वात राहील अगर नाही याचीच शंका आहे. अंती ही सर्व जबाबदारी सरकारलाच पत्करावी लागणार आहे, आणि ज्यावेळी सर्व क्षेत्रांत सरकारीकरण होत जाते त्यावेळी लोकशाही संपुष्टात येते हे सत्य आहे. मुलांनी काय शिकावे, त्यांनी कोणी शिकवावे, कोणत्या पद्धतींनी शिकवावे, त्यांनी कोणत्या व्यवसायात घालावे हे सर्व काही एकाच केंद्रबिंदूतून ठरविण्यात येऊ लागले, तर तो कदाचित साम्यवाद वा समाजवाद होईल; पण त्यात लोकशाही मात्र खास असणार नाही.

लोकशाहीची बूज राखू इच्छिणाऱ्यांनी प्रथमत: शिक्षण स्वावलंबी, स्वयंपूर्ण व सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त कसे राहील याचा कसोशीने विचार केला पाहिजे. त्यासाठी आवश्यक तो झगडा देण्यासही सज्ज झाले पाहिजे. आमच्या शिक्षणसंस्थेने ह्या संदर्भात थोडेफार करण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या निवेदनातील ह्या झगड्याचा सारांश का होईना रसग्रहणास पात्र ठरला तर आम्हांला पुष्कळ श्रेय लाभले, असे आम्ही म्हणू!

●●●

उभारीच्या काळात दत्त आपटे यांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेविषयीही नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे ही संस्था सांगलीत नावाजलेली असून तिच्या अंतर्गत आज आठ शाखांमधून सुमारे अडीच हजार विद्यार्थी शिकत आहेत. नव्या काळानुसार नव्या पिढीने 'पब्लिक स्कूल' सुरू केले आहे.

संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष श्रीमती मेघना कोरे या आहेत. संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षाचा संकल्प म्हणून मराठी(प्राथमिक विभाग)साठी ८४ लाखाची नवी इमारत बांधली आहे. त्याकरिता सुमारे ६६ लाख इतकी रक्कम नागरिकांतून देणगी मिळाली. क्रीडांगणाच्या पश्चिम बाजूला पब्लिक स्कूलच्या विस्तारीकरणाचे काम १.४ कोटी रुपयांचे आहे. तर बगीच्यासाठी २.२५ लाख आणि मुलांसाठी खेळणी ३ लाखाची आहेत. मुख्याध्यापकांचे दालन व प्रशासकीय कार्यालय ५ लाख रुपये खर्च करून अद्ययावत केले आहे. ई लर्निंगचा वर्ग तयार झाला असून नव्या काळानुसार या संस्थेच्या सर्व शाखा विकसित होत आहेत. शामरावनगर येथे श्री गणपतराव आरवाडे बालक मंदिर सुरू झाले. एकूण दत्त आपटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पायाभरणी केलेली संस्था नवे शिखर गाठत आहे.

●●●

# परिशिष्टे


| प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|
| आत्माराम बापू पाटील : श्रद्धांजली | १४५ |
| पत्रव्यवहार | १४७ |
| शीर्षपत्रे (लेटरहेड्स) | १५६ |
| हस्ताक्षर | १५७ |
| कुलवंशातील नोंदी | १५८ |
| निधनवार्ता, आणि श्रद्धांजली | १५९ |

दत्त आपटे यांनी त्यांचे जीवलग स्नेही व काँग्रेस कार्यकर्ते, बोरगाव (इस्लामपूर) येथील

# आत्मारामबापू पाटील

## यांच्या निधनानंतर त्यांच्याविषयी लिहिलेला श्रद्धांजली लेख-

दि.१० जून(१९६७)च्या शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास आत्माराम बापू पाटील अचानकपणे माझ्या दाराशी येऊन उभे राहिले. त्यांची ठेंगू मूर्ती व बांधा पाहून मुले त्यांना 'लाल बहादूर शास्त्री' म्हणत. मला वर्दी आली ती अशीच, 'लाल बहादूर आले आहेत.' अचानकपणे घरी येणाऱ्या बापूंचा हा प्रघात काही नवा नव्हता; पण त्यांचे हे येणे अखेरचे ठरणार असेल याची कल्पना कोणालाच नव्हती. एरवी आमच्या शाळेत उतरणारे बापू, राजकीय गप्पा मारण्याची लहर आली म्हणजेच फक्त माझ्या घरी येत. फिरून काँग्रेस प्रवेश करतेवेळी ते असेच घरी आले होते, आणि रात्रभर बोलत बसले. आजही त्यांनी माझ्याकडे मुक्काम टाकण्याचा मनोदय जाहीर केला, तेव्हा मी गृहीत धरले की आजची रात्र जागण्याची आहे; राजकीय उलाढालींच्या चर्चेची आहे. आणि झालेही तसेच!

काँग्रेसमध्ये अलीकडे शिरलेल्या व्यक्तिमत्वांची विचारपातळीची कक्षा किती खालच्या दर्जाची आहे, याचे कथन बापू मोठ्या उद्विग्नतेने करीत होते. महाराष्ट्रातील राजकीय उलाढालींशी समरस झालेला, त्यात सातत्याने बेचाळीस वर्षे वावरणारा एकेकाळचा आत्माराम नाना आज उदास होऊन निराशेने कण्हत होता.

रविवारी उठून सकाळी बाहेर पडताना बापू सहज बोलून गेले, ''मी आता कॉलेजवर जात आहे. परस्पर जाईन. कदाचित आपली भेट फिरून होणार नाही..'' या वाक्याचा मी मर्यादित अर्थ घेतला; कारण कॉलेजवरची 'सहकार परिषद' आटोपताच बापू परस्पर बोरगावला जाणार होते. पण नियतीने त्यांच्या या वाक्याची मर्यादा इतकी वाढविली की, बापू मला नंतर भेटले ते 'जाण्या'च्या मार्गावर, फिरून न परतण्याच्या मार्गावरच!

माझा आणि बापूंचा ऋणानुबंध बेचाळीस वर्षांचा, तो इतक्या अनपेक्षित संपुष्टात येईल याची कल्पनाच आली नाही. त्यांच्या जाण्याने आम्हा जुन्या मित्रमंडळीत एक पोकळी तयार झाली. विद्यार्थी दशेत सांगलीत वावरणारा बापू, नंतर काँग्रेसच्या राजकीय चळवळीत वावरणारा बापू, महाराष्ट्रातील क्रांतिदलात वावरणारा बापू, सातारा जिल्ह्यात प्रचंड बहुमताने विधिमंडळासाठी निवडून येणारा बापू, भावी काळात गरिबांचे राज्य व्हावे म्हणून काँग्रेस अंतर्गत धडपड करणारा, मजूर पक्षात, संयुक्त महाराष्ट्र समितीत, गोवा विमोचन समितीत वावरणारा बापू -असे अनेक बापू माझ्या डोळ्यापुढे उभे आहेत. बेचाळीसच्या आंदोलनात बापूंनी 'रॉय वादा'चा आश्रय केल्यामुळे बापूंच्या हितशत्रूंनी त्यांच्याविरोधी अनेक कंड्या उठविल्या. 'ते पोलिसांना सामील आहेत' असे सांगण्यापर्यंतही कित्येकांची मजल गेली. पण राजापूर प्रकरणाचे धागे-दोरे माझ्या हाती असल्याने, बापू काय करीत आहेत याची मला पुरेशी कल्पना होती.

१९६०च्या सुमारास एक दिवस बापू मला म्हणाले, ''रामला हजर करून हे राजापूर प्रकरण एकदा गाडून टाकले पाहिजे.'' १९३० सालापासून महाराष्ट्रात चालू असलेल्या सर्व राजकीय आंदोलनांत बापूंचा या ना त्या कारणांनी संबंध येतच गेला. गांधीजींचा अहिंसक सत्याग्रह असो, अगर क्रांतिवाद्यांचा दहशत मार्ग असो; बापूंचा त्याच्याशी संबंध आला नाही असे घडलेच नाही! पिंगळे कुटुंबाशी संबंध आल्यानंतर बापूंच्या जीवनात एका नव्या प्रवाहाची भर पडली. बापूंचा हा आंतरजातीय विवाह होता. विख्यात क्रांतिकारक विष्णूपंत पिंगळे यांच्या घराण्याशी आपला संबंध जोडला जात आहे, हाही एक अभिमान बापूंच्या मनात त्यावेळी वास करीत होता.

काँग्रसमध्ये ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व आहे, त्या ठिकाणी

बहुजन समाजाचे वर्चस्व निर्माण झाले पाहिजे, असा विचार सातारा जिल्ह्यातील काँग्रेस वर्तुळात प्रसृत झाला. काँग्रेस चळवळीत नव्यानेच पदार्पण केलेले यशवंतराव चव्हाण ही भूमिका आग्रहाने प्रतिपादन करीत होते. शेतकरी कामकरी पक्षाची उभारणी करण्याचे मनसुबे रचले जात होते. सातारा जिल्ह्यातील आत्मारामबापूंचे वर्चस्व लक्षात घेता, या विचाराला आत्माराबापूंचा पाठिंबा मिळेल तरच काही होऊ शकेल, या दृष्टिकोणातून यशवंतराव चव्हाणांसुद्धा सर्वांनी आत्मारामबापूंचे मागे नुसता लकडा लावला. आपल्या नेहमीच्या तडफदार स्वभावाला अनुसरून आत्मारामबापूंनी काँग्रेसमधील बड्यांच्या व मध्यमवर्गीयांच्या वर्चस्वाला सुरुंग लावण्यासाठी रणशिंग फुंकले. ऐनवेळी यशवंतराव चव्हाणानी मात्र माघार घेतली, ते काँग्रेसमध्येच राहिले. या घडामोडीत काँग्रेस वर्तुळात आत्मारामबापूंचा भाव घटताच यशवंतरावांचा भाव वधारला. आत्मारामबापूंच्या राजकीय वर्चस्वाला ओहोटी लागली.

काँग्रेससारख्या प्रगल्भ संघटनेशी मुकाबला करणे किती दुर्घट काम आहे याचे प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ विराम पावल्यानंतर बापूंना आले. याच संधीकाळास बापूंनी परत काँग्रेस प्रवेश करावा, अशी अपेक्षा यशवंतरावांनी व्यक्त केल्याने मी आत्मारामबापूंना घेऊन यशवंतरावांची गाठ घेतली. यावेळी यशवंतरावांनी महाराष्ट्रात हिऱ्यांचा बळी घेऊन, आपले काँग्रेसमधील आसन पुरे स्थिर केले होते. यशवंतराव त्यावेळी आत्मारामबापूंना म्हणाले, ''तुम्ही सारे लोक मला संधीसाधू म्हणता, हे मला मान्य आहे. काँग्रेसमधील माझे आसन स्थिर करण्यासाठी मी हा संधीसाधूपणा केला आहे. आज माझे स्थान असे आहे की, तुम्ही कोणी काँग्रेसमध्ये आलात काय किंवा नाहीत काय; चालण्याजोगे आहे. पण मला असे वाटते की, काँग्रेसला पुरोगामी वळण लावावयाचे असेल तर आता पुरोगामी विचाराची जुनी मंडळी काँग्रेसमध्ये एकत्रित येणे आवश्यक आहे. आणि म्हणून मी तुम्हाला काँग्रेसमध्ये बोलवीत आहे'' इतका निर्वाळा दिल्यानंतर आत्मारामबापूंनी काँग्रेस प्रवेश केला. पण त्यांच्या पुरोगामीत्वाचा यशवंतरावांनी कितपत उपयोग करून घेतला, हे कळण्यास मार्ग नाही.

बुधवार ता.१४ जून १९६७ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे आमच्या शाळेत प्रवेश करताच मला दीनानाथ भोसले यांनी अचानक निरोप दिला. 'रात्री दोन वाजता हृदयविकाराचा झटका आल्याने बापूंना सरकारी दवाखान्यात आणण्यात आले आहे, आणि तुम्हाला तेथे तत्काळ बोलाविले आहे.' दीर्घकाळ झगडणारा आत्मारामबापू ऑक्सिजनच्या नळ्या नाकात घालून कॉटवर पडला होता, ''दत्तोपंत तुम्ही एवढ्या गडबडीने का आलात? मला तसं विशेष काहीच झालेलं नाही. तुम्हाला कोणी जास्त कमी काही सांगितलं काय?''

बापूंचे थोरले बंधू रामभाऊ तेथे होते. राजापूर प्रकरणानंतर जवळ जवळ २५/३० वर्षांनी माझी त्यांची भेट होत होती. भावाच्या या अवस्थेने ते चिंतातूर झालेले दिसत होते. सिव्हील सर्जनची गाठ घेताच ते मला म्हणाले, 'हृदयाची हालचाल बंद आहे. नाडी लागत नाही. अशा अवस्थेत हा माणूस ज्या पद्धतीने बोलतो आहे, तिचा विचार करता काय घडेल हे सांगणे कठीण आहे....''

बापूंच्या राजकीय जीवनात संपूर्ण रस घेणारी, पण खंबीरपणाने त्याच्या प्रापंचिक जीवनाची उभारणी करणारी, त्याची पत्नी शांताबाई आज रडवेली झालेली दिसत होती. कधीही कोणालाही हार न जाणारी ही बाई, काही तरी विपरीत तर घडणार नाही ना; या शंकेने व्याकूळ झालेली दिसत होती. आणखी चोवीस तास गेले. तरीही बापू म्हणत होता, ''तुम्ही लोकांनी काही तरी शंका घेतलेली दिसते. आपल्याला खूप काम करायचं आहे. इतक्यात मरून चालणार नाही.''

-आणि एकाएकी दुपारी साडेअकराला बापूंच्या देहाची व आत्म्याची धडपड थांबली. ४२ वर्षांचा जागता इतिहास थंड झाला.

शांताबाईने माझे दोन्ही हात करकचून आवळले, व एकच टाहो फोडला.

●●●

# दत्त आपटे यांचा काही पत्रव्यवहार

**भूतपूर्व प्रधानमंत्री व तत्कालीन काँग्रेसचे तत्वनिष्ठ नेते मोरारजी देसाई यांच्याशी दत्त आपटे यांचा निकट स्नेह होता. त्यांच्याच हस्ताक्षरात 'भाईश्री' दत्त आपटे यांना लिहिलेले एक पत्र-**

मोरारजी देसाई

९, डुप्ले रोड
नवी दिल्ली-११
दि. ११-२-१९७०

भाईश्री दत्त आपटे

तुमचा ७ फेब्रुआरीचा पत्र मिळाला. धन्यवाद.

श्री. नाईक निंबाळकर यांनी तुम्ही परिस्थिति बद्दल बोलले ते बरे केले. त्यांची सल्ली प्रमाणे तुम्ही कार्य चालु ठेवा.

मी तुम्हाला ६ तारखेस लिहिला होता त्याप्रमाणे मी हल्ली सांगलीची भेट घेउ शकणार नाही.

श्रीमती तारकेश्वरी, श्री. एस. के. पाटिल आणि डो. रामसुभगसिंघना तुम्ही परस्पर लिहा. मी ही व्यवस्था करुं शकणार नाही.

लि. मोरारजी देसाई

To,
Shri. Morarji Desai
Chief Minister
Bombay State, Bombay.

बंदुकीचा परवाना मिळण्यासाठी दत्त आपटे यांनी रीतसर अर्ज केल्यानंतर स्वतंत्र भारतातील सरकारी खात्यांकडून टोलवाटोलवी होऊ लागली. त्यावर मुख्यमंत्र्याकडे बाजू मांडणारे सडेतोड भाषेतले हे पत्र.

Sir,

I beg to place the following points before you for your kind consideration and disposal.

1. I applied for a sporting license on 23rd April 1953.
2. I got reply of refusal on the 10th June 1953.
3. No grounds for refusal are mentioned therein.
4. The grant of a license depends upon the recommendations from the local Police Authorities.
5. It appears that I did not secure the necessary recommendations from the authorities concerned.
6. I do not know what exact stand they have taken in refusing the license, but according to me it appears baseless.
7. The press discussion and assembly talks are already known to the Government. I regret that I had to endure the same bitter experience. I request the Prime Minister to judge the case from this point of view.
8. I feel that the refusal is a direct charge on me.
9. I do not accept it, and protest it strongly.
10. I request that the grievances, if there be any, should be brought to your notice so that I may correct myself and try to be a good citizen.
11. If it is not possible, my case must be treated justly.
12. I feel that my special position and behavior is not at par with the license-holders of this district and town, and if it be true, I request your Honour to guide me. I am prepared to accept the directive. As a citizen of the independent country I must prove myself worthy of the expected standards.
13. Uptill now I have tried myself to be above the party and the self. I have applied for the license for myself. However, this time my self-respect is injured and this matter being somewhat of public nature, I have ventured to present it before you.
14. A retiring friend of mine offered me his gun as a gift and I have mentioned it in my application, but now whatever may be the case as I am entitled to apply for the license.
15. I have realized certain facts and in the light of these I shall try to be on my guard. But my faith in the special status and role of citizenship will not be shaken by these undemocratic acts of the guard ians of democracy.
16. Lastly I conclude with the words of Andrew Carnegie 'He that cannot reason is a fool. He that will not is a bigot. He that dare not is a slave.'

I may take a chance of meeting you by the end of this month and show you the manuscript.

Your's sincerely
Dutt Apte

N.B. I am prepared to mention some names of the license holders if required and if your honor feels that they are worthier than me, then I have nothing to say.

I thank the collector South Satara

Sd.
11.6.1953

निकटवर्ती राजकीय नेते

D. C. Shaha, M.L.C.
Bankers. Tobacco Merchant.
& Commission Agent.

Gram: "Cuco"
Nipani (Belgaum)
Date ८-३-१९५८

श्री आपटे यांना,

स. न. वि. वि.

आपले तारीख ७-३-१९५८ चे पत्र पोहोचले मजकूर समजला.

आपले आंबवडे हायस्कूलच्या 'रायफल क्लब'चे उद्‌घाटन झाल्याचे वाचून आनंद वाटला. त्या क्लबाचे फंडासाठी मला भेटण्यासाठी केव्हा यावे म्हणून जी विचारणा केलीत ते ठीक आहे. परंतु हल्ली बाजारात खूप मंदी झाली असल्याने, येथील सर्वच व्यापाऱ्यांना सक्त नाडी झाली आहे. तरी या परिस्थितीत आपल्या कामी येथून काही उपयोग होईल असे वाटत नाही. कारण आपण इकडे येण्याचा बेत तूर्त २-४ महिने तरी रहित करावा असे मला वाटते. कळावे लोभ असावा हे वि.

आपला,
D. C. Shah

श्री.एन.एस.
मुख्य मंत्र्यांचे कार्यालय,
सचिवालय, मुंबई १.
दिनांक २४ मार्च १९६०

स. न. वि. वि.

आपले दिनांक १५-३-६० चे पत्र मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना मिळाले. त्यासोबत पाठविलेली पुस्तिकाही त्यांना मिळाली. त्या पुस्तिकेवर त्यांचा अभिप्राय आपणास आवश्यकता नाही कारण ही पुस्तिका आहे त्याच स्वरूपात ... असे त्यांनी कळविले आहे.

आपला
पर्सनल असिस्टंट

को/मेओ-पी/१२/७०३
मुख्य मंत्र्यांचे कार्यालय,
सचिवालय, मुंबई १.

दि. १२-९-५७.
१३

स.न.वि.वि.

आपले दि. २६ ऑगस्ट ५७ चे पत्र मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना मिळाले. भारत सेवक समाजाच्या प्रचारार्थ बोलाविलेल्या सभेचा वृत्तांत त्यांना समजला.

याबाबतीत त्यांनी आपणहून कोणाकडे बोलावयाचे नाही असे ठरविले आहे. परंतु त्यांना जर यासंबंधी कोणी विचारले तर आपण दिलेल्या माहितीचा ते अवश्य उपयोग करतील.

कळावे.

आपला नम्र,
के. बा. आठे
पर्सनल असिस्टंट

9361-PSF/18
PRIVATE SECRETARY.
FINANCE MINISTER,
INDIA.

नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर १९५८

स. वि. वि.

आपले ता. १३ ऑक्टोबरचे पत्र मिळाले. आपल्या संस्थेच्या auditorium योजनेबद्दल येथे शिक्षण खात्यात चौकशी करवीत आहे. ह्याबाबतीत पुन्हा कळवीन. ह्यासाठी योजना मंजूर होण्यासाठी मी शक्य ती खटपट करीन. कळावे.

आपला
(सही)
(खासगी सचिव)

मुख्य मंत्री

महाराष्ट्र

हैद्राबाद हाऊस,
नागपूर.
4 NOV 1977

स. न. वि. वि.

आमदार श्री. बाबासाहेब पाटील यांच्या अकाली व आकस्मिक निधनाबद्दल आपण ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. स्वतःच्या स्वार्थापेक्षा जनसेवेच्या कार्यातून निर्माण होणारे ऋणानुबंध सामाजिक कार्यकर्त्यांच्या जीवनात अधिक निकटचे असतात. याचा प्रत्यक्ष अनुभव कै. बाबासाहेबांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला आलेला आहे. सेवाभावी वृत्तीने जनसेवेची उद्दिष्टे साध्य करण्यात सतत प्रयत्न करीत राहणाऱ्या कै. बाबासाहेबांना योग्य आदरांजली वाहण्यासारखे होणार आहे. आपण निधनाबद्दल व्यक्त केलेल्या भावनांबद्दल पुन्हा आपले आभार.

आपला

( वसंतराव पाटील )

श्री. द. बा. आपटे
कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसा.,
मुंबई.

GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF COMMERCE & INDUSTRY.

Dated New Delhi, ६ फेब्रुवारी १९५७.

स. न. वि. वि.

आपले ता. ३ फेब्रुवारीचे पत्र श्री. मोरारजी देसाई ह्यांना पोहोचले. त्यांचे मतदार संघाला उद्देशून केलेले भाषण आपणास आवडले हे वाचून आनंद वाटला. त्यांना आपण सुयश इच्छिले त्याबद्दल आभार. कळावे.

आपला

(खासगी सचिव)

**शिक्षण मंत्री यांची कचेरी,**
**सचिवालय, मुंबई**

ता. ७/७/१९६१

नुकत्याच झालेल्या मोटार अपघातातून सुदैवाने मी बचावलो. आपण माझेबद्दल ज्या सदीच्छा व प्रेम व्यक्त केले त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे.......... आपला जिव्हाळा असाच कायम राहावा हीच एक विनंती. .....आपले मनोभावे आभार मानतो.

आपला नम्र
(बाळासाहेब देसाई)

8513-FMPS
OFFICE OF THE
PRIVATE SECRETARY TO THE
FINANCE MINISTER, INDIA.

New Delhi ५ सप्टेंबर १९५९.

स. न. वि. वि.

आपले ता. २ सप्टेंबरचे पत्र श्री. मोरारजी देसाई ह्यांना पोहोचले. सहकारी शेतीवरील आपली पुस्तिका प्रसिद्ध झाल्यावर त्यांच्या अवलोकनार्थ पाठवावी. कळावे.

आपला

(खासगी सचिव)

पुरवठा मंत्री
मुंबई राज्य

सत्यमेव जयते

"सह्याद्रि"
रिज रोड, मलबार हिल,
मुंबई, ६

यशवंतराव चव्हाण

दिनांक- २१ सप्टेंबर १९६१

श्री. दत्त आपटे

स.न.वि.वि.

माझ्या मातोश्रींच्या प्रकृतीविषयीं आपण पत्रद्वारें जी आस्थापूर्वक विचारपूस केलीत तीबद्दल व त्यांना लवकर बरें वाटावें म्हणून ज्या शुभेच्छा व्यक्त केल्यात त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. परमेश्वराच्या कृपेने त्यांच्या प्रकृतीमध्यें आतां सुधारणा होत चालली आहे.

कळावें

आपला
यशवंतराव चव्हाण

*ता. २४ जून १९५७*

*आपले .....पत्र मोरारजी देसाई यांना पोहोचले. आपल्या शाळेच्या योजनेबद्दल त्यांना येथून मुंबई सरकारला काही विशेष सांगता येईल असे वाटत नाही. आपले येणे झाले तर सवडीनुसार भेटतील. त्यावेळी ह्या व इतर गोष्टींबद्दल चर्चा होऊ शकेल.*

*आपला*
*वि.या. टोणपे*
(खासगी सचिव)

OFFICE OF THE MINISTER
FOR LABOUR AND LAW
Sachivalaya, BOMBAY 1

ता.१६ एप्रिल १९६०

आपले .....ना.श्री. शांतिलाल ह.शाह यांना उद्देशिलेले पत्र मिळाले....आपण ना.मंत्र्यांना कोल्हापूर मुक्कामी ...दि. १९ एप्रिल १९६० रोजी दु.२.३० नंतर भेटण्याचे करावे.

आपला नम्र
वि.वा. वासुदेव
(खासगी चिटणीस)

Secretarial, Bombay, I

आपले तारीख १०-३-१९५५चे पत्र श्रीयुत मोरारजी देसाई यांना मिळाले. असेम्बलीचे अधिवेशन चालू असल्याने भेटीची निश्चित वेळ देता येणे कठीण आहे. आपण ३॥ ते ४ पर्यंत ता.१४ ते १७ पर्यंत केव्हाही त्यांना कौन्सिलहालमध्ये भेटावे. अखादवेळी अल्प मुदतीत मुलाखतीची मागणी केल्यास देता येईलच असे नाही. मोरारजींना केव्हा वेळ आहे याची अगोदर चौकशी करून मग भेटावयास यावे.

(वि.या.टोणपे)
(खासगी सचिव)

रा. रा. श्री. दत्त आपटे यांस
सां. नं. वि. वि.
श्री. जी. डी. पाटील उपमंत्री हे आपणास आज सायंकाळी ८-३० वाजता श्री. भाऊसाहेब कुलकर्णी लोकूरकर यांचे घरी आपणास भेटू इच्छितात कळावे.

आपला [illegible]
[illegible]
पर्सनल असिस्टंट

कोल्हापूर कचेरी
राजवाडा.
२-८-५६.

Council Hall,
Poona, 26th August, 1953.

To Shri Dutt Apte, B.A. D.P. Ed.,
Sangli.

Dear Sir,

With reference to your letter, dated 20th August 1953, I am directed by Shri B.S. Hiray, Minister for Revenue, Agriculture and Forests, to inform you that you may come and see him in Poona at any time during office hours on Friday, the 4th September, 1953.

Yours faithfully,
(R.T. Nadkarni)
PERSONAL ASSISTANT.

मुख्य मंत्र्याचे कार्यालय
सचिवालय, मुंबअी १
दिनांक २७ डिसेंबर १९५६

आपले पत्र मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना मिळाले.

आपल्याला त्यांनी दिनांक १० जानेवारी १९५७ रोजी १.१५ वाजता सचिवालयात भेटीस बोलविले आहे.

पर्सनल असिस्टंट

## पुस्तक प्रकाशनासंबंधी

टेलिफोन : [illegible] 1958 56

भा. रा. भागवत • सौ. लीलावती भागवत • चंदर भागवत

[illegible] मुंबई [illegible]

२०/११/५८

प्रिय श्री० आपटे
स० न० वि० वि०

आपल्या पत्राला माझ्याकडून उत्तर गेले नाही याबद्दल क्षमा मागतो. खरं म्हणजे आपण [illegible] मुंबईला येत आहात तेव्हा भेटू असे जे आपल्या पत्रात होते त्यावर विसंबून मी [illegible] राहिलो! पण आपले येणे काही कारणाने [illegible] झाले असावे. असो. शिवाय श्री० [illegible] आपले हस्तलिखित आपण मिळवून देऊ शकाल असे आधी वाटले होते.

काही असले तरी या 'माले' करिता आपले पुस्तक निश्चित हवे आहे. तेव्हा आपण [illegible] महिनाभरात पुस्तक लिहाल [illegible] Ghost Stories चा [illegible] आहे. Ghost Stories च्या anthologies [illegible] [illegible]

[illegible]

---

केशव भिकाजी ढवळे [illegible] कर्नाटक प्रकाशन संस्था

कर्नाटक हाउस, गिरगाव, मुंबई ४

श्री: दिनांक १५-१०-५८.

अनेक नमस्कार. वि. वि.

आपण 'स्मृतिग्रंथा' साठी लिहून धाडलेली स्मृतिकुसुमांजलि मिळाली. आम्ही अल्पमुदतींत अगत्यपूर्वक पाठविल्याबद्दल आभारी आहे. छान आहे. अतिशय आवडले. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला,
बागटवडे

[illegible]

---

KESHAV BHIKAJI DHAWALE
PUBLISHER — SHRI SAMARTH SADAN, GIRGAON, BOMBAY.

श्री दिनांक २१ मे '५५.

कृ० नमस्कार वि० वि०

आपली दोन्ही पत्रें मिळाली. आपलें पुस्तक [illegible] [illegible]

कर्नाटक प्रकाशन संस्था

कर्नाटक हाउस,
गिरगाव, मुंबई २

[illegible]

KESHAV BHIKAJI DHAWALE
KARNATAK PUBLISHING HOUSE
PHOENIX PUBLICATIONS

KARNATAK PRINTING PRESS
KARNATAK TYPE FOUNDRY
KARNATAK PROCESS STUDIO

KARNATAK HOUSE, 142 BC, GIRGAUM ROAD, CHIRA BAZAR, BOMBAY 2

[illegible]

आपला,
बाटवडे

केशव भिकाजी ढवळे, प्रकाशक
कर्नाटक प्रकाशन संस्था

कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २


श्री: दिनांक [illegible]

अनेक नमस्कार. वि. वि.

[illegible]

आपला,
बाटवडे

**सांगलीचे जिल्हाधिकारी श्री.चिन्मुळगुंद (पती-पत्नी) हे दत्तोपंतांचे घनिष्ठ मित्र होते. नंतर ते मंत्रालयात सचिव झाले. त्यांचे एक पत्र**



Dear Apte

As the inspection work is still going on at the E.E.'s Office and will be finished this evening, I am going to the E.E.'s Office tomorrow at about P.M.-5. We shall come to your school tomorrow at about P.M. 6, instead of today.

With kind regards

Yours sincerely,

P. J. Chinmulgund.

2/6/61

<u>पुढच्या पिढीला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तिगत वैचारिक पत्राचा नमुना-</u>

दिनांक : २४-३-६३

प्रिय विल.

अ.आ. तुझे सविस्तर पत्र मिळाले. मी काल रात्रीच मुंबईहून एथे परत आलो. गाडगीळ तू आल्याचे व त्यांना कोल्हापुरी पादत्राणे दिल्याचे सांगत होते. ऑलीव्हर ट्रिस्ट प्रसिद्धीच्या मार्गावर असून या महिना अखेर प्रसिद्ध होईल. प्रत पाठवीन. तुला निरोप देणेसाठी मुंबईस येणार पण कामांची एवढी विलक्षण गर्दी होती की, सवड काढणे कठीण. तशात २०ला पंडीतजी व नंदाजी मुंबईस येणार हे माहीत असल्याने पाठोपाठ दुसरा हेलपाटा घ्यावा लागणार हेही स्पष्ट होते. त्याप्रमाणे जावे लागले व मध्यंतरीच्या माझ्या हालचालीवर संमतीचे शिक्कामोर्तब मिळाले. आता कामाचा व्याप अधिकच वाढणार.

तू जवळ जवळ कवीचे काम गद्यात केले आहेस. स्विस भूमीचे वर्णन करणारे गद्यकाव्यच आहे तुझे पत्र. पाश्चात्य संस्कृतीत तुला अध्यात्माचे प्रस्थ आढळणार नाही. एकदा माणसाचे मनावर सुखवादाचा ठसा उमटला की तो पुसणे कठीणच. स्वाभाविक आधिभौतिक सुखसमृद्धीच्या मागे ते लोक धावत जाणार! स्विस लोक याला अपवाद कसे असणार?

शास्त्रज्ञ जगाचे आद्य कारण प्रयोगशाळेत हुडकू लागले की, एकातून अनेक रहस्ये उलगडत जातात, पण त्या उलगड्यांतून निर्माण होत जाणारे संशोधन आधिभौतिक वस्तुमात्राचा पसारा वाढवीत जाते, स्वत:मधून तयार झालेल्या तंतूने कोळी गुरफटावा त्याप्रमाणे मानवाची अवस्था होत जाते. अध्यात्मवादी आदिकारणावर श्रद्धाच ठेवून असल्याने तो या पसाऱ्यातून मुक्त राहतो. हाच पूर्व आणि पश्चिम यामधील फरक! या दृष्टिकोणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न आज पंडीतजींच्या रूपाने साकार झाला आहे...

तू, हणमंता परत आल्यानंतर -दिवाळीत एक खास स्नेहसंमेलन भरवू. हास्यरसाची कारंजी उडविता येतील, असे खास कार्यक्रम ठेवू. शांती, विमी येतीलच. मध्यंतरी वैनीच्या ट्रस्टींना एक झटका देऊन सहा-सात हजार रुपये वसूल केल्याने ती खर्चास तयार आहेच. बाकी सर्व ठीक.

⁂

दिनांक : ७-३-६३

प्रिय विठ्ठल

तुझे पत्र आताच मिळाले. रविवार अखेर -लागलाच तर सोमवार, मी अत्यंत कामात आहे. 'लेबर कन्सिलिएशन' चालणार आहे. तुझे जाणे इतक्या जलदीने ठरले आहे की, ॲडजेस्टमेंटला वावच राहिला नाही. तुझी होणारी वाढती प्रगती मोठी आनंददायक आहे. चि.हणमंता भेटेलच. आमचे एकूण घराण्यांची प्रतिष्ठा फार मोठी आहे, तीत यांमुळे चांगलीच भर पडत आहे. चि.सावळाराम सध्या जतेला असतो, त्याच्या आजोबांच्या त्या भागातील कर्तृत्वामुळे आजही ५० वर्षांनंतर त्याला मान मिळत आहे. पैसा कोणीही मुलाबाळासाठी ठेवतील पण अर्धशतक दोन पिढ्यांना पुरेल एवढी प्रतिष्ठा निर्माण करणे ही मानवी जीवनाची खरी कृतार्थता आहे. तुम्ही लोकांनी हा वारसा टिकवून धरणे हीच भावी कालातील जबाबदारी.

तुझा

दत्तूकाका

**दत्त आपटे यांची विविध कार्यक्षेत्रे दर्शविणारी शीर्षपत्रे (लेटरहेड्स)**



फोन नंबर १०३

**अखिल महाराष्ट्र नाटय विद्या मंदिर समिती सांगली**

**नाट्याचार्य खाडीलकर जन्मशताब्दी महोत्सव.**

C/o. विष्णूदास भावे नाटय मंदिर, हरभट रोड, सांगली.

महोत्सव कार्यकारी समिती :– स्वागताध्यक्षा

श्रीमंत सौ. पद्मीनीराजे पटवर्धन
राजमाता सांगली.

जा. क्रमांक

दिनांक

**सांस्कृतिक कार्य सल्लागार मंडळ**

श्री. वसंतरावदादा पाटील,
वीज व पाटबंधारे मंत्री,
( महाराष्ट्र राज्य )
श्री. त्र्यं. शि. भारदे,
माजी अध्यक्ष,
महाराष्ट्र विधान सभा.
श्री. वि. स. पागे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र विधान परिषद.

**शताब्दी महोत्सव कार्यकारी मंडळ**

श्री. आण्णासो कराळे
,, वि. ज. पाटणकर
,, मधुसूदन करमरकर

**कार्यकारी मंडळ**

श्री. आण्णासो कराळे, अध्यक्ष
वि. ज. पाटणकर, उपाध्यक्ष
बा. आरवाडे, कोषाध्यक्ष
,, दत्त आपटे, कार्यवाह
,, शं. के. निकम ,,
,, के.वि. तथा दादूकाका भिडे सदस्य
,, तात्यासाहेब पाटील ,,
,, जोतीरामदादा पाटील ,,
,, भगवानराव पाटील ,,
,, रामभाऊ आरवाडे ,,
,, गोपाळराव आपटे ,,

---

फोन नं. १५४ पो. बॉ. नं. १००

**–● महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था संचालक–संघ महामंडळ. ●–**

**द्वारा - जी. ए. हायस्कूल, हरभट रोड, सांगली. (महाराष्ट्र)**

अध्यक्ष– **प्रा. गोवर्धनदास पारीख, मुंबई.** उपाध्यक्ष– **श्री. रा. म. नलावडे, सातारा.**
कार्यवाह– **श्री. दत्त आपटे, सांगली.** सहकार्यवाह– **श्री. बा. ग. ठाकरे, नासिक.**

जा. क्रमांक तारीख

---

**अध्यक्ष:–**
*पं. जवाहरलालजी नेहरू*
**चेअरमन:–**
*गुलझारीलालजी नंदा*
**अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश:-**
*त्र्यं. शि. भारदे*

भारत सेवक समाज
BHARAT SEVAK SAMAJ

*दत्त आपटे*
भा. से. समाज, सांगली.


जा. क्रमांक ..........


दिनांक ६.३.५३


दत्त आपटे यांचे हस्ताक्षर




(स्वाक्षरी)







N. B. I am prepared to mention some names of the licence holders if required and if your honour feel that they more worthy them my self I have nothing to say.



# कुलवंशातील नोंदी

श्री

पितृग. नारायण, बाळकृष्ण मोरेश्वर. } कौशिक
मातृ. राधा, तारा लक्ष्मी

मातामह' पेंडसे

मातामही'

पितृव्य केशव, (सप०) } कौशिक
रामचंद्र ,,

भ्रातु: वासुदेव सप० } कौशिक
हरी ,,

मातुल रामचंद्र, महादेव (पेंडसे)
सप० सप०

मातृभ. ताई सभ० काश्यप
येसू सभ० काश्यप
चंद्रा सभ० काश्यप
काशीबा. सभ० शांडिल्य.

आत्मभ. बेनू, जना, मनु, अंबू (सभ०)
… कौंडिण्य, शांडिल्य शांडिल्य
…मय सप० शांडिल्य
…रायण सप० कौशिक.

पितृगणांची यादी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पितृगणी | दत्तात्रय | नारायण | बाळकृष्ण | कौशिक |
| मातृगणी | उमा | राधा | तारा. | |
| मातामह | [illegible] | [illegible] | [illegible] | |
| मातामही | [illegible] | [illegible] | [illegible] | |
| पितृव्य | विनायक | | | कौशिक |
| | गोपाळ | | | |
| | (बापू) स.प. | | | |
| | (आबा) स.प. | | | |
| भ्रातृ: | हर्षवर्धन. | | | कौशिक. |
| मातुल | (नाना) | | | |
| मातृभगिनी. | इंदु. | | | |
| पितृभगिनी. | अंबु स.भ. | | | |
| | स.भ. | | | |
| | स.भ. | | | |
| गुरु. | दत्तात्रय | | | कौशिक |

## वासांसि जिर्णानि यथा विहाय....

सोमवार दि. १ फेब्रुवारी १९८२ या दिवशी सायंकाळी ६.३० वाजता दत्त नारायण आपटे हे कालवश झाले. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबावरच नव्हे तर साऱ्या सांगली शहरावर शोककळा पसरली.

त्यांच्या निधनाविषयी वृत्तपत्रांमधून आलेला मजकूर -

श्री. आपटे यांनी १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. ते रॉयवादी विचारसरणीचे होते. सांगलीची यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी स्थापन करून त्या संस्थेच्या विद्यालयात शिक्षक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले होते. त्यांची काही पुस्तके प्रसिद्ध आहेत. कामगारांची यशवंत सिमेंट फॅक्टरी त्यांनी उभारली. भावे नाट्यमंदिराशी त्यांचा निकट संबंध होता. सोमवार १फेब्रुवारी रात्री त्यांच्या पार्थिवावर अत्यसंस्कार करण्यात आले.

*-(केसरी दि.३-२ १९८२)*

**याच आशयाची वृत्ते नवसंदेश, राष्ट्रशक्ती, तरुणभारत, अग्रदूत वगैरे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली.**

अंत्यविधीच्या प्रसंगी फार मोठा जनसमुदाय लोटला होता. बाबुराव दांडेकर, भूपाल नवले, डॉ.खोत, डी.एल. थोरात, प्रा.भावे, बी.एन.कुलकर्णी, विष्णूआण्णा पाटील, चारूभाई शहा यांनी श्रद्धांजली वाहिली.

त्याशिवाय दहाव्या दिवशी सांगलीच्या नगरपरिषद सभागृहात नागरिकांची शोकसभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी व्यक्त झालेली काही मनोगते-

सांगली शहराच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक जडण-घडणीत दत्तोपंत आपटे यांचा सिंहाचा वाटा आहे. ते शिक्षक, संस्थाचालक, कामगार नेते, राजकीय सामाजिक कार्यकर्ते होतेच, पण ते दिलदार माणूस होते; सांगलीचे भूषण होते. असा माणूस पुन्हा जन्माला येईल असे वाटत नाही.- सभेचे अध्यक्ष दीनानाथ भोसले

एक चांगला शिक्षक, जिद्दीचा कार्यकर्ता व सामाजिक जीवनात ध्येयवेडा असलेला कार्यकर्ता - राजाभाऊ जगदाळे

प्रामाणिक व धमक असलेला कार्यकर्ता -बाळासाहेब गलगले

या शोकसभेत बाबुराव नाईक, शाहीर शंकरराव निकम, गजानन हुद्दार, रघुनाथ पाटील, नामदेव कराडकर, आर.बी.शिंदे, दुधाणे, लिमये, वनेचंद शहा, जोशी, भास्कर पाटील, भा.श्री.ठाणेदार, लता देशपांडे, धों.ल.थोरात, चिंतोपंत गोखले, शिवाजीराव पाटील, श्री.ग.सबनीस, बाजीराव बेलवलकर, मालवणकर, दत्ताजी शिंदे, मारुती कांबळे, मोहन साबळे, बिराज साळुंखे इत्यादींनी दत्त आपटे यांचे कार्य आणि गुणवैशिष्ट्ये सांगून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

आरवाडे हायस्कूमध्येही शोकसभा झाली; त्यात बाबुराव नाईक, रघुनाथराव भिडे, दादूकाका भिडे, रेठरेकर वकील तसेच ग.वा.बापट, परांजपे, साळुंखे बाई, माणगावकर, बी.ए.कुलकर्णी इत्यादींनी त्यांच्या आठवणी सांगून आदरांजली वाहिली.

दत्त आपटे यांच्या पत्नी उषाबाई आणि कुटुंबाकडे सांत्वनपर असंख्य पत्रे आली. अनेक संस्थांनी त्यांच्या ठिकाणी शोकसभा घेऊन दु:खद निधनाबद्दल शोक-ठराव करून पाठविले. त्यामध्ये सांगली शहरातील नागरिकांची विशेषसभा आणि आरवाडे हायस्कूलमधील शोकसभेत झालेले ठराव होते. त्याशिवाय पुतळाबेन शाह कॉलेज, मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, यशवंत हायस्कूल तासगाव, समर्थ व्यायाम शाळा, नगर वाचनालय, सांगली जिल्हा परिषद, फ्रेंड्स असोसिएट्स जत, सोलापूर जिल्हा शिक्षणसंस्था संघ, तरुण भारत व्यायाम मंडळ, ताराराणी विद्यापीठ कोल्हापूर इत्यादींचा समावेश होता. अनेक व्यक्ती, मित्र परिवार व नातलगानींही दत्त आपटे यांना आदरांजली अर्पण केली.

■ ■ ■